उषा पाणंदीकर

म.ग्रं.सं ठाणे
विषय : भू-प्रवास
सं क्र. ७४४

RFFBK-0026749

संदर्भ
ग्र-प्रकाश
७४४
२६६५८
२२४५८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

5 MAY 1993
19 MAY 1993
29 MAY 1993
16 OCT 1993
7 OCT 1995
13 JAN 1996
27 APR 1996
27 APR 1996
22 JAN
17 FEB
९३१९९१
१७
७१९
२५

(क्र. मा. पहा)
१००००—११—८९

# देखणी दक्षिण

उषा पाणंदीकर

REFBK-0026749

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

प्रकाशक

सुनील अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

मुद्रक

हरीश विनायक चौधरी
अजीश कमर्शियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी ३ री गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१

© उषा पाणदीकर
'लिली' ॲक्वम आल्टो
मारगाव, गोवा ४०३ ६०१

प्रथम आवृत्ती मार्च, १९९२

किंमत ५० रुपये

ISBN 81-7161-192-3

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी गोमंतक मराठी अकादमीने अनुदान दिले आहे

ज्याच्या संगतीने
मी हा प्रवास केला
आणि जीवनाचाही प्रवास करीत आहे
त्या माझ्या पतींना
**केशव पाणंदीकर**
यांना

## दोन शब्द

१९ डिसेंबर, १९८७ च्या गोमतक मुक्तिदिनाच्या शुभमुहूर्तावर माझे ' आज इथे, उद्या तिथे ' हे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले जून १९९० मध्ये ' आम्ही लमाण ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि आता या मार्च १९९२ मध्ये माझे तिसरे ' देखणी दक्षिण ' हे पुस्तक प्रकाशित होण्याचा योग येत आहे डॉ सुभाष भेंडे याचे बोट धरून मी सरस्वतीच्या साहित्यसेवकाच्या ' मादियाळी 'त प्रवेश केला आणि कुठे तरी सादीकोपऱ्यात का होईना जागा मिळविली.

भारताच्या चारही दिशांचा मी शोध घेतला पूर्व–पश्चिम आणि उत्तर या दिशाची माझी भटकती मी शब्दबद्ध करून प्रसिद्धीच्या प्रकाशात आणली. राहिली होती ती दक्षिण तिचा दौरा या पुस्तकात वाङ्मयरूपाने मांडला आहे आता मागे वळून पाहिले तर माझे मलाच आश्चर्य वाटते तुकाराममहाराजानी म्हटल्याप्रमाणे ' कवतुक वाटे झालिया वेचाचे ' असेच म्हणावे लागेल

ही एवढी वाटचाल करताना मला वाटेत आप्त, स्नेही, सोबती, मित्रमंडळी भेटली, अनोळखी समीक्षक भेटले सगळ्यांकडून कौतुकाचे, प्रोत्साहनाचेच शब्द कानी पडले गोमंत विद्या निकेतन, गोमंतक मराठी अकादमी, कला अकादमी, गोवा सरकार यानी पारितोषिके

देऊन मला गौरविले मेहता प्रकाशनचे श्री सुनील अनिल मेहता हे वाटाड्यासारखे उभे राहिले झाला प्रवास सुखाचा झाला या सगळ्याची मी आभारी आहे

तिन्ही बाजूनी प्रशात सागरानी वेढलेला हा प्रदेश सुदर आहे, सुपीक आहे, सस्य शामल आहे इथे नेहमीच कला जोपासली गेली आहे आणि धार्मिक दृष्टीने ती पवित्रही मानली गेली आहे इथे वास्तुकला, शिल्पकला, नृत्य, नाट्य कला प्रगत झाली होती, याची साक्ष हा दक्षिणेचा परिसर देतो आणि निसर्गाचाही या भूमीवर वरदहस्त आहे, याचीही आपल्याला प्रचीती येते खरोखरच ही दक्षिण देखणी आहे

पण या गोष्टी सागून समजण्यासारख्या नसतात याची अनुभूतीच घ्यायला हवी दुधाचा पेला मागणाऱ्याना हे ताक वाटेल, पण हे गोड मानून त्यानी तहान भागवून घ्यावी

' लिली ' उषा पाणदीकर

आके मडगाव

# देखणी दक्षिण

मराठी ग्रंथ संग्रहालय
भू-प्रवास
दा. क्र. ६४८

आम्ही अगदी खुषीत होतो अर्थात ज्योतिषाने कुडली न मांडता भविष्य सांगितले असते, कारण पायावर फूल पडलेले आम्ही लोक आम्ही प्रवासाला जात आहोत

या वेळेला आम्ही दक्षिणेकडे जात होतो

लहानपणापासून मला या भूमीचे अप्रुप जिथे तीन सागर धरतीचे पाय धुतात, जिथे एक कन्या भणग प्रियकरासाठी कल्पातापर्यंत कुंवार राहून त्याची वाट पाहते, त्या देशात स्त्रीला केवळ नावाची नाही, खरोखरच देवता मानतात कुटुंब-प्रमुख म्हणून मान देतात अशी काही आकर्षणे मनात बाळगून आम्ही उबरठा ओलांडला होता

आम्ही गोमतकीय, अर्थात समुद्र आमच्या उशा–पायाला, पण काळी नदी-वरून ' जगल 'वरून गाडी न्यायची, हा आदिमानवी अनुभव और होता

हे जगल म्हणजे रान नव्हे मोटारगाड्या वाहून न्यायला जो तराफा असे, त्याला, त्याला जगल असे म्हणत ' ज्यांगाद ' ( Jangada ) या पोर्च्युगीज नावाचा हा अपभ्रंश ज्यांगाद म्हणजे तराफा. दोन–तीन होड्या एकमेकींना बांधून, त्यावर समांतर फळ्या टाकून हा तराफा केलेला असे आणि एक लाँच हा तराफा

ओढून नेई आज काळी नदीवर पूल आहे

सागरवेळेचे अप्रुप नव्हतेच तरीही कारवारचा किनारा 'वेळ' मनात घर करून गेलीच

पाढऱ्या पिवळ्या तगरीच्या फुलासारखे फेसाचे तुरे सागर धरतीला आणून देत होता. तिला खूष करू पाहत होता हे पाहून लालभडक चोचीचे पाढरे पक्षीही खूष झाले होते तिरकी झेप मारून सूर मारू पाहत होते किनाऱ्यावरची तरणीताठी सुरूची झाडे समोरच्या डोंगराला अचकट–विचकट नाचून दाखवीत होती, समोरच्या कुळागरातील पोफळीची झाडे नाक मुरडून अनुरागाने माडाला म्हणाली, 'नस्ले बाये म्हाका सोसना मोगाक भायली सवगा कित्याक !

किनाऱ्यावरच्या कोळणींनी केलेली सुक्या बागड्याची वर्तुळाकार रचना समोरच्या घराच्या अगणात काढलेल्या रांगोळीलाही तोंड पाढरे करायला लावीत होती

उगाच नाही आजारपणात हवा पालटायला आलेल्या रवींद्रनाथाना ही 'वेळ' आवडली होती ! उत्साहाचे टॉनिक घेऊन ते घरी कलकत्त्याला गेले होते आणि मग त्यांच्या हातून 'गीताजली' पुरी झाली होती.

कुमठा होनावरचा गगावळी नदीवरचा पूल पार करून आम्ही गोकर्णाला केव्हा पोहोचलो कळलेच नाही

रावणाची मातृभक्ती या महाबळेश्वर मदिराच्या रूपात पाहावी. 'ताई गिता बद्र विल्ला' मानेसारखे दुसरे दैवत नाही देवाच्या पूजनाशिवाय आई अन्नाचा कण पोटात घेत नाही, हे पाहताच रावणाने महादेवाचे आत्मलिंग मागून आणले पण या मदिराच्या निर्मात्याची दारातल्या एका लहानगा तसबिरीखेरीज कुठेच खूण दिसत नाही ती तसबीर तीही अरविंद त्रिवेदी या नटासारख्याच कुणाची तरी असावी आणि एक मचूळ घाण पाणी दाखवले जाते, ती खूण रावणाची नव्हे, तर माणसाच्या कोत्या मनाची

आणि खोटारडेपणाचा पुरावा तर दारातल्या गणपतीच्या रूपात पाहावा रावणाला अडवून, त्याला कैचीत पकडून त्याने हे लिंग लुबाडले

माणूस माणूसपण विसरला, कृतघ्न झाला, पण महाबळेश्वराने आपल्या या भक्ताला विसरावे ? माणसाची री ओढावी ?

रावण ही असामी नगण्य नव्हती या दक्षिणेच्या सम्राटासमोर मोठेमोठे राजे बिचकून असत विंध्य पर्वताखालची द्रविड सस्कृती ही या राक्षस राजाच्या पराक्रमाची खूण होती हा चौदा चौकडीचा राजा नुसता रणागणावरचाच योद्धा नव्हता, तर कवी होता सगीत, नृत्य जाणकार होता सामवेद पचवून, रिचवून होता पचमवेद, कृष्णयजुर्वेदाची रचना याच्या हातून झाली त्याच्या नावाची सस्कृत

हस्तलिखिते सुचित ग्रथ, कुमार तत्र, प्राकृत कामधेनू, अर्कप्रकाश, इद्रजाल ही अजून आहेत

तो राक्षस होता, पण त्याने राक्षसविवाह केला नाही त्याच्या अत पुरात ब्राह्मण, दैत्य, गधर्व, राक्षस, नाग याच्या सुकन्या होत्या, पण त्या बलात्काराने आल्या नव्हत्या त्याच्यावर बळजबरी नव्हती नल कुबेराची पत्नी त्याच्यावर आशिक होती, पण याने तिला उपदेश करून परत पाठविली मदोदरीशिवाय त्याने दुसऱ्या स्त्रीशी विवाह केला नाही रामाप्रमाणेच तो एकपत्नी होता

सीतेचे हरण हे राजकारण होते शूर्पणखेच्या विटबनेवरचा तो सूड होता तिच्या विरूपकरणीला ते उत्तर होते स्त्रीला कारण म्हणून वापरणे आणि तिला चलन म्हणून वापरणे हा पुरुषी समाजाचा तेव्हाचा धर्म होता

म्हणूनच आर्यांचे भाट वाल्मीकीसुद्धा रावणाचे कौतुक करताना भान विसरतात ' तो वैडुर्यमण्यासारखा निळसर पर्वतासारखा प्रचड ज्याच्या हातांचे व पायांचे तळवे सोनेरी होते बगळ्याच्या पक्तीतल्या सुशोभित असलेल्या वसंतातल्या मेघासारखा ' असा सुदर तो भासला तो आला की सूर्य शीतलता धारण करी पवन मद गतीने वाहत असे नद्या वेग सोडून देत पर्वत कठोरता विसरून जात

त्याचे सौंदर्य, त्याचा पराक्रम, त्याची सपत्ती, सगळे सोडा, पण या रावणाचे महादेवावर अतिप्रेम होते तो त्याचा भक्त होता, चाहता होता, भाट होता आतड्याच्या ताराचे सारगीसारखे वाद्य करून, दहा वर्षे सामवेद गाऊन त्याने महादेवाना प्रसन्न करून घेतले होते, पण वारा येईल तसे सूप देऊन महाबळेश्वर महादेव त्याला विसरले होते

आम्ही देऊळ पाहायला आत गेलो दारातच गणपती उभा दिसला जक्कणाचार्यांशी सबधित असलेले हे देऊळ खूप जीर्ण आहे जीर्ण धाबळचा, मुकटा नेसलेले भटजीही तसेच दिसले एक भटजी महादेवाचे आत्मलिंग पाहायचा आग्रह करू लागला दुसरा पार्वतीची पूजा बाधायला सागू लागला. या लिंगात अर्थात वेगळेपण आहे हे मोठे लिंग नाही पिंडिकेच्या आत मध्यभागी खळगा होता आतले छोटेसे लिंग हाताला लागले लागले ? कोण जाणे !

लैंगिक जीवन हे आपल्या सस्कृतीचे सार जीवनाच्या वाढीकरिता ' काम ' हा गरजेचा, हे आपल्या धर्मातच सांगून ठेवले आहे यज्ञातील सूत्रे धरती ही स्त्री ही अशी उपमा वारुळमृत्तिका कामदेवाची पूजा हे वेगळे काहीच सांगत नाहीत

शकराचे लिंग व पिंडी ही शिव व शक्ती प्रकृती व पुरुष याचे मिलन महालिंग उभा स्तभ व शाळुका ही महायोनी कामयज्ञाचे हे कुड पिंडी ही

गेले पाण्यानेही मुकाट ऐकून घेतले सासुरवाशिणीसारखे ते सोसत राहिले

पावसाचे दिवस सपले होते करगळीएवढी धार पडत होती जोग केविलवाणा झाला होता, पण आता सत्कार्यी लागला होता

पावसाचे थेंब शिंपल्यात पडले तर मोती होतात आणि जमिनीवर पडले तर दाणे आता धबधब्याचे दृष्टिसौख्य नव्हते, पण गरिबाच्या घरातील गजलेले चिमणीचे दिवे गेले होते आता विजेच्या दुधी प्रकाशाने घर उजळून निघत होते रजल्यागाजलेल्याच्या पोटात चार घास जात होते भूमी सस्य श्यामला झाली होती

जातीच्या सुंदराना काहीही शोभते इतके झाले तरी भोवतालच्या निसर्गातले सौंदर्य काडीने उणे झाले नव्हते जोगचा मागचा हिरवाकच्च पहाड एखाद्या वनपुरुषासारखा नटून राहिला होता आपली अदब साभाळून तो दुसऱ्याला देत होता, देतच होता

आम्ही गिरसप्पाचा निरोप घेतला, पण मन मात्र मागेच राहिले एखादे गुपित जपल्याजपल्यासारखे ते मागे ठेवूनच आम्ही पुढे आलो कदाचित ते धबधब्याच्या चिंब धारेत स्नानाचे सुख घेत असेल. गिरसप्पाच्या बागेतल्या लाल शेंदरी गुलाबाच्या कळीभोवती गुंजारत असेल जांभळ्या बोगनवेलीच्या जाळीत दडून बसले असेल हिरव्या निसर्गाची गहराई अनुभवत असेल तळ्यात फुललेल्या कमळमिठीत अडकून पडलेलेही असेल आपले काहीतरी हरवले असल्याचा भास झाला

आम्ही पुढे झालो, चिकमगळूरकडे इंदिरा गांधींना विजयी करणाऱ्या गावाकडे

शिमोगा या गावाविषयी कुतूहल होते, पण तो चारचौघासारखाच होता बिनचेहऱ्याचा आणि आम्ही त्याचे काहीच देणे लागत नव्हतो मग आम्ही त्याची का म्हणून याद ठेवावी ?

आम्हालाही मरगळल्यासारखे झाले होते

भद्रावती येथील लोखंडाचे कारखाने आणि काळाकाळा धूर व धूळ पार करून आम्ही हळेबीडचा रस्ता धरला आणि हा असर हळेबीडच्या आवारात येईतो राहिला

गिरसप्पा हे निसर्गाचे देणे होते अनत हस्ते कमलावराने दिलेले ते दान होते आणि हळेबीड ही दोन मानवी हाताची किमया होती

हळेबीडच्या आवारात आम्ही पाऊल टाकले तेव्हा त्याने आमची पार निराशा केली होती ते बाहेरून अतिसामान्य वाटले होते दारातला बगिचा सुकून गेला होता सर्वत्र रखरखीत, भगभगीत, कोरडे वाटत होते मागल्या भकास उघड्याबोडक्या डोंगरावर भग्नावशेष दिसत होते सगळे कसे पारोसे पारोसे वाटत होते

ज्योत पार्वती परमेश्वराचे रूप मग ही आदिमाया वेगळी का राहते ? तिची देवळे निराळी असतात

सध्याकाळी आम्ही समुद्र पाहायला गेलो

समुद्र गभीर वाटत होता वाऱ्याच्या थपटांनी लाटा उसळत होत्या शिडाच्या होड्या, मचवे डुलत होते हिंदकळत होते किनाऱ्यावर कुणीच नव्हते थडीतला निमुळता दिवस काळोख पाझरू लागला होता तळव्याना गुदगुल्या करणारी पाढरी–पिवळी वाळू परकी वाटू लागली होती पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणारी बगळ्याची माळ मात्र ' निल गगन के चले, धरती के प्यार तले, ऐसे ही जगमे आकाशात पोहत चालली होती

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या गिरसप्पा गावात पोहोचलो गावासारखा गाव झाडीने भरलेली पाणथळ जागा कुद कोदट ओले वातावरण गाई–म्हशी चरत होत्या कोंबड्याचाही कलकलाट चालला होता.

आम्हाला धबधबा पाहायला जायचे होते गिरसप्पा धबधबा म्हणून लहानपणापासून ऐकत होतो गडकऱ्याच्या ' राजसन्यास ' नाटकाने तर त्याच्याशी जवळीक साधली होती या ब्रिटिशांनी त्याचे नाव ' जोग ' असे ठेवले, पण जोग म्हटल्यावर मला उगीच एक हॅटबूटवाला ' हाउ आर यू ? ' म्हणत कोरडे हस्तांदोलन केल्यासारखा वाटतो, तर गिरसप्पा हा अप्पा आपल्या आजोबासारखा ' निद हॅग उदीर ' म्हणत जवळ घेतो पण जोग म्हणजे खड्डा हे ऐकून पोटातच खड्डा पडला

पाणी बरसताना पाहावे, गरजताना पाहावे

मागे एकदा आम्ही आलो होतो, तेव्हा या शरावतीचे पाणी जीवाच्या आकाताने ८०० फूट खोल कोसळत होते महारुद्र रुद्रासारखा गर्जत होता सतीवर अन्याय झाला, तेव्हा हा पेटून दक्ष राजाचे नि:सतान करायला नाचत सुटला होता. तुडवत सुटला होता तशात वीरभद्रही खकाळत खाली येत होता राजा राजासारखा वागत होता पार्वती रॉकेट पाच धारांच्या लवाजम्यासह पचायतन जलराशी घेऊन खाली येत होते खडकाला जणू पाझर फुटला होता गिरसप्पा जमिनीवर झेप घेत होता, खडकाशी अडखळत होता धुके धुके होत होते निळी, हिरवी, गुलाबी इद्रधनुष्ये फुलत होती

हा गिरसप्पा पाहून विश्वेश्वरअय्या आनदित झाले होते, पण त्यांचे वैज्ञानिक मन कोरडेपणाने त्याना व्यावहारिक सल्ला देत होते, ' What a waste of water ! आणि मग ही पाण्याची उधळमाधळ आवरण्यात आली पाण्याला अडवून त्याच्या मुसक्या बाधण्यात आल्या त्याला कोंडून ठेवून त्यावर धरण बाधले

गेले पाण्यानेही मुकाट ऐकून घेतले सासुरवाशिणीसारखे ते सोसत राहिले

पावसाचे दिवस संपले होते करंगळीएवढी धार पडत होती जोग केविलवाणा झाला होता, पण आता सत्कार्यी लागला होता

पावसाचे थेंब शिपल्यात पडले तर मोती होतात आणि जमिनीवर पडले तर दाणे आता धबधब्याचे दृष्टिसौख्य नव्हते, पण गरिबाच्या घरातील गजलेले चिमणीचे दिवे गेले होते आता विजेच्या दुधी प्रकाशाने घर उजळून निघत होते. रजल्यागाजलेल्याच्या पोटात चार घास जात होते भूमी सस्य श्यामला झाली होती

जातीच्या सुंदराना काहीही शोभते इतके झाले तरी भोवतालच्या निसर्गातले सौंदर्य काडीने उणे झाले नव्हते जोगचा मागचा हिरवाकंच पहाड एखाद्या वनपुरुषासारखा नटून राहिला होता आपली अदब साभाळून तो दुसऱ्याला देत होता, देतच होता

आम्ही गिरसप्पाचा निरोप घेतला, पण मन मात्र मागेच राहिले एखादे गुपित जपल्याजपल्यासारखे ते मागे ठेवूनच आम्ही पुढे आलो कदाचित ते धबधब्याच्या चिंब धारेत स्नानाचे सुख घेत असेल. गिरसप्पाच्या बागेतल्या लाल शेंदरी गुलाबाच्या कळीभोवती गुंजारत असेल जाभळ्या बोगनवेलीच्या जाळीत दडून बसले असेल हिरव्या निसर्गाची गहराई अनुभवत असेल तळ्यात फुललेल्या कमळमिठीत अडकून पडलेलेही असेल आपले काहीतरी हरवले असल्याचा भास झाला

आम्ही पुढे झालो, चिकमगळूरकडे इंदिरा गांधींना विजयी करणाऱ्या गावाकडे

शिमोगा या गावाविषयी कुतूहल होते, पण तो चारचौघासारखाच होता बिनचेहऱ्याचा आणि आम्ही त्याचे काहीच देणे लागत नव्हतो मग आम्ही त्याची का म्हणून याद ठेवावी ?

आम्हालाही भरगळल्यासारखे झाले होते

भद्रावती येथील लोखडाचे कारखाने आणि काळाकाळा धूर व धूळ पार करून आम्ही हळेबीडचा रस्ता धरला आणि हा असर हळेबीडच्या आवारात येईतो राहिला

गिरसप्पा हे निसर्गाचे देणे होते अनंत हस्ते कमलावराने दिलेले ते दान होते आणि हळेबीड ही दोन मानवी हाताची किमया होती

हळेबीडच्या आवारात आम्ही पाऊल टाकले तेव्हा त्याने आमची पार निराशा केली होती ते बाहेरून अतिसामान्य वाटले होते दारातला बगिचा सुकून गेला होता सर्वत्र रखरखीत, भगभगीत, कोरडे वाटत होते मागल्या भकास उघड्याबोडक्या डोंगरावर भग्नावशेष दिसत होते सगळे कसे पारोसे पारोसे वाटत होते

त्यातच एका लेकुरवाळ्या कुत्रीवर कुणीतरी धोंडा मारला होता. एका पायावर उभी राहून ती केकाटत होती, विव्हळत होती आणि सभोवती तिची पिल्ले रडून कालवा करीत होती

पण आम्ही आत पाऊल टाकले आणि अलीबाबा झालो तिळा उघडून खजिना बघितल्यावर त्याची झालेली स्थिती काही आमच्याहून वेगळी नव्हती, नसावी

उंच चबुतऱ्यावरचे हे जुळे मंदिर होयशाळ राजाच्या केमतुल्ला या सेनापतीने राजाराणीच्या प्रेमापोटी बांधले हा लाळघोटेपणा असेल, लाघवीपणा असेल, पण त्यामुळे एक खजिना आपल्यापुढे मोकळा झाला १७२१ मध्ये विजयनगरच्या काळात हे मंदिर पुरे झाले

शिवाय या जैनधर्मीय राणीकरिता विष्णुवर्मा ऊर्फ बिट्टीदेव राजाने जैन धर्म स्वीकारला होता, पण राजा नंतर बिथरला आणि तो परत वैदिक धर्मात आला अर्थात कोंधागारात गेलेल्या राणीला हा तोबराही असेल

दारातल्या नृत्य करणाऱ्या गणपतीला, कुबेराला, दुर्गामातेला वंदन करून आम्ही पुढे झालो

दोन्ही लिंगे एरवी होयशाळेश्वराचीच, पण राणी हक्काच्या जाणिवेची जोगवा मागून हक्क मिळत नसतात, हे जाणणारी होती या शांतलेने, या 'नृत्य सरस्वती'ने थयथयाट केला असावा ती अर्ध्या वचनात नव्हे, पण अर्ध्या वाट्यात राहिली एक शिवलिंग तिने स्वतःच्या नावावर करून घेतले होयशाळेश्वर व शांतलेश्वर

शिवाय या जैनधर्मीय राणीकरिता विष्णुवर्मा ऊर्फ बिट्टीदेव राजाने जैन धर्म स्वीकारला होता, पण राजा नंतर बिथरला आणि तो परत वैदिक धर्मात आला अर्थात कोंधागारात गेलेल्या राणीला हा तोबराही असेल.

पण कलावंताला जात, धर्म, वर्ण, रंग नसतो ही शांतलादेवी फक्त अर्ध्या वाट्यात राहिली नाही हे देऊळ उभे करण्यातही खूप झटली ही कलावती होती, कलाकार होती कसलेली नृत्यांगना होती जाणकार होती वीणावादन, गायन यांत पारंगत होती वासंतिक उत्सवाच्या वेळी लक्ष्मीचे रूप, सरस्वतीचे तेज लेऊन ही राणी वावरत असे

इथला प्रत्येक गाभारा तिने नवरंग ठेवला आहे त्याच्या मधोमध नृत्यासाठी सहाणेसारख्या शिळा ठेवल्या आहेत नृत्य पाहावयास बसण्यासाठी आसनेही आहेत

एकदा वस्त्र विरले की ते फाटत जाते एकदा जखम चरली की ती बुजली तरी त्यावर व्रण राहतातच दुखावलेल्या शांतलेने मनाची उभारी मग धरलीच नाही या मानी स्त्रीने मग गरूडव्रत घेतले शेवटी ती शिवगंगेवर गेली आणि तिने

आत्माहुती दिली

ही इथली दोन्ही प्रचंड शिवलिंगे अर्थात त्यांची वाहने आलीच दारात एकमेकाकडे तोंड करून बसलेले हे दोन्ही नंदिकेश्वर एकाच दगडात कोरलेले आहेत त्यांची बसण्याची ऐट, त्यांची वशिंडे, त्यांच्या थरथरणाऱ्या नाकपुड्या, त्यांचे पायाचे खूर, त्यांच्या समीप असलेल्या स्वामींची शितावरून भाताची कल्पना देतात

( दक्षिणेतल्या मंदिराची भव्यता त्यांच्या गोपुरावरून तोलली जाते जास्तीत जास्त उंच गोपुर बांधणे हे त्या वेळचे समृद्धीचे लक्षण उत्तुंगतेचे लक्षण राजेशाहीच्या मस्तकावरील तुरा, परकियाशी झगडताना देवालयातील मूर्ती विटाळू नये, ही सोवळी सनातन कल्पना ही गोपुरे बांधण्यामागे होती किल्ले कोट नाहीत. प्रदेश सपाट, तेव्हा शत्रूची टेहळणी त्यांच्याशी दोन हात करण्यासाठी ढालीसारखा या गोपुरांचा उपयोग होत असे आणि अरिष्ट, पूर या संकटांना ही गोपुरे आईच्या मायेने कांगारूसारखी लोकांना पोटात घेऊन बसत )

पण या हळेबिड मंदिराला गोपूर नाही त्याचा माथा सपाट आहे एक त्रिशुलयुक्त कळस गौरवाने आपल्या स्वामींची गाथा गातो

हे विनगोपूर असण्याचे कारण असे देतात की, अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफर याने या मंदिराचा विध्वंस करण्याचा खूप प्रयत्न केला. तेव्हा हे मंदिर मातीने झाकून गाडून ठेवण्यात आले गोपूर चुगल्या करील म्हणू त्याला उतरवण्यात आले

'हळे' म्हणजे जुनी व 'बीड' म्हणजे राजधानी हातात संपत्ती आली राज्यात समृद्धी आली म्हणजे प्रथम आपली राजधानी दुसरीकडे वसवायची ही हुक्की सर्व राजांना येत असे विजयनगरच्या राजांनीही हेच केले त्यांनी आपली नवी बीड बेलूरला वसवली आणि दोरासमुद्र हळेबीड झाली

या होयसाळ घराण्याची व्याख्या अशी करतात एक जैन ऋषी तपाला बसला होता त्याच्यावर वाघाने झडप घातली 'सळ' नावाचा एक आदिवासी तरुण हातात खंजीर घेऊन वाघाला मारण्यासाठी धावला यतीच्या तोंडून शब्द बाहेर पडले 'होय सळ' 'होय' याचा अर्थ होता हाण, मार. वाघाला मारण्याचा हा पराक्रम, पौरुष दाखवणारे चिन्ह दारात उभे आहे राजमुद्रेवरसुद्धा हाच पुरुष आहे

हासन जिल्ह्याच्या सीमेवरचे, चिकमगळूरच्या डोंगरावरचे हे होयसाळ पुरुष खूप पराक्रमी होते ११ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंत ३०० वर्षे या हासन ऊर्फ सिंहासनपुरीच्या राजांनी गाजवली भारताची आण्विक प्रयोगशाळा याच गावात आहे लोक अभिमान धरून आहेत

रामानुजनचा चेला होयसाळ राजा मिलिंद याने चोला राजाना हरवल्यानतर विजयाचे प्रतीक म्हणून या पत्थरातून कलाकृती कोरल्या हे हळेबीड मदिर म्हणजे आर्यन, द्राविडियन सस्कृतीचा मिलाफ असे सागतात नागज, मल्लप व दारुप या तीन शिल्पकारांच्या तीन पिढ्याची ही किमया सर्वस्व अर्पण केल्यामुळे ही कला सजीव झाली येथील दगड कोरायला कठीण काळा खडक, पत्थर, तरीपण हे रेशमाच्या विणीसारखे कोरीव काम, अप्सराच्या वस्त्रावरील चुण्या, मेखलावरील नक्षी, अलकाराची कलाकुसर हे सगळे अवर्णनीय आहे

वसुदेव कृष्णाला यमुनेच्या तडीपार करीत असताना नदीतले मासे, मगरी भीती, आश्चर्य व कुतुहलाने बघत आहेत त्याच्या डोळ्यात आनद मावेनासा झाला आहे

किरात वेषातील शकर उमेला डिवचून खूण करीत आहे ओठावर हात ठेवून पार्वतीने केलेला तो ' इ ' आणि महादेवाच्या चेहऱ्यावर ते खोडसाळ हास्य काय सुदर म्हणणे, मोठे कठीण '

एक कहाणी सागतात येशूला पाहिल्यावर, त्याने स्पर्श केल्यावर पाण्याने आपल्या स्वामीला पाहिले आणि ते लाजले, आरक्त झाले तसेच या कारागिराचे कुशल हात लागल्यावर हा वज्रादपी कठोर असलेला पाषाण फुलाहूनही कोमल झाला असेल, लोण्याहूनही तो मऊ बनला असेल

थोड्याचे म्हणणे हा असा नव्हता हा मऊ होता एकाही हळव्या अतः-करणाची व्यक्ती जगाचे टक्केटोणपे खाल्ले म्हणजे बधीर होते, कठोर मनाची होते तसेच हे आम्ही आत गेलो

पहिली राग अर्थात हत्तीची हत्ती हे स्थैर्याचे, स्वास्थ्याचे, समृद्धीचे प्रतीक हत्ती म्हणजे गजलक्ष्मी प्रत्येक मदिराच्या तळाशी ही रांग असतेच असते त्यातून बारकाईने पाहिले तर कळते, एक हत्ती हा दुसऱ्यासारखा कुठल्याच शिल्पात नसतो हत्ती म्हणजे सुपाएवढे कान, बारीक डोळे असा एकछापीपणा कुठेच नसतो इथेही नाही

काही हत्ती शूरवीर आहेत झुज देण्याच्या पवित्र्यात आहेत रग, मद त्याच्या गडस्थळाच्या नसानसातून दिसतो एक हत्ती शेळपट तो ची ची करून पळत सुटला आहे एक राजस, गभीर तत्त्वज्ञासारखा, तर एक गिस्कील, चावट आहे बहुदा ओलेतीला बघण्याचा त्याला शौक असावा त्यालाही स्नानाचे वेड तिच्यावर सोंडेतून धाराचा वर्षाव सुरू करतो, तर एकटा बिचारा लाकडाला साखळदडाने बाधला गेला आणि एक लाकडाचा ओडका वाहतो आहे आणि एक खटचाळ त्याला पायात विळखा घालून फशी पाडत आहे, त्याला ढकलून देत आहे त्याच्या नजरेतले ते भाव टिपण्यात कलाकाराचे अप्रतिम कौशल्य आहे

दुसरी रांग सिंहाची सिंह हे तर पौरुषाचे प्रदर्शन गळ्याभोवती गर्द आयाळ असलेला हा केसरी म्हणजे गूढ, विशाल अर्थ असलेला हा शार्दुल राजा

आपल्या संस्कृतीत कमल हे तार त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे ' कमलायन, कमलेक्ष, कमलकिरीट, कमलमुद्रायें नुतपद कमला, कमला ' ते तर लक्ष्मीचे आसन ती कमलांतच निजते, कमलच पांघरते किंवा लक्ष्मी म्हणजेच कमला, कमळजा

नतर वेलींची कलाकुसर वेल हे सर्जनाचे प्रतीक सुफलतेचे प्रतीक पृथ्वीचे, वसुंधरेचे प्रतीक

जसे गर्भाशय हे मानवी बीज उमलण्याचे स्थान ही सगळ्या सगळ्यात सुरक्षित जागा तसाच कुंभ हा नवा कोंभ उगवण्याची जागा सगळीकडे धान्य रुजवण्याच्या वेळी हा कुंभ ठेवलेला असतो कुंभ हे मंगल चिन्ह समजले जाते

तशीच स्वस्तिक, गोपद्म, कुंभ वगैरे मंगलचिन्हेही इथे दिसतात

कीर्तिमुखाच्या रूपात राक्षस असतातच ती तर सामान्य माणसे आणि ते पायाशी दाखवले जातात छतावर अष्टदिक्पाल तर गाभाऱ्यावर गळ्यात नररुंड-माला, कवटया घातलेले द्वारपाल नंतर अश्व, कुठे प्यादी, कुठे बुद्धिबळ पट, कुठे मद्याचे रिते प्याले, कुठे नाग आणि कमळ, कुठे फुले, फळे या चिऊकाऊच्या गोष्टी

एक हंसी आपल्या पिल्लांना भरवीत आहे घास देण्यासाठी तिचा तो वासलेला आ आणि डोळे न फुटलेल्या पिल्लांची ती खाण्यासाठी केलेली धडपड हे मातृभोजन पाहून आपल्याही मनात वात्सल्य उभे राहते, पण हा हंस निरक्षीर विवेकबुद्धीचा म्हणून दाखवला आहे

दैत्यगुरू शुक्राचार्य मदिरा पीत कदंब वृक्षाखाली बसले आहेत कदंब म्हणजे मदन, पण शुक्राचार्य चळले नाहीत, तर चळली आहेत गोपी, गाई, वासरे आणि झाडेझुडपेसुद्धा

वेणुगोपाळच्या मुरलीने केळीचे दुमडलेले पानसुद्धा थरथरत आहे आणि एकीकडे वाऱ्याने एक साखळी हलल्याचा भास होऊ लागला

एका भिंतीवर रामभंग, द्विभंग, त्रिभंग शिल्पकला दिसते. रामायण—महा-भारतातील कित्येक कथा — कृष्ण पावा वाजवीत आहे आणि गाईंना पाडसांना पाजण्याचेही भान नाही आणि शबरीने चाखून ठेवलेली बोरे राम तोंडात टाकून ती चघळण्याचे विसरून गेला आहे

एकीकडे कैलास पर्वत उचलून धरणारा रावण दिसतो, तर दुसरीकडे रामाच्या विवाहाची धामधूम चालू आहे कोरीव कामाची कमाल या कलाकारांनी दाखवली आहे कैलास पर्वतावर एक शेंगदाण्याएवढा बैल दिसतो आणि शंकराला

बिलगून बसलेल्या पार्वतीच्या भागटिळ्यावरील रत्ने मोजून घेता येतात आणि हातातल्या हलणाऱ्या ककणावरील स्वस्तिकाची नक्षी दिसते

गाइडने एकीच्या हातातले ककण सरकवून तर दुसरीच्या गळ्यातला हार काढून दाखवला

एकीकडे पिंपळपानावर अगठा चोखत प्रलयाची वाट पाहत असलेला बाळकृष्ण दिसतो, तर दुसरीकडे एका मुलाचे कोवळेसे बाळाचे खेळणे दिसते आणि त्या खेळण्याचे आणखी छोटे खेळणे दिसते आणि त्या इटुकल्या खेळण्याचे विचकलेले दात दिसतात

अलकारामुळे माणसाला शोभा येते का ? की माणसामुळे अलकार सुदर वाटतात ? बाहेर सरताना दारातले शिवाचे द्वारपाल पाहावेत हे नखशिखात दागिन्यानी नटले आहेत त्याच्या मुगुटाची टोके कानातल्या कुडलापर्यंत पोहोचली आहेत, पण कुडलामागच्या फुललेल्या चाफ्यासारखा कान आणि भालप्रदेशावरचा कमळासारखा डोळा हे त्या अलकाराना मागे सारतात

काही मूर्ती पोकळ आहेत त्यांच्या कानांतून काडी घातली तर तोंडातून बाहेर येते एका कानातून घातली तर दुसऱ्या कानातून बाहेर येते काहींची काडी मात्र जिथल्या तिथेच राहिली थोडे लोक, एका कानातून ऐकले तर दुसऱ्या कानातून सोडून देतात काही महाभाग ऐकलेली अफवा दाहीदिशाना पसरवतात, तर थोडे ऐकलेले आतल्या आत ठेवून देतात पोटातल्या पोटात दडवून ठेवतात त्याचे हे विश्लेषण ही व्यगोत्री असेल का ?

एका पक्तीत विष्णुवर्धन राजा दरबारात बसला आहे बरोबर केमतुल्लाही दिसतो एक कार्य भरून पावले दोघाच्याही चेहऱ्यावर कृतार्थता निथळत आहे

मदिरात दिवा नाही, वात नाही हे मदिर टुरिझमच्या ताब्यात आहे, पण एक बारा वर्षांचा पोरगा धोतर नेसून जेव्हा आरती करू लागला, तेव्हा आरती दाखवण्याची नव्हे तर ताकाआड भाडे लपवण्याची त्याची धडपड त्याच्या चेहऱ्यावर ओशाळेपणा दाखवून गेली

आणि त्याच्या भाड्यात आम्हाला काही टाकणे योग्य वाटले ते आमच्याच पदरात काही टाकून गेले त्या कर्पुरारतीच्या उजेडात जे शिल्प दिसले, ते मनात कोरून राहिले वास्तविक टुरिझम खात्याने तिथे प्रखर दिव्याची सोय करायला हवी

बाहेर एक मोठे नाटच होत होते दोन बाया एकमेकींशी भाडत, झिंज्या ओढत होत्या, बोचकारत होत्या आणि एकमेकींना शिव्याची लाखोली वाहत होत्या शेवटी नेसण ओढीपर्यंत पाळी गेली

त्याचे असे झाले होते आम्ही एक पोरगा वाटाड्या घेतला होता देऊळ हिंडता हिंडता आणखी एक आला दोघेही एकाच वर्णाचे, टपोऱ्या डोळ्यांचे काळेसावळे होते आम्हाला काहीच कळले नाही दोघांमध्ये थोडाच फरक Babi shabi pouca difference एकाने देऊळ दाखवले होते दुसऱ्याने पैसे घेतले होते

सख्खे भाऊ पक्के वैरी म्हणतात आणि या त्यांच्या बायका जावा–जावा, उभा दावा म्हणूनच या पोरग्यात सारखेपण असावा हे दोन्ही पोरगे मात्र आयाची ही भांडणे हातात हात घालून पाहत होते पोट धरधरून हसत होते आडाचे पाणी शेवटी नदीलाच मिळते

अरुंद गल्ली, झोपडीवजा बुटकी घरे, दगडधोंड्यांनी भरलेला प्रदेश आणि धुळीचे लोट आम्ही बेलूर नावाच्या खेड्यात पोहोचलो, पण आम्हाला आता एक माहीत झाले होते बाहेरच्या अगाला, ढगाला फसू नये

चहुबाजूंनी पंचायतन देवळे जिकडे तिकडे कोरीव कोनाचे खांब आणि मध्यभागी आकाश फोडून बाहेर निघालेले चन्नकेशवाचे मंदिर

चन्नकेशव म्हणजे सौम्य, प्रसन्न कृष्ण शीतल, सुंदर विष्णू स्वामी सज्जन साधा असला म्हणजे सेवकाने तेज ‘ शिटूक ’ असायला हवे त्याने तसे व्हायला हवे त्याने काळेबेरे ओळखायला हवे आल्यागेल्यावर नजर ठेवायला हवी सावधगिरीने वागायला हवे

आणि हा विष्णूचा सेवक तसा नाही आहे पुढच्या एका बुटक्या देवळीत दारातल्या पितळी दीपस्तंभाजवळ हा गरुड बावळटपणाने उभा आहे पण हा.. त्याला माणसांचे अगत्य आहे यजमानासारखे हा आपले स्वागत करतो त्याचे हात जोडलेले आहेत नाहीतर हाताला धरून त्याने आपल्याला आत नेले असते

त्याचे अगत्य स्वीकारून आपण आत जातो

‘ ना मारो पिचकारी ’ ही चीज एरवी कुणीही म्हणो पण म्हणणारी नायिका स्त्री असे अभिप्रेत असते पुराणातले कृष्ण–राधा असे काव्यमय, शृंगारिक युगुल त्यात असते, पण इथे एक रंगेल नवयौवना आपल्या प्रियकराला भिजवीत आहे पिचकारीने त्याचे अंग अंग भिजवून ती त्याला जेरीस आणीत आहे आणि नको ’ची आर्जवे करण्याची पाळी त्याच्यावर आली आहे आणि तिची दासी की सखी कोण जाणे ती तर इतकी बहात्तर खोलीवाली खटचाळ, खोडसाळ आहे खुदूखुदू हसून ती हिला भरीस पाडते आहे, उद्युक्त करते, तिला प्रोत्साहन देते

असले फालतू उद्योग काय रिकामटेकड्यांनाच शोभावेत, सुचावेत ? आमची

बिलगून बसलेल्या पार्वतीच्या भागटिळ्यावरील रत्ने मोजून घेता येतात आणि हातातल्या हलणाऱ्या ककणावरील स्वस्तिकाची नक्षी दिसते

गाइडने एकीच्या हातातले ककण सरकवून तर दुसरीच्या गळ्यातला हार काढून दाखवला

एकीकडे पिंपळपानावर अंगठा चोखत प्रलयाची वाट पाहत असलेला बाळकृष्ण दिसतो, तर दुसरीकडे एका मुलाचे कोवळेसे बाळाचे खेळणे दिसते आणि त्या खेळण्याचे आणखी छोटे खेळणे दिसते आणि त्या इटुकल्या खेळण्याचे विचकलेले दात दिसतात

अलकारामुळे माणसाला शोभा येते का ? की माणसामुळे अलकार सुदर वाटतात ? बाहेर सरताना दारातले शिवाचे द्वारपाल पाहावेत हे नखशिखात दागिन्यांनी नटले आहेत त्याच्या मुगुटाची टोके कानातल्या कुडलापर्यंत पोहोचली आहेत, पण कुडलामागच्या फुललेल्या चाफ्यासारखा कान आणि भालप्रदेशावरचा कमळासारखा डोळा हे त्या अलकारांना मागे सारतात

काही मूर्ती पोकळ आहेत त्याच्या कानांतून काडी घातली तर तोंडातून बाहेर येते एका कानातून घातली तर दुसऱ्या कानातून बाहेर येते काहीची काडी मात्र जिथल्या तिथेच राहिली थोडे लोक, एका कानातून ऐकले तर दुसऱ्या कानातून सोडून देतात काही महाभाग ऐकलेली अफवा दाहीदिशांना पसरवतात, तर थोडे ऐकलेले आतल्या आत ठेवून देतात पोटातल्या पोटात दडवून ठेवतात त्याचे हे विश्लेषण ही व्यगोत्री असेल का ?

एका पक्तीत विष्णुवर्धन राजा दरबारात बसला आहे बरोबर केमतुल्लाही दिसतो एक कार्य भरून पावले दोघाच्याही चेहऱ्यावर कृतार्थता निथळत आहे

मदिरात दिवा नाही, वात नाही हे मदिर टुरिझमच्या ताब्यात आहे, पण एक बारा वर्षांचा पोरगा धोतर नेसून जेव्हा आरती करू लागला, तेव्हा आरती दाखवण्याची नव्हे तर ताकाआड भाडे लपवण्याची त्याची धडपड त्याच्या चेहऱ्यावर ओशाळेपणा दाखवून गेली

आणि त्याच्या भाड्यात आम्हाला काही टाकणे योग्य वाटले ते आमच्याच पदरात काही टाकून गेले त्या कर्पुरारतीच्या उजेडात जे शिल्प दिसले, ते मनात कोरून राहिले वास्तविक टुरिझम खात्याने तिथे प्रखर दिव्याची सोय करायला हवी

बाहेर एक मोठे नाट्य होत होते दोन बाया एकमेकीशी भाडत, झिंज्या ओढत होत्या, बोचकारत होत्या आणि एकमेकींना शिव्याची लाखोली वाहत होत्या शेवटी नेसण ओढीपर्यंत पाळी गेली

त्याचे असे झाले होते आम्ही एक पोरगा वाटाड्या घेतला होता देऊळ हिंडता हिंडता आणखी एक आला दोघेही एकाच वर्णीचे, टपोऱ्या डोळ्यांचे काळेसावळे होते आम्हाला काहीच कळले नाही दोघामध्ये थोडाच फरक Babi shabi pouca difference एकाने देऊळ दाखवले होते दुसऱ्याने पैसे घेतले होते

सख्खे भाऊ पक्के वैरी म्हणतात आणि या त्यांच्या बायका जावा–जावा, उभा दावा म्हणूनच या पोरग्यात सारखेपण असावा हे दोन्ही पोरगे मात्र आयाची ही भाडणे हातात हात घालून पाहत होते पोट धरधरून हसत होते आडाचे पाणी शेवटी नदीलाच मिळते

अरुंद गल्ली, झोपडीवजा बुटकी घरे, दगडधोंड्यांनी भरलेला प्रदेश आणि धुळीचे लोट आम्ही बेलूर नावाच्या खेड्यात पोहोचलो, पण आम्हाला आता एक माहीत झाले होते बाहेरच्या अगाला, ढगाला फसू नये

चहुबाजूनी पचायतन देवळे जिकडे तिकडे कोरीव कोनाचे खांब आणि मध्यभागी आकाश फोडून बाहेर निघालेले चन्नकेशवाचे मदिर

चन्नकेशव म्हणजे सौम्य, प्रसन्न कृष्ण शीतल, सुदर विष्णू स्वामी सज्जन साधा असला म्हणजे सेवकाने तेज 'शिट्टक' असायला हवे त्याने तसे व्हायला हवे त्याने काळेबेरे ओळखायला हवे आल्यागेल्यावर नजर ठेवायला हवी सावधगिरीने वागायला हवे

आणि हा विष्णूचा सेवक तसा नाही आहे पुढच्या एका बुटक्या देवळीत दारातल्या पितळी दीपस्तभाजवळ हा गरुड बावळटपणाने उभा आहे. पण हा... त्याला माणसांचे अगत्य आहे यजमानासारखे हा आपले स्वागत करतो. त्याचे हात जोडलेले आहेत नाहीतर हाताला धरून त्याने आपल्याला आत नेले असते

त्याचे अगत्य स्वीकारून आपण आत जातो

'ना मारो पिचकारी' ही चीज एरवी कुणीही म्हणो, पण म्हणणारी नायिका स्त्री असे अभिप्रेत असते पुराणातले कृष्ण–राधा असे काव्यमय, शृगारिक युगुल त्यात असते, पण इथे एक रगेल नवयौवना आपल्या प्रियकराला भिजवीत आहे पिचकारीने त्याचे अग अग भिजवून ती त्याला जेरीस आणीत आहे आणि 'नको'ची आर्जवे करण्याची पाळी त्याच्यावर आली आहे आणि तिची दासी की सखी कोण जाणे ती तर इतकी बहात्तर खोलीवाली खटचाळ, खोडसाळ आहे खुदुखुदु हसून ती हिला भरीस पाडते आहे, उद्युक्त करते, तिला प्रोत्साहन देते

असले फालतू उद्योग काय रिकामटेकड्यांनाच शोभावेत, सुचावेत ? आमची

पुरुषमंडळी आम्हाला खिजवतील, पण त्या आधीच त्यांना उत्तर मिळाले एक स्त्री मृगया करून आली आहे खूप थकली आहे ऊर धपापतो आहे कपाळावरून घर्मबिंदू ओघळत आहेत बरोबरच्या स्त्रीच्या हातात भले मोठे हरणाचे धूड आहे. एका हाताने पेलत तिने ते आणले आहे

भिंतीवरच्या छताच्या चारी बाजूंना आहेत सौंदर्यशालिनी बेचाळीस अप्सरा. एकीसारखी दुसरी नाही या किन्नरी वेगवेगळ्या नाट्यमय मुद्रा लेवून उभ्या आहेत मोहक अंडाकृती चेहरा, सरळ चाफेकळी नाक, धनुष्याकृती भुवया, मोहक तोंडली ओठ, मासोळीसारखे चंचल नेत्र, मखमली उदर, कर्दळी मांड्या, यौवनाने टचटचलेले उन्नत उरोज, केळीच्या सोप्यासारखे पाय आणि आषाढ घनासारखा भरघोस केशसंभार   हा सौंदर्याचा अर्क आहे

यांची नावेच आहेत हस्तिणी, चित्रिणी, भामिनी, कामिनी, पूर्ण मोहिनी, गौरी, सुगंधा, चित्रलेखा, चैत्रावली, दर्पण सुंदरी, गानमंजिरी, धनुष्य देहिनी, कपोलभैरवी

या श्रीमंताघरच्या स्त्रिया नाहीत या नायिका आहेत, गणिका आहेत, नगरवधू आहेत या नुसत्याच सुंदर नाहीत या ६४ विद्याकलांत प्रवीण आहेत सोळा शृंगार त्यांना अवगत आहेत त्या सकलकलामंडित आहेत नृत्यकला, चित्रकला, संगीत, काव्य यांत त्या निपुण आहेत रतिविलासात त्या निष्णात आहेत त्या पाककलाप्रवीणही आहेत पुरुषांना वश करण्याचा मार्ग ओठातून जातो, तसा पोटातूनही जातो, त्यांना माहीत आहे

या वारयोषितांपैकी चंद्रसेना या सम्राट अशोकाच्या राजनर्तकीचे कलिंग राजकुमारावर प्रेम होते, पण जनहितासाठी त्याला तिला दूर लोटावे लागले

नगरवधू चित्रलेखा ही सेनापती विजयगुप्ताच्या प्रेमासाठी सर्वस्वाचा होम करून उजळून निघाली स्कंदपुराणात सांगितल्याप्रमाणे पिंगला ही ' वेश्या असुनि पतिव्रता   नेमिला जो पुरुष तत्त्वता   कोणासही वश नव्हे ' अशी होती

आपले तन, मन, धन गौतम बुद्धाला अर्पण करणारी आम्रपाली हीसुद्धा नगरवधूच होती कौटिल्याने चंद्रगुप्ताच्या शत्रूंना वश करून त्यांचा नाश करण्याकरिता अशा नगरवधू राखल्या होत्या मृच्छकटिकातली वसंतसेना ही नुसती काव्यकल्पना नाही, हे त्या त्या वेळच्या समाजव्यवस्थेचे चित्रण आहे

पाहता पाहता आपल्या ध्यानात येऊन चुकते की, या मदनिकांच्या कमरेखाली फक्त अर्धवस्त्र आहे, पण त्यांचे सारे अंग अलंकारांनी भरलेले आहे गळ्यात, कानात आभूषणे आहेत डोक्यावर किरीट आहे कपाळावर भांगटिळा आहे कमरेवरची मेखला खालचे ओटीपोट झाकते, तर गळ्यातले दागिने वक्षस्थळे लपवून ठेवतात

कपड्यांनी अंग झाकावे दासदासींनी . भिक्षूनी संत–सतिणींनी आपला सौष्ठवपूर्ण देह लपवून का ठेवायचा ? निसर्गाची ही सुंदर कृती झाकून का टाकायची ?

आणि हे उणे पडते म्हणून दुसऱ्याला विद्ध करण्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे विभ्रम, शृंगार, नखरे, आर्जवे, राग, रुसवे, अबोला, त्रागा, ताठा .

नेहमी सुंदर स्त्रीची कल्पना म्हणजे गुलछडीसारखी लवचिक, वेलीसारखी कोमल, वेताच्या छडीसारखी शिडशिडीत अशी असते पण इथल्या एकूण एक स्त्रिया संस्कृत वाङ्मयातील नायिकेसारख्या ठेंगण्या पण प्रमाणबद्ध, बांधेसूद, कोरीव आणि लालित्यपूर्ण आहेत

सौंदर्याची व्याख्या करणे कठीण असते संस्कृतीप्रमाणे सौंदर्याची कल्पना बदलत राहत असते

ब्रह्मदेशात जिराफाच्या मानेसारख्या उंच मानेच्या स्त्रिया या सौंदर्यवती म्हणवल्या जातात चीनमध्ये सुंदर बनवण्यासाठी तिचे पाय लोखंडी पट्टीमध्ये मुडपून बांधले जात असत लहान पायावर ती लुटूलुटू चालली की ती कौतुकाचा विषय होई आफ्रिकेत डोळे बारीक, ओठ जाड फताडे, रंग जास्तीत जास्त काळा व उरोज, कंबर मोठी ती सौंदर्यसाम्राज्ञी म्हणवली जाते

सगळे मंदिरच जेव्हा नक्षत्र बनून राहते, तेव्हा तिथला गाभाराही नक्षत्राकृती असायला हवा त्याने तसे व्हायलाच हवे. तो त्याचा धर्म असतो त्याचा तिथेच मान असतो, आब असतो

आम्ही आत गेलो शंखचक्रपद्मगदाधारी विष्णू आपल्या श्रीदेवी भूदेवीसह स्मितहास्य करीत गाभाऱ्यात उभा होता

गर्भगृहाबाहेरचा स्तंभ पूर्वी नारायण स्तंभ म्हणून ओळखला जायचा याच्यात दडित स्त्रीबीजे असावीत पूर्वी तो आपल्याच आसाभोवती फिरत, आपल्याच सौंदर्यात मश्गुल असायचा अर्थात तो मोहिनीस्तंभ म्हणून नंतर ओळखला जाऊ लागला

पाच फूट उंच अशा चबुतऱ्यावरच्या या देवालयात नवग्रह मंडप आहे यात ४८ दगडी स्तंभ एकासारखा दुसरा नाही प्रत्येक आगळा नि वेगळा गोल, चौकोनी, त्रिकोनी, अष्टकोनी, दशकोनी आणि बाराकोनीसुद्धा आहेत प्रत्येक स्तंभावर विष्णुमूर्ती आहेत हे स्तंभ काळेकुळकुळीत, पॉलिश केल्यासारखे चकाकतात त्यांना पाहून संगमरवरानेही तोंड पांढरे करावे हत्ती कामाला लावून हे स्तंभ घासून गुळगुळीत केले होते

होयसाळ राजवंशातील शेवटचा राजा विष्णुवर्धन याच्या कारकीर्दीतले हे

मंदिर अर्थात राजाराणीला पुजायलाच हवे राजाराणीचे शिल्प पुजायलाच हवे. राजाराणीचे शिल्प असल्याशिवाय मंदिर कसे पुरे होणार ? राजाच्या दरबारातला देखावा चितारला आहे राजाच्या शेजारी ' सखी राज्ञी युवती ' अशी होयसाळ राणी शांतलादेवी बसली आहे तिच्या हातात पानाचे त्रिदल आहे

तरी शांतलादेवीची हौस भागली नसावी हीच शांतला गाभाऱ्यातील एका स्तंभावर दिसली गाभाऱ्यात अंधार होता तेव्हा गाइडने विजेरीने ती आम्हाला दाखवली तिच्या केसाची फुलपाखरू रचना, तिचा कमरपट्टा, तिच्या चाफेकळी नाकातली मोरणी, वस्त्राच्या चुण्या आणि गळ्यातली पायांपर्यंत आलेली साखळी तिचा चोखंदळपणा दाखवून गेली

छतावर एक टांगते कमळ होते घंटेसारख्या खांबावर गाभारा आधारलेला होता त्या स्तंभावर चार तरुणी ओठंगलेल्या होत्या त्यातली एक शांतलादेवी होती.

स्तंभावर राजाराणी आणि अशी ९० युगुले आहेत, पण रती-मदनाला वेगळे पाडले आहे आपल्या बाणांनी महादेवांना विद्ध, विव्हळ केले, त्यांचे मन चळायला लावले, त्याबद्दल ही शिक्षा तर नाही ना ? पण नाही, बीण नाही विषयवासनांना वेगळे पाडा, अलग करा, दूर ठेवा असा हा उपदेश आहे

सगळे मंदिर पाहून होते, पण स्तंभामधला एक रिकामा कोपरा आपले मन भारून टाकतो एका कुशीला हा कोनाडा अर्धवट सोडला आहे कोणते शिल्प या शिल्पकाराला आकारायचे होते, हे कळत नाही इथली वेगळी वळणे वेगळी, नक्षी वेगळी, कलाकुसर वेगळी, वेलबुट्टी कुठेच शोधून सापडत नाही म्हणतात काही तरी आगळीवेगळी अनपेक्षित कलाकृती, धक्कादायक निर्मिती या चित्रकाराला चितारायची होती हे निश्चित ! मग याने हे चित्र अपुरे का टाकले ? आणि आणि मग एक निष्कर्ष निघतो

राज्यकर्ते हे केव्हाही, कुठेही एकच हे लहरी असतात, सर्वज्ञ असतात, उन्मत्तही असतात आणि नेमका हा सरस्वतीपुत्र ' श्री ' पुढे कुठेतरी दुखावला गेला असावा

कुणास ठाऊक थोड्यांचे असे मत अपूर्णतेत सौंदर्य असते अर्धस्फुट सौंदर्यात खास खासियत असते पूर्ण चंद्रापेक्षा चंद्रकोर सुंदर दिसते मुग्ध हास्य बांधून ठेवते कदाचित तेही या बेफिकीर, अनामिक चित्रकाराला दाखवायचे असेल, कारण बाकीच्या एकूण एक चित्राखाली सह्या आहेत, पण या कला-कृतीखाली कुणाचाच शिक्का नाही

असेही म्हणतात हा कोपरा मुद्दाम मोकळा ठेवला जो कुणी अशी आगळीवेगळी कलाकृती करील, त्याच्यासाठी रसिका, तुझ्याचसाठी ' हा कोपरा त्या महान कलाकाराची वाट पाहत आहे

आणखी एक आशय असा भगवत निर्विकार तो सर्वत्र भरलेला आहे. इथल्या ९० मूर्तींवर ज्याचा विश्वास नसेल, तो त्याला हवी तशी मूर्ती बनवू शकतो

नवरग मडपात एक चपलांची जोडी चामारानी केली म्हणतात रामानुजानी तसा हट्ट त्याच्याकरिता धरला

मदिरापुढे साठ फूट, चौकोनी पायांचा गरूडस्तभ आहे. हा स्तभ काही अशाचा कोन करून कोपऱ्यावर टेकला आहे आतल्या फटीतून कागद सरकावून काढता येतो ही करामत अतर्क्य आहे शिल्पकलेतले ते आश्चर्य आहे

पुढचे पाहावे आणि मागचे विसरून जावे अत करणावरून ते पुसून जावे आजच्या प्रभेहून कालची आभा सरस अशी काहीशी स्थिती या प्रवासात होत होती कालच्याहून आज सुदर. आजच्यापेक्षा उद्या उत्तम, अत्युत्तम अशी चढती भाजणी चालली होती दिवस नवा नवा उगवत होता आम्ही श्रवणबेळगोळा गावात चाललो होतो

गावात पोहोचण्याआधीच विंध्यगिरी खडकाचे दोन सफेद डोंगर खुल्या माळावर फार आधीपासून दिसू लागले होते आणि एका डोंगरावरचा बाहुबलीही तो एकमेकांना दाखवीत दाखवीत आम्ही उठत होतो, बसत होतो

पण गाव अगदी भिकार दगडांच्या रांगा, राशी आणि काळा कातळ आम्ही पाहिल्यावर दोन–चार मुले परवचा म्हटल्यासारखी घोकू लागली, ' स्वामी बा दुडू ' आणि दोन–चार कुत्री श्लोक म्हटल्यासारखी विव्हळू लागली

श्रवणबेळगोळा हे गाव या दोन डोंगराच्या चिंचोळ्या पट्टीत वसले आहे मोठा डोगर ' दोड्डाबेट्टा, ' लहान चिकबेट्टा ' याचीच दुसरी नावे इद्रगिरी व चद्रगिरी मध्ये सुदर ' बेळगोळा ' म्हणजे धवलतीर्थ गोळा म्हणजे तलाव स्वच्छ शुभ्र पाण्याचे स्फटिकयुक्त तीर्थ श्वेत सरोवर.

३५०० फूट उच असलेला इद्रगिरी हा अधिक मोठा भाग्यवान, कारण त्याच्याच माथ्यावर सर्वसगपरित्याग केलेला बाहुबली तपश्चर्या करीत आहे, म्हणूनच या डोगराला मोठ्याचा मान, पण चद्रगिरी हा छोटा पहाडसुद्धा कमी नाही तो तोडीस तोड आहे १०६ पैकी ९२ देवळे माथी धरणाऱ्या या पहाडाला जैन साधू फार पवित्र मानतात, कारण भद्रबाहू व सम्राटपद सोडून आलेला चंद्रगुप्त मौर्य या दोघानीही इथे निर्वाण घेतले एवढ्या बलिष्ठ नदराजाची सत्ता उलथून आलेला चद्रगुप्त इथे लीन होतो आणि चद्रगिरी त्याला कायम विसाव्यासाठी जागा देतो मग तो पहाड चिकबेट्टा कसा ? आणि गोमटेश्वराच्या जनकाची चामुडरायाची गुहा जो पहाड बाळगतो, तो ' लहान ' असूच शकत नाही

सम्राट चंद्रगुप्ताला स्वप्न पडले गूढ विद्येमध्ये निष्णात असलेला भद्रबाहू राजधानी पाटलीपुत्राला आला आहे त्याला जाऊन भेटावे असाही आदेश सम्राटाला मिळाला राजाने भद्रबाहूला शोधून आणले व स्वप्नाचा अर्थ विचारला भद्रबाहूने अर्थ उलगडून सांगितला तो असा यानंतर बारा वर्षांनी राज्यात पडणाऱ्या भीषण दुष्काळाला जनतेला तोंड द्यावे लागेल

आणि स्वप्नाचा खरोखर पडताळा येऊ लागला तेव्हा चंद्रगुप्ताचे धाबे दणाणले ती निष्पर्ण झाडेपेडे, तोंड वासून पडलेली पाखरे, गाईगुरे व पोट खपाटीस गेलेली माणसे पाहून राजा हवालदिल झाला आपण शासनकर्ते, प्रजेचे त्राते, स्वामी हा राजाचा गर्व उणा होऊ लागला आपण कमी पडलो ही भावना जाळीत सुटली

तशात दुष्काळ नाहीसा होण्याकरिता करण्यात येणारे हिंदुमतिले यज्ञयाग, त्यांतले केविलवाणे बळी राजाला पाहवेनात त्यांच्या किंकाळ्या राजाच्या कानात घुमू लागल्या त्याच्याभोवती अभद्र जणू फेर धरून नाचू लागले त्याने सम्राटपद ठोकरले आणि अंतिम मुक्तीचा मार्ग शोधला

आम्ही चढू लागलो सायंकाळचे चार वाजले होते या अर्धवर्तुळाकार तापलेल्या पाषाणपायऱ्यावरून अनवाणी पायांनी जाणे, हे पाहून जीव आधीच पोळून निघाला होता

पाय चढत होते बाहुबली गुल झाला की ते गळायचे, निसरत जायचे शांत, सुंदर बाहुबलीचे तोंड दिसले की एकास दोन पायऱ्या चढायचे

आमच्याबरोबर आदित्य भास्कर नावाचे एक बंगाली गृहस्थ होते हे जोडपे डोलीत होते बाकीची पायांनी चढत होती पुढच्या कातळावर प्रवाशांना घेऊन डगमगत चालणाऱ्या डोल्या पाहून इथे डोलीत बसलेल्या आदित्यांना घेरी यायला लागली अर्थात अर्ध्या वाटेवर ही डोली दुसऱ्या प्रवासिनीला मिळाली ही आळशा-पुढे गंगा नव्हे तर थकलेल्यापुढे डोली होती तिला अतिशय आनंद झाला आणि तिने तिथेच ' जय गोमटेश्वरा ' नव्हे, ' जय भास्करा ' म्हणत नमस्कार घातला

हळूहळू धापा टाकीत आम्ही वर चढलो आणि अवाक् झालो श्रम कुठल्या कुठे पळाले होते आमच्यापुढे अद्भुत उभे होते काही अनुभव असे असतात ते शब्दांत पकडता येत नाहीत आणि तशी गरजही नसते

निळ्याभोर आकाशाच्या पडद्यावर, निसर्गाच्या भव्य वेदीवर सत्तावन्न फूट उंचीचा नग्न, निर्भय, निरिच्छ पण निरागस चेहऱ्यावर केसाची झुल्फे खेळवणारी ही प्रचंड मूर्तिशिळा... एक हजार वर्षांचा असा हा सुकुमार गोमटा बाहुबली ताजा, टवटवीत तरुण भासत होता डोक्यापासून पायापर्यंत सगळे अवयव रेखीव व प्रमाणबद्ध मोठे रुंद कपाळ, सरळ नाक, डोळे अर्धवट उघडे, मुखावर मंद स्मित

आहे आणि अनायकालीन गाभीर्य वसत आहे, अशा हा सर्वसग परित्याग केलेला तपस्वी कमलपुष्पावर ध्यानस्थ उभा आहे. आजूबाजूला मुग्यानी वारुळे केली आहेत. याला भान नाही वारुळातून नाग डोकावताहेत, याला भीती नाही, पण चदनाचा परिमळ लागल्याशिवाय काय राहणार आहे ते आपला स्वभाव विसरले आहेत. तेही ध्यानस्थ आहेत

जगाच्या कल्याणासाठी हा बाहुबली खडतर तप करीत आहे, मग माधवी वेलीनी काय करावे ? त्यानी त्याला शीतलता द्यावी आणि त्या तेच करताहेत. त्यानी त्याला खाद्यापर्यंत लपेटून घेतला आहे त्याचे पाय प्रेमाने बाधून ठेवले आहेत

पण विद्युल्लता धुसमुसळी बेभरवशाची तिची प्रेमाची रीतच न्यारी मदनासारख्या गोमटाचे चुबन घेण्याचा तिला मोह झाला त्याला स्पर्श करण्याचा तिने ध्यास धरला, त्याला आलिगण्याची तिला आस लागली आणि आवेगाच्या भरात गोमटेश्वराचा थोडा कपटा निघाला तिला रागे भरण्यात अर्थ नाही प्रेमात सर्व काही क्षम्य असते

या पुतळयाची उची वाढत आहे अशी एक समजूत आहे, याचे कारण उचीच्या बाबतीत एकवाक्यता नाही कोण ४७ फूट म्हणतो, कोण ५० फूट असा दावा करतो सस्कृत वाङमयात याची उची तेरा पुरुष पावणेसदतीस हात असे लिहिले आहे तर पुराभिलेखन हिशेब करते की हा पुतळा ७० फूट आहे एकूण अदाज पचे दाहोदर्श

याच्या डोक्यावरून कुठलाच पक्षी जात नाही, अशी एक समजूत आहे आणि याच्या पुढे कुठलाच देव उभा राहू शकत नाही असा एक समज आहे बरोबर आहे जवळ दगडच नाही तर देव कुठून होणार ?

जगात पुष्कळ पुतळे आहेत जपानमधला तप करण्यास बसलेला बुद्ध, इडोचायनाचा निजलेला बुद्ध, बामियनचा उभा बुद्ध, पण एकाच दगडात कोरलेला हा महावीर मात्र एकटाच

आमच्याबरोबर एक अमेरिकन आणि जर्मन जोडपे होते ऐहिक सुख पायाशी लोळत असताना ती भारतीय सस्कृतीचा ध्यास घेत होती, त्याकरिता त्रास घेत होती, धडपडत होती आम्ही या गोमटेश्वराच्या पुतळ्याप्रमाणे त्याचेही कौतुक करून घेतले

नाहीतर 'बिल्ली गयी हाज को' पण तिथेही तिने उदीर खाण्याचे थांबवले नाही एक गुजराती स्त्री उजव्या हाताच्या तर्जनीवर १०८ मणी ओढीत त्रिशरण मत्र जपत होती, पण तिचे लक्ष हुदकणाऱ्या तिच्या नातवावर होते आणि तिच्या नवऱ्याचे या बायडीवर होते तो तिला तिचे दागिने जपण्याविषयी सांगत

होता

एक गोष्ट अशी सांगतात

दोन मित्र होते त्यातला एकटा देवळात कीर्तनाला गेला तर दुसरा देवळाच्या शेजारच्या घरात नर्तिकेच्या नाचाला गेला, पण दोघांचेही लक्ष त्याच्यापाशी नव्हते दोघेही हळहळत होते

जो कीर्तनाला गेला होता, तो म्हणत होता, 'आपण उगीच ही बाष्कळ बडबड ऐकून घेत आहोत कुणी पाहिला आहे उद्याचा जन्म, मोक्ष ? आजची घडी महत्त्वाची आला क्षण भोगावा हेच खरे ! मीही तिथे जायला हवे होते '

तर दुसरा चुटपुटत होता, 'कुठल्या क्षणिक सुखासाठी आपण वासनेची शिकार होऊन बसलो आयुष्यातील सुंदर क्षण आपण कुरूप करून टाकले '

नग्नता ही बीभत्स आहे का ? नसावी, नाही ते निसर्गाचे आदिम रूप जगात येणारा व इथून शेवटचा निरोप घेऊन जाणारा माणूस कपडे पेहनीत नाही, नसतो पक्षी काही आगडे-टोपडे घालून येत नाहीत आणि पशूही शेवटचे कफन घालून जात नाहीत मग माणूस एका धाग्याकरिता ही नाटके का करतो ? दुःखाचे शभर धागे बांधून का घेतो ?

आफ्रिकेमधल्या नायजेरियाजवळचे 'आनावारिक' हे आदिवासी नागडे-उघडेच हिंडायचे प्राण्यासारखी मुक्तपणे क्रीडा करायचे एक दिवस वरून हुकूम आला समजावणी आली नागवे हिंडायचे नसते गरजेपुरती तरी वस्त्रे अंगावर ठेवायला हवीत या फर्मानाने जनतेला राग आला भयंकर असंतोष माजला आणि जनतेने सरकारला ठणकावून सांगितले, नग्नता ही आमची संस्कृती, तो आमचा धर्म, तो आमचा हक्क त्याच्यावर आम्ही गदा आणू देणार नाही सरकारची ही दडपशाही आम्ही मानणार नाही सरकारला हा नंगानाच, हे वाकडे पाऊल आम्ही घालू देणार नाही

जैन धर्माचा पहिला तीर्थंकर वृषभदेव यास दोन राण्या – पहिल्या यशस्विनीला भरत धरून १०० पुत्र व ब्रह्माला ही कन्या तर धाकटी राणी सुनंदा हिला बाहुबली हा पुत्र व सौंदरी ही मुलगी योग्य वेळ येताच भरतास राज्याभिषेक झाला व बाहुबली युवराज ठरला त्याना राज्य वाटून देण्यात आले भरत अयोध्यापती झाला, तर बाहुबली पौधनपूरचा अधिपती म्हणून जाहीर झाला

पण भरताची साम्राज्यलालसा वाढली त्याने सगळे जग पादाक्रांत केले आपल्या भावांस ठार मारले आणि बाहुबलीकडे आपला मोर्चा वळवला युद्ध म्हणजे मनुष्यहानी हे त्यानी अनुभवले होते तेव्हा फक्त दोघातच युद्ध व्हावे, असे ठरले भरताने चक्र सोडले, ते बाहुबलीकडे लीन झाले त्याने गदा फेकली, तीही बाहुबलीच्या पायांशी येऊन राहिली त्याने बाण मारला तर बाणाने बाहुबलीच्या पायाशी फिरून

प्रदक्षिणा घातली भरताने बाहुबलीच्या पायावर घालून घेतले

बाहुबली जिंकला खरा, पण त्याचा आनंद नासून गेला तो स्वार्थाला, स्वपणाला, मोहाला विटला संसाराच्या तापातून सुटका शोधू लागला त्याने सारे राज्य काढून भरताला दिले व तो रानात तपाला निघून गेला

या गोमटेश्वराच्या पायथ्याशी कोरलेला चामुंडराये करवियले, गंगासुत्ते करवियले ' हा मराठीतला पहिला शिलालेख पाहून आपले मराठी मन खुशाल होते आणि आपण शोध घेतो – हा चामुंडराय कोण ?

गंगवंशीय घराण्यातील राजमल या राजाचा चामुंडराय हा सचिव, मंत्री आपल्या आईच्या इच्छेखातर, ती जेव्हा अन्न घेईनाशी झाली, तेव्हा त्याने हा पुतळा करवून घेतला

हा चामुंडराय सुंदर गोमटा होता त्याला गोमट असे म्हणत, यावरून या बाहुबलीला गोमटेश्वर हे नाव पडले गोमटेश्वराचा प्रासाद बांधताना आपल्या इंद्रगिरीवरच्या महालातून तो येत असावा त्याची पावले इथे कोरलेली दिसतात

हा चामुंडराय कोकणी असावा गोमट हा शब्द आणि ' सुत्ताले करवियले ' हे वाक्य मराठीतले नव्हे, तर हे शब्द कोकणी मंगळूरी भाषेतील असावेत असे म्हणतात ही प्राकृत मराठी असाही दावा आहे

दर बारा वर्षांनी या बाहुबलीला महामस्तकाभिषेक होतो हा अभिषेक अकरा दिवस चालतो या महामूर्तीच्या मागच्या बाजूस एक पराण बांधतात भारतातील सगळ्या नद्यातील १००८ कलशांतील पवित्र पाणी त्या पाण्यात गाईचे दूध, तूप, दही, मध व साखर हे पंचामृत तसेच चंदन, गूळ, खारीक, केशर, कस्तुरी, खसखस व निवडक वनस्पती मुळांचे मिश्रण मिसळलेले असते गहू, शहाळ्याचे व वाळ्याचे पाणी, सोन्याची फुले आणि सोन्याच्या दुर्वाही घातल्या जातात

सर्वसंग परित्याग केलेल्या या गोमटेश्वराला ही सोन्याची फुले अळी मिळी गूप चिळी आपण पुसू नये, विचारू नये आपण उद्धट ठरू

पहिला अभिषेक अर्थात चामुंडरायाने केला असावा नंतर किती शतकांनी कृष्णदेवराय वडियारने २ फेब्रुवारी, १९८० ला स्व इंदिरा गांधींच्या हातून केला होता शेवटचा ६ फेब्रुवारी, १९९० ला झाला

भयंकर तहान लागली होती एका छोटयाशा घुमटीत वाटोळ्या चेहऱ्याची ' गुळ्ळेकायजी ' उपदेश करीत होती आत्म्याला दडवून परमार्थ नाही पण सोमवारच्या कहाणीतल्या राजाप्रमाणे तिचे कुणीच ऐकत नव्हते जवळ एकसुद्धा चहाचे हॉटेल नव्हते लिंबू, सरबत, पाणीसुद्धा नव्हते

आणि याचकरिता सौ आदित्य संतापली होती ' टाळ्याला काटे आले अगदी, पण पाण्याचा थेंबसुद्धा नाही ' ती बडबडत होती

तिचा राग खरा होता, पण अंदर की बात अशी होती ' बातों बातों में ' ते आम्हाला समजले तिला शॉपिंग करायला मिळाले नव्हते बेलूर हळेबीडमधे असेच झाले होते ' काय बघायचे त्या दगडात ? सगळे बीभत्स ! ' ऑब्शिक ' नुसती ' ती मोहरीसारखी तडतडत होती

या उलट श्री भास्कर शांत, संयमी होते त्यांना कलेची जाण होती ते रसिक होते बेलूर हळेबीडला त्यांनी चार दिवस घालवले होते इथे गोमटेश्वरापुढे स्तिमित होऊन ते कितीतरी वेळ उभे होते

ती भडाभडा बोलली म्हणजे श्री आदित्यांच्या कपाळावर सूक्ष्म अशी आठी पडे ते बेचैन झाले आहेत हे कळे

एरवी दोघेही अगदी दृष्ट लागण्याजोगे जणू काय जोडी एकमेकांकरिताच बनवलेली ते रुबाबदार, देखणे तीही तशीच साजरीगोजरी होती

पण सूर जमत नव्हते कुठेतरी काहीतरी चुकत होते एक चाक कुरकुरले की वाहन सरपटत चालते लग्नगाठी स्वर्गात पडतात, पण कांच पडतो इथे रक्तबंबाळ होऊन मग सारे आयुष्य काढावे लागते

म्हैसूरला जाताना अलीकडे नऊ मैलावर रंगनाथस्वामीचे श्रीरंगपट्टण गाव लागते टेकल्या-टेकल्यासे, बसून हातावर साऱ्या देहाचा भार घेत रंगनाथस्वामी डुलक्या घेत होते आपल्या अर्धोन्मिलित डोळयांनी त्यांनी आमच्याकडे बघितल्यासारखे केले आम्हीही देखल्या देवा दंडवत घालायलाच आलो होतो

येताना आमच्या वाटाड्याने गाडी जवळपास थांबावयास लावली व आमचे लक्ष्य एका शिळेकडे वेधले पाटीवर इंग्रजी शब्द होते ' The body of Tipu Sultan was found here ' पाटीवर चाँदतारा होता वाटाड्या पुढे सांगू लागला, ' हातात बंदूक घेऊन, गुडघे टेकून प्रतिकाराच्या आवेगात बसलेल्या टिपूला गोळी लागली तो मरण पावला तेव्हा ब्रिटिशांनी त्याचा गौरव केला, ' He fought like a tiger '

' मरणांति वैराणी ' मेलेल्या माणसाबद्दल वाईट उद्गार काढू नयेत हे जाणण्याइतके रामासारखे ब्रिटिशही चतुर होते शिवाय टिपू सुलतानाला वाघाचे खूप आकर्षण होते त्याच्या रत्नजडित सिंहासनाच्या कुशीला सोन्याचे वाघ जडवले होते त्याचा ध्वजसुद्धा वाघाच्या अंगासारखा पिवळ्या-काळ्या पट्ट्याचा होता तेव्हा श्रद्धांजली वाहताना बेरकी ब्रिटिशांनी या म्हैसूर ' हुली 'बद्दल हे उद्गार काढले

लहानपणी इतिहास पाठ केला होता

टिपू हा शूर होता त्याला पारतंत्र्याची चीड होती झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवा यांच्याही आधी टिपू ब्रिटिशाविरुद्ध लढला, पण नशीब आडवे आले आणि टिपूला देह ठेवावा लागला

पुढे आणखी आठवले त्याच्या सैन्यात कित्येक हिंदू अधिकारी उच्चपदावर होते त्याच्या मंत्रिमंडळात नऊ मंत्री हिंदू होते पुर्णय्या हा त्यातलाच एक हा टिपू परधर्माविषयी आदर बाळगून होता सर्वधर्मसमभाव, दयाशीलता, सहिष्णुता हे गुण त्याच्यात होते

श्रीरंगपट्टण येथील रंगनाथ मंदिर तर त्याच्याच पखाखाली होते, पण कित्येक देवालयाना त्याने वार्षिक अनुशासन दिले होते त्याच्या दिवाबत्तीची सोय केली होती तो ' खुत्बा 'चे पठण करीत असलेल्या मौलवींना जसा ' मन्नत ' देत असे, तसाच अनुष्ठानाला बसलेल्या ब्राह्मणांनाही दानदक्षिणा देत असे दिवसाला कित्येक हजार लोकाना तो मदत करीत असे त्यात ४० हजार हिंदू होते

कित्येक देवालयांना त्याने सोन्याच्या मूर्ती अर्पण केल्या होत्या, कित्येक देवाची पुनःस्थापना केली होती त्यात कोचीनचे मंदिर एक होते

नंतर हळूहळू कळले शाळेत शिकवतात तो इतिहास वेगळा असतो इतिहास हा कोऱ्या मनाने टिपकागदासारखा अलगद टिपायचा असतो मानभावी-पणाने लिहिलेला इतिहास हा विपर्यास असतो

अगदी भटाब्राह्मणासारख्या सात्त्विक दिसणाऱ्या या टिपूच्या मनात एक जुलमी धर्मवेडा खोल दडून होता टिपू हे दुभगलेले व्यक्तिमत्त्व होते

या टिपूने सात लाख ख्रिश्चन व अकरा लाख हिंदू बाटवून घेतले होते तो त्याची सुंता करी त्याना गोमांस खायला घाली माणसाना शाश्वती उरली नव्हती. कित्येकानी बायका-मुलांसह तुंगभद्रेत जाऊन जीव दिला होता

कालिकत येथे टिपूचा सरदार फेरोक याच्या नावाचा वधस्तंभ आहे त्यावर लिहिले आहे, ' जे जे मुसलमान होण्यास नकार देतात, त्याच्याकरिता '

हिंदूंनी वा अन्यधर्मियांनी ज्या ज्या चांगल्या गोष्टी केल्या, त्या फोडण्यात, मोडण्यात, तोडण्यात याला आसुरी समाधान मिळत असे अंगाडीपुरम गावातल्या महादेव मंदिराचा डिंडिगल इथल्या महालक्ष्मी देवालयाचा आणि वायनाड इथल्या गणेश मंदिराचा त्याने नाश केला

कबरी मसजिद इलाह ही श्रीरंगपट्टणाची मसजिद ही पूर्वजन्मीची हनुमान मठी होती टिपूच्याच आशीर्वादाने हिचे धर्मांतर झाले

हा टिपू स्त्रीलंपट होता स्त्रियांची अब्रू लुटणे हा त्याचा छंद होता रोजचा खेळ होता त्याना पळवायच्या, जनानखान्यात कोंबायच्या आणि उरलेल्याना आपल्या सैनिकात वाटून टाकायच्या, हा त्याचा विजयाचा श्रीगणेशा होता

कुर्गी स्त्रियावर तर त्याने अगणित अत्याचार केले लढणाऱ्या कुर्गी पुरुषाला बोलावले व वचनाला न जागता त्याचे खच्चीकरण करून त्याना सडवून टाकले, पण कुर्ग त्याला पुरून उरले आज टिपूचा जो उदो उदो चालला आहे, कुर्गी लोक आपली कीव करीत असतील

राम व लक्ष्मण वनवासात हिंडत असताना पपा सरोवराकडे पोहोचले पपेचे शात, शीतल, सथ, निळे पाणी, तळचातली ती लाल–पाढरी कमळे, ती पोहणारी बदके, सभोवतीची ती हिरवी वनराई, कुशीचा तो डोगर निसर्गाचे ते भव्य, सुदर रूप पाहून रामाच्या मनाचे बध सुटले तो भावनाकुल झाला आणि सीता-वियोगाचे मनाला जाळणारे दु ख विसरण्यासाठी त्याने तिथे निवारा करावयाचा ठरवला

तळचाच्या काठी एक बगळा एक पाय वर काढून स्तब्ध उभा होता रामाला वाटले, या साऱ्या आसमताचा या बगळ्यावर परिणाम झाला असेल आणि त्याने या साधू बदकाचे कौतुक केले ती स्तुती आतल्या पाण्यातील माशाच्या कानावर पडली त्याने डोके पाण्यावर काढले आणि रामाची कीव करीत म्हणाला, 'रामचद्रा! एवढी काय त्याची स्तुती करतोस ? अरे, त्यानेच तर आमचा सहार केला आहे '

टिपूच्या मृत्यूनतर वलस्ली याना बहाल केलेल्या तलवारीवर हे शब्द होते, ' अल्ला हो अकबर काफराचा नाश कर जे जे मुस्लिम होण्यास नकार देतात त्याना सजा दे त्याच्याचकरिता ही तलवार तळपते आहे आम्हास साहाय्य कर '

हा टिपू ' हुली ' वनराज नाही हा क्रूर लाडगा आहे, हा व्याघ्र आहे

इतिहास लाजिरवाणा असला किंवा गोजिरवाणा असला, आपल्याला तो नाकारता येत नाही, नेहरूनी म्हटले होते

आम्ही त्याचा गुबज पाहावयास गेलो कावेरी नदीच्या दुबोळक्यात हा गुबज आहे टिपूने लावलेली आब्याची झाडे अजून आहेत ती दाखवली गेली

हिरवळीच्या गालिच्यातून आम्ही आत गेलो प्रवेशद्वारावर उर्दूतले शब्द होते, ' टिपू व त्याच्या मातापित्याच्या कबरी आत आहेत ' इमारत साधीसुधी होती, पण हस्तिदती नक्षीकाम केलेले तीन दरवाजे व जाळीदार नाजूक खिडक्या सुदर आहेत सज्जाच्या चारी बाजूना २६ काळे सगमरवरी खाब होते हे काळे सगमरवर काही पर्शियाहून आणले नाहीत आमचा वाटाड्या म्हणाला की, पांढरा मकरानाचा सगमरवर काही विशिष्ट रसायनात घालून दोन वर्षे ठेवला की तो काळा होत असे.

' दर्यादौलत ' या उन्हाळी राजवाड्याचे छत, भिंती, खाब तुळया, कमानी सारे काही लाकडी आहे लाकडावर कापड बसवून, वर गिलावा काढून हा रंगवलेला आहे वर तैलरगात चित्रे आहेत सारे काही टिपूमय कुठे टिपू हुक्का ओढतो,

कुठे कुराण पढतो, कुठे पांढऱ्या शुभ्र घोड्यावर बसून, वजीर मंत्री घेऊन चालला आहे कुठे टिपूला इंग्रजांचा वेढा पडला आहे कुठे विमनस्क बसला आहे, तर कुठे जिंकला आहे

दुसऱ्या मजल्यावर टिपूची सिंहासनाची जागा खास सज्जा आहे तिथे आज नकली सिंहासन आहे खालच्या मजल्यावर दरबाराचे लोक बसत

मी मुद्दाम मागे गेले, कारण हीही गोष्ट ऐकली होती राजवाड्याच्या शेजारी एक लोहार काम करत असे आणि त्या आगीच्या धुरामुळे, धगीमुळे राजवाड्याचा कोपरा काळा झालेला होता त्या काळ्या कोपऱ्यामुळे टिपूची प्रतिमा धवल, स्वच्छ ठरत असे आता काळा कोपरा वगैरे काही नाही, पण विचारवंताचे कुचले टिपूची प्रतिमा मात्र काळी ठरवतात

ज्या महिषासुराचा वध करून चामुंडादेवीने वडियार घराण्याला राज्यकारभार चालविण्यास दिला, तिच्या दर्शनाला आम्ही आल्याबरोबर प्रथम निघालो

म्हैसूर म्हणजे पृथ्वीवरचा दागिना अलंकार, अगदी जडावाचा नकसुद

स्वच्छ सुंदर रस्ते, दोन्ही बाजूंनी बागा, फुलझाडे, रंगीबेरंगी बोगनवेली तसेच रस्त्याच्या कुशीला गुलमोहोर कांचन शिरीष बहावा आणि अरुंद पानाची कण्हेरीची झाडे चाफा बोलेना बोलायलाच कशाला हवे होते ? या लाल किरमिजी सफेद गुलाबी पिवळ्या चाफ्याचे हास्य बोलण्यापलीकडे होते ते शिवाचे हास्य होते

निरगुडीच्या निळ्या व पिवळ्या लाल फुलातून फुलपाखरे उडून गेली, तेव्हा नकळत गळ्यातून ओळ येऊन गेली, 'लक्ष उडाली फुलपाखरे हवेत उडाले रंग ''

म्हैसूर म्हणजे धनलक्ष्मीचे निवासस्थान इथे काय उणे आहे ? पाण्याचे प्रपात आहेत, त्यामुळे विद्युत्शक्ती मुबलक, भरपूर येथील सोन्याच्या खाणी, विविध बडे कारखाने त्याला श्रीमंत बनवीत आहेत

पण गाव तिथे महारवाडा असतोच आम्ही पाहिले, एक माणूस गटारातले वेचून खात होता एका खानावळीपुढे भिकाऱ्यांचा जमाव कलकलाट करीत होता आणि एक गाय एक काटेरी बोर ओरबाडत सुटली होती

टेकडीवरचा रस्ता ' डोळे मोडीत राधा चाले असा नखरेल लाटालाटाचा, वळणावळणाचा दारातच लाल लाल जीभ, पिवळा देह व काळ्याकुट्ट मिशा असलेला महिषासूर हातात परशू घेऊन आल् आल् दूर करीत आपल्याला प्रथम हटकतो आम्हीही ' दुर्जनस्य प्रथमम् वंदे ' केले आणि देवीच्या भेटीला गेलो याच्याच नावावरून म्हैस उर नाव पडले सुवर्णकांतीचा चकचकीत कळस आणि देवीच्या काळ्या मुखड्यावरील चकाकणारी हिऱ्याची नथ कितीतरी वेळ मनात

चकाकू लागली टेकडीवरचा उन्हात तळपणारा राजेंद्रविलास राजवाडा आणि खालचा ललितमहाल काही त्यावर मात करू शकला नाही, पण मात केली नदीने .. काय ऐट ती बसण्याची ढब... कपाळावर लावलेले ते आडवे गंध नखशिखात नटून अगदी साधुपुरुष वाटला

असे म्हणतात, झाड वाऱ्याने डोलतेवेळी पाहावे, माणूस आनंदाने बोलतेवेळी पाहावा, तसेच शहर उत्सवाच्या वेळी पाहावे थोडा त्रास होतो, पण अनुभूती मिळते शहराचा आत्मा कळतो

हे शहर तसे आम्ही मागे अनुभवले होते म्हैसूरच्या प्रसिद्ध दसरा महोत्सवाला आम्ही गेलो होतो, पण संस्थाने खालसा झाली होती संस्थानिक पदभ्रष्ट झाले होते दसरा विटकळला होता फक्त प्रथा उरली होती

दसरा म्हणजे विजयादशमी सत्याने असत्यावर मिळवलेला विजय कालीने या दिवशी राक्षसांचा संहार केला पांडवांनी या दिवशी शमीच्या झाडावरून अस्त्रे खाली घेतली बुद्ध गौतमाने या दिवशी अखेरचा उपदेश केला जैन श्रमणाच्या व्रताची सांगता याच दिवशी होते

खरे म्हणजे या दिवसांत पावसाळा संपलेला असतो तळी, विहिरी उपाट असतात हवा चांगली असते हिरवी प्रसन्नता असते पिके आलेली असतात घर धनधान्याने भरलेले असते आणि ' पोळयेर पावणो ' या दिवसात पाहुणे आले तर ते लोकाना आवडतात, मानवतात व परवडतात

पण साखरेचे खाणार आम्ही गेलो त्या वर्षी म्हैसूरचे वडियार महाराज हे मद्रासचे गव्हर्नर म्हणून नेमले होते अगदी देव्हाऱ्यात बसवून फुले नाही वाहिली तरी ते ' नारायण 'देव होते २१ तोफांची सलामी नसली तरी ते राजा म्हणूनच ओळखले जात होते, मानले जात होते राजा बोले आणि त्या वर्षी दसरा पूर्वीच्याच जोषात साजरा झाला होता म्हैसूरचा अंबाविलास राजवाडा परत झगमगला होता सजवलेल्या जरीपटक्याच्या हत्तीवरून डुमूडुमू नगारे वाजवले गेले होते सनई-चौघडा घुमला होता खाशे स्वारीची मिरवणूक निघाली होती शमी वृक्षाची पूजा झाली होती सोने लुटले गेले होते इडली-उतप्पाची रुची वाढली होती रस्ते फुलून आले होते रेशमी चौकडीची कांजिवरम साडी व हिऱ्याच्या कुडया घातलेल्या व दोन्ही नाकपुडयात चमक्या असलेल्या अम्मा, कानात लाल खडे व ठेवणीचा रेशमी शर्ट व धोतर नेसलेल्या अप्पाकडे शीळ घातल्यासारख्या कुजबुजत व ते गडगडाटी हसत

या कृष्णकमळी वातावरणात मोगऱ्याच्या फुलासारखे लोक मिसळले होते गोरे गोरे घरघरित नाक व विशाल डोळयाचे हे कुर्गी लोक होते ढोपरापर्यंत घागरा व वर सदरा घातलेले हे लोक डोक्यावरचा शेमला नाचवीत दसरोत्सव

पाहण्याकरिता चालले होते त्याच्यातल्या थोड्या स्त्रिया आमच्या गावड्यासारख्या नेसल्या होत्या, पण अगात लाब हाताचे मिन्याचे पोलके होते आणि डोक्यावरचा शेमला पाढरा होता

इतक्यात एक लाब काळा कोट घातलेला, अर्ध्या कोपऱ्यांकडे बाह्या, कोटाच्या छातीवर ‘ कुपिया ’ साखळी आणि कमरेला पिसकाती ’ सुरी लावलेला एक पुरुष आला आणि एका तरुणीला घेऊन कुशीला जाऊ लागला ती अग चोरू लागली, पण त्याच्यापुढे तिचे काही चालले नाही तो तिला कुशीच्या बोगनवेलीच्या झुडपात घेऊन गेलाच बोगनवेल शरमून लाल झाली, म्हणाली,

‘ मुझे मालूम है मै शराबी नही
पर कोई पिलाये तो मै क्या करूँ ?’

हा जोष, हा उन्माद पाहून वृदावनातील दोन हत्तीच्या तोडातून कमानी-सारखी उडणारी, छत्रीसारखी उमलून येणारी कारजी उफाळून आली होती सुरेख रगातले धबधबे एकसारखे पाणी ओतत होते

आणि हे सगळे पाहून सोन्याचे पाणी माखलेल्या छत्रीखाली उभ्या असलेल्या कृष्णराज वडियाराच्या पुतळ्याला कौतुकाने भरून आले होते

या वेळेला मात्र काहीच नव्हते ते स्वरूप काहीच उरले नव्हते वृदावनाची एकमेकांवर झेप घालणारी कारजी मान खाली घालून होती टप्प्याटप्प्यावर खिदळणारे पाणी थिजले होते धबधबे मुके झाले होते ‘ये तो दिवस गत’ दारातला कावेरीचा पुतळा सांगत होता

या कावेरीवर धरण बांधण्याची कल्पना एरवी टिपू सुलतानाची त्याप्रमाणे त्याने १७६४ साली तज्ज्ञ फ्रेंच इजिनिअर्स बोलावून थोडे काम झाले होते. त्यानतर १५० वर्षांनी विश्वेश्वरअय्यानी ही कल्पना मूर्त स्वरूपात आणली भारतियांचा हा पहिला प्रकल्प १२९ फूट उचीच्या या कृष्णराजसागरने राज्याच्या प्रगतीचा पाया घातला

पधराव्या शतकात यादव कुळातले यदुराय व कृष्णराय द्वारकेहून दक्षिणेला आले आणि त्यांनी राज्य स्थापले. याच कुळातले कठोख चिक्कदेवराय, चामराज कृष्णदेवराय हे राजे शूर होते त्यांचे राजचिन्ह होते सिहाचे शरीर व गरुडाचे मस्तक असे ‘ भेरुड ’ होते सिह हा वनचराचा राजा, तर गरूड हा पक्षिमडळाचा याची युती म्हणजे हे भेरुड होते हे राजाची महत्त्वाकांक्षा जागवीत असे

हे राजे सहिष्णू आहेत, समजस आहेत त्यानी तुलसीपत्रावरच्या तीर्थाप्रमाणे साऱ्या राज्याचे दान केले आणि ते भारताच्या सर्वाधिकारात जमा झाले

राज्यपद सोडले म्हणजे सगळे सोडले आज म्हैसूरमध्ये दसरा होतो या दसऱ्याच्या सोहळ्यात हत्तीवरच्या हौद्यात हा ‘ नारायण ’ राजा बसत नाही, तर

१९१९ पर्यंत खासगी असलेला जगन्मोहन राजवाडा हा आता म्युझियम आहे हस्तिदंत व चंदन घरचेच अर्थात याची दारे–दरवाजे चंदनाच्या कारागिरीने नटली आहेत गुलाबकाष्ठाची नक्षीही शोभा वाढवते नक्षीच्या छतावरची निळी जांभळी रंगीबेरंगी झुंबरे, दिव्यांची आच्छादने, मोठमोठ्या फुलदाण्या, वर तोंड करून लावलेली वाघाची कातडी, वेलबुटीदार बिलोरी आरसे, शिसवी फर्निचर आणि खालची आमसुली कुसुंबा टेराकोटा इटालियन फरशी हे पॅलेसचे आजचे वैभव आहे

याला साजेसा ४० कि ग्रॅम वजनाचा सोन्याच्या देव्हारा आणि २८० कि ग्रॅम वजनाचे सिंहासन इथे आहे संगमरवरी जिने, मार्बलचे भले मोठे खांब आणि वरचे निळे जांभळे छत पाहिले तर राजवाड्याच्या भव्यतेची कल्पना येते

चित्रकृतींच्या दालनात मात्र आम्ही आवडीने आलो म्हैसूर राजघराण्यातील व्यक्तींची खास चित्रे पुण्याचे पेशवे नाना फडणवीस हेही दिसतात

पाण्यात राहून माशाशी वैर करू नये तेव्हा कौतुक करायलाच हवे आम्ही ते केलेही तरीसुद्धा म्हैसूरचे तीनही महाराज आमच्याकडे रोखून पाहत होते कुठेही गेलो तर त्यांची नजर आमच्यावरच

मरून पडलेल्या टिपू सुलतानाचा देह जेव्हा प्रथम वायलीच्या नजरेस पडला, तो प्रसंग कोण्या चित्रकाराने अमर करून ठेवला आहे आश्चर्य, आनंद, भीती काळजीच्या थोड्या रेषाही दिसतात एक आख्खा दिवस टिपूच्या देहाला कुणी हात लावला नाही म्हणे ! उगीच तोहमत कशाला घ्या ? फट म्हणता ब्रह्महत्या व्हायची

एका खास रंगमहालात रविवर्माची चित्रे, तर एका दालनावर रोअरिक पितापुत्र हक्क सांगतात

हा बाप रोअरिक हिमालयावर खूप प्रेम करीत असे हा परदेशी माणूस आपला देश विसरला त्याने तिथला निसर्ग नाकारला आपली माणसे तोडली त्याने हिमालयाचा ध्यास घेतला आणि त्याकरिता हा त्याच्याच वळचणीला कुलू येथे येऊन राहिला चित्रसाहित्य घेऊन दोन-दोन, तीन-तीन महिने हिमालयाच्या दऱ्या – पहाड तुडवीत असे हाताची उशी करून हिमालयाला न्याहाळीत पडला असे- गोऱ्या साहेबावर हिमयुवतीने चेटूक केले आहे त्याला पिसे लावले आहे, असे पहाडी लोक म्हणत चेटूक हिमयुवतीने केले नव्हते पिसे हिमालयाने लावले होते

त्याने विविध अगांनी हिमालय पाहिला आणि तो चित्रित केला विमनस्क, कातावलेला हिमालय, दु खी, कोमजलेला हिमालय ओशाळलेला हिमालय, सुस्तावलेला, स्वस्थ पडलेला हिमालय, सतापाने धगधगलेला हिमालय, हमरा, लाजरा हिमालय, समाधानी हिमालय, निराश, हताश, हिरमुसलेला हिमालय, कलदर हिमालय आणि कुटुबवत्सल हिमालय या छटा म्हणजे काव्यकल्पना वाटतात

आपल्याला सप्तरगाइतकीच ही रोअरिकने काढलेली काळी कबरी चित्रे आवडतात, पण रविवर्माची चित्रे पाहिल्यानतर आपण फुलून येतो तसे इथे होत नाही आपले भारतीय मन ठणकते, कारण या रोअरिकशी देविकाराणीने केलेला विवाह मियाँ बिबी राजी एरवी देविकाराणी ही चचल सिनेसृष्टीतली अभिनेत्री. तिने विवाह केला हिमाशु रॉय वारल्यानतर ही देविकाराणी ना आपल्या नात्याची-गोत्याची पण आपले भारतीय मन उगीच कुरकुरते

आज ही देविकाराणी ' मेक्सिकन ट्री वनस्पतीच्या निगराणीत मग्न आहे. हे तेल साबण, वनस्पती तेल यात वापरले जाते कालची ही कलावती आज हे व्रतस्थ जीवन जगते करून करून भागली आणि आता देवपूजेला लागली आहे

हळदणकर याचे चित्र अजूनही मनात प्रकाश उजळते हातात पणती घेतलेली स्त्री तिचा चेहरा तर पणतीच्या प्रकाशाने उजळला आहेच, पण हाताच्या बोटाच्या फटीतून प्रकाश पाझरत होता खोलीत काळोख करून गाइडने चित्रातल्या दिव्याने खोली उजळवून टाकली

कलासग्रहालय पाहून आम्ही प्राणिसग्रहालयाकडे वळलो या जयचामराजेद्र प्राणिसग्रहालयात भोवती खदक असल्याने हे प्राणी स्वैर नैसर्गिक वातावरणात असतात कित्येक जलपक्षी, बगळे, शहामृग या पाणथळ जागेत विसावले होते, तर पाढरी अस्वले, एक शिगाचा पाणघोडा हेही रमले होते नात्रासारखाच किंग कोब्रा – राज नाग तोंडातून विषाचा फवारा उडवणारा हा काळा सर्प आमच्याही मनात कालकूट पसरवत होता

एक वाघीण माजाला आली होती आपले मूत्र शिपडीत ' तुमचे इथे काय काम ?' असे गुरगुरून विचारीत होती खरोखरच आमचे काहीच काम नव्हते आम्ही बाहेर सरणेच योग्य होते

आम्ही बाहेर आलो आणि आम्हाला श्रवणबेळगोळा गावात भेटलेले जर्मन जोडपे भेटले हे जोडपे मग कुठे ना कुठे भेटत असे आणि मग आम्ही त्याची ओळख करून घेतली त्याचे नाव जोयस व तिचे नाव नॅन्सी असे होते

भरपूर उची, रोमन पुतळ्यासारखे नाक–डोळे आणि नितळ, गोरी कांती हे त्याचे रगरूप होते, तर कसलाही, कोणत्याही कपड्याचा रग शोभून दिसावा

असा शेंदरी गुलाबी रंग.  निळे डोळे, जास्वंदी ओठ आणि मक्याच्या कणसाच्या केसांचा बुचडा घातलेली नॅन्सी ही तर त्याच्या समोर एवढीशी पोर वाटत असे आणि ती वागत होती तशीच तो त्या त्या स्थळाचे फोटो घ्यायला लागला की ही धावत जाऊन त्या पार्श्वभूमीवर भोज्या होऊन उभी राहत असे आणि ओठ मुडपून हसत असे कपाळावर येणारी पिंगट केसांची झुल्फे मागे सारून मग त्याने तिला टपली द्यावी, हे ठरलेले असे

दोन महायुद्धे होऊन विभाजन झालेल्या राष्ट्रातले हे लोक, पण त्यांच्यात कडवटपणा नव्हता खिलाडूपणाने ही आल्या प्रसंगाला तोंड देत ओले-कोरडे खात एखाद्या अलिशान हॉटेलमध्ये राहत, तशीच एखाद्या मठीत मुक्काम करीत

एकदाच ही रागावलेली आम्ही पाहिली

काळ्या कोळशाच्या रंगाचा, डोक्यावर तेल-पाणी-फणी नाही अशा राठ केसांचा पाठीवर अबाडा, रंगीबेरंगी ठिगळांच्या गोधडीचा अंगावर झगा आणि वरच्या उघड्या अंगावर शेंदूर माखलेला, पायात चाळ व कमरेला घुंगरांची माळ असा एक पोतराज आला बरोबर हातात मोरपिसाचा कुंचा घेतलेली आणि माथ्यावर गाड्यासारखा देव्हारा ठेवलेला अशी त्याची स्त्री हे विदेशी लोक पाहून धावत आली हा पोतराज अंगावर आसूड मारीत रक्ताच्या चिळकांड्या उडवीत येऊ लागला हे पाहून हे जोडपे स्तंभित होऊन डोळे मोठमोठे करीत पाहत राहिले हे पाहून हा चेकाळला आणि परत परत आसूड मारून घेऊ लागला आणि ती बाई छातीवर स्वस्तिकाची आकृती करीत, मागे-पुढे पाय करीत मोरपिसाचा कुंचा हलवीत नाच करू लागली डोळे झाकून नॅन्सी ओरडू लागली तशी ही बाई चेटकीसारखे हसत अंगात आल्याचा आभास करू लागली 'यु ब्रूट !' अनावर होऊन जोयस त्याच्या अंगावर धावून गेला आणि बाकीच्यांनीही मग या पोत-राजाला पळवून लावले त्यांनी त्या पोतराजाला पैसे दिले नाहीतच, पण नित्य नावीन्याचे हे भोक्ते – त्यांनी त्याचे फोटोसुद्धा काढले नाहीत

जो तो आपल्या भाग्याने खातो 'कौन खाय दूध-मलिदा, कौन खाय भूस   याच वेळी एक फासेपारध्यासारखा माणूस डमरूसारखे 'बुडबुडके' हे वाद्य घेऊन आला पक्ष्यांच्या आवाजावरून हा भविष्य सांगत होता तेही गद्यात नाही तर पद्यात हे सारे सांगणे जॉयसच्याच नव्हे तर आमच्याही डोक्यावरून गेले, पण त्या पद्याचा सूर, ती लय, तो ताल आणि सांगताना होणारे नाटच सगळ्यांना आवडून गेले   जॉयसने नॅन्सीसहित त्याचे फोटो काढले आणि त्याला पैसेही दिले त्यानेही वाहत्या गंगेत हात धुऊन घेतले त्यांना फक्त जुने कपडे, धान्य देतात आमचा शेजारचा इसम कुरकुरू लागला. खाणाऱ्याने खाल्ले कोठा-वळ्याच्या पोटात दुखत होते

म्हैसूरहून उटी १०० मैलावर या उदकमंडलला जाण्याकरिता आम्ही गुडलपेठपर्यंत आलो निलगिरीचा घाट सुरू झाला वाटेत बदीपूरची हरणे डोकावून गेली पायन व सुरूची झाडे गाडीशी लगट करू लागली सर्पवेष्टित चंदन जो काव्यवाङ्‌मयात असतो, दिसतो तो तसाच असतो का ? तसाच दिसतो का ? तो तर शेजारच्या झाडानाही सुगंधित करतो, म्हणून बारकाईने पाहिले, पण चंदनाची झाडे अगदी साधीसुधी दिसली म्हणाली, संस्कृत वाङ्‌मयाने तुमची खूप दिशाभूल केली तुमची फसवणूक झाली आहे

त्याचे म्हणणे खरे होते खरोखर या झाडाचे वरचे खोड खडबडीत, गंधहीन आणि त्यापेक्षाही वाईट म्हणजे आपले जीवन जरी हा सुगंधित करतो, तरी हा चंदन बांडगुळ आहे दुसऱ्याचे अन्न शोषून घेणारा नाही निर्मळ जीवन असा

'पर्वता दोंगरार चंदन फुलला चंदन फुलला कोणे देखिला ' खरच, खरा चंदन कोणीच देखिला नाही, पाहिला नाही

निळेभोर आकाश साद घालू लागले 'दुरून डोंगर साजरे ' पण हा निलगिरी दुरूनच साजरा दिसतो असे नाही निळ्यानिळ्या फुलांनी सजून, निलगिरीच्या झाडानी नटून हा आपले निलगिरी नाव सार्थ करीत होता

सगळीकडे निळा शाम भरून राहिला होता चहाची निळी, हिरवी रोपटी आसमंतात निळाई पसरवीत होती

आणि तंबोऱ्याची तार तुटावी तशी आमची तंद्री भंगली आमची मिनी बस अचानक थांबली भरून राहिलेला शाम अंतर्धान पावला होता आणि पुतनेसारखी येणारी रात परिस्थितीची तीव्रता पुढे करीत होती

आमची मिनी बस ही खास प्रवासी चीज होती एरवी हिने कितीतरी वेळा सारी दक्षिण पालथी घातली होती, पण या वेळेला तिला कसलीतरी व्यथा जडली होती चढण आली की ती धापा टाकीत असे व गुरगुर करीत बंद पडत असे. शेवटपर्यंत चालकाला इलाज सापडला नाही एकदा धरलेला सहचराचा हात संसाराच्या अर्ध्या वाटेवर सोडून देता येत नाही मनाला समज घालून जे पुढे येईल तसे पत्करावे लागते, तसेच इथे झाले. अर्थात या उदकमंडलच्या उदकात आमचा घोट नसावा, असे आम्हाला वाटले आणि आम्ही गप्प झालो

पुढची वाट भोवळ आणीत होती खाली दूरवर दरी पसरली होती बाजूचे डोंगर, खालची नारळीची झाडे दूरची वाटत होती 'काळवंडली जळे चिंचही न सळसळे वाटते भयाण सर्व सलत आत कातरा ' भासत होते

आमच्या प्रवासाचा मार्ग उटी, कोईमतूर, केरळ असा ठरला होता या बसच्या त्राग्याने तो आम्हाला आता बदलणे भाग होते आम्ही बस मागे फिरवून घेतली आणि पायथ्याशी गुडलपेठ गावात आलो आता पुढच्या प्रवासाकरिता

आमची व मिनीबसची पोटापाण्याची सोय बघायला हवी होती आणि परिमळ निलय हे हॉटेल आम्हाला दिसले

गजबजल्या जगापासून दूर असे हे हॉटेल होते कडेकडेने शकासुराची पिवळी व लाल तांबडी फुले असलेली झाडे मादक कडवट गंध फेकीत होती आम्ही आत शिरलो आणि व्हराड्यावरच्या वेताच्या खुर्चीवर बसलो इतक्यातच एका वाऱ्याच्या लबाड झुळकीने आमचे स्वागत केले मालकही हसत सेवेला उभा राहिला आम्ही आत जेवणघरात गेलो

पण आत शिरतानाच आंबलेल्या पदार्थांचा आम्हाला उग्र वास आला आणि आम्ही जेवणाला फाटा दिला भरून आणलेली भाडी तशीच आत गेली, त्यात आमच्या आवडीचे ' अळसादे होते ओशाळच्या अन्नामारखाच मालकही ओशाळा झाला होता तो आम्हाला ताजे अन्न देण्याचा आग्रह धरीत होता, पण आम्ही बिस्कीट—चहावर भागवले आणि बाहेर आलो

शेजारच्या एका लिंबाच्या झाडाच्या आडोशाखाली तीन दगडांच्या चुलीवर एक हमाल कुटुंब स्वयपाक करीत होते गरमागरम जोंधळ्याच्या भाकऱ्याची ती उबदार वाफ आणि त्याच्या कालवणाचा तो तिखट मसालेदार वास मनात तुफान माजवून गेला

आम्हाला केरळला जायचे आहे, हे कळल्यावर स्टँडवरच्या ड्रायव्हरनी आम्हाला नवा रस्ता दाखवला या रस्त्याला चढण नव्हती ही खात्री आम्ही करून घेतली आणि नव्या रस्त्याने प्रयाण आरंभले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता ' आधी झाले घोडे त्यातून नाक्यावरच्या पोलिसाने मिशा पिळत मिजास दाखविली

आमची बस धावत होती थोडे थकल्यासारखे वाटत होते बाहेरून आलेल्या शात झुळकीने आणि प्रवासाचे तीन तेरा झाले नाहीत, नीट मार्गाला लागलो, या भावनेने तरतरीनही वाटत होते

आता निसर्गाचे एक नवे पान उलटत होते वायनाड या केरळच्या घाटाच्या माथ्यावर आम्ही पोहोचलो होतो सूर्य क्षितिजाच्या दरीत झेपावत डुबत होता. त्याचा सोनेरी प्रकाश दरीतून उसळत होता सगळे सुवर्णमय वाटत होते, पण सभोवतालचे निसर्गाचे स्वरूप रौद्रभीषण होते अवाक् करणारे होते स्तिमित करून अगावर काटा आणत होते आम्हा लोकांच्या तोंडून शब्द निघत नव्हते, अगदी चिडीचूप बसलो होतो

वळणाशिवाय घाट नसतोच आणि ही वळणे आकड्याची वळणे ही तिन्हीकात्रीची वेळ आणि आपली आजारी बस आणि ती घसरली तर ! हा विचारच मन जास्त दासळीत होता

हे निसर्गाचे एवढे रौद्र व सुंदर रूप आजही आठवणीत आहे

रस्ता अगदी निर्मनुष्य रानातून जात होता चिटपाखरू नव्हते वाहतुकीचे एकसुद्धा साधन आढळले नाही एक बोर्ड दिसला आम्ही पाहिले -- तो वनखात्याचा होता कानडीत होता तरी तो आम्हाला समजला ' राखूक जाय गोय झाडा रोय ' असा होता

पण प्रवासाचा शेवट हा असतोच आम्ही सपाटीला आलो माणसांची वस्ती जाणवू लागली मिणमिणते दिवे दिसू लागले तुरळक घरे दिसू लागली गाई-गुरांच्या शेणाचा वास नाकाला जाणवू लागला कुठे गळ्यातल्या घंटाचा किणकिणाट मनात घुंघुरवाळे नाचवू लागला

शेवटी सुल्तान बॅटरी हे गाव आले कुठल्यातरी फलकावरून ते आम्हाला कळले एक चहाचे खोपटवजा दुकान आम्हाला लागले आमचा कोरडा पडलेला घसा आता ओला व्हायला हवा होता आम्ही उतरलो आता तो प्यालेला चहा आम्हाला अमृतासारखा वाटला

एरवी हॉटेल छान होते चहा, कॉफी, वडा, इडली, उतप्पा सारे काही होते, वर्दळ नव्हती ' भलत्या वेळी, भलत्या मेळी, मन असता भलतीच कडे ' गाठी-भेटी चालत असतीलही, पण खाणे ते जमत नाही, जमले नाही

कालपेट्टा पार करून कालिकतला पोहोचेपर्यंत रात्र झाली होती कालिकत हे काझिकोडे हा शोध आम्हाला इथेच लागला

कालिकतविषयी थोडी घृणा थोडी आत्मीयतासुद्धा वाटली भारताचा शोध लावणारा वास्को दि गामाचे पांढरे पाय इथे या कालिकतला लागले ' कालिखोन ' असा उच्चार या केरळात केला जातो, पण कालिकत असे नाव एकदा चिकटलेले भूगोलात त्याच नावाने ते ओळखले जाते

नुसते केरळच नव्हे तर सारा मलबार किनारा हा गोमंतकाचा तोंडवळा भात शेती, खाचरे, केळी, पोफळी, माड, काजू, नद्या, ओढे, तलाव, कालवे, खाड्या खाड्याशेजारी डोकावणारी घरे आणि नद्यातील होड्या, पडाव, पनेळ आणि मासे पण केरळात हत्ती भेटतात आणि शिरा काढून वाटीत भार उणा केलेली रबराची झाडे दिसतात आणि इथे नेमेचि जूनमध्ये येणारा पाऊस दुसऱ्यादा भेटला तेव्हा वाटले, आम्ही मावशीकडे आलो आहोत

भार्गव परशुरामाने सागर मागे हटवला आणि ही सुंदरभूमी सागराच्या तळातून काढून आपल्या आवडत्या पुत्रांना दिली म्हणतात, म्हणून हे लोक जमिनी-वरून अनवाणी चालत असत ज्या जागेवर परशुरामाचा पदस्पर्श झाला, ती जागा

पादत्राणे घालून विटाळून कशी चालेल ?

डोंगरउतारावर चहा, कॉफी, वेलदोडे, जरा खाली मोठ्या पानाचा टॉपियका आणखी जरा खाली मिरीवेली, दालचिनी, नारळाची झाडं, सुपारीची कुळागरे, केळीची बने, शेतीभाती

एका माडी–सुपारीवरून अलगद वरचेवर दुसऱ्या पोफळीवर जाणारे रेदेर पाडेली कौतुकाने कुणीतरी आम्हाला दाखवले, पण आम्हा गोमतकियाना ते अप्रूप नव्हते.

पूर्वी इथे कुठेच ओसाड भाग दिसत नव्हता एक चतुर्थांश रान, त्यात ६००–८०० तरी चित्रविचित्र तऱ्हेचे वृक्ष होते, असे कळते, पण तिथेही लाकूडतोडे धावले. सायलंट व्हॅलीमध्ये जेव्हा असा सहार होऊ लागला, तेव्हा सुजाता कुमारीने आवाज उठवला चेलियर नदीच्या काठी 'वाळक्कड खोऱ्यात १९६३ साली फॅक्टरी झाली फॅक्टरीचे घाण पाणी येऊन प्रदूषण होऊ लागले 'परबीकुलम' अभयारण्याच्या जवळ तीन धरणे होऊ घातली तेव्हा जनता परत रस्त्यावर आली

खरे म्हणजे गर्द हिरवे जगल व्हायला खूप वर्षं जातात होत्याचे नव्हते क्षणात होते

एक गाव कधी सपला आणि दुसरा कधी सुरू झाला कळत नाही वारुळातून काळ्या–पांढऱ्या मुंग्या भुरूभुरू बाहेर सराव्यात तशी ही पांढरे कपडे घातलेली, न्हाऊन–धुऊन बाहेर आलेली माणसे आणि माणसे

एक दिवस माजी पतप्रधान कै. राजीव गांधींनी दौऱ्यावर असताना अचानक रस्ता बदलला आणि त्याना एक निर्मनुष्य गाव दिसले इथे केरळमध्ये पतप्रधानानी कितीही रस्ते बदलले तरी त्याना उपाट भरलेलीच गावे दिसतील

केरळ म्हणजे तांबडीलाल माती, हिरवी वनराई, शेजारी निळा निळा समुद्र असलेली ३८ हजार चौरस मैलाची भूमी पश्चिमेस निळ्या समुद्राने कवटाळलेली पूर्वेस हिरव्या, मोरपिसी पर्वतरागानी आलिंगन दिलेली उत्तरेस असलेल्या पर्वतराजीस 'अनैमल' म्हणतात, तर दक्षिणेस वेलची पिकवणारा वेलची पर्वत आहे

चेरियर, चलकुडी, पेरियर, पंपा या नद्यानी समृद्ध केलेले त्रावणकोर, कोचीन आणि मलबार किनारा एक करून १९५६ साली जन्माला आलेली ही पट्टी म्हणजे केरळ राज्य

भूमी सस्य श्यामला केरळच्या नद्या तीन हजार फुटावरून वीस मैल जाऊन समुद्राला मिळतात केरळला कोरडा दुष्काळ कधीच आठवत नाही नसावा मे ते सप्टेंबरमध्ये नैऋत्य आणि ऑक्टोबर ते डिसेंबर ईशान्य मान्सून इथे फुगडी घालतात हवा एवढी गरम नसते, पण तरीही नाहाण्यात सुख मानणारे, पांढरे, सुती कपडे

वापरणारे, धार्मिकता व कम्युनिझम याची सांगड घालणारे, साक्षर पण संस्कारात हरवून बसलेले लोक

पण या परशुरामकन्येच्या कपाळी वराबरोबर शापही आहेत 'देवान दिला आणि देवचारान व्हेलां ' किनाऱ्यावर रुप्यासारखी मासळी चमचमते, पण सगळेच लोक ती खात नाहीत वेलदोडे पिकवतात, पण पकवत नाहीत जेवणात याचा स्वाद त्यांना चालत नाही आणि सुजलाम्, सुफलाम् अशी ही आपली भूमी सोडून हे देशांतराला जातात सुवासाच्या आशेने कस्तुरीमृगासारखे धावत सुटतात हे एक कोडे होते, म्हणजे ' माझ्या गोव्याच्या भूमीत लाल माती, निळे पाणी, खोल आरक्त घावात, शुद्ध वेदनाची गाणी ' तेच, तसेच या केरळभूच्या कपाळी !

सुशिक्षित असल्याने त्यांना इंग्रजी कळते आम्ही एकाला डिवचून विचारले तर त्याने फणा काढला अर्थ होता, ' आळवा खाज ज्याची ताकाच कळटा ' बरोबर आहे आपले खाचखळगे आपल्यालाच माहीत असतात नव्या वहाणा कुठे टोचतात, हे त्या घालणाऱ्यालाच कळते

' ओणम् ' या फुलांच्या उत्सवाच्या दिवसात बळीराजा वर्षातून एकदा येतो दिवळीत तेल-वात घालून वाट पाहणाऱ्या आपल्या लेकरांना भेटतो पिवळी भात-शेती अमृताचे कलश घेऊन मिरवणारे कल्पवृक्ष पिवळे लाल झेंडूचे गेंद पाहून खूष होतो आपली प्रजा संतुष्ट आहे, हे पाहून आपणही संतुष्ट होतो, पण बाकीच्या ३६४ दिवसांचे काय ? कुठे घालवायचे हे दिवस ?

पुरुष हा उपरा, स्त्री ही धरतीप्रमाणे चिरंतन जन्मदात्री, ही जुनी मातृ-सत्ताक पद्धत आचरलेले नायर, आपल्या थरवाडातील मुरुमुक्कातायम् हा द्राविडी सांप्रदाय ही दक्षिणी पद्धत अजून आचरतात, तर आर्यांचे वंशज नंबुद्रीपाद नंपुतिरी ब्राह्मण आपल्या ' इलम ' या पितृसत्ताक पद्धतीचा तोरा मिरवीत असतो फक्त थोरला मुलगा हाच संपत्तीचा वारस त्याला दौलतच नव्हे तर सर्वाधिकार मोठा मुलगा हा हिरा, बाकीचे कचरा लग्न, बायकोसुद्धा मोठ्यालाच बाकीच्यांना लग्नाचा अधिकार नाही त्यांनी पाहिजे तर वहिनीशी ' संबंधम् ' ठेवावेत नाहीतर नायर स्त्रीला जवळ करावे दोन साड्या व एक तेलाचा डबा वर्षाकाठी दिला की झाले जबाबदारी संपली हात झटकून कुशीला व्हावे भिकाऱ्यांना ओकाऱ्या कशाला ?

या लोकांना सोवळेओवळे खूप तसेच रोटी-बेटी संबंधात खूप कडवे गेज चालते, पण पेज चालत नाही

आम्हाला एक नंपुतिरी ब्राह्मण जोडपे दिसले होते गुडाळलेले, बिनकासोटयाचे धोतर, वर एक परीटघडीचे जरीकाठी उपरणे आणि डोक्यावर छत्री घेतलेला एक उच्चनीच भस्मचर्चित ब्राह्मण अनवाण्या पायांनी चालणाऱ्या आपल्या बायकोला भर बाराच्या उन्हात हाकारीत होता हाताच्या चिमटीत ओचे किंचित उचलून ती बाई

मागून धावल्यासारखी चालत होती उन्हात तिच्या पायांची भाकरी झाली तरी ती बाई पतीच्या पावलावर पाऊल ठेवून चालणार होती ती बाई पडद्यात होती, तरी तिची पोळलेली नजर आम्हाला सारे काही सांगून गेली प्रतिष्ठित समाजाचा हा तिरफळासारखा तऱ्हेवाईक नमुना आम्हाला पार मागल्या आमच्या लहानपणच्या काळात घेऊन गेला

एके ठिकाणी आम्हाला शहाळी विकणारा एक पोरगा भेटला 'आरूद' 'आरूद' म्हणत तो शहाळी दाखवत होता 'आमी तुमी एका नव्हे भाषेन केली लोका ' दोघांनाही भाषा कळत नव्हती भाव ठरत नव्हते शेवटी शेजारच्या माणसाने हाक मारली 'ए! मॉपिटलाय!' मॉपिटलाय याचा अर्थ जावई पण हा जावई शब्द मानाचा नव्हता अरब व्यापाऱ्याची ही मूळची अनैतिक प्रजा तेव्हा जावई डोके उघडे-बोडके आणि हनुवटीला दाढी असलेला हा आरुदवाला मोपला होता मोपला म्हटल्याबरोबर कुणाला मोपल्याचे बंड आठवले कुणाला खिलाफत चळवळ आठवली आजच्या खलिस्तानसारखे या मोपल्यानीही खिलाफतीची स्थापना करून मलबारात मल्लापुरम पाकिस्तान निर्माण करण्याचा घाट घातला होता शेष भारतापासून फुटून जाण्याची भाषा वापरली होती

आम्ही अविश्वासाच्या दृष्टीने त्याच्याकडे पाहू लागलो हा मात्र बिचारा डाव्या बाजूने बांधलेला मुंडू खोचत आमच्या तोंडावरचे हसू एकाएकी का नासले ? काहीच न कळल्यामुळे आडसरे फोडता फोडता टुकूटुकू पाहत होता

कन्नोरचे अलिराजे हे मोपले राजघराणे अलिराजे हे सागरावरचे अधिपती चिक्कल नावाची एक राजकन्या एकदा तलावात पडली आणि बुडू लागली एका मोपला तरुणाने तिला वाचवली मुलगी मृत्यूच्या दाढेतून वाचली, म्हणून राजा खूष झाला, पण तो त्याच वेळी दु खी झाला एकूण ही मुलगी त्याला आता मेल्यातच जमा होती खालच्या जातीतल्या परपुरुषाचा स्पर्श झालेली ही मुलगी आता राजवाड्यात येऊ शकत नव्हती मुलीलाही या दुटप्पी समाजाचा उबग आला असावा आखूड पादत्राणे घालण्यापेक्षा अनवाणी पायानी हिंडणे चांगले तीही बापाकडे यायला तयार नव्हती तिने शादीबरोबर मुस्लिम धर्माचा स्वीकार केला लग्नानंतर या तरुणाला अलिराजे हा किताब मिळाला आणि हुंडा म्हणून कन्नोरचे चिक्कल राज्य तेव्हा हे जावई

खरे म्हटले तर हे उर्दू बोलत नाहीत 'पज्ञमतील' ज्यातून तमिळ भाषा जन्मली ती भाषा हे लोक बोलतात इथल्या मातीशी, जीवनाशी, संस्कृतीशी हे लोक मुरून गेले आहेत

असेच आपल्या संस्कृतीशी, मातीशी इमान राखीत असलेले लोक म्हणजे 'बेने इस्रायल ' हे मोठ्या नाकाचे खाली धोतरी डोक्याला टोपी घालणारे

दुरग यहुदी किंवा ज्यू म्हणवून घणारे  दाराच्या चौकटीवर पितळी नळकांडे ' सद्याय ' लावून हे घर ज्यूचे म्हणून पटवणारे, ओळख दाखविणारे

कोचीन बंदरात पुत्रार नदीच्या काठी सॉलोमनचे जहाज फुटून आलेले हे लोक  पॅलेस्टाईन इथे या लोकाचा छळ होत होता  आश्रयाला आलेल्यापैकी फक्त सात स्त्रिया व काही पुरुष वाचले राजा भास्कर वर्मा याने या लोकाना क्रॅगनोर इथे वसतीला जागा दिली या लोकाना सरक्षण दिले त्याना खास अधिकार दिले तो ताम्रपट अजूनही पाहायला मिळतो यांनीही आपला धर्म आपल्यापुरताच ठेवला तो पसरायचा विचार कधी मनातही आणला नाही

मातनचेरीच्या वाड्याच्या आवारात डच पॅलेसच्या जुन्या १६६३ सालातल्या सिनेगॉगच्या पटागणात भगवती मंदिर आहे हा तीन मजली वाडा आमच्या गोमतकातल्या जुन्या ख्रिश्चन घरासारखा वाटला वाड्याच्या दरवाजाजवळ पोर्च होता आजूबाजूला माडपोफळीची कुळागरे होती आणि शेजारी ज्युइश सिनेगॉग होते

हा डच राजवाडा पोर्च्युगिजांनी बाधला पण नंतर त्यानी तो मैत्रीकरिता डचाना बहाल केला डचानी या वाड्याचा कायापालट केला ते खाल्ल्या अन्नाशी जागले विष्णू व शिव याची मदिरे त्यानी उभारली

मध्यभागच्या कॉरोनेशन हॉलमध्ये कोचीनच्या राजाचा राज्याभिषेक होत असे राजाराणीच्या महालामध्ये रगीबेरगी चित्रे भिंतीवर दिसतात कुमारसभव, रामकृष्ण ही देखणी चित्रे ३०० वर्षे झाली तरी शिलोषात होत नाहीत रोजवुडचे छत तर आत्ता केल्यासारखे ताजे वाटले

राणीच्या शयनगृहात नक्षीकाम केलेले माचुल, ' फेरफटका मारण्याची पालखी, बसण्याचा झोपाळा, अबारी आणि जतन करून ठेवलेले राजाचे कपडेही दिसले

शेजारच्या सिनॅगॉगमध्ये आम्ही गेलो दोन मजली उच अशा या सिनॅगॉगची घटा वाजत गर्जत सागत होती, ' भारतातील ज्यू लोकाचे हे सर्वांत जुने चर्च आहे ' आम्हीही ' आमेन ' म्हणून घेतले

या सिनॅगॉगमध्ये आत जायला कुणीही आडकाठी करीत नाही फक्त आपल्या देवळातल्याप्रमाणे पायताणे काढायची, हे पथ्य पाळायचे ही ' धूळभेट ' घेण्याची कल्पना आपल्याप्रमाणे सोवळी नसावी पायताणे, जुती इथली नाजूक इटालियन फरशी तुडवून नाहीशी करून टाकतील, म्हणून ही व्यवस्था असावी चोहोबाजूनी स्त्रियाना बसण्याची मोठी गॅलरी होती पितळी कठड्याच्या आत धर्मगुरू प्रवचनाला बसत असे वर मोठमोठी हड्या, झुबरे टागलेली दिसली Old Testament ची हिब्रू भाषेतील मूळ प्रत आणि भास्कर वर्माचा ताब्याच्या पत्र्यावर लिहिलेला,

मागून धावल्यासारखी चालत होती उन्हात तिच्या पायांची भाकरी झाली तरी ती बाई पतीच्या पावलावर पाऊल ठेवून चालणार होती ती बाई पडद्यात होती, तरी तिची पोळलेली नजर आम्हाला सारे काही सांगून गेली प्रतिष्ठित समाजाचा हा तिरफळासारखा तऱ्हेवाईक नमुना आम्हाला पार मागल्या आमच्या लहानपणच्या काळात घेऊन गेला

एके ठिकाणी आम्हाला शहाळी विकणारा एक पोरगा भेटला 'आरूद' 'आरूद' म्हणत तो शहाळी दाखवत होता 'आमी तुमी एका नव्हे भाषेन केली लोका ' दोघानाही भाषा कळत नव्हती भाव ठरत नव्हते शेवटी शेजारच्या माणसाने हाक मारली 'ए ! मॉपिटलाय !' मॉपिटलाय याचा अर्थ जावई पण हा जावई शब्द मानाचा नव्हता अरब व्यापाऱ्याची ही मूळची अनैतिक प्रजा तेव्हा जावई डोके उघडे–बोडके आणि हनुवटीला दाढी असलेला हा आरुदवाला मोपला होता मोपला म्हटल्याबरोबर कुणाला मोपल्यांचे बंड आठवले कुणाला खिलाफत चळवळ आठवली आजच्या खलिस्तानसारखे या मोपल्यानीही खिलाफतीची स्थापना करून मलबारात मल्लापुरम पाकिस्तान निर्माण करण्याचा घाट घातला होता शेष भारतापासून फुटून जाण्याची भाषा वापरली होती.

आम्ही अविश्वासाच्या दृष्टीने त्याच्याकडे पाहू लागलो हा मात्र बिचारा डाव्या बाजूने बांधलेला मुंडू खोचत आमच्या तोंडावरचे हसू एकाएकी का नासले ? काहीच न कळल्यामुळे आडसरे फोडता फोडता टुकूटुकू पाहत होता

कन्नोरचे अलिराजे हे मोपले राजघराणे अलिराजे हे सागरावरचे अधिपती चिक्कल नावाची एक राजकन्या एकदा तलावात पडली आणि बुडू लागली एका मोपला तरुणाने तिला वाचवली मुलगी मृत्यूच्या दाढेतून वाचली, म्हणून राजा खूष झाला, पण तो त्याच वेळी दु:खी झाला एकूण ही मुलगी त्याला आता मेल्यातच जमा होती खालच्या जातीतल्या परपुरुषाचा स्पर्श झालेली ही मुलगी आता राजवाड्यात येऊ शकत नव्हती मुलीलाही या दुटप्पी समाजाचा उबग आला असावा आखूड पादत्राणे घालण्यापेक्षा अनवाणी पायानी हिंडणे चागले तीही बापाकडे यायला तयार नव्हती तिने शादीबरोबर मुस्लिम धर्माचा स्वीकार केला लग्नानतर या तरुणाला अलिराजे हा किताब मिळाला आणि हुडा म्हणून कन्नोरचे चिक्कल राज्य तेव्हा हे जावई

खरे म्हटले तर हे उर्दू बोलत नाहीत 'पझमलील' ज्यातून तमिळ भाषा जन्मली ती भाषा हे लोक बोलतात इथल्या मातीशी, जीवनाशी, सस्कृतीशी हे लोक मुरून गेले आहेत

असेच आपल्या सस्कृतीशी, मातीशी इमान राखीत असलेले लोक म्हणजे 'बेने इस्रायल ' हे मोठ्या नाकाचे खाली धोतरी डोक्याला टोपी घालणारे

दुरण यहुदी किंवा ज्यू म्हणवून घणारे  दाराच्या चौकटीवर पितळी नळकांडे ' सद्याय ' लावून हे घर ज्यूचे म्हणून पटवणारे, ओळख दाखविणारे

कोचीन बंदरात पुवार नदीच्या काठी सॉलोमनचे जहाज फुटून आलेले हे लोक  पॅलेस्टाईन इथे या लोकांचा छळ होत होता  आश्रयाला आलेल्यापैकी फक्त सात स्त्रिया व काही पुरुष वाचले राजा भास्कर वर्मा याने या लोकांना क्रँगनोर इथे वसतीला जागा दिली या लोकांना संरक्षण दिले त्यांना खास अधिकार दिले तो ताम्रपट अजूनही पाहायला मिळतो यानीही आपला धर्म आपल्यापुरताच ठेवला तो पसरायचा विचार कधी मनातही आणला नाही

मातनचेरीच्या वाड्याच्या आवारात डच पॅलेसच्या जुन्या १६६३ सालातल्या सिनेगॉगच्या पटांगणात भगवती मंदिर आहे हा तीन मजली वाडा आमच्या गोमंतकातल्या जुन्या ख्रिश्चन घरासारखा वाटला वाड्याच्या दरवाजाजवळ पोर्च होता आजूबाजूला माडपोफळीची कुळागरे होती आणि शेजारी ज्युइश सिनेगॉग होते

हा डच राजवाडा पोर्च्युगिजानी बांधला, पण नंतर त्यानी तो मैत्रीकरिता डचाना बहाल केला डचानी या वाड्याचा कायापालट केला ते खालल्या अंशाशी जागले विष्णू व शिव यांची मंदिरे त्यानी उभारली

मध्यभागच्या कॉरोनेशन हॉलमध्ये कोचीनच्या राजाचा राज्याभिषेक होत असे राजाराणीच्या महालामध्ये रंगीबेरंगी चित्रे भिंतीवर दिसतात कुमारसंभव, रामकृष्ण ही देखणी चित्रे ३ ० वर्षे झाली तरी शिलोधात होत नाहीत रोजवुडचे छत तर आत्ता केल्यासारखे ताजे वाटले

राणीच्या शयनगृहात नक्षीकाम केलेले ' मांचुल, ' फेरफटका मारण्याची पालखी, बसण्याचा झोपाळा, अंबारी आणि जतन करून ठेवलेले राजाचे कपडेही दिसले

शेजारच्या सिनॅगॉगमध्ये आम्ही गेलो दोन मजली उंच अशा या सिनॅगॉगची घंटा वाजत गर्जत सांगत होती, भारतातील ज्यू लोकांचे हे सर्वांत जुने चर्च आहे ' आम्हीही ' आमेन ' म्हणून घेतले

या सिनॅगॉगमध्ये आत जायला कुणीही आडकाठी करीत नाही फक्त आपल्या देवळातल्याप्रमाणे पायताणे काढायची, हे पथ्य पाळायचे ही ' धूळभेट ' घेण्याची कल्पना आपल्याप्रमाणे सोवळी नसावी पायताणे, जुती इथली नाजूक इटालियन फरशी तुडवून नाहीशी करून टाकतील, म्हणून ही व्यवस्था असावी चोहोबाजूनी स्त्रियाना बसण्याची मोठी गॅलरी होती पितळी कठड्याच्या आत धर्मगुरू प्रवचनाला बसत असे वर मोठमोठी हंड्या, झुंबरे टांगलेली दिसली Old Testament ची हिब्रू भाषेतील मूळ प्रत आणि भास्कर वर्माचा ताम्याच्या पत्र्यावर लिहिलेला,

कोरलेला लेखही दाखविला गेला

येशूला मानणारे, पण रोमन कॅथॉलिक चर्चचा तिरस्कार करणारे, रोममध्ये कॅथॉलिक धर्म रुजण्यापूर्वी आलेले सिरीयन याची चर्चेस् ते वेगळीच ठेवतात पण सगती सग दोषानम् पण यानी साऱ्या रीती हिंदूच्या उचलल्या आहेत हे हुडा घेण्यास आशाधोशीपणा करतात बायकोचे पहिले बाळतपण माहेरीच व्हावे, असा आग्रह धरतात आणि आजोळ घराहून येणाऱ्या मुलाची सोनसाखळीसह वाट पाहतात

यांची कगोरे नसलेली, चौकोन चौकोन असलेली चर्चेस् आम्ही खूप ठिकाणी मग पाहिली

तसेच नाशरेनीस ही जमात दुधात पाणी मिसळावे तशी मिसळून गेली, पण ते आपली अस्पृश्यता विसरत नाहीत, आपले पूर्वीचे मगळसूत्र घालायचे विसरत नाहीत

तसेच इडावा हे हरिजन शेतीच्या कामाकरिता आले आणि त्यांनी इथेच रुजवून घेतले

थिय्या ही पोर्च्युगीज जमातही अशीच सूर्यासारखा पिवळा पोशाख घातलेली ही जमात जिथे-तिथे काम करीत असताना दिसते

केरळात पहिला धर्मगुरू आला तो सेंट थॉमस ख्रिस्ताच्या पहिल्या बारा शिष्यांपैकी तो होता त्याच्या कब्जात सापडला केरळचा चेर राजा पल्लिवन पेरूमल राजा बोले या जाळ्यात मग कित्येक बडे लोक सापडले

भारतात सर्वांत प्रथम पोर्च्युगीज आले या कालिकतजवळ पुवार गावी Cape of Good Hope ला वळसा घालून वास्को द गामा उतरला आणि येथल्या कप्पाड गावचा झाला तिथल्या सेंट फ्रान्सिस चर्चमध्ये त्याचे दफन झाले

पण पोर्च्युगीज इथे रमले नाहीत त्यांच्यामागून आलेले ग्रीक, रोमन, अरब, डच, फ्रेंच, ईस्ट इंडियाचा पालव धरून आलेले ब्रिटिश मग धदा-व्यापार करीत राहिले

कॅननोर इथली मशीद नख काढने मुसलमान इथे वास्तव्य करीत आहेत सांगते तर कालडी गाव अभिमाने म्हणते आठव्या वर्षी चतुर्वेदी झालेला अद्वैत आद्य शकराचार्य इथलाच केरळपासून काश्मीरपर्यंत त्याने धर्माची गुढी नाचवली

चॅटी कुळनगर इथले तिबेटी पद्धतीचे बौद्ध मदिर सागते, बौद्ध धर्म इथे नादला आहे आणि वालकिणीचे मदिर नारायण महाराजांचा उपदेश करते नारायण महाराज म्हणतात, माणमाचा एक धर्म, माणसाची एक जात, माणसाचा एक देव ही आपली सस्कृती

तसी ' बारा बलुती, अठरापगड जाती कुठेही असतातच, पण पाकळ्या जरी

वेगळ्या असल्या तरी फूल एकच  एकीकडे नादू आनि चिचेपानार न्हिदू '
ही आपली संस्कृती राजकारणी लोकाची शिकार झाली आहे, विघटनात सुख
शोधते आहे ' आषाढमासे दिसे चांदणे  समजावी दुष्काळाची लक्षणे ' म्हणतात
थोडा वेळ आम्ही चिंतित झालो, पण मग सावरलो

वाटेत नारळाचे प्रदर्शन रंग उधळीत होते पिवळे, लाल, हिरवे नारळ
नारळाचे केरळचे नाते अनादिकालीन  या 'कैरा 'वरून जागेला केरळ म्हणवले
गेले हे श्रीफळ आणि नारळाचा उपयोगही ते खूप करतात खाण्यासाठी उपयोग
होतोच, पण ' सोय ' चव परदेशी रवाना होतो त्याशिवाय आपल्या झावळ्यानी
गरिबाची घरे तो शाकारून त्याची अब्रू झाकतो काथ्याची पायपुसणी होतात
दोऱ्या वळल्या जातात वाशाच्या भुश्श्याचा लगदा बाहुल्या बनविण्यासाठी होतो
आपल्यासारखेच हेही लोक माडाला कल्पवृक्ष मानतात आपल्यासारखेच हेही लोक
हातात नारळ देऊन बोळवण करतात.

सगळीकडे भाताची हिरवी शेते आणि ' यल्लु ' तिळाचे पिवळे गालिचे
निळे निळे कायर व त्यातली पिवळी, पांढरी व लाल कमळे व बदके तोचतोचपणा
टाळत होती

आणि वाऱ्याच्या झुळकीने शीळ घालणाऱ्या नारळीच्या झावळ्या ' कायरा 'त
डुबणारी मुले  शेजारी आळसून पडलेली घर ' कुरूवेप्पु ' कडुनिंबावर चिव-
चिवणाऱ्या ' कुरुवा ' चिमण्या आणि बुचाच्या झाडावरचे ' तता ' पोपट  हा
सारा निसर्ग सृष्टीचे हे रूप पाहून आनंदाने भोवळ यायला लागली कुर्गच्या
मडिकेरी गावातली, कॉफीच्या बागातली ती भांगोळीसारखी वाट आणि तो सुगंध
किती तरी वेळ मनात राहिला

कालिकोडे ही मामुद्रिन आमोरिन राजाची राजधानी या घराण्यात युवराज
वारस ठरत नाही तर युवराज्ञी ' राजा ' होते सर्वांत मोठी अम्मा म्हणवली जाते
आत्याकडे – सर्वांत वडील मुलीकडे सर्वाधिकार असतात राज्य अथवा पौरोहित्य हे
मुलाकडे नाही तर भाच्याकडे जाते सुना पाहुण्या ठरतात आणि जावई सासुरवास
भोगण्याकरिता घरात आणले जातात ' थरवाड ' पद्धतीने राज्य स्त्रीच्या परंपरेने
चालत असे

विवाहसंस्था ही कृत्रिम, सोयीने स्वीकारलेली मातृत्व हे सत्य नैसर्गिक
निसर्गातसुद्धा हे असेच चालते जनावरात कुठे आहेत विवाह ? पक्षी लग्न करतात?
किडा–मुंगी विवाहबंधनात असतात ? ' रवळेत दवरला फोव  येतली वतली
म्हजो घोव !  ' ही त्याची आदत, परंपरा, पण म्हणून प्रजोत्पत्ती थांबली आहे
का ? पिवळे पोट, पाय व वर गुलाबी छटा असलेला हळदुरा पक्षी ' किंचाळत
सांगू लागला

या सामुद्रिन घराण्यात आणखी एक नैसर्गिक नियम होता प्रत्येकाने बारा वर्षे राज्य करावे नतर स्वत चा शिरच्छेद करून घ्यायचा ही रीत अमानुष होती, अमानवी होती, रानटी होती, पण भवितव्याच्या दृष्टीने अचूक होती जीवनाचा अनुट मोह, ससाराची अतृप्तता दूर करणे आवश्यक असते निसर्गातसुद्धा हेच चालते केळीला घड आला की ती कापून काढायची असते फळ धरल्यानतर फुलाने झाडाची कूस साडायला हवी जुन्याने नव्याला जागा द्यायला हवी सर्जनाला मरणाची आवश्यकता आहे, हे त्यांना पटले होते

आम्ही अर्नाकुलमच्या दिशेने गाडी हाकारली

रस्ताभर नुसती उधळण चालू होती साऱ्या सृष्टीला भुरळ पडली होती पाण्याच्या खाचरात काम करणाऱ्या स्त्रियांच्या काचोळीविना काया उन्हात तळपत होत्या आणि त्याचे उघडे पाय जणू कृष्णकमळीची फुले वाटत होती पल्ल्यासारख्या नेसूच्या पाढऱ्या पायावर आलेल्या निऱ्या, त्याचे पाठीवरचे मोरपिसारे आणि त्याचे पीळदार शिसवी शरीराचे ' पुडवे ' नेसलेले त्याचे घरकार ही जणू जलतरगातली चित्रे वाटत होती

वृक्षाना गराडा घातलेल्या मिरवेली व जायफळ–दालचिनीची झाडे दिसत या मसाल्यापायीच फिरग्याचे पाढरे पाय या भूमीला लागले त्यांनीच जणू अवदसा ओढवून आणली परकीय परदेशी येतच राहिले येताना अत्तराचे शिसे, घड्याळे, विलोरी आरसे आणीत राहिले इथून तबाखू नेऊन चीनला विकू लागले लाख, राळ, नीळ, अगुरू, रक्तचदन नेऊ लागले

पण येताना त्यानी खूप अपूप गोष्टी आणल्या सीताफळ, रामफळ, पपई, केळी ही क्युबामधून घेऊन आले, तर पेरू, सफरचद, मेक्सिकोमधून, अमेरिकेमधून तर बटाटे खुद्द त्याच्या देशातूनच त्यानी आणले ही झाडे आपलीच होऊन बसली घरात लक्ष्मी आणू लागली काजूच्या झाडाने व रबराच्या झाडाने देशाचे दारिद्र्य उणे केले

कॉफीचे झाड हे तर केरळचे वरदान बाबा बुडन फकीर याने एक दिवस पाहिले, एका विशिष्ट वनस्पतीची पाने खाऊन शेळ्या–मेंढ्या उत्तेजित होतात बाबाने ती पाने खाऊन पहिली आणि मग ही झाडे तो घेऊन आला त्याची लागवड केली आणि हळूहळू त्याच्या बियांची भाजून पूड झाली ती कॉफी ६००० फुटावर हा बाबा राहत असे त्या पर्वतावर बाबाचा दर्गा आहे आणि त्या पर्वताचे नाव बाबा बुडनगिरी असे आहे

अर्नाकुलम–कोचीन ही जुळी शहरे एका खाडीने दुभगलेली आहेत आणि पुलाने जोडलेली आहेत बोटी आल्या की हा पूल उचलला जातो अर्नाकुलम ते कोचीन हे सहा मैलांचे अतर जलमार्गानेही काटले जाते

कोचीन हे भारतीय आरमाराचे बदर हे केंद्र आज प्रचड शहर बनून राहिले आहे, तरी या कोचीनातला चीन काही लपत नाही वाटेत विवलोन खाडीत 'सपन' नावाच्या चौकोनी शिडाच्या होडचा दिसतात, त्या चिनी पद्धतीच्या सयामी पद्धतीने विणलेल्या चीनच्या छत्र्या मासे पकडण्याची रीत हीसुद्धा चीनचोच मिशाचे आकडे वळवल्यासारख्या छपराची घरे आणि रुंद काठाच्या चटईच्या टोपल्या हे सर्व आपल्याला हाच पुरावा देतात

इडली, वडा, उनप्पा आवडला म्हणून काय झाले ? आणि सारम्, रसम् 'पापड' व 'यापड' रुचकर लागले म्हणून काय झाले ? Naoe sempre rainha, haoe sempre galinha या पोर्च्युगीज म्हणीप्रमाणे रोज शय्येला राणी चालत नसते आणि जिभेला कोबडी नको असते

'कांटो आनि गोटो' हे आमचे अन्न जीव अगदी विटून गेला होता अळणी होऊन जिभेला माठ आला होता जेवल्याशिवाय भागत नव्हते म्हणून आम्ही जेवत होतो आणि आम्हाला एक दिवस चक्क विस्वोणाचे हुमण व उकड्या तादळाचा भात मिळाला आणि आम्ही केरळ गोमतक एक है'चा उष्टचा तोडाने घोष केला

पुढे हे आपापसातले नाते खूप ठिकाणी दिसून आले 'पायस' ही दुधात आटवलेली तादळाची खीर, हे काही आम्हाला सागायला नको होते 'पडी' हे आमचे धान्य मोजायचे माप त्यानाही माहीत होते नायक, दुकळे, पै, काणे ही नावे पोर्च्युगिजाच्या इक्विझिशनच्या काळात परागदा झालेल्या आपल्याच लोकाची नावे नव्हेत काय ? आम्ही नतद्रष्टानी दुकळो, काणो, कामोतीम अशी नावे जाणून-बुजून केली आणि आमची वेगळी अस्मिता असे म्हटले म्हणून काय झाले ? मातनचेरीचे, सारस्वताचे, कृष्णाचे देऊळ आणि तिथल्या सारस्वताचा मठ हे गोमतकियाचे विसाव्याचे स्थान नव्हते काय ?

तिन्हीसाजेला पाय मोकळे करण्याकरिता आम्ही खाली उतरलो दुकानाच्या पाट्या वाचण्याचा आम्हाला आता छद लागला होता सहज वाचनात आले, 'दीपांजली मेडिसिन' दीपाजली आणि औषधाचा सबध ओढूनताणूनही लक्षात आला नाही, पण देवमाता हॉस्पिटल' मात्र लक्षात राहिले Mae de deus हे पोर्च्युगीज व Our Lady या इग्रजी नावापेक्षा हे देवमाता भारतीय नाव जास्त सुदर, कलापूर्ण व नादपूर्ण वाटले

तसेच चालत आम्ही पुढे गेलो नारळाचे ट्रक्स भरभरून जात होते फणसाचे कुवले, केळीचे घड व सुपारीची शेंदरी शिपटीही पाट्या भरून जात होती. जवळच्या तिठचावर झाडीच्या आत एक लाकडाचे हॉटेल होते गरम भज्याचा

खरपूस वास आमच्या नाकात शिरला आणि आम्ही हॉटेल जवळ केले

सोडा बॉटलच्या गोळ्याच्या बाटल्यांनी भरलेल्या लाकडी पेट्या दिसल्या भाजलेले शेंगदाणे, चणे, कुरमुरे व कुरकुरीत शेवेचे लाडूही दिसले जवळच कुठेतरी इगर्जीची घंटा वाजली माडावर चढलेल्या रेंदराची शीळ ऐकू आली आता तो कातार म्हणणार, 'आग मुजे चोय पुण ' असे वाटले अगदी आम्ही गोव्याच्याच भूमीत होतो

भज्याचा घाणा कढईत तळत होता कुशीला चहा उकळत होता दुधाच्या आशेने एक लोचट मांजर पायांशी येऊन अंग घासू लागले तेव्हा आम्ही कुशीने आलो आणि पाहिले, जवळच्या भेंडशीवर एक ' मोगरा फुललेला ' नव्हता, पण कचकचीत टपोऱ्या कळ्यांनी भरून गेला होता या मोगऱ्याला काय म्हणतात ? मी भोचकभवानीने पेल्यात हात बुडवून पाणी समोर ठेवणाऱ्या पोऱ्याला प्रश्न केला ' मुल्ला ' पेल्यात हात तसेच ठेवून तोंडावरची मिरी न हलवता तो म्हणाला, ' मुल्ला ?' मला हसू फुटले माझा विश्वास बसेना म्हणून मी त्याला पुढे विचारले ' आणि या वेलीला ?' ' चेंडी !' त्याच सुरात तो उद्गारला माझे हसे विरघळले ' चेंडी ' म्हणजे आमच्या गोव्याची कसबीण ! नायकीण ! ज्ञानेश्वरांच्या मोगरीवर हा आरोप ? आपले आपले म्हणून थुळावे आणि यानी आपल्यावर असा मागून वार करावा ? मला गदगदून येत होते

गरम गरम भज्यांची आणि मिरच्यांची चव घेता घेता आमच्या मंडळीत ' आमोद सुवासी ' आले होते हास्याची खसखस पिकली होती टिंगलटवाळी चालू होती कुठले कुठले चावट विनोद, गोष्टी काढल्या जात होत्या

रात्र चढत होती, चंद्राला कुशीत घेऊन सूर्याला पुढे ढकलणारी

कोचीन काझिकोडेहून वाट वाकडी केली तर गुरुवायुर मंदिर लागते, हे आम्हाला कळले आणि आम्ही दुसऱ्या दिवशी आडवाटेला गेलो

हे मंदिर साधेसुधे, पण याचे धार्मिक महत्त्व मोठे जनमेजय राजाने आपले सर्पसत्र आवरले आणि सरत्याशेवटी तो कुष्ठरोगाने पछाडला तेव्हा तो इथे येऊन राहिला त्याने देवांची आराधना केली व त्याचे अंग सोन्याचे झाले, पण आम्ही एकच जाणत होतो, ते म्हणजे या मंदिराच्या अस्पृश्य बंदीविरुद्ध गांधीजींनी लढा दिला होता

श्रीकृष्णाला कल्पना होती, आपण ज्याकरिता आलो ते कार्य संपले आहे. ' यदा यदा हि धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत अभ्युत्थानम् धर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ' कृष्णाला यादवांमधल्या भांडणाची व पुढे होणाऱ्या अनर्थाची कल्पना होती सुख उतू लागले म्हणजे दु:ख झिरपू लागणारच त्याने निरवानिरव केली उद्धवाकरवी बृहस्पतीला निरोप पाठवला, आपल्या मात्यापित्याच्या रोजच्या

पूजेतील बालविष्णूची मूर्ती सांभाळावी, राखावी

बृहस्पतीने गुरू व वायू यांना ती मूर्ती आणण्यास पाठवले, पण गुरू व वायु पोहोचले तेव्हा फार उशीर झाला होता द्वारका बुडाली होती दारू पिऊन, एकमेकांशी झगडून यादव साध्या लव्हाळयाचे भक्ष्य झाले होते श्रीकृष्णाने देहत्याग केला होता बलराम व श्रीकृष्ण यांच्या अंत्यक्रिया करून यादवांच्या विधवा स्त्रियांना घेऊन गेलेल्या अर्जुनाची ससेहोलपट झाली होती या खानदानी स्त्रिया आभिरांनी, सामान्य लुटारूंनी हिसकावून नेल्या होत्या त्या लुटल्या गेल्या होत्या, नागवल्या गेल्या होत्या, नागल्या गेल्या होत्या

देवपूजेतील ही मूर्ती शंखचक्रपद्मगदाधारी होती, तीच ही गुरुवायूरची मूर्ती पुराण सांगते, भगवंताचे हे दर्शन फक्त दोनदाच झाले. एकदा मथुरेत कंसाच्या तुरुंगात लहान बालकाने देवकीला चमत्कार दाखविला आणि एकदा साक्षात्कार पटवला गेला कुरुक्षेत्रावर अर्जुनाला भगवद्गीता सांगून युद्धाला प्रवृत्त करीत असताना

उत्सव चालू होता सकाळ–संध्याकाळ लाल झूल चढवलेल्या हत्तीवरून मिरवणुका चालल्या होत्या. हत्तीसमोर ढोल, झांजा, डमरू, सनई, पंचवाद्ये वाजवीत वाजंत्री चालले होते मोठमोठे चांदीचे लामणदिवे डोक्यावर घेऊन सोवळे ' धवे पुडवे, ' मुंडू नेसून गळयात माळा घातलेले ब्राह्मण मिरवीत होते हत्तीवर छत्र गरगरा फिरवीत ते अभिमानाने फुलून आले होते फळे, फुले, नारळ, विडयाची पाने, केळीच्या पानावर ठेवून पंचवाद्याच्या तालावर स्त्रिया मिरवणुकीत सामील झाल्या होत्या उन्हाचा मारा होता कपाळावर आडवे गंध व वर कुंकू लावलेल्या या वयस्क स्त्रिया मधेच जाऊन थोडयांना गोंजारीत त्यांच्या माथ्यावर ओला कपडा ठेवीत त्यांच्या कानशिलावर कडाकडा बोटे मोडीत, तर थोडयांवर डाफरत. त्यांना कचाकचा बोलत त्यांच्यामागे कडाकडा बोटे मोडीत उन्हाच्या माऱ्यात कोमेजलेल्या त्या मुली मग आणखीन ' बावून जात आणि मग आम्हाला कळले, हा फरक माहेर ते सासर असा होता

आमच्याकडे माझी आत्या एक गोष्ट सांगत असे तिच्या शेजारणीला सून व मुलगी दोन्ही अंगे होती दोघीही घरात असल्या म्हणजे माझी आजी विचारी, ' दोघा मुलींना न्हाऊ कधी घालतेस ग ? ' ' हो ' बाई अगदी खडीसाखरी मिटक्या मारून सांगे, ' धुवेला न्हाण घालण्यास वेळ तरी मिळतो का ? तिला न्हाण घालते. या आयतारा त्या बुधवारा ' ' आणि सुनेला ? ' आता आजी खोचकपणे विचारी आणि पुढे म्हणे, ' तिचे केस पिसूडल्यावरी दिसतात ' ' तिचे केस परत परत धुवावे लागतात तिचे केस आहेत वरड, भरड, तुटके तिला मी या धाकले दिवळेक त्या व्हडले दिवळेक न्हाऊ घालते '

शेजीबाई मुलीच्या बाबतीत रविवार ते बुधवार, यामधले दोन दिवस रवरासारखे ताणीत असे व दिपवाळी, धाकटी दिवाळी ते व्हडली दिवाळी, तुळशी-विवाह समारंभ यामधले दोन महिने दोन दिवसावर आणीत असे

माती कोणतीही असो, हवा निराळी असो, हे सासरचे बोल, कारल्याचे वेल बिनापाणी, बिनाखत फोफावतात

देवळात नंबुद्रीपाद ब्राह्मण चंदन झरवीत होते आणि बाहेर दोन-चार भक्त घड्या जमिनीवर लोटांगणे घालीत पोटफाट झरवीत होते

कुणा एका लहान मुलाचे उष्टावण चालले होते आणि दुसरा कुणी एका लहान पोराच्या केसांची बट देवाला देत होता

कुणी एक रुक्मिणी तुलसीदलाने श्रीहरीची तुला करीत होती वत्ताशाचीही तुला चालली होती

पूर्वेच्या गोपुराजवळ कुशीला एक दगडाची पाथर 'वेल्लिकल्लु' होती तिथेच गुरू व वायू भेटले इथे सात-आठ ब्राह्मण अस्खलित श्लोक म्हणत होते भागवतातील श्लोक म्हणून शेवटच्या अक्षराने भेंड्या लावायचा 'नारायणीम्' हा खास उत्सव चालू होता एक तऱ्हेने ही उजळणी असावी

मंदिरापुढे आम्हाला एक मेळा दिसला केशरी, भगवे कपडे घातलेले हे लोक सुब्रह्मण्यम स्वामींच्या मंदिरात जात होते एकटा ढोलक बडवत होता आणि दोघाच्या हातात कावड होती

आमच्या गोमंतकातल्या मंदिरासारखाच फक्त पुजाऱ्यानाच गर्भगृहात जाता येते आणि तो मूर्तीला हात लावू शकतो त्यालाच हा अधिकार असतो या पुजाऱ्याच्या हाताखाली चार तंत्री व तंत्र्याखाली चार ओथक, पण या लोकांना आत जाण्यास मज्जाव असतो आणि गोमंतकापेक्षाही इथले सोवळेओवळे कडवे या पुजाऱ्याला मंदिराच्या ठराविक हद्दीच्या बाहेर सरण्यास मिळत नाही आणि या पुजाऱ्याला सेवेकरी असताना ब्रह्मचर्य पाळावे लागते

आत अभिषेक चालला होता दूध, शहाळी, गुलाबपाणी, यवोदक, उगाळलेले चंदन, अगुरू, दुर्वांकुर, पत्र, फुलम्, तोयम्, पंचामृतस्नान अर्थात होतेच देव रास-न्हाण करीत होते

स्नान ही सौंदर्यप्रसाधनाची सुरुवात अभ्यंगस्नान हे सोळा शृंगारापैकी एक सौंदर्याला उजाळा देणारे सौंदर्य वृद्धिंगत करणारे

मोगल साम्राज्ञी नूरजहान ही पाण्यात गुलाब कुस्करून ते पाणी न्हात असे, तर नेपोलियनची राणी जोझेफायन हिला कांती नितळ ठेवण्यासाठी स्ट्रॉबेरी लागत असे जिच्या सौंदर्याने इजिप्तच्या इतिहासाला वेगळे वळण लागले, त्या राणी क्लिओपात्राला स्नान करण्यास गाढवीचे दूध लागे अर्थात तिच्या गाढवीही

न्हाऊन-धुऊन स्वच्छ ठेवल्या जात तर स्पेनची राणी मारिया ही ताज्या दारूने नहात असे हिमालयाची उमा दवाकुराने स्नान करीत असे आणि कोण कोण आगीतही स्नान करतात म्हणे। या सौंदर्यवतीचे ठीक, पण दगडांच्या देवाना हे का चोचले ?

कुचेला उत्सव चालू होता कुचेला म्हणजे सुदामा श्रीकृष्णाचा हा गरीब बालमित्र एकदा त्याला भेटावयास आला व श्रीकृष्ण त्याला प्रेमाने भेटला त्या प्रीत्यर्थ हा उत्सव, पण हे लोक इतक्या दुरून आलेल्याना, आम्हा लोकाना काही देवाला भेटू देत नव्हते उलट महानुभवी लोकासारखे काळे कपडे घातलेले लोक आम्हाला आत जाण्यास अडवू लागले आमोरिनचे वशज असावेत असे आम्ही म्हटले आणि कावळा बसला व फादी मोडली आमची वाणी खरी ठरली हे देऊळ खरोखरच आमोरिनच्या पजाखाली होते आमोरिनच्या विश्वस्तामार्फत या देवालयाचा कारभार चालतो

हे लोक आम्हाला मनाई करीत होते, तावातावाने हातवारे करून काहीतरी सागत होते आणि आम्ही परत परत त्याना सुदाम्याची गोष्ट सागत होतो. मित्राला काही श्रीकृष्णाने परत पाठवले नाही, पण भाषेशिवाय हे त्याना सागावे कसे ?

' भाषा हवी कशाला मौनामध्येच बोलू ' वसत बापटाना हे जमले असेल

हे लोक आम्हाला अस्पृश्य समजत होते आम्ही ब्राह्मण नाही असे त्याना वाटले होते

अस्पृश्यता हा आपल्या समाजजीवनावरील मोठा कलक आहे अजून त्याला आळा घालता आला नाही इथे या मदिरात महात्मा गाधीनी उपवास करून अस्पृश्याना प्रवेश दिला होता, पण तो त्या वेळेपुरताच असावा

पण काही वेळा अस्पृश्यता ही शिवी कधी कधी ओवी बनते कलक हा टिळा मानला जातो

त्रिच्यूर जिल्ह्यात ' क्रोडलगर 'च्या पारलम या गावात एक जत्रा भरते तिथे १७ दिवस हा उत्सव चालतो अस्पृश्य लोक बेफाम, बेभान होऊन जथ्याने नाचत, गात धुद होऊन येतात हे लोक दारू प्यालेले असतात त्यानी अफू घेतलेली असते त्याना शुद्ध नसते

देवीने दारूक राक्षसाचा वध केला तेव्हा देवी मानसिक रुग्ण झाली होती तेव्हाही अशीच बेभान होऊन बेताल नाचत सुटली होती

तिला खूष करण्यास, तिला समजावण्यास हेही स्वत ला भाल्याने टोचून घेतात, तलवारीने जीभ फाळून घेतात, कान काटून काढतात, नाक कापून टाकतात, डोळ्याना जखम करून घेतात त्याच्या तोंडात अश्लील गाणी असतात, घाणेरडे अगविक्षेप, स्वत चे अवयव दाखविण्याचा अगोचरपणा, आचरटपणा, बीभत्सपणा,

हे असे खेळ करीत हा ताडा नाचत, झिम्मा खेळत निघून जातो कुणीतरी हे आम्हाला सांगितले

या केरळमध्ये दोन ठिकाणी आम्ही देवळे बघितली मुद्दाम ती आम्हाला दाखवली गेली

लंबवर्तुळाकार वाटोळी वाटोळ्याच जोत्यावर उभ्या असलेल्या या देवळावर कलाकुसरीचा एक पट्टा होता विमान व मंडप एवढाच आवाढा होता आत प्रदक्षिणा घालताना 'फुगडी फू फू बाई फू' करून वाटोळेच हिंडावे लागले

आपण बहुतेक अनंत हे विष्णुसहस्रनामातले विष्णूचे नाव समजतो, पण श्रीविष्णू ज्या शेषावर विश्राती घेतात त्याचे नाव अनंत असे आहे

या अनंताचा निवास 'थिरू' येथे आहे या थिरू अनंतपुरम्‌ला, त्रिवेंद्रमला आम्ही रात्री पोहोचलो केरळच्या पायथ्याशी असलेले हे त्रिवेंद्रम शहर म्हणजे त्रावणकोरची राजधानी आहे इथले प्रसिद्ध पद्मनाथ मंदिर पाहायला आम्ही भल्या पहाटे उठून बाहेर पडलो, पण मंदिर त्रावणकोरच्या राजाकरिता अडून बसले होते शेवटी आम्ही बाहेर बसलो असतानाच एक पोरगेलासा इसम आला आणि मंदिराचे दरवाजे उघडले तेव्हा ध्यानात आले, हाच तो त्रावणकोरचा राजा पद्मनाभपुराण तिथेच राहिले आणि राजापुराण सुरू झाले मला तर दगडाच्या देवापेक्षा जिताजागता माणूस जास्त आवडतो आणि राजाचे कवतुक ऐकायला मी कान फाकले

हा राजा विलासी आयुष्याला चटावलेला नाही हा स्वत देऊळ झाडतो, तेल–वात करतो हा धर्माचा अभिमानी आहे, आश्रयदाता आहे जर हा राजा एखाद्या दिवशी काही अपरिहार्य कारणामुळे देवदर्शनाला येऊ शकला नाही, तर त्याला ठराविक रकमेचा दंड देवस्थानाला द्यावा लागतो, अर्थात त्याचा त्यानेच हा नियम केला आहे, स्वत:वर बंधन घालून घेतले आहे हा सुबुद्ध आहे, स्वतंत्र वृत्तीचा आहे, सुस्वभावी आहे आम्ही त्याला भेटायचा प्रयत्न केला, पण तो भेटला नाही शेवटी आपण एका संस्थानचे राजा आहोत, हेही त्याला माहीत होते

केरळची मंदिरे एरवी साधीसुधी, कौलारू तांबड्या–निळ्या पट्ट्याची घरे व मंदिरे विशेष फरक न दाखविणारी, पण या मंदिरांवर राजाचा वरदहस्त उंचवटयावरील या मंदिराचे गोपुर अभिमानाने आणखीन उंच झाले होते

हे मंदिर कुणी बांधले कळत नाही, पण त्रावणकोरचा राजा मार्तंडवर्मा याने या मंदिराला नवीन रूप दिले जुन्या रूपाचे वर्णन देवालयात मिळते

या मंदिराकरिता ४००० वास्तुशिल्पकार, ६०,००० कामगार व १,००० हत्ती २२ वर्षे ६ महिने खपत होते मंदिराचा प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ चिपू आचारी

व त्याचे मदतनीस आत देवळाच्या डाव्या बाजूला दिसतात

या दक्षिणेकडच्या साऱ्याच देवळात एक वस्त्र व वर उपवस्त्र घालून आत जावे लागते आम्ही काही देवपुजेकरिता आलो नव्हतो, पण प्रवेशच बद अर्थात मग धांदल उडाली थोडे हॉटेलच्या खोलीवर धावले आणि त्यानी पाढरी धोतरे, आमची पांढरी पातळे आणि पांढऱ्या चादरीसुद्धा आणल्या मुलानी तर पांढरे रुमाल ढुगणाला बाधले

हे दक्षिणेचे देव बायकाबाबतीत मात्र सौजन्यशील आहेत साडीच नाही, पण चुडीदार, कुडता काहीही चालते अर्थात ते उत्तरेकडचे हिंदूचे पोशाख त्यांना माहीत आहे

मदिराभोवतीच्या विस्तीर्ण कुलशेखर मार्गावर ३३६ दगडी स्तभावर पितळी पणत्या घेतलेल्या स्त्रिया आहेत उत्सवाच्या वेळी या पणत्या पेटवल्या जातात, तेव्हा ' लखलख चदेरी तेजाची न्यारी दुनिया ' होत असावी आणि चादणेसुद्धा लाजून ढगाआड जात असावे

प्रवेशद्वारावर गरूड व हनुमान उभे राहून वाट दाखवतात, पण आपल्याला नाही, राजाला आपल्याला उत्तरेकडून मार्ग असतो

मदिराच्या एका मडपाच्या कोपऱ्यात सप्तस्वराचे दगडी स्तभ आहेत चारी बाजूचे स्तभ वेगळे वेगळे बोलतात छतावरसुद्धा एक दगडी स्तभ आहे

पुढच्या विशाल मडपात होणारा त्रावणकोरच्या राजाचा राज्यारोहण समारभ अनतशयनम निजल्या निजल्या पाहत असे विष्णूची ही प्रचड काळी मूर्ती १९ फूट झोपलेली आहे नाभीतल्या कमळावर अर्थात ब्रह्मदेव उभे आहेत लक्ष्मी चरण चुरीत आहे तिच्याशेजारी ऋषी स्तवन करीत आहेत

ही मूर्ती इतकी प्रचड आहे, अर्थात ही तीन दरवाजातून पाहावी लागते पहिले मस्तकदर्शन, नतर नाभीदर्शन आणि शेवटचे चरणदर्शन मदिरातील सगळी शिल्पे काळ्या दगडाची, पत्थराची पण ही मूर्ती मात्र वाळू व चुना यानी बनवली आहे अर्थात या मूर्तीला स्नान नाही, अभिषेक नाही शारीरिक स्वच्छता नाहीच, पण या देवाला मनाचे मालिन्यही नाही या देवाला काजीचा नैवेद्य लागतो तो करवटीतून आणि तोही एका ' पुयर ' या नायर स्त्रीकडून.

याचे कारण अनतखड जगलात एक मूल भुकेने कळवळून रडत होते एका स्त्रीने त्याला स्तनाला धरले, पण त्याची भूक भागेना, तेव्हा तिने बुडकुल्यातल्या पेजेची धार त्याच्या तोंडात धरली थोड्या वेळेने तिने पाहिले एक नाग येऊन त्याने फणा फुलवला व तो बालकाला सावली देऊ लागला ती स्त्री समजली, ते बालक श्रीविष्णू होते

श्रीविष्णूही ती पेज आणि ती देणारी स्त्री विसरले नाहीत

वाटेत आम्ही खूपकडे पाहिले आणि बारकाईने पाहिले घरासमोर नागाची प्रतिमा असलेले चबुतरे दिसत तुळशीसमोर दिवा ठेवताना या काउस 'पुढे, सोप्यापुढेही दिवली ठेवलेली असे

नागपूजा हे केरळचे वैशिष्ट्य आहे ही नागपूजा फार पूर्वीपासून होती म्हणतात किंवा या नागावरूनच नायर शब्द आला हा नाग हा रक्षक, तो आपला हितकर्ता इथल्या वेली या फळाफुलासाठी नसतात, शोभेसाठीही नसतात त्या असतात नागासाठी त्याना आडोसा हवा म्हणून, त्याना आसरा हवा म्हणून, त्याना थडाई हवी म्हणून आपणही या नागाला पूजतोच नागपचमीच्या दिवशी दूध–लाह्या देऊन ' दूध लाह्यो चाख भावाक म्हज्या राख ' म्हणून विनती करतो

मावेली क्रुरा येथे कौलारू छपराचे सर्पदेवतेचे देऊळ आहे ही सर्पदेवता मातृमुखी आहे सर्पदंश झालेले रोगी इथे बरे होतात खरेखोटे कोण जाणे ! आपण ऐकावे, न पटले ते सोडून द्यावे

वासावरून जशी अन्नाची चव कळते, तशी ' खेड्यामधले घर कौलारू ' अशी आर्ट गॅलरीची इमारत पाहतानाच आपल्याला आतल्या कलेची कल्पना येते, चुणूक लागते आणि कळते ' दिसते तसे नसते ' ही म्हण ही इमारत खोटी पाडते

राजा रविवर्मा याची त्रिवेंद्रम ही सासुरवाडी आणि केरळीय परपरेने दत्तक घर त्याची इथे खूप चित्रे आहेत हस व दमयती, जटायुवध, हरिश्चद्र-तारामती, भीष्मप्रतिज्ञा, गगावतरण आदी पौराणिक प्रसग तसेच दादाभाई नवरोजी, विवेकानद हेही चित्रित झाले आहेत अवनिंदनाथ टागोर, रविवर्माचे भाऊ राजवर्मा यांनी काढलेली चित्रे त्याच्या नोंदीसह कुठे एक मिनिट, कुठे दोन मिनिटे दिसतात तसेच राजा रविवर्मा यांना बक्षीस मिळून सन्मानित करण्यात आलेले शिकागोच्या प्रदर्शनातले ' द पॉव्हर्टी ' हे चित्रही तिथे आहे रविवर्मा यांचे आंग्ल गुरू यांचे ' The lady with fan पखा घेऊन ही स्त्री वळून वळून आपल्याकडे पाहते आपण मागे–पुढे होतो, येतो–जातो, पण या सटवीची नजर आपल्यावरच

ही चित्रे पाहता पाहता आम्ही एका चित्रापुढे स्तब्ध झालो ते म्हणजे राजा रविवर्माच्या प्रेयसीचे चित्र, सुगधा म्हापसेकर हिचे चित्र पाहून सुदर शालीन चेहरा, माथ्यावरचे कुरळे केस, चमकत असलेली दतपक्ती, पिवळी सोनचाफी, किंचित गुलाबी झाक असलेली त्वचा निळ्या जळासारखा शालू नेसलेली ही शुभ्रवसना मनात कालवाकालव करून गेली हिराबाई पेडणेकर, अजनीबाई मालपेकर यांची ही समकालीन त्यांच्याचसारखी ही आपल्या गोमतकाची होती

खरे म्हटले तर राजा रविवर्मा हे राजघराण्यातले नव्हेत त्रावणकोरचा राजा या चित्रकारावर लुब्ध झाला होता थरवाड 'च्या पद्धतीप्रमाणे त्याने आपल्या

बहिणीकरिता या चित्रकाराला मागणी घातली पुरुष काय पत्करतो ? प्रेयसी की पैसा ? शेवटी राजा रविवर्मा त्रावणकोरचा घरजावई झाला आणि त्याने सुगधाला निरोप दिला

' मी तुझा कोणी नव्हतो
आणि कुणी नाही
विसर सर्व घडलेले
विसर तू, मलाही '

हे सर्व नकळत झाले असेल प्रेम सपल्यावर उरते काय – मरण ते सुगधाने पत्करले

ओणम् हा सण होऊन गेला होता नूतन वर्षदिन थिय्या ' नवे ' पहिल्या पिकाची पेंडी घेऊन आला होता नव्या भाताचे तादूळ केले गेले थोडे भात पुढील्ल वर्षांच्या बियाकरिता साठवून, मग बाकीचे नांगरून ठेवलेल्या जमिनीत पेरायला नेण्यात येणार होते

हस्तनक्षत्र लागून दहा दिवस नबुद्रीपाद ब्राह्मणाच्या घरी पूजापाठ चालले होते सोवळचा–ओवळयाचे स्तोम माजवीत हे कर्मकांड उरकीत होते रूढी–परपरा जपत होते

या उत्सवाला बळीराजा आला होता त्याची पूजा झाली होती सजवलेल्या कलशाच्या भोवती ' पुलबक्कम ' ही फुलाची व ' पुआडियल ' ही तादळाच्या पीठाची कमलाकृती रांगोळी काढली होती मधल्या ' ओणतप्प्या 'ची पूजा झाली होती त्याच्याभोवती मुलींनी फेर धरला होता आणि नाचत, गात हादगा जागवला होता

केळीच्या पानांवर बळीराजाला ६४ प्रकारचा नैवेद्य दाखवला होता इडली दोसाय तर होतेच, पण उयनी वडा, उयनी आप्पम्, पक्वडा, मसाले वडा, कट्टु साबार, रसम् लिबाचे लोणचे व ओल्या बाबूचे ' उरकाय, ' आक्कम्, पक्कम् पापड व पायस् – नव्या तादळाची दुधातली खीर होती

इतकेच नव्हे तर मुडकार ' कुट्टीयान ओवाळे, ' सुपारीची ओली शिपटी, केळचाची घडावली, विडचाची पाने, केळीची पाने घातलेले ओझे घेऊन आला होता ते ओझे मग मुलीच्या घरी नव्हे, मुलाच्या घरी पाठवण्यात आले ते ओझे ओझे न मानता त्यात मिठाई घातली होती त्या लोकानीही घेऊन गेलेल्या गडचाचे हात ओले केले

' कुट्टनाद ' या सर्पाच्या आकाराच्या बोटीच्या होडचाच्या शर्यती झाल्या होत्या सजवलेल्या हत्तींचे खेळ झाले होते ' पतुकळी ' हे चेडूचे खेळ मुलाकरिता आणि पतग उडवण्याच्या ' सर्ती 'ही होऊन गेल्या या सगळचाना पुरस्कार जाहीर

झाले होते तसेच ओणम्च्या पुष्परचनेलाही बक्षिसे दिली गेली

श्रावण किंवा भाद्रव्याच्या सुरुवातीला साजऱ्या होणाऱ्या या ऋतुउत्सवाला सगळे केरळ सामोरे जात असते 'फुलेचि घर फुलेचि दार ' केरळ असे नटून जाते मोकळ्या माळावर रंगीबेरंगी तेरडा, हळदुवी हरिणीची फुले फुललेली असतात गुलाबी ' कुड्डुक ' उगरमेली झाली असते जाईजुईची झुडपे नक्षत्रांनी भरून ओतत असतात सोनचाफा गंध उडवीत असतो नागचाफा फणा काढून डोलत असतो केतकी उगवलेली असते ' फुलों से कलियों से तेरी माँग भर दूंगा ' असे इथला प्रत्येक तरुण आपल्या सखीला म्हणत असेल हा फुलांचाच उत्सव आहे इकेबाना किंवा चेरी उत्सवाची महती जपानने फार गाऊ नये केरळमध्ये हा असा उत्सव फार पूर्वीपासून आहे

त्रिवेंद्रमहून सोळा मैलावर नैय्यर धरण व जवळचे थुंबा हे अणुकेंद्र बाहेरच्या बाहेर पाहून आम्ही कोवालम्कडे वळलो

किंचित आत वळलेला, माडापोफळींनी भरलेल्या डोंगराच्या कुशीत लाडाने शिरलेला हा नागमोडी चंद्राकृती किनारा म्हणजेच ' कोवालम् बीच ' हिरवे निळे पाणी, पांढऱ्या, पिवळ्या मोगऱ्याच्या फुलासारखी वाळू व वर आळसावून पडलेल्या मदनिका आम्हाला आमच्या पाळोले वागातोर किनाऱ्याची आठवण झाली

ओल्या वाळूवर तापलेल्या उन्हाच्या गंधात अनावृत्त तरुणी, तसेच तरुण आळोखेपिळोखे

मनाची नाहीच, जनाची तरी लाज आम्ही नाक मुरडले असावे हे पाहताच शेजारच्या डोंगराना झोंबले असावे ते म्हणाले, ' का ? तुम्हाला याचा विटाळ आहे ? गोवा तर अशा पर्यटकाकरिता प्रसिद्ध आहे ' बरोबर होते । ' कभी कभी बेजूबान परबत कहते है '

आम्ही एकाला विचारले तो म्हणाला, ' हे सूर्यस्नान केवळ सौंदर्याकरिता नाही लॅनोलिन उणे पडल्याने हाडे, अस्थी जंतूनी भरून जातात मग तुमच्याकडे पांढरे कोड होते आमच्याकडे काळे चट्टे पडतात. उबदार उन्हातही औषधी द्रव्ये असतात मध्यान्हीच्या सूर्याने तर रक्तदाबसुद्धा कमी होतो हे नुसते कातडी सावळी टॅन करण्यासाठी नसते '

एकाच वर्णाचे, एकाच रंगाचे, एकाच ढंगाचे हे लोक फक्त छातीवरचे एक फडके स्त्री–पुरुष हा भेद दाखवीत होते या स्त्रियाना उन्नत उरोज, घाटदार नितंब, शरीराला गोलाई काही काही नसते आम्हाला बिचाऱ्यांना वाटते, बायकांनी बायकासारखेच असावे, दिसावे, वागावे

एका माणसाने अमेरिकेतल्या नग्न माणसाच्या गावाला भेट दिली व तो आपले अनुभव आपल्या मित्राला सांगू लागला आपण एका घराकडे गेलो व बेल वाजवली मोलकरणीने येऊन दार उघडले 'पण ती मोलकरीण होती, हे तुला कसे कळले ?' मित्राने विचारले ! 'कारण तो गडी नव्हता !' तो म्हणाला

जगात जाती किती आहेत ? स्त्री व पुरुष या दोन आहेतच, पण आणखी एक तृतीयपंथी जात आहे ही तिसरी जात नपुंसक असते, पण तरीही त्याची लग्ने होतात

इथल्या कुवागम नावाच्या खेड्यात चैत्र पौर्णिमेला ही लग्ने होतात इथल्या 'आरावण'च्या मंदिरात हे लोक एकत्र येतात. अर्थात हा मोफत खेळ पाहायला गावातले रिकामटेकडे, गुलछबू, टारगट आलेले असतात त्यांतलेच काही तरुण या नवऱ्या मुलीच्या गळ्यात हळकुंडाची थाळी बांधून त्यांना पिवळ्या करून सोडतात एक एक नवरा पाच–पाच सौभाग्यकांक्षिणींना उजवून टाकतो अर्थात या लग्नाला ना देणे, ना घेणे ना गोड, ना धोड

या प्रथेमागचे कारण

कुरुक्षेत्रावर भारतीय युद्ध सुरू होण्यापूर्वी एक विचार आला, तो असा की भूमीला एका पूर्ण पुरुषाचे दान द्यायला हवे, तर पांडवांना युद्धात जय मिळेल पांडवांमध्ये श्रीकृष्ण, अर्जुन व नागकन्या उलुपी झालेला अर्जुनपुत्र आरावण हे तिघे पूर्णपुरुष होते आणि आरावण पुढे झाला, पण त्याने एक इच्छा व्यक्त केली आपण लग्न करू इच्छितो बळी जाणाऱ्या पुरुषाला मुलगी कशी मिळणार ? शेवटी श्रीकृष्णाने स्त्रीरूप घेतले आणि आरावणाचे लग्न झाले एक क्षण प्रेमाचा भोगून आरावण सहस्र मरणे भोगायला गेला

मंदिराशेजारी माळावर ही लग्न झालेली जोडपी एक रात्र घालवतात सकाळी आरावणाची मिरवणूक निघते त्यात या नववधू नाचत गात असतात मग आरावणाचे डोके उडवले जाते आणि यानंतर 'थाळी' मंगळसूत्र तोडून देऊन, बांगड्या फोडून या वधू विधवा होतात छाती पिटून, रडून घेऊन मग या अघोळीला जातात लग्नाची रंगीबेरंगी वस्त्रे सोडून देऊन सुतकाची पांढरी वस्त्रे नेसतात आणि मग ही जत्रा संपते, हे लोक पांगतात

कथाकली पाहायची खूप इच्छा होती आणि इच्छा तशी फळे. जवळच कला-मंगलम्‌तर्फे कथाकलीचा कार्यक्रम होता आम्ही राहत होतो, त्या हॉटेलमध्ये फलकावर कथाकलीची जाहिरात होती

कथाकली ही आमच्या काल्या ललितासारखी आमचे हे दशावतारी खेळ देवळाच्या प्रांगणात, समुद्र व माड या पार्श्वभूमीवर निसर्गाच्या सान्निध्यात होतात, तशीच

एका घराच्या अंगणात हे संगीतप्रधान नृत्य-नाट्य होणार होते मागे पुरुषभर उंचीच्या समया होत्या मागे एक पडद्यासारखी चादर लावली होती ती काढायला दोन पुरुष माणसे आली आणि वाद्ये सुरू झाली बारा माणसे होती. चार वाजवणारी, चार नाचणारी आणि चार गायला बसली पात्रे बोलत नव्हती, फक्त मुद्राभिनयाने आपल्या मनाचा भावाविष्कार दाखवीत होती 'चेंगलम् चेंडा मंगलम्' ताल-वाद्याच्या ठेक्यावर रौद्र, शृंगार, हास्य, कारुण्य, बीभत्स हे नवरस प्रकट होणार होते शंकराचा हा पाचवा वेद, नाट्यवेद आता भलताच रंगणार होता

कथा पौराणिक होती गडद रंगवलेला, भडक कपडे घातलेला कुणीतरी क्रोधी किंचाळत होता आणि फिक्की, सौम्यशी रंगवलेली स्त्री करुण वाणीने त्याला समजावीत होती, त्याची मनधरणी करीत होती, त्याचे पाय धरून होती

आपला प्रचंड घागरा गरागरा हलवीत,दमदार पावले टाकीत,पदन्यास टाकीत टाकीत हा पुढे झाला आणि थयथया नाचत सुटला विकट हास्य करीत, आपला क्रोध डोळ्यांत, हातात, बोटात, पावलात, केसात आणि पापणीतसुद्धा दाखवीत राहिला या अशा कंसासारख्या रावणासारख्या राक्षसाचा मुखवटा गडद असतो, त्याला 'कच्ची' म्हणतात, या उलट 'पच्चा' हा हिरवा मुखवटा सात्त्विक असतो

या नृत्याचे, मुद्राभिनयाचे शिक्षण वयाच्या पाचव्या वर्षापासून 'कलरी' म्हणजे कलाशाळेत दिले जाते नुसती इच्छा असून उपयोग नसतो शरीर बांधेसूद ठेवण्यासाठी व्यायाम करावा लागतो खूप परिश्रम घ्यावे लागतात नृत्यशिक्षण ही साधना मानावी लागते कला अंगात मुरवावी लागते सगळे आयुष्य या कथाकलीत घालावे लागते आणि हे पिढ्यान्‌पिढ्या चालते

पण अस्सल गोष्टी खेड्यातच असतात त्याची भ्रष्ट नक्कल शहरात होते आम्ही पाहिलेली कथाकली हा तीन पैशाचा तमाशा होती खरी कथाकली दूर खेड्यात जाऊन पाहायला हवी तिथे कलेचा सच्चा आविष्कार पाहायला मिळतो रात्र रात्र जागरण होते, पण डोळे निवतात आणि मन तृप्तीने भरून जाते

आमच्या गोमंतकात खेड्यापाड्यात, थंडीच्या दिवसात जत्रा कालोत्सव होतात या उत्सवात पालखी, पेणे होते मग दशावतारी खेळ आणि मग मुख्य नाटक होते

तंजावरप्रमाणेच आम्हीही हा दशावतारी खेळ कर्नाटकातल्या यक्षगानवरून उसना घेतला आजसुद्धा कलोत्सवात जे हरिदास बोलतात, ते त्यांचे त्यानाच माहीत नसते. त्याकरिता प्राकृत कानडी कळायला हवी

या यक्षगानाची कल्पना अशी की, जेव्हा जीव गर्भाशयात असतो, तेव्हा तो मत्स्यावतार मानला जातो थोडा मोठा झाला की तो होतो कासव, कूर्म तो रांगू

लागतो मग वराह अवतारात तो घोडा घोडा करतो पुरी बुद्धी नाही थोडा जनावरासारखा नरसिह होतो मौंजीबंधनानेला बटू म्हणजे वामन तो पुढे रागीट परशुराम होतो विवाहकाली तो राम असतो गृहस्थाश्रमी झाला की कृष्णावतार आणि शेवटी तो अवसानघातकी कलकी होतो हे दहाही अवतार पूर्वी काल्यात दाखवले जात

हे दहा अवतार म्हणजे मानवी जीवनाची सुरवात, आरंभ. डार्विनच्या शोधापूर्वी हे आपल्याला माहीत आहे

आपल्या खेळातल्याप्रमाणेच इथेही आरंभी मुकी धुमाळी वाजते नंतर 'मन्मटा गणपती येनम् ' आपणही नमन लंबोदरा गौरीच्या कुवरा म्हणत गणपतीचे स्तवन करतो आणि मग गणपती आपला मुखवटा सांभाळीत येऊन बसतो मग शारदा नाचत येते शंकासुरही येतो

आपल्याकडे एक म्हण आहे, ' फेस्त करी गाव पादव्हिगारा नाव.. ' म्हणजे उत्सव जरी देवस्थानचा असला तरी तो होतो लोकाश्रयावर, लोकांच्या पैशावर अर्थात सगळा गाव या उत्सवाचा भागीदार असतो

दुपारचा स्वयंपाक पुरणावरणाचा असतो ताज्या फटफटीत मासळीचे चमचमीत हुमण व तळलेली मासळी हा रात्रीचा बेत असतो आणि मुख्य पक्वान्न म्हणजे तांदळाच्या रसात घातलेल्या शिरवळ्या, ' तांदळाच्या शेवया असते

नातेवाईकांची भाऊगर्दी झालेली असते पाहुणे-रावळे आलेले असतात भरपेट जेवून आणि गोडाधोडावर ताव मारून काल्याला येईतो मध्यान्ह झालेली असते ' सकासूर ' येऊन वेद चोरून घेऊन गेलेला असतो दिवसभराचे श्रम मांडवात बसल्याबरोबर यजमानाचा डोळा लागतो

तो डोळे उघडतो आणि त्याला दिसते, केसांत अबोलीचा भरगच्च वळेसर, नवे कोरे लुगडे नेसून त्याची बायको खांबाला टेकून बसलेली असते दिवसभराचे कुळाचार, पाहुणचार आणि नंतरची उस्तवार करून ती शिणलेली असते, कोमेजून गेलेली दिसते त्याला तिची कणव येते आणि त्याच्या ध्यानात येते की, ती येण्याआधी सकासुराचे सवंग येऊन गेले आहे

त्याचे मन फणा काढते अरे ! मीसुद्धा दोन कुडव भात उत्सवाला दिले आहेत आणि तो मोठ्याने ओरडतो, ' हाड रे सकासुरा, सवंग भायर '

जितका जास्त माणूस मोठा, तितका त्याचा बारदाना मोठा आणि तितका त्याला येण्यास उशीर. दुसरा मग येतो आणि म्हणतो, ' हाड रे सकासुरा, सवंग भायर ' मग तिसरा पहाटेचा उजेड होईतो हे काळे कपडे घातलेले सकासुरा सवंग नाचत असतात आणि हरिदास ' सकासुरा, रे महावीरा ' म्हणत बरोबर झांज बडवीत असतो

मला पाहिजे होते ते हे   इथेसुद्धा हे असेच घडते का ?

सध्याकाळपर्यंत आम्हाला कन्याकुमारीला पोहोचायचे होते त्याकरिता आम्ही धावत–पळत नागरकोंइलहून विवेकानद आश्रमात आलो, पण वाटेवरचे शुचिद्रम पाहायचे काही सोडले नाही

मदिर सांगते, आपण केरळचे रहिवासी, पण उभे पट्टे असलेले तमिळ कपडे पाघरते आणि आढ्याची टोके वर करून केरळी परपरा राखते अर्थात सीमेवर असल्याने त्याला पाडसावरचा कुवाळा ' व्हायलाच पाहिजे

तिरुमल नायक याने हे देऊळ बाधले अर्थात ते राजा–प्रधानाचे पुतळे अगा-खाद्यावर खेळवते गरूडमडपात हा तिरुमल नायक बसला त्याच्या तोंडानाकातून तार जाते

तिरुमल नायक हा राजा कसलेला राजकारणी तो या कानाची बातमी त्या कानाला कसा लावू देईल ? आणि तोंडातून वाफ कशी दडवेल ? हे शक्य आहे ?

अहिल्येशी केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल गौतमाकडून इद्राला शाप मिळाला त्याच्या अगाला लक्ष लक्ष क्षते पडली, पण नतर अनसूयेकडून त्याची ' शुचि ' झाली म्हणून हे शुचिद्रम अजून इद्र या देवाच्या दर्शनाला येतो फक्त पुजाऱ्यांना दिसतो पिपळाजवळ ठेवलेल्या उकळणाऱ्या तुपाच्या कढईत बुडी मारून प्रायश्चित्त घेतो तरी श्रद्धा हवी, दृष्टी हवी,तर तो आपल्याला दिसतो अर्थात हे एकटा ऐकतो, दुसरा ऐकतो तिसरा दादा बोले तेचि रे ' म्हणतो, पण या मदिरात इद्र-देवाचा पुतळा नाही, शिल्प नाही, काही नाही आरसा हे त्याचे प्रतीक आहे

या मदिरात फक्त सप्तस्वरच नाहीत, खूप आहेत चार मृदग आहेत घोष, वीणा, झकार, डमरू, जलतरग, घटा, बासरी, सनई आहेत दोन मोठ्या स्वर-स्तभावर ३३ लहान स्तभ आहेत, तर दोन लहान स्तभांवर पचवीस आणखी लहान असे स्तभ आहेत आघात केल्यावर हे ते ते आलाप काढतात

एकमेकाच्या दुव्यात अडकवलेली साखळी ही एका अखड दगडातून बनवलेली आहे शिल्पकलेतील हे एक आश्चर्य आहे आणि एक कौतुक म्हणजे एका मडपात बारा राशी व सत्तावीस नक्षत्रे लुकलुकताना दिसतात

जिच्याकरिता देव कैलास सोडून आला आणि इथे ' स्थाणू ' झाला ते लिंग चकाकत होते देवाला वदन करून आम्ही पुढे निघालो, तेव्हा उन्हे कलू लागली होती

विवेकानदपुरम् आश्रम ते कन्याकुमारी भूशिराचे टोक हे अतर एरवी एक किलोमीटर आणि आश्रमाच्या बसेस ते विनामूल्य दूर करतात, पण आम्हाला

गावही ढोंगी वाटले आणि माणसेही तिथल्या चालकाशी आमचे काही जमले नाही आम्ही दूर राहणेच पसत केले त्यांनी मग आमची खूप मनधरणी केली, पण आंबट पडले होते, दूध विटकळले होते

भात शिजेपर्यंत दम राहतो, निवेपर्यंत नाही शेवटी धावत पळत आम्ही किनाऱ्यावर येऊन उभे राहिलो आणि जीव भाडयात पडला सूर्यास्त अजून व्हायचा होता आकाश जाभुळलेले होते, ओथबलेले होते, इशाऱ्याची वाट पाहत होते

भारताचा नकाशा डोळ्यांसमोर आला आणि आपण भारताच्या चिंचोळ्या टोकावर आहोत, भारतभूच्या पायांजवळ उभे आहोत, हे ध्यानी आले आणि क्षणभर उचबळून आले ऊर भरून आला वाटले, केवढा उत्तुग आपला देश! कुठे दलदल, कुठे वाळवट, कुठे घामाच्या धारा, कुठे उन्हाच्या झळा तर कुठे बर्फाचा मारा आपल्या पर्वताची शिखरे किती प्रचंड, नद्या केवढ्या मोठ्या आणि हे तीन सागरांचे दर्शन

मला एक गोष्ट आठवली

एकदा दयानद सरस्वती याना एक माणूस भेटायला आला बोलता बोलता त्याने आपल्या ऐश्वर्याच्या गोष्टी सागावयास सुरुवात केली स्वामीजीना त्याची कीव आली त्यानी आपल्या शिष्यांस नकाशा आणायला लावला आणि तो त्या इसमाच्या पुढे पसरला व त्या जगाच्या नकाशातला त्याचा देश शोधण्यास त्याला सागितले त्याने एवढ्याशा ठिपक्यासारखा आपला देश शोधला, पण त्याला प्रात दिसेना, गाव दिसेना सरस्वतीनी त्याला उपदेश केला, 'वेड्या! जिथे तुला तुझा गाव सापडत नाही, प्रात दिसत नाही, नकाशावर बिंदूसारखाही तो वाटत नाही, तिथे कुठल्या वैभवाची गाणी गातोस? या विश्वात तू कुठे आहेस? किती लहान, बेडकांच्या जगात राहतो आपण! हे तुला कळले ना?'

तिन्ही बाजूनी अथाग समुद्र हिंदी महासागर, अरबी समुद्र व बगालचा उपसागर पाणी, पाणी आणि पाणी 'पानी, तेरा रग कैसा?' पाण्यामध्ये जे मिसळले जाते, तो त्याचा रग असतो

या तिन्ही सागराचे रग वेगळे दिसतात म्हणे! अरबी समुद्राचे मोरपिसी निळे पाणी बगालच्या उपसागराचे पोपटी हिरवट आणि हिंदी महासागराचे पाण्यासारखेच पाणी याला त्या त्या समुद्राने फेकून दिलेली काळी, किरमिजी, ताबडी, दाणेदार, कणीदार तादळासारखी वाळू पुरावा देते

नियोजित वर आला नाही त्यामुळे या भाबड्या कन्येने रागाने अक्षता फेकून मारल्या त्या पिंजर हळदीच्या अक्षता रत्नाकरानी माथी धरल्या त्याना भरून आले असावे

हिमराजाची ही कोवळी कुमारी कन्या पुरुषाच्या कारस्थानाला बळी पडली.

नारदाने कपट केले माणसाचे अनुकरण केले त्याच्यासारखा स्वार्थ साधला. तिचे लग्न झाले, तर तिचे कौमार्य भग पावणार होते तिच्या हातातून बाणासुराचा वध होणार नव्हता ज्योतिर्मय जग अधारात बुडून जाणार होते

आमच्यासारखे कितीतरी लोक सूर्यास्त पाहायला डोळ्यात जीव आणून उभे होते अखेर तो क्षण आला क्षितिजाच्या कडेला सूर्यबिबाचा लाल गोळा बुडला आणि म्हणतात तसे ' श्रावणात मेली सासू आणि भाद्रपदात आले आसू ' तशी चंद्राची नखरेल कोर क्षितिजापासून अलग व्हायला लागली

चद्र वर आला आणि येताना पाऊस घेऊन आला क्षणात मुसळधार पाऊस कोसळायला लागला आणि तो जास्त जास्तच होत गेला

चद्रोदय–सूर्यास्त बरोबरीने होतात ते मार्च–सप्टेंबर महिन्यात जेव्हा दिवस रात्र एकाच लांबीचे असतात, तेव्हा एका बाजूने चद्र उगवतो आणि दुसऱ्या बाजूने सूर्य मावळतो उगवती व मावळती समोरासमोर उभ्या राहायला पाहतात

कुठलीही खरेदी किंवा विक्री ही एक कला आहे गोड गोड बोलून कसलाही माल गळयात बाधणे किंवा घासाघीस करून उत्तम माल कमी किमतीत विकत घेणे हे एक शास्त्र असते येरागबाळयाचे ते काम नव्हे

कन्याकुमारीला चटया मिळतात गिऱ्हाईक तो माल कमीत कमी किमतीत घ्यायला पाहते विक्रेते त्याच्यापेक्षा जादा हुशार असतात ते एका मिनिटात हात-चलाखी करतात गिऱ्हाईक चटया खरेदी करते आणि त्याच्या ध्यानात येते की, खरेदी केलेल्या चटयाचा पोत व रग पहिल्याहून खराब आहे आपण फसवलो गेलो आहोत

आमचे एक दूरचे आजोबा होते ते एकदा खरेदीस दुकानात गेले आणि त्यानी एक लुगडे बघितले घासाघीस करायचीच तेव्हा त्यानी दुकानदारास विचारले, ' हे लुगडे किती किमतीचे ?' दुकानदाराने उत्तर दिले, ' बाब ! साठ रुपये ' 'साठ?' आजोबा उद्गारले, ' पन्नासाला देतोस ?' त्यानी विचारले ' साहेब, साठ नाही मी सात म्हणालो, ' विक्रेता म्हणाला ' अस्सं ! सात, मग पाचला दे ' आजोबा बोलले

अर्थात खरेदी करण्यात आम्ही आमच्या आजोबांची नातवडे शोभत होतो. आम्ही त्या मार्गाला गेलो नाही, पण घेतली समुद्रफुले इवले इवले शख. . ती सागरसपत्ती पैशाला पासरीभर मिळत होती सागर उघडया हाताने ती देत होता

सूर्यास्त हुकला होता सूर्योदय पाहण्याकरिता आम्ही पहाटे उठलो काल रात्री ताडव केलेल्या पावसाने पलायन केले होते आकाश निवळले होते समुद्राची मद खळाळती गाज ऐकू येत होती दूरचे माड झावळया हलवून डोलत होते

पोतराजाच्या हिडीस सोंगाला विटलेले जॉयस व नॅन्सी हे जर्मन जोडपे अगदी सकाळी सकाळी कन्याकुमारीच्या प्रांगणात भेटले इथे ती अगदी हरखून गेली होती तो उकिडवा बसून फोटो घेत होता आणि ती खुशीत येऊन डुम डुम डुमाक डुम डुम डुमाक ढोलक्याच्या लयीवर आपणही मान हलवीत आणि कंबर लचकावीत काहीतरी गुणगुणत होती

देवळापुढे डोंबाऱ्याचा खेळ चालला होता एक माकड शिपाईगड्याचा पोशाख आणि खांद्यावर एक बंदुकीवजा काठी घेऊन युद्धावर चालला होता आणि माकडीण डोळ्याला पदर आणि डावा हात डोक्यावर घेऊन बसली होती भाषा कळली नाही, पण हे ' गेला दरियापार ' नाट्य होते आणि खेळ आटोपल्यावर माकडाच्या जोडीला घेऊन तो डोंबारी नमस्काराला आला तेव्हा तो बोलला, ' चल, सलाम कर हे साहेब तुझे अन्नदाते आहेत ते तुझ्या पोटाला उणे पडू देणार नाहीत ' हे आम्हाला कळले आणि जॉयस नॅन्सीलासुद्धा त्यांनी त्याच्या पोटापाण्याची कित्येक महिन्याची बेगमी केली

त्या पोतराजाची आठवण काढली म्हणजे नॅन्सी अजून अंगावर शहारे आणायची आम्ही हसून तिला समजावले हा दक्षिणेचा पोतराज त्याला म्हादगी, म्हादगुळ म्हणतात आमच्याकडे त्याला मरिआई, कडकलक्ष्मी म्हटले जाते यात बहिणी म्हणून ज्या ग्रामदेवता इथे आहेत, त्याचा हा भाऊ म्हणवला जातो आमच्या गोव्यातसुद्धा लाडीराय, मोरजाय, केळबाय, केरबाय, सातेरी, मिलाग्र व भगवती या सात ग्रामदेवता आहेत आणि त्याचा खेतलो म्हणून भाऊ ढुंगण वाकडे करून बसलेला आहे संस्कृतीचे हे रूप असते हे रंग असतात सगळीकडे तुमच्याकडेसुद्धा हे असेच असेल... तुम्ही गोव्यात याल तेव्हा आम्ही तुम्हाला हे दाखवू

आम्ही कुमारीचे दर्शन घ्यायला गेलो

लाल रेशमी भरजरी परकर घातलेला, दंडावरचे सोनेरी काठ, खांद्यावरची सोनेरी कोयरी आणि कंचुकीचे मागचे सोनेरी बंध उजव्या बाजूने खोवलेला शेला डोक्यावरचा चकाकता मुकुट, कमरेची मेखला लखलखते दोन्ही नाक-पुड्यातले हिरे झगमगतात, अशी वधुवेशातली कन्याकुमारी उभी आहे

सौभाग्यकांक्षिणी म्हणाल तर हातात फुलांची वरमाला नाही, पण शिवाला आवडणारी रुद्राक्षमाळ आहे रुद्राक्ष म्हणजे वैराग्य, वंचना हसऱ्या मुखवट्याआड डोळ्यातले आसू लपवीत, कल्लोळ दाबीत, उसासे उरात दडवीत ही कन्याकुमारी उभी आहे

' सैय्या झुठो का बडा सिरताज निकला ' हे दुःख, हा अपमान, ही वंचना तिला जाळीत आहे प्रेमाची फुले दगडावर पडली, हे तिला कळून चुकले आहे

तिने वराकडे पाठ फिरविली आहे ' नको क्षुद्र संसार तो दुबळांचा ' भ्याडाचा, लबाडांचा, त्यापेक्षा त्याची दुरता साहवीत ही वधू युगानुयुगे उभी राहील

बिचारी माझी बाळी ती ! खूप सोसलस तुला कधी पोटभर रडून घ्यावेसे नाही वाटले ? गळचात गळा घालून आवेग मोकळा करावासा नाही वाटला ? कुठून आणलस हे धैर्य !

' सगळच कसे होणार
आपल्या मनासारखे
आपणसुद्धा आपल्याला
होत असतो पारखे !'

दान पडल नाही म्हणून सारीपाट उलथून असा उधळून टाकायचा ? आपण स्त्रियांनी ही स्वप्ने पाहूच नयेत मग ती फोल होण्याचे दु ख नाही आणि साफल्याचे मोलही मोजावे लागत नाही

मलबारी स्त्रीला जेवढे प्रियकर, तितका तिला मान ही जवळची देख न घेता ही कोवळी वधू गलथान, दिलेला शब्द न पाळता येणाऱ्या एका भणग जोगड्याकरिता कल्पातापर्यंत वचनबद्ध राहते हे फक्त स्त्रीच करू जाणे तीच करू शकते आम्ही आमच्या पुरुषमंडळीना खूप चिडवून घेतले

वरमाला घेऊन उभ्या असलेल्या या वधूचे तोंड एरवी वराकडे शुचिंद्रमकडे असायला हवे होते, पण ती रागाने पूर्वेकडे तोंड करून उभी आहे आणि मंदिरात प्रवेश मिळतो उत्तरेकडून याचे कारण देवीच्या नाकात जो तेजस्वी हिरा आहे, भोवतालच्या पाण्यातले खडक दाखविण्याचे दिपस्तंभी काम तो करीत असे, पण एका स्त्रीच्या नाकातील तो खडा, तो चळला, चंचलपणा करू लागला नको त्या वेळेला चकाकू लागला आणि त्याचे किरण परावर्तित होऊन खलाशांचे डोळे दिपून अपघात व्हायला लागले, त्यामुळे पुढचा दरवाजा बंद ठेवावा लागला

कन्याकुमारीचे मंदिर पाहिल्यावर कुणीही शेजारच्या गांधी स्मारकाकडे जातो त्यांच्या अस्थी १२ फेब्रुवारी, १९४८ रोजी इथे विसर्जित केल्या गेल्या २ ऑक्टोबरला सूर्यकिरण आतल्या चौथऱ्याला भेट देऊन बाहेर सरतात

एकदा गांधीजी इथे आले होते तो विराट निसर्ग, भारतमातेचे ते चरण धुणारे तिन्ही सागर बापू भावनावश झाले आणि त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले ' इथेच राहता आले तर ! '

आणि त्यांचे उद्‌गार खरे झाले बापू इथले कायमचे रहिवासी झाले

पाण्यात अर्पण करण्यापूर्वी अस्थीकरंडक इथे ठेवला होता, त्या जागेवर हे स्मारक आहे

कुमारीने ज्या शिळेवर राहून शिवाची वाट पाहिली, ती शिला 'श्रीपाद पारै' म्हटली जाते पारै म्हणजे शिळा पार्वतीच्या पावलाचे दर्शन इथे होते याच शिळेच्या उच्च भागावर विवेकानंद स्मारक उभारले आहे हे स्मारक पाहायला लाँचमधून जावे लागते २९ डिसेंबर, १८९२ ला विवेकानंद इथे आले होते ६० फूट दूर असलेल्या या खडकावर बसून त्यांनी भारतभूला डोळेभर पाहून घेतले कफनीत दिडकी नव्हती, त्यामुळे ते पोहून गेले होते देशासाठी उर्वरित आयुष्य खर्चायचे ही प्रेरणा देणारा तो खडक बेलूरमठासारखे स्मारक झाले आहे

लाँचमध्ये आमच्याबरोबर जॉयस–नॅन्सीचे जोडपे होते त्यांना विवेकानंदाची माहिती नव्हती तेव्हा ही आम्हाला सांगावी लागली विवेकानंदाच्या खूप गोष्टी आम्ही त्यांना सांगितल्या सिस्टर निवेदिताविषयीही त्यांना माहिती नव्हती सिस्टर निवेदिता ही तुमचीच आयर्लंडची अल्स्टर गावची मार्गारेट ह्युमस असे सांगितल्या-वर त्यांना आश्चर्य वाटले

हे जोडपे फ्रँकफुर्टच्या शेजारच्या गावात राहत होते तो कॉम्प्युटर इंजिनिअर होता, तर ती होमिओपाथ डॉक्टर होती घरची शेती–भाती होती ते बघण्याचे घरगुती काम दोघेही करीत अजून मूल नव्हत सारे जग हिंडायचे आणि मग या पाशात अडकून बसायचे, असा त्यांचा इरादा असावा

रुडॉल्फ हिटलरविषयी आमच्या मनात जिज्ञासा होती साठ लाख ज्यूंची कत्तल करणारा हा नाझी सैतान होता की खरोखरच याला जर्मन निळ्या रक्तात भेसळ नको होती ? हा फ्युरर जर्मनीवर खरोखरच प्रेम करीत होता, की तो फक्त विस्तारवादी होता ? आम्हाला असे खूप प्रश्न विचारायचे होते, पण आमचे प्रश्न गळ्यातच थिजले

त्याने एका वाक्यात सांगितले, 'We hate Hitler' आमच्या देशाची फाळणी करण्यास हा जबाबदार आहे आपल्या मायभूचे दोन तुकडे झाले, हे त्याचे दुःख होते जर्मन अस्मितेची विटंबना झाली, हा त्याचा राग होता आम्हीही या दशेतून गेलेलो आम्ही त्यांना सहानुभूती दाखविली

पूर्व व पश्चिम जर्मनी एकत्र आली आहेत आणि त्यांची आता खूप आठवण होत आहे ही बुलबुलांची जोडी पुढे आम्हाला दिसली नाही

विवेकानंद स्मारक ही स्वातंत्र्यानंतरच्या काळातली देणगी आहे आठ फूट उंच असणारा धीरगंभीर वाटणारा हा पुतळा आहे या ब्राँझ पुतळ्याचे डोळे कुमारीच्या पावलांकडे लागले आहेत याच पावलाकडे पाहत तीन दिवस बसून त्यांनी ध्यान केले होते

कुशीला त्यांचे गुरू रामकृष्ण परमहंस व माता शारदादेवी होत्या

मदुराईच्या मीनाक्षी मंदिराबद्दल लिहावे तितके थोडे भव्य, उत्तुंग, अजस्र या शब्दांचा वेध घ्यायचा असेल, हे शब्द जाणून घ्यायचे असतील तर हे मंदिर पाहावे हे मंदिर नाही, हा गाव आहे

यमुनाकाठची मथुरा आणि वैगेही नदीकाठची मदुरा हे मधुर नगर पाड्य घराण्यातील सुंदरेश्वर राजाने बांधून काढले

या मंदिराचे सहस्र मंडप, अष्टशक्ती मंडप, पोन्नपलाई मंडप, किलीकुट मंडप, ही एकापेक्षा एक मोठी दालने आहेत आग्नेय बाजूकडची सुवर्णकमलांची पुष्करिणी, चारी बाजूची चार गोपुरे, आपले डोळे थकून जातात पंधरा मजली इमारतीएवढी ही गोपुरे यातले एक तर २२० फूट उंच आहे या गोपुरावरील पौराणिक कथा वाचायला हव्यात, तर त्या दुर्बिणीने वाचाव्या लागतात

मीनाक्षी मंदिर बांधण्याकरिता पाड्य चोला या राजांनी ६०० वर्षे काम केले त्यांनी ते व्रत मानले नंतर विजयनगरचे राजे मोज्जुद झाले या घराण्याने त्यातल्या त्यात तिरुमल नायक (६२३–६५९) या रसिक राजाने खूप भर घातली सहस्र खांबाचा मंडप त्या काळीच उभा राहिला

या भूमीपर्यंत परकीय आक्रमणे पोहोचली नाहीत या भूमीला विनाशाचा त्रास कमी झाला राजांना स्वास्थ्य मिळाले त्यांच्याकडे संपत्ती जमा झाली

मंदिरे या वास्तू फक्त आराधना, पूजन याचकरिता नव्हत्या ही सांस्कृतिक केंद्रे होती तिथे नृत्य, गायन, शिल्प, वादन यांचा शास्त्रयुक्त अभ्यास झाला कलेला पोषक वातावरण निर्माण केले गेले

नावाप्रमाणेच ही मीनाक्षी आहे शंकराप्रमाणेच ही आपल्यालाही भूल घालते ही भिल्लीण उमेसारखी भाबडी नाही कुमारीसारखी भोळी नाही ही मुग्धा नाही ती विकसित झालेली, होऊ घातलेली सहस्रदलाची कळी आहे ती त्याला सुखवत, खुलवत आपलासा करते नृत्याद्वारे वश केलेल्या या प्रियकराला, महेशाला ती मोकळा सोडायला तयार नाही. प्रीती करून, भक्ती करून राधेसारखा तर हा शाम तिने विकत घेतला आहे तिने त्याला सुंदरेश्वर म्हणत, कौतुक करीत त्याला आपल्याच घरात बंदी केलेला आहे ती त्याला डोळ्यासमोर नाचवते. हातातल्या पोपटाप्रमाणे त्याला ती बोटावर खेळवते

मलयध्वज राजाची ही कन्या पुत्रप्राप्तीसाठी या राजाने यज्ञ केला आणि निपजली कन्या उधाण आलेल्या लाटेसारखी, पेटल्या वणव्यासारखी तेज विद्युल्लतेसारखी

राजाला तिलाच मुलगा मानावे लागले, पण एकच आक्रित होते तिला तीन वक्ष होते, पण राजाला एक दिलासा होता, ही जन्मल्यावर आकाशवाणी झाली होती तिच्या जोडीदाराचे, तिच्या भावी पतीचे दर्शन झाल्यावर तिचे तिसरे वक्ष

नाहीसे होईल

'पाहता पाहता बालपण निसटून गेले मुलगी वयात आली यौवनाने मुसमुसली, चित्त गाभुळली, पण तिच्या लग्नाची काळजी करीत करीत पिताच निघून गेला बापाचे निधन झाल्यावर ही राणी झाली आणि एक दिवस शिवाशी युद्ध करण्यास कैलासावर गेली शिवाला पाहता पाहता ही हरखून गेली, मोहरून गेली, हरवून गेली हाच आपला जन्मजन्मांतरीचा सहचर हे मनोमन उमगली नुसत्या स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही, हे तिला कळून चुकले युद्धाचे रूपांतर प्रेमात होऊन बसले रणांगणाचे बोहले व्हायला आले

पण ' आंधळ्याक गाय, सन्यासाक बाय ' पत्नी उमा सोडून गेल्यापासून शिव सन्यस्त झाला होता, विरक्त झाला होता, विस्कटून गेला होता.

आणि त्यानेही मीनाक्षीला पाहिले हळूहळू त्याची कळी खुलत गेली मन गाभुळले गेले सोनेरी स्वप्ने पाहण्याचे दिवस सुरू झाले

चैत्रपौर्णिमेला कदंब वृक्षाखाली त्यांचा विवाह झाला भाद्रपद महिन्यात जेव्हा मूळ नक्षत्र असते, तेव्हा हा ' अवनिमुलम ' विवाह उत्सव साजरा होतो ज्या कदंब वृक्षाने हा विवाह पाहिला, त्या साक्षीदाराचा फक्त आज बुंधा शिल्लक आहे

मीनाक्षीचे मंदिर इतके प्रचंड आहे की कुठल्या दारातून आपण आलो, कुठे पोहोचलो हे कळत नाही कुठे जाणार आहोत हे ध्यानात येत नाही त्याचे दक्षिणे-कडचे गोपूर सर्वांत मोठे ही खूण मनात ठेवून आम्ही पुढे पुढे जात होतो, गर्दीत शिरत होतो आणि आम्ही चुकलो कुठल्या कुठे भरकटत निघालो उत्तरेहून आलेल्या अगस्त्य ऋषीसारखे आपणही इथेच उरतो की काय, असे वाटले, पण नाही परत वळणावर आलो आणि कळले, आम्ही सारे देऊळ पाहून घेतले आहे

उत्सवाचा दिवस होता इतके मोठे मंदिर माणसांनी भरून वाहत होते कपाळावर, हातावर भस्माचे पट्टे लावलेले पुरुष आणि तशाच भस्मावर कुंकू लावलेल्या स्त्रिया होत्या किलीकुट मंडपात पांढरे शुभ्र वस्त्र नेसलेल्या देवीला तिला आवडणारे पोपट ' शुक ' अर्पण करीत होते सारा मंडप किर्र किर्र करणाऱ्या मिठ्ठुमियांनी हिरवागार झाला होता

(मंदिरात सहस्र खांब मंडप आहे काळाच्या ओघात त्यातले १४ खांब नामशेष झालेले आहेत या प्रत्येक खांबाजवळ एक एक जोडी शिव–पार्वती, कृष्ण–रुक्मिणी, नल–दमयंती, अर्जुन–सुभद्रा, राम–सीता, लक्ष्मी–विष्णू, रती–मदन ही जोडपी आहेत या जोड्यासारखा प्रत्येक खांब आगळा नि वेगळा आहे )

रती म्हणजे शृंगार, ही रती अतिशय सुंदर आहे, मादक आहे, मोहक आहे, मनस्वी आहे, चतुर आहे आणि सावध आहे )

ज्या शिवाने मदनाला जाळले, त्या शिवाच्याच सदनात आपण आहोत, हे

तिला भान आहे मदनाच्या भेटीची ओढ अनावर झाली तरी गाफील नाही, पुरी सावध आहे तहान लागली तरी ती ताक फुकून पिते हळूच खूण करून ती मदनाला बोलावते तिचा हस तर तिच्याहूनही बनेल आहे तोही टारगटपणे डोळा मारीत, डोळे मिचकावीत शीळ घालतो

सगळचा बाजूनी यक्ष, किन्नर, गधर्व, देव, दानव, नवग्रह तसेच आळवार सत नायकर राजा आहेत तरी मुख्य यजमान आहे शकर, सुदरेश्वर मीनाक्षी-इतकाच इथे शिव आहे तो इथे तिथे, सगळीकडे आहे

मध्यभागी नटराजाच्या विविध मुद्रांतल्या मूर्ती नृत्याचा आविष्कार माडून प्रलय आरभतात आणि एकीकडचा उभा गणपती चार हातानी आपले पोट सावरीत एका पायावर उभा राहून नाच करीत नटराजाचा गर्व उणा करतो दुसरीकडे 'कुदेंदु तुषार हार धवला' घालून पाठीवरचे फुलारलेले मोरपिसाऱ्यासारखे केस सावरीत श्वेत पद्मासनावरून उठून, वीणा वाजवून, नृत्य करीत पुढे येते

याच मडपात डमरू, मृदग, घटा, वीणा, धरमवाद्य, बीन, घोष, टाळ, झाज हे स्वरस्तभ जाळीच्या आडोशाआड बदोबस्तात ठेवले आहेत) तरी एक पोरगा त्यावर पत्थर मारून आवाज काढीत होता

आमच्यापैकी कुणा एकाला गलबलून आले किती अनमोल ऐवज आहे हा ! केवढा मोलाचा खजिना ! शिल्पकलेतले हे आश्चर्य ! त्याने त्या पोराला पैसे दिले आणि समजावले या आपल्या अनमोल ठेव्यामुळे पर्यटक आपल्या दारात येतात या सौदर्यस्थळामुळे, या अप्रतिम वास्तूमुळे आपल्या पुराण्या सस्कृतीचा प्रचार होतो गतकाळातील ही वैभवाची मानचिन्हे आपण नाहीशी करून टाकली तर आपण करटे ठरू

आम्ही पाठ फिरवली मात्र त्या मुलाने दगड मारायला सुरुवात केलीच आणि आमच्यावरही एक भिरकावला

एकदा एका विंचवाला नदी पार करायची होती एका खेकड्याने त्याला आपल्या पाठीवर घेतले. नदी पार करताना खेकड्याने विंचवाला उपदेश केला, आता कधीच कुणाला दश करायचा नाही. विंचू कबूल झाला, पण नदीपार आला मात्र पहिला चावा त्याने खेकड्याचा घेतला

सहस्र मडपाच्या आवारात तलाव आहे स्वर्गाचा राजा इद्र जगलात तपश्चर्या करीत असताना त्याला शिवलिग दिसले जेव्हा जेव्हा इद्र या लिगाची पूजा करण्याचे नुसते योजित असे, तेव्हा तेव्हा ही पुष्करिणी सुवर्णकमलानी फुलून येत असे, आज सुवर्णपुष्पे नाहीत, साधी कमळेसुद्धा आत दिसली नाहीत, तरीपण हा तलाव दिसतो सुदर या मदिराचे सर्वात मोठे गोपूर इथे आपला मुखडा न्याहाळते आपणच खूष होते अवळच्या माडाला मग हुरूप येतो झावळ्या

हलवीत तो आत डोकावत राहतो चेकाळल्यागत परत परत डोकावतो

कबथडी मंडपात मीनाक्षीच्या विवाहाचे शिल्प आहे पत्थराने जणू गीत गायिले आहे त्याला शब्द फुटले आहेत उमा शंकराच्या हातात हात देऊन अधोवदन, मुग्ध कळीसारखी उभी आहे ती आनंदाने मोहरून गेली आहे शंकराच्या चेहऱ्यावर उतावळेपणाची झाक दिसते तोही आनंदाने फुलून आलेला आहे आणि मेहुण्याच्या कन्यादानाचे पाणी घालीत विष्णू अलगद कृतार्थ झाला आहे आपलेपणाचा कटाक्ष सारे काही सांगून टाकतो हातातल्या गडूतल्या पाण्यासारखीच तृप्तीही ओसडून जात आहे, पण सारेच मुसळ केरात अलगरला कन्यादानाचे श्रेय मिळाले नाही.

मीनाक्षी ही शाक्त धर्मातली तर सुंदरेश्वर ' छोक्कालिंगम ' हा शैव आणि अलगर हा विष्णूअवतार तिरूमल नायक या दूरदृष्टीच्या राजाला या तीनही धर्मांत एकी हवी होती आणि त्याने हे मीनाक्षी कल्याणम् आरंभले अलगरने येऊन दरवर्षी कन्यादान करावे असे ठरले आणि त्याप्रमाणे तो नदीअलीकडे आला आणि त्याला कळले की मीनाक्षी कल्याणम् आटोपले आहे तो रागावून परत जाईल, म्हणून शैव वैष्णव नदीपलीकडे धावले. आताही जातात पायघड्या घालतात. अलगरची पूजा करतात आणि त्याला घेऊन येतात पायघड्या फक्त वरमाईलाच घालतात असे नव्हे, वधुपित्यालाही घालाव्या लागतात

पाऊस तर मधून मधून पडतच होता, पण चांगल्या कार्याला शकुन–अपशकुन नसतात शुभमुहूर्त लागत नाहीत अडीअडचणी नसतात आम्हाला हैद्राबादला जायचे होते त्याशिवाय आमच्या परतीच्या मार्गावर हे होतेच अर्थात आम्ही थेट रस्ता पकडला मदुराईहून टाडा येथे आलो पाऊस हळूहळू कमी झाला आणि इथे येईतो त्याने पळ काढला हैद्राबाद अगदी रखरखीत प्रकाशत होते

हैद्राबाद एकेकाळचे बडे संस्थान ८२ हजार चौरस मैलाची ही निजामाची राजधानी आताही आंध्राची राजधानी म्हणून मिरवते दहा जिल्हे तेलगू, पाच जिल्हे मराठी, तीन जिल्हे कानडी तरीही मुस्लिम संस्कृतीचा गोषा पांघरते हिना व मजमुआ मोगरीचा सुगंध, गुडाखू व पानविडा, लमाणी लोकांचे आरसे लावलेले चित्रविचित्र घागरे, पोचमपल्ली साड्या व मुसलमान स्त्रियांचे काळे बुरखे, पुरुषांच्या गोंड्याच्या लाल फैज टोप्या, सुरवार, सलतन, पांढरी लुंगी, पांढरा मलमलचा सदरा घातलेले लोक, काळे अंगूर आणि पांढरी अंडी, कबाब गोस्त आणि इडली साबार यांची ही मिसळ इथे कुचिपुडी नृत्यातले चाळ वाजवले जातात आणि मुसलमान वस्तीत कव्वालीच्या टाळ्या घुमत असतात

महमद कुली कुतुबशहा सध्याच्या निजामाचा सातवा पूर्वज यांची चचलम्

गावची हिंदू राणी भागमती हिच्या नावावरून शहर स्वतःला भागानगर म्हणवून घेऊ लागले भागामतीला भाग्य नव्हते नतर तिच्याबरोबरच शहरावरही मुस्लिम सस्कृतीचा पडदा आला ते स्वतःला हैदरनगर म्हणवून घेऊ लागले आणि नतर झाले हैद्राबाद

शेजारची मुसी नदी ओलाडून हा महमद कुली कुतुबशहा नर्तकी भागामतीचा नाच पाहायला जात असे पूर आला तरी होडी घालून मार्ग काढायला हा पठ्ठा घाबरला नाही, पण घाबरला त्याचा बाप त्याने नदीवर बधारा घालून या प्रेमिकांना ईष्काचा मार्ग जोडून दिला

तसे या प्रदेशाने खूप राजे भोगले पाण्याबरोबर ढेकळे फुटावीत तसे चालुक्य आले देवगिरीचे यादव वारगळचे काकतीय आले हा धागा थेट सम्राट अशोकापर्यंत जातो शककर्ता सातवाहन हासुद्धा त्यांतला दुवा

पण नतर या भाग्यनगरीच्या नशिबी दुर्भाग्य आले अल्लाउद्दीनची स्वारी झाली औरगजेब तर डोळ्यांत तेल घालून हा प्रदेश तुडवायला सज्ज होता नौबत पहाडाच्या जवळ फतेहपूर मैदानात हा औरंगजेब कित्येक महिने बसला होता

जिच्या आश्रयाने हे हैद्राबाद उभे राहिले, त्या मुसी नदीचा पत्ताच नाही ती नदी म्हणजे नुसते वाळवट वाटते शहर इतके वाढले आहे की, पुढले कँटोनमेंट सिकदराबाद हे भटाला दिलेल्या ओसरीप्रमाणे हातपाय पसरीत आहे या नदीने दोन तालाबना जन्म दिला आहे उस्मानसागर तालाब व हिमायतसागर तालाब

आता रेताड असलेली ही नदी बेभान, बेफाम भरलेली असे तिला धरबध नव्हता दरवर्षी ती पूर आणीत असे एका वर्षी ती इतकी उतली, इतकी मातली की ती स्वतःच्या राजधानीवरच उलटली तिच्या जीवाशी खेळू लागली आणि मग या मनोरुग्ण नदीला डाबून धरावे लागले हकीम विश्वेश्वरअय्या आले 'मुसी' बरोबर 'इसी'लाही औषध दिले गेले दोघानाही बांधून घालून उपचार करण्यात आले

या नद्याचे पाणी प्यालेला, अर्थात या निजामाच्या अगातही मस्ती होती या सस्थानाने भारतीय गणराज्यात यायचे नाकारले आणि शासनालाच आव्हान दिले एक समर्थ इस्लामी राज्य, मुस्लिम सस्कृतीचे एक केंद्र बनविण्याचा त्याचा विचार होता आम्हाला राज्य करता यावे, हुकमत करण्यास मिळावी, म्हणूत परवर दिगारने 'महकुम रिआवा' शोषित प्रजा जन्माला घातली 'ताशेमोक्कर' यावच्चद्र दिवाकरौ आम्ही राज्य करणार पाच फूट उचीचा हा किरकोळ इसम खासगीत वल्गना करीत असे

पण याचा बोलविता धनी पाकिस्तानचा महमदअली जीना होता भारत–पाक निर्माण झाले तेव्हा एक निर्णय घेण्यात आला होता दोन्ही देशानी अतर्गत

असलेल्या सस्थानाच्या नाजूक प्रश्नात नाक खुपसायचे नाही लोकशाहीवादी नेहरूंचे म्हणणे होते की, प्रजा ही सार्वभौम असते तीच आपले भवितव्य ठरवील तर कायदेआझम कायदा बोलत होते, राजा व नवाबाना दिलेले अधिकार कुणालाही काढून घेता यायचे नाहीत तेच सार्वभौम तेच प्रदेशाचे हित जपतील आणि सिंध-मधले बलुचिस्थान कलाल, पूर्व पाकिस्तानातले बहावलपूर ही सस्थाने भारतात येण्यास गाठोडे बांधून बसली होती तर काश्मीर जुनागढ, जयसलमीर ही पाकिस्ता-नात जाण्यास आतुर होती या सगळ्याना थोपटून धरण्यात आले होते

आणि आपली प्रजा हिंदू निजाम मनातून हादरून गेला होता आणि त्याने वाकडी चाल काढली पाकिस्तानच्या फुशीने मुसलमान रझाकार दहशतवादी सघटना स्थापून हा उदीर भारत पोखरू पाहत होता, पण हे उभे केलेले भस्मासूर त्याच्याच माथ्यावर हात ठेवायला निघाले आणि हा पुटकुळीएवढा फोड फोडायला वल्लभभाईना हातात शस्त्र घ्यावे लागले आणि एक कोंडून उरलेले जीवन राष्ट्र-धारेत मिसळण्यासाठी धावत सुटले शतकाने मोकळा श्वास सोडला

हैद्राबाद विमुक्त झाले सहाशे वर्षे दबून असलेली एक सामजिक सस्कृती उसळून उठली, तेव्हा समदु खी असलेल्या आम्ही गोमतकियानी नरकासुर मारल्याचा आनद व्यक्त केला होता

या नदीप्रमाणेच उद्दाम निजाम भारत सरकारच्या एका फटकाऱ्यानिशी सामान्य नागरिक झाला २१ तोफांच्या मानकऱ्याचा सुवर्णकाळ सपला ' आप सोडून पर घरी त्याची मनसुबी देव करी '

नाहीतर जमवून घेणे हे त्यांच्या रक्तातच होते भुकणे नाहीतर कान पाडून राहणे हा त्यांचा धर्म होता तो या निजाम लोकांचा स्वभाव झाला होता पहिल्या शभर वर्षांत प्रत्येक निजामाने कधी फ्रेंचाशी दोस्ती, तर कधी ईस्ट इडिया कपनीशी मैत्री, कधी पेशव्यांची शेंडी कुरवाळणे तर कधी टिपू सुलतानाला शेंड्या लावणे यातच त्यांचा जन्म गेला आणि नतर सारा भारत ब्रिटिशांकडे आला आणि शेवटचा निजाम त्यांच्या ताटाखालचे माजर नव्हे, बोका बनून राहिला

हैद्राबादला जाताना आम्हाला कुणीतरी शिटकावले होते साभाळून तो गाव क्रूर आहे मोहल्ले आणि माणसेही तिथे या ना त्या निमित्ताने दगा होतो तेव्हा अहिस्ता, अहिस्ता

पण आम्ही पाहिले, माणसासारखीच माणसे होती नादान, निर्बुद्ध, निर्दय, राजस, रागीट, कठोर, कोमल, कुर्रेबाज, शहाणी, समजस पण क्रूर कुणीच नव्हते आमच्याकडे वाईट कुणीच वागली नाहीत एकटा तर सायकलवरून वाट तुडवीत आमची मिनी बस दुरुस्त करण्याकरिता हिंडला होता आणि दुसऱ्याने रबडीत वेलची दाणे, चारोळ्या, कलिंगडचे बी, खोबऱ्याचे काप असलेली शाही हैद्राबादी

खीर खिलविण्याकरिता नेमके हॉटेल दाखविले होते बिचारी पोटासाठी इथे तिथे धावत होती त्यांना क्रूर बनवले होते या गरिबीने त्याहोपेक्षा राजकारणी लोकानी त्याची शिकार करून

हैद्राबाद–दिल्ली विमानात एक चिमुरडी आठ वर्षांची मुलगी ओक्साबोक्सी रडत होती विमानसुदरी अमृता अहलूवालियाने तिला कारण विचारले तेव्हा तिला कळून चुकले की, या लडकीची – अमिनाची – साठ वर्षांच्या याह्या अल सागिश ' नावाच्या अरब बुड्ढ्याशी शादी झाली आहे व हे जोडपे घरी सौदी अरेबियाला चालले होते

अमृता अहलुवालियाने प्रसग ओळखला मियाँ राजी होता, पण बिबी नव्हती हे तिला कळले आणि तिने दिल्लीकडे सपर्क साधला दिल्लीला पोहोचल्याबरोबर शेख परत एकदा चतुर्भुज झाला आणि अमिनाची रवानगी नारी निकेतनमध्ये झाली

चारमिनारपासून पाच मिनिटांच्या अतरावर ' बराकस ' या भागात असा हा बाजार भरतो इथे मुली विकायला काढल्या जातात आणि इथेच अमिना ' बेचली ' गेली एक लाख रुपये बापाच्या नावावर व तिच्या पुढच्या आयुष्याकरिता तिला सहा हजार रुपये मेहेर असा व्यवहार ठरला

एक आख्यान पुरे झाले, पण आता दुसरा अध्याय सुरू झाला होता हा असा बाजार भरतो, हे उघडे सत्य होते सगळ्याना ते माहीत होते, पण आता सगळ्यांना वाचा फुटली सामाजिक सघटना, राजकीय पक्ष जो तो प्रत्येकाने तोंडसुख घेतले एकच कालवा झाला, गदारोळ उठला

प्रत्येकाला या घटनेचे भांडवल करायचे होते जनता दलाचे एक आमदार यानी याची कसून चौकशी व्हावी, असे ठणकाबून सागून सरकारला धारेवर धरले. तर उस्मानिया विद्यापीठाचे एक सुबुद्ध प्राध्यापक हुडा प्रथेला दोष देतात गरिबीला, दारिद्र्याला दोष देतात, तर ' उलुल्म ' या सस्थेचे एक सदस्य मुसल-मानांना बदनाम करण्याकरिता केलेला हा डाव आहे आणि समान कायदा आणण्या-करिता सरकारने उचललेले हे पाऊल आहे, असे त्वेषाने सागतात, तर हैद्राबादेतले आणखी एक मौलवी बरळतात, यात सरकारने नाक खुपसण्याची गरज नाही. तो धर्माचा खासगी प्रश्न आहे तो काझीच्या, मौलवीच्या अखत्यारीतला आहे मुसल-मान मुलगी फक्त ' उलेवा 'शीच लग्न करू शकते जोडप्यापैकी एक मोठा असला म्हणून काय झाले ? महमदची बायको खदिजा ही त्याच्यापेक्षा सहा वर्षांनी मोठी होती

असे म्हणतात, महमदने म्हटले होते, आपण गेल्यानतर खूप वर्षांनी धर्मात गडबड–गोंधळ माजेल आणि याला कारण स्त्रिया असतील हा गोंधळ माजवणारी

अमिना काय करते कुणास ठाऊक

समरकद बुखाराहून ख्वाजा अबिद अली नावाचा एक माणूस यात्रेकरिता शहाजहान बादशाहाच्या दरबारी आला व बादशहाची खुषामत करीत करीत त्याने आपला पुतण्या शहाबुद्दीन याला बोलावून घेतले मोगलाच्या दरबारी नोकर म्हणून राहिलेल्या या शहाबुद्दिनाचा मुलगा निजाम उल्मुक हा आसफिया घराण्याची सत्ता रोवणारा पहिला पुरुष होता याने खाल्ल्या घरचे वासे मोजले याने मोगला-विरुद्ध बड पुकारले आणि १५६० मध्ये हैद्राबाद उभे राहिले

गोदा व कृष्णा या नद्यानी समृद्ध केलेला हा आंध्र प्रदेश आम्हाला भाताचे कोठार म्हणतात त्याशिवाय ज्वारी, बाजरी इथे विपुल पिकते, पण याची राजधानी मात्र जिकडेतिकडे अडथ्याची टरफले पडावीत तसे गोल गुळगुळीत पाढरे पाढरे दगड व धोंडे, एकावर एक उतरडीसारखे रचलेले, अस्ताव्यस्त पडल्यासारखे वाटणारे, भूमीशी अगुळमात्र चिकटलेले, भूमीशी फटकून वागणारेही, पडायच्या बेतात आहेत असे वाटणारे पत्थर आणि शाही पत्थरानी मढवलेली दिसते

पण जवळ जावे तसतसे या शहराचे रूप डोळ्यात भरते शहर नबाबी, रुबाबी, सुदर, दिलचस्पी जगातल्या बड्यापैकी पाचवे शहर आहे

शहराचे तेरा दरवाजे येणाऱ्याजाणाऱ्यांसाठी उघडझाप करतात आणि नदी-वरील पाच पूल, पुराना, नया, सालारजग, मुस्लिम जग आणि चदेरघट माणसाची आवकजावक सांभाळतात निरनिराळ्या बागा, लाल टेकडी, हुसेनसागरात डोकावणारा नौबत पहाड, घुमटाचे उस्मानिया हॉस्पिटल पाहत पाहत आम्ही हिंडत होतो

चौमुल्ह्यापासून जवळच गल्लीत असणारा महाराज चदुलाल याचा वाडा आणि तेहेरानच्या शहाच्या राजवाड्यासारखा राजवाडाही पाहिला

दिवस सक्रातीचे होते स्त्रिया हातात रगीबेरगी फुलानी भरलेली तबके घेऊन बाहेर सरत होत्या त्या फुलांच्या राशीत मध्ये एक भोपळ्याचे फूल असायचे थोड्याच्या तबकांत हळदीचा गोळा असायचा हे वाण घेऊन दर दिवशी त्या हुसेनसागर तलावाकडे जाताना दिसत

आणि खूप ठिकाणी जमिनीवर रागोळी काढून, त्यावर शेणाचे गोळे ठेवून त्याची पूजा केलेली दिसे

हैद्राबाद म्हणजे चारमिनार तो कुठूनही दिसतो निदान त्याचे दोन खाब तरी दिसतात

ताजियासारखा असणारा, दिसणारा, लबचौकोनी शभर फूट लाब, १८७ फूट उच अशा पाढऱ्या सगमरवरी पत्थराचा हा मिनार १८८१ साली बांधला प्लेगची साथ आली होती अल्लाकडे दुवाई मागितली गेली देवकृपेने

निवारण झाले आणि हा ' या असिफ ' बांधला गेला यामधून वाहतूक जाते, पण यावर जाता येत नाही प्रेमी जोडपी बसण्याच्या निमित्ताने जाऊन तिथे खुदकुशी करू लागली जाणारा जातो, पण आळ येऊ लागला मिनारवर तेव्हा हा बंद करावा लागला

अशीच चांदण्याचे पाणी प्यालेली वास्तू म्हणजे बिर्ला मंदिर. हे उंच टेकडी-वर असलेले तिरूपतीचे मंदिर पाहताना बा भ बोरकरांचे ' चांदणे माहेरी आले ' असे वाटले. ज्ञानेश्वरीतल्या ओळी आठवू लागल्या ' चांदवो चांदणे ' पण छे ! सांगणे जमत नाही शब्द हरवतात काय बाई सांगू कसं ग सांगू

देव वरून पाहतो सारे पाहतो तो पेटून उठत नाही तिथली जाळपोळ, ते दंगेधोपे, बलात्कार, हिंसा पाहून तो उसळून येत नाही वाहणारे रक्त पाहून त्याला राग येत नाही दुर्बलाच्या डोळ्यांतली दु:खे पाहून त्याला रडू येत नाही

निजामाच्या एका पार्टीला बार्बारा हडसन ही अभिनेत्री गळ्यात एक अनमोल अशा मोत्याचा एकसर घालून आली आणि निजामाला आपला दौलतखाना पाहण्याची इच्छा झाली पेटारेच्या पेटारे भरून खजिना ओतला गेला पोती भर-भरून मोती शहराच्या घराच्या छपरावरून वाळत घातले गेले सारे हैद्राबाद मोत्यांनी शृंगारले होते

चारमिनार पाहायला जाताना वाटेत आमची हीच गत झाली मिनार पाहायला जाताना एक लांबच लांब पेठ लागते सारी पेठ तांदळासारख्या मोत्यांनी भरलेली होती कुठेही जा, फुलांच्या दुकानासारखी सारी दुकाने भरलेली कुठे हारासारखे तन्मणी लावलेले कुठे वळेसरासारखे सर टांगलेले कोण गजऱ्या-सारखे झुमके करतो, कोण जुईच्या फुलांसारखी कांकणे बांधतो

म्हाडदोळच्या, म्हाळशेच्या देवळात जायाच्या पूजेला गेल्यासारखे वाटले खांब, गाभारा सगळे जायीमय सुगंध दाटून येऊ लागला, पण तसे काही नव्हते हा भुलभुलैया नव्हता, चकवा नव्हता एका रसिक दुकानदाराने ' मोतिया चमेली 'चे अत्तर लावले होते

पण हे सागराच्या शिंपल्यातले मोती नाहीत, कल्चर्ड नाहीत, खोटेसुद्धा नाहीत हे आहेत हैद्राबादच्या शेजारी एक पांढरा पत्थर मिळतो त्याचे कणीदार तुकडे

पण हैद्राबाद रत्नाच्या बाबतीत वाझ नाही इथल्या गोवलकोंडा खाणीत हिरे सापडत, आजही सापडतात

१६२ कॅरेटस्‌चा जॅकोब – कोहिनूर हिऱ्यापेक्षा मोठा – असा हा हिरा गोवलकोंडा खाणीमध्ये मिळाला होता

शाह ऑफ पर्शिया मयूरसिंहासनावरचा हिरा इथलाच – आपलाच

कोहिनूर – ज्याच्यामुळे आपली मान उचावते, हेच त्याचे जन्मस्थान शेवटी शेवटी तो इथेच होता एका निजामाच्या जोड्यात दडून बसला होता एकेकट्याचे आयुष्य असेच असते

होप हा हिरा तर आपल्याला शरम आणतो हा वाईट प्राक्तन घेऊन आलेला या हातातून त्या हातात जाता जाता त्याने कित्येकाना फटकारे दिलेले आहेत आणि शेवटी हा हिरा Harry Winston या गृहस्थाकडे आला याचा गवगवा इतका झालेला हा हॅरी एकदा विमानातून प्रवास करीत होता त्याने पाहिले, पाच मिनिटात सारे विमान रिकामे झालेले उगीच होपच्या मालकाबरोबर प्रवास का करा ? जीवावर यायचे, पण आपण त्याला कसे ठोकरायचे ? तो आपलाच ना ? गोवलकोंड्याचा !

अर्थात या गोवलकोंड्याच्या स्वामीकडे अफाट सपत्ती, जडजवाहिर होते शेवटचा निजाम मीर उस्मान अलीखान याने जाता जाता आपल्या कुटुबाच्या जड-जवाहिराचा ट्रस्ट केला दहा कोटी रुपयांचा निजामाच्या वशजाना शिक्षण भत्ता, औषधपाणी, वैयक्तिक खर्च याकरिता उपयोग होत असे

फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचू नयेत खान साहेबजादा दिलशाद – सातव्या निजामाचा नातू, नवाब इमदार जहाँ याच्या चौथ्या बेगमेपासून झालेला – ' मसेरत ' या महालात जन्मलेला हा चौदावा पुत्र सव्वीस वर्षांचा हा युवक दरडोई १५०० रु मिळावेत, अशी मागणी करीत उपोषणाला बसला होता मोत्यांच्या जाजमावर बसून सोन्याच्या ताटात जेवणाऱ्या निजामाचा हा वारस सतरजीवर बसून होता कालाय तस्मै नम !

चारमिनाराच्या उत्तरेस आहे जामा मसजिद दहा हजारावर माणसे नमाज पढण्यास बसली तरी कितीतरी जागा मोकळी उरते तिथे चार मोठी टेबले, दोन सगमरवरी, दोन साधी फरशाची होती त्यातले एक ' बैठिये जनाब, तशरिफ लाइये ' परत परत म्हणत होते या टेबलावर बसल्यास हैद्राबादला परत यावे लागते मग आम्ही बसलो नव्हे, अगदी ठाण मांडले.

अशीच मक्का मसजिद तेहरानच्या शहाच्या ' चौ महल या राजवाड्या-सारखीच बांधलेली सुरुवात महमद कुतुबशहाने केली, पण नतर औरगजेबाने पुरी केली

जुम्मा मशिदीच्या प्रागणात पाढऱ्याशुभ्र वाटोळ्या विणलेल्या टोप्या घातलेले लोक ' ला इल्लाह इल्लिल्लाह मुहम्मदूर सुपल्लिलाह ' एकमुखाने मत्रघोष करीत होते तालात उठत–बसत होते मौलवी सज्जन होता त्याने आम्हाला प्रार्थनेचा अर्थ सांगितला अल्लावाचून दुसरा कुणी पूजनीय नाही तो महमूद रेसूल म्हणजे दूत आहे. ' शुक्र अल्लाह ' म्हणत त्याचे आभार मानून आम्ही आटोपते घेत

होतो, पण तो पुढे सांगू लागला –

कामाला सुरुवात करण्यापूर्वी मन एकाग्र करण्यासाठी नमाजाची गरज आहे या प्रार्थनेला ' फजर ' नमाज म्हणतात जेवल्यानंतर सुस्ती येऊ नये म्हणून ' जोहरा ' नमाज पढावा लागतो तिन्हीसांजेला शीण घालविण्याकरिता ' असर ' नमाजची गरज असते आणि शांत झोप लागावी म्हणून परमेश्वराची स्तुती करणे याला ' मगरीब 'चा नमाज म्हणतात

नमाज पढल्यानंतर बाहेर तोबा गर्दी झाली आत बुरख्यातल्या स्त्रिया होत्या स्त्रिया आणि आत !

या रणरणत्या उन्हात हे काळे कपडे म्हणजे शिक्षा होती वाळूपासून संरक्षण म्हणून मक्केमध्ये हे बुरखे होते नंतर तिच्या रक्षणाला हे पुरुष तोकडे पडले तेव्हा तिलाच बुरख्याआड दडवून आपल्या अहंकारावर पांघरूण घालण्याकरिता हे कपडे प्रतिष्ठितपणाचे ठरवले गेले

पण आता या मोकळ्या वातावरणात ताजी हवा नाकारण्याचा हा अट्टाहास का ?

फलकुनाम राजवाडा शहराच्या टेकडावर असलेला हा राजवाडा आता हॉटेल झाला आहे तेव्हा हा सरकारी रेस्ट हाऊस होता बड्यांच्या सरबराईला हे निजाम लोक अगदी तत्पर असत बडे लोक आले म्हणजे खास परदेशातून आयात केलेली उंची दारू पेश केली जात असे खान्याला गब्दुल कोंबड्या मारल्या जात बदाम–पिस्ते घालून केशराच्या स्वादातली बिर्याणी अस्सल तुपातून शिजवली जात असे खास वेचीव हैद्राबादी अंगूर घालून उत्तम फळांचे सलाड बनवले जात असे हैद्राबादची एखादी खास नर्तकी पेश केली जात असे पलंगावर पऱ्यांच्या गाद्यावर निजून हे बडे आदमी रंगून जात आणि गवाक्षातून ऐकू येणारे तबल्याचे ठेके, चाळांचे आवाज व मुगरा चमेलीचे गंध घेत घेत खालचे मरिजुमला व मीरआलम तलाव स्तब्ध झालेले असत

शेवटचा, ८० वर्षे जगलेला निजाम मीर उस्मान अलीखाँ हा कवडीचुंबक होता, पण त्याला स्त्रियांचा शौक होता मिळेल ती आणि मिळेल तशी स्वस्त, महाग औरत जनानखान्यात लोटायची हा त्याचा छंद होता एकदा तर त्याने बापाच्या जनानखान्यातून ३० रुपयांना एक बाई विकत घेतली होती आणि बापाकडेच एका बाईचा बाडेलोटपणा केला होता फूल हुंगून झाले की मग त्याच्याकडे पाहणे नाही हैद्राबाद स्वतंत्र झाले तेव्हा हा जनानखाना उघडा पडला या स्त्रिया सडलेल्या होत्या, पिडलेल्या होत्या, कुजलेल्या होत्या, वेड्यापिशा झालेल्या होत्या निजामाच्या या कंजूष स्वभावामुळे त्यांच्यावर ना दवा, ना पाणी झाले होते

हा स्त्रियांच्या बाबतीतच कजूष होता असे नाही हा करोडोपती जगातला सर्वोच्च श्रीमंत माणूस खासगी आयुष्यात खूप कद्रूपणा करीत असे हा टीनच्या ताटात जेवत असे त्याच्या टेबलाभोवती फक्त तीन खुर्च्या होत्या चौथी घेण्यास त्याला कधीच जमले नाही त्याचा बिछाना सटीसामाटी झाडला जात असे त्या बिछान्यात पिसवा असत, ढेकूण असत आणि झुरळेही असत

तो साधे मळखाऊ, तपकिरी रंगाचे कपडे वापरी बूट ही चैन असा त्याचा समज असावा त्याच्या डोक्यावरील फेज टोपी आयुष्यात त्याने एकदाच धुतली होती ४०–४५ वर्षे त्याने ती तशीच वापरली होती त्यामुळे त्याचे केस उवांनी आणि Dandruf कोंड्याने भरलेले असत एकदा त्याची शाल फाटली आहे, हे त्याच्या कारभाऱ्याने पाहिले, पण निजाम १७ रु च्या वर शालीवर खर्च करीना शेवटी स्वत:चे तीन रुपये घालून एक टिकाबू शाल कारभाऱ्याने निजामाला नेऊन दिली

कमी पाण्याच्या वापराकरिता अंघोळ तर जुम्मे के जुम्मे होई आणि दर खुत्बाच्या दिवशी दात धुतले जात

एकदा तो आजारी पडला आणि दरबाराने मुंबईहून डॉक्टर आणला डॉक्टरने त्याचा कार्डिओग्राम काढला तर कागदावर ग्राफ उतरेना आणि कळले की इलेक्ट्रिसिटीचा वापर न करण्याकरिता निजामाने करंट कापला होता

साखरेचे खाणाऱ्यालाच देव देतो असे नाही देवाने त्याला खूप दिले होते, अधाशीपणाने, हावरेपणाने त्याने ते जमविले होते. त्याचे वार्षिक उत्पन्न ४० लाख पौंड होते अब्ज दशकोटी किमतीची सोने–चांदी होती तळघरात हिरे, मोती, पाचू माणिक यांच्या गोण्या भरलेल्या होत्या ढेकणासंगे हिरा तो भंगला, हिरे भंगले नाहीतच, पण जवाहिराचा गोणपाट उंदरांनी कुरतडला होता आणि एकदा डॉलर्सचे नोटांचे गोण वाळवीने खाल्ले होते

कचरा म्हणजे लक्ष्मी हे हिंदू तत्त्वज्ञान त्याने मनात धरले असावे पान-विड्याच्या पिचकाऱ्यांनी भरलेले त्याचे ऑफिस आणि निजण्याची खोली एकदा त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी झाडली जात असे त्याचा नोकरावर विश्वास नव्हता, कारण त्याच्या आलमारीचे ड्रॉवर्स नोटांच्या थप्प्यांनी भरलेले असत त्यावर एक एक जुने वर्तमानपत्र गुंडाळलेले असे Jacob २८० कॅरेटचा हिरा वेटपेपर म्हणून त्यावर ठेवलेला असे एकेकाची ही जिंदगी असते

बायांसारखाच गाड्यांचा पण त्याला शौक होता, पण त्याही फुकटात पाडून घेतलेल्या

संस्थानात एखादी नवी गाडी दिसली रे दिसली, की गाडीच्या मालकाकडे खलिता जाई, ' बडे लाटसाहेब ' आपली गाडी पाहू इच्छितात अशा तऱ्हेने

त्याच्याकडे भरपूर गाड्यांचा साठा झाला होता

प्रजेकडून तोहफा घेणे हा त्याचा एक दुसरा छंद होता दसऱ्याला आपट्याचे सोने देणे–घेणे हा राजेरजवाड्यांचा रिवाज होता, पण बडोदा, म्हैसूर, ग्वाल्हेर ही संस्थाने आहेर परत करीत, पण निजामाने हे कधीच केले नाही त्याच्या सिंहासनाशेजारी एक पिशवी ठेवलेली असे प्रजेने दिलेल्या सोन्याच्या मोहरा तातडीने उचलून तो पिशवीमध्ये कोंबी एकदा तर एक नाणे घरंगळत गेले आपल्या पायांचा अधूपणा विसरून गुडघ्यांवर चालत निजामाने ते पकडले होते

आपल्या वाढदिवसाला नजराणे घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे असे तो मानत असे त्याच्या मुलाच्या, नातवडांच्या, नातेवाईकांच्या वाढदिवसालाही प्रजेला येणे भाग असायचे आणि तेही रिकाम्या हाताने नव्हे बाईटातून चागले इतकेच होते, ज्याच्या–त्याच्या इतमामाप्रमाणे, मिळकतीप्रमाणे हा तोहफा वसूल केला जात असे गळ्यात पडलेले हार मागच्या दाराने बाजारात नेले जात आणि ते अर्ध्या किमतीत विकले जात अशा दावती, तोहफा बारा महिने तेरा काळ चालत

आणि रुस्तुम दनरात अरुस्तु झेमन वली मालिक असफजहा, नवाब मीर उस्मान अलीखर बहादूर मुझफर मलिक, सिपाह सोलर फतेह जग निजाम उल्मुक मीर उस्मान अलीखान हा जगातला सर्वांत श्रीमंत असामी म्हणून गणला गेला तर नवल ते काय ?

या निजामाचे देवडीत असलेले, साधेसुधे कला नसलेले घर पाहिले की निजामाचे सारे सारे आयुष्य आपल्याला आठवू लागते

कर्नुल जिल्ह्यातल्या नदीकोटकूर तालुक्यात श्रीशैल्य हे मल्लिकार्जुनचे मंदिर म्हणजे भारतातील शैव दैवताचे प्रमुख स्थान समजले जाते, म्हणून कृष्णेच्या पूर्वतीरावरील या क्षेत्राला दक्षिण कैलास म्हणतात आणि हे लिंग स्वयंभू बारा ज्योतिर्लिंगापैकी एक त्याला लिंगचक्रवर्ती म्हटले जाते देवाला वाहिलेला बेल हा दुसऱ्या दिवशी निर्माल्य होतो, पण या स्वयंभू लिंगांना वाहिलेला बेल परत वाहिला तरी नवा, ताजाच राहतो

पुराणकाळापासून या नल्लुमलै पर्वतावरच्या श्रीशैल्याचा मोठा दबदबा आहे हे योग्याचे स्थान आहे पुराणकाळापासून अघोरपंथीय कापालिक सांप्रदायाची ही भूमी आहे बौद्धाचे मंत्रयान, वज्रयान हे तांत्रिक पंथ इथेच निर्माण झाले महानुभाव संस्थापक चक्रधर इथे बारा वर्षे होते म्हणतात दत्तात्रयाचे अवतार श्री नरसिंह सरस्वती विसाव्याला इथे राहिले संन्यासी लोकांचे हे माहेरघर. त्रिदंडी संन्यास घेतल्यानंतर अर्जुन इथे राहिला होता

मुसलमानकाळात श्रीशैल्य देवस्थानाची खूप पडझड झाली १६७७ मध्ये

शिवाजी महाराज इथे आले होते त्यानी देवाच्या पूजाअर्चेची सोय लावून दिली

१५६२ फूट उच्च अशा या पर्वताकडे जाण्यास पूर्वी खूप त्रास होत असे आज बसेस जातात मंदिरापुढून जाणाऱ्या रस्त्याने ८०० फूट खोल दरीत वाहणाऱ्या कृष्णेकडे जाण्यास पायऱ्या आहेत आधी डोंगर चढून जायचे मग त्या पायऱ्या खाली उतरून कृष्णेत स्नान करायचे आणि परत वर चढून यायचे अर्थात त्याचे श्रम फळाला यायचे त्याला स्वत च्या हाताने पूजा बांधायचे समाधान मिळत असे

देऊळ भले मोठे तीन गोपुराचे आहे हे आठव्या शतकात बांधले गेले. देवळाच्या संगमरवरी भिंती शिवाच्या कौतुकाने मढल्या आहेत प्राकारात एका बाजूला वृद्ध मल्लिकार्जुन बसला आहे

आपल्या संस्कृतीत वृद्ध माणसे आपण होऊन वानप्रस्थाला जात ती मुलाच्या संसारात अडगळ होऊन राहत नसत देवाला मला सांगावेसे वाटले, बापाचे जुते मुलाच्या पायात येऊ लागले की बापाने संसारातून अलिप्त व्हायला हवे

एका गावात माणसाची ठराविक वर्षे उलटली की त्याचा मुलगा त्याला डोंगरावर नेऊन ठेवीत असे त्याला अथरुणास, पांघरुणास घोंगडी–कांबळ, थोडे जेवण–खाण व पाणी प्यायला एक लोटा जवळ ठेवीत असे आणि मुलगा परत येत असे

एकदा एकावर डोंगरावर जाण्याची वेळ आली वृद्ध बापाने जाताना दोन दोन वस्तू घेतल्या ' हे काय ?' मुलाने विचारले, ' दोन दोन वस्तू कशाला ?' ' मुला !' बाप म्हणाला, उद्या तूही इथे येशील येताना तू या गोष्टी न आणल्या तरी चालतील '

मी देवाला म्हटले, तुम्ही वेळीच सावरला नसावेत किंवा तुम्ही मुलाला असा परखड उपदेश केला नसावा, पण आम्ही पामर यापेक्षा देवांना जास्त काय सांगणार ? आम्ही बाहेर आलो

देवळाच्या मागल्या बाजूस भ्रमरांबा देवीचे देऊळ आहे ही भ्रमरांबा म्हणजे महिषासुराला मारणारी शक्ती भ्रामरी–पार्वती ही काही कमी नाही, पण तरीही देव तिला सदोदित पाठीशी, मागे ठेवतात नाहीतर आम्हा बायकांचे हे असेच असते गुण असून मागे राहावे लागते आणि ती पाठीशी आहे, म्हणून आपल्याला कार्य करता आले, हेही संभावित शब्द ऐकून घ्यावे लागतात घावावर मिरची चोळून घ्यावी लागते

मंदिराच्या बाहेर जटांचे, वाढवलेल्या दाढीचे साधू, यती, गोसावी बसले होते थोड्यांच्या जवळ माणसाच्या कवट्या होत्या त्यांतून हे भिक्षा मागत होते ' कपाली ' माणसाची कवटी हातात धरणाऱ्या, स्मशानात राहणाऱ्या शिवाचे हे

भक्त अघोरपंथी, उग्रमार्गी कापालिक पूर्वी हे नरहत्या करीत रक्त व मास खात आता काय खातात कोण जाणे ! पण चरस खातात हे नक्की त्याचे हे धुंद डोळे आणि बरळणे त्याच्याकडे आम्हाला पाहावेसे वाटेना त्यातच दोघाचे भाडण झाले, मारामारी सुरू झाली आणि आम्ही धूम ठोकली वाटेत शिजवलेल्या भाताचा नैवेद्य घेऊन भटजी बसले होते, तोसुद्धा आम्ही तुडवला आम्ही तिथे थाबलो नाही तडक हैद्राबादला आलो वाटेवरचा कबन तलावसुद्धा पाहिला न पाहिलासा करून पाहिला

विजयनगरच्या कृष्णदेवरायाची राणी उत्कल देशाची राजकन्या होती, पण तिचा राजाला काही सशय आला आणि त्याने तिला माहेरची वाट दाखविली, पण ही मानी राजकन्या माहेरी गेली नाही माहेरी मानाने जावे हे तिला माहीत होते जे काय गाठीला धन होते, त्याचा तिने सदुपयोग केला तिने हा तलाव बाधला या तलावाने भूमीला समृद्ध केले नतर तिच्यावरील किटाळही दूर झाले आणि राणी मानाने राजाकडे आली

हैद्राबादला येताना वाटेत एक-दोन ठिकाणी आम्हाला गध, फुले घातलेल्या शिळा दिसल्या देवाकरिता आत्मबलिदान करणाऱ्याच्या त्या समाध्या होत्या त्याना वीरगळ म्हणतात, म्हणून कळले

आम्ही हैद्राबादहून आलो आणि तिथून ९० मैलावर असलेल्या काझीपेठहून हणमकोडा येथे आलो तिथे सहस्र खाबाचे देऊळ आहे, असे ऐकले होते दारातच फलक होता, Rudra Daman Kakatiya Founder of Kakatiya Dynesty भगलेल्या मंदिराचा बाहेरचा नदी अतिशय सुदर होता देवालयाला सुदर स्थापत्य होते, कलाकुसर होती अर्थात या काकतीय राजाचा शोध घेत घेत आम्ही वारगळला त्याच्या राजधानीपर्यंत आलो आणि वारगळहून सहा मैलांवर असलेल्या राजांच्या किल्ल्यावर आलो हा किल्ला काकतीय राजा गणपती देव याने बाधला आणि शेवटचा प्रतापसूर्य दामन हा राजा या किल्ल्याकरिता झटला, झगडला

हे काकतीय – काकती देवीचे भक्त खूप शूर होते त्याच्याकडे अफाट सैन्य होते ते सहिष्णू होते, दयाळू होते, दानधर्म करणारे होते फक्त ब्राह्मणानाच नव्हे तर सर्वधर्मियाना त्याची अन्नछत्रे खुली होती त्यानी प्रसूतिगृहे खोलली होती औषधालये काढली होती अभ्यासगृहे होती सशोधन करण्यास कार्यालये होती त्यानी ललितकलाचा विकासही केला होता काकतीय राणी रुद्रमहादेवी हिने तर एक गाव लोककल्याणासाठी दिला होता, असे शिलालेख सागतो राज्यात समृद्धी होती घोगड्या, कांबळी, रेशीम तयार होत असे मछलीपट्टण इथून निर्यात होणारी मलमल तर बाहेरच्या जगात एक अजब वस्त्र मानले जाई.

आम्ही चालत होतो खडकाळ वाट ठेचकाळीत होती काटे–करवदीसारखी खुरटी वनस्पती वाट अडवीत होती पोपटी करड पिंगट झाले होते रानफुलांचा सडा पडला होता जांभळी, गुलाबी, लाल घाणेरीची झाडे तिखट, हिरवट, उग्र गंध सोडीत होती एक वडाचे झाड पाखराचा संसार घेऊन बसले होते त्यांच्या किलबिलीत स्वत चे सुख शोधत होते

किल्ल्याला पूर्वी सात कोटवजा वेशी होत्या आज भुईस मिळू पाहणाऱ्या बंधाऱ्यासारखे मातीचे ढिगारे दृष्टीस पडतात बाहेर बौद्ध कमानीसारख्या दोन प्रचंड काळ्या कमानी आहेत या कमानीच्या आत एक चौरस जागा आहे तिथे खूप कलाकृती आहेत एका कमानीवर कोरलेले सारस पक्षी दिसले आणि मग कुतुहलाने पाहिले तर जिथे तिथे सारस पक्षी दिसले राजाला सारस पक्षी आवडत होते का ? की इथे पूर्वी सारस पक्षि येत होते ?

तटाच्या आत मुसलमानाची वस्ती आहे आम्ही खूप जणाकडे चौकशी केली. माणसे निर्विकारपणे येत–जात होती कोण गणपती देव आणि कोण प्रतापसूर्य दामन ? इतिहास वाळला आहे

जिथे काकतीय राजांचे अफाट सैन्य होते, जिथे हत्ती चित्कारले, घोडे खिंकाळले, तिथे गाईगुरे हंबरतात, शेळ्या, कुत्री ओरडतात, दु खात सुख इतकेच होते राजाची राजधानी उजाड नव्हती नापीक नव्हती तिथे शेते होती सोनियाच्या कणसांनी फुलारली होती मोतियानी डवरली होती

आम्ही मुकाट परत आलो

मला एरवी म्युझियम पाहायला आवडत नाही तिथले ते ममीज ते जुने अवशेष, त्या पोथ्या, त्या सनावळीच्या चिकटपट्ट्या आणि चेहऱ्यावरची मिरी जराशी न हलवता मिरवणारे स्थितप्रज्ञ हे दाखवू पाहणारे ते पुराणरक्षक

पण हैद्राबाद म्हणजे सालारजंग म्युझियमला भेट द्यायलाच हवी यात्रेला गेलो आणि देवाला न भेटताच आलो असे व्हायचे

सालारजंग नावाच्या निजामाच्या एका मंत्र्याचा हा प्रचंड उद्योग अजायबघर बनून राहिला आहे मोठमोठे ७४ हॉल भरून ओतत आहेत कोण पांघरून बसले आहे, असे वाटून आम्ही पाहावयास गेलो असेल कुणी खेडुत शेजारच्या गावातून आलेली, थकवा घालवायला बसली असेल असे आम्हाला जवळ जाऊनसुद्धा वाटले, पण ती कलाकाराची किमया होती पाऊस नाही, पाणी नाही, पण ही तर ओलेती होती तिच्या नेसण्याच्या चुण्या तिच्या अंगाला चिकटल्या होत्या हा एक स्त्रीचा पुतळा होता

तसाच कलेचा आणखी एक आविष्कार आठवतो मागे स्त्री, पुढे पुरुष असा हा पुतळा पुरुषात स्त्रीची व स्त्रीत पुरुषाची बीजे दडलेली असतात. त्याचाच

तर हा गर्भितार्थ नसावा ! नाही, हा कठोर पुरुष 'मॅफिस्टो' आणि कोमल स्त्री 'मार्गारिटा' याचा लाकडाचा, झाडाच्या बुध्याचा पुतळा होता

पण आम्हाला पाहायचे होते एक घड्याळ सालारजंग म्युझियमची एक अमूल्य वस्तू, पण भुकेल्याचा भात लवकर शिजत नाही म्हणतात

बारा वाजायला आले होते सगळेजण धावत सुटले होते कुठल्या तरी शाळेची मुलेही म्युझियम पाहायला आली होती घाईत घाई आणि विंचू डसला ग बाई एका मुलीच्या घागऱ्याच्या घोळात एका मुलाचा पाय अडकला त्याला ठेच लागली आणि तो मुलगा पडला त्याच्या अंगठ्यातून रक्ताचे वाहाळ वाहू लागले नुसती कोरडी शाब्दिक सहानुभूती कशी चालेल ? त्याला मलमपट्टी झाली तोपर्यंत पाच मिनिटे मोडली आता मात्र आम्हीही धावत सुटलो

एका लहानशा कपाटवजा घड्याळात एक चिमुकला माणूस मिनिटाचे टोले देत होता एक, दोन चोपन्न, पचावन्न, एकोणसाठ, साठ आणि त्या छोट्या माणसाच्या जवळ असलेल्या छोट्याशा घरातून तसाच आणखी एक माणूस बाहेर आला व तासाचे टोल बडवू लागला बारा वाजले तो छोटा माणूस परत घरात गेला, तसा चिमुकल्या घराचा दरवाजा बंद झाला तो मिनिटांचे काटे बडवणारा माणूस मात्र आपले काम निरलसपणे करीत होता एक, दोन, तीन, चार

आम्हा गोव्यात राहणाऱ्या लोकाना हे विशेष नव्हते पोर्च्युगीज काळात आम्ही 'कुक्कु'ची घड्याळे पाहिली होती त्याचीच ही उजवी आवृत्ती होती

सिकंदराबाद पाहायला हुसेनसागर तलावावरून जावे लागते हा एक मैल लांबीचा भला प्रशस्त असलेला रस्ता पुतळ्यानी शृंगारला आहे कवी, लेखक, शास्त्रज्ञ, राजेरजवाडे, नानन्मार, आळवार, ओहमार साधू हे लोक ती ती खाली नावे घालून आहेत आपल्याला भाषा, लिपी कळत नाही, पण कमळासनावर बसलेला बुद्ध, घोड्यावर बसलेला शालिवाहन राजा, सम्राट अशोक हे कळले अर्थात काकतीय राजा प्रतापरुद्र दामन, देवगिरीचा रामराजा, विजयनगरचा राजा, चोल राजा हेही त्यात असतील

हा परिसर अतिशय सुंदर आहे आणि स्वच्छ राखला आहे सुंदर सुंदर रंगीन झाडे, मोहक दिवे, रंगीबेरंगी कुंड्या आणि पुतळ्याच्या कुशीने हिरवीगार हिरवळ आणि भेळीय, पाणीपुरी, थंडा लेमन, सोडा बोट्ल, आइस्क्रीमवाले नाहीत त्यांच्यावर न येण्याची सक्ती असावी अर्थात इथे घाण, केरकचरा नाही

गोवलकोंडा राजघराण्याची ही नगरी, त्या वर्षी १०० वर्षे पूर्ण करणार होती हुसेनसागर तलावाच्या रॉक ऑफ जिब्राल्टर या खडकावर एक २५० टन वजनाचा बुद्धाचा उभा पुतळा उभा करण्यात येणार होता आंध्राला हे एक भूषण होणार होते रायगिरीवरच्या पाषाणाचा हा पुतळा जागेवर नेताना वाटेत आडवा

होऊन पाण्यात बुडाला होता

आंध्र प्रदेश हा शकुन–अपशकुन, श्रद्धा–अंधश्रद्धेने भरलेला आणि भारलेला आहे, परंपरेने चालत आलेला आहे काही जुनी मूल्ये मुद्दाम डावलल्यामुळे, चुकून चुका घडल्यामुळे,काही गोष्टींकडे डोळेझाक केल्यामुळे हे अरिष्ट आले प्रतिष्ठापनेच्या आधीच पुतळा बुडाला कोणतेही कार्य ' ॐ नमोजी आद्या ' स्तवनाने होते आणि ही पूजा झाली नाही, हे जनतेच्या पोटात डुचमळत होतेच

बुद्धाचा हा ७५ फूट उंचीचा पुतळा उभा करण्याआधी आता प्रथम तिथे एक गणपतीची प्रचंड मूर्ती उभी करण्यात येणार आहे

सिकंदराबाद येता–जाता बघितलेच होते विशाखापट्टण बंदर व तिथला बोटी बांधण्याचा कारखाना बघितला मछलीपट्टणही मांडवले, पायाखाली घातले

चारमिनारपासून सहा मैलावर असलेल्या गोवलकोंड्यास एक धावती भेट द्यावी, म्हणून आम्ही गेलो होतो, पण तिथेच आम्ही दिवस घालवला

तेलगू भाषेत ' गोल ' म्हणजे मेंढरे आणि ' कोंडा ' म्हणजे पाळणारा. मेंढपाळ एका मेंढपाळाने हा प्रदेश दाखवला म्हणतात थोडे म्हणतात कोंडा म्हणजे किल्ला

काकतीय या वारागळच्या राजांनी बांधलेल्या आणि कित्येक शतके बांधीत असलेल्या या किल्ल्याला अर्थात हिंदू स्थापत्य आहे किल्ल्याचा विस्तार खूप मोठा आहे आत विहिरी आहेत, तळी आहेत, शेते आहेत, पार्श्वभूमीला एकमेकावर रचलेल्या हत्तीसारख्या शिळा आहेत छोटा मिनार, चारमिनाराची आवृत्ती इथे खूपकडे दिसली

गोवलकोंड्यास औरंगजेबाचा वेढा पडला शेवटचा सुलतान तानाशाह याला पकडून दूर ग्वाल्हेरास नेऊन ठेवण्यात आले, तेव्हा इथल्या सैनिकांनी हात वर करून बंदुका खाली ठेवल्या वाळवीने कलाकुसर केलेला तो साठा हल्लीपासून इथे होता म्हणतात सरपण म्हणून चुलीत जाणे हे त्याचे प्राक्तन होते

किल्ल्याच्या प्रवेशद्वारी टाळी वाजली की ती आत ऐकू येते पूर्वी इथे घंटा होती दाद मागण्याकरिता ती वाजवली की ' बालेहिस्सार 'वर दरबारात बसलेल्या सुलतानाला ऐकू येत असे राजा स्वत दिसत नसे, पण तो संदेश देत असे अशीच दोन फर्लांगावर असलेल्या प्रेमामहल व तारामहल इथे बसून गाणाऱ्या पद्मावती व तारामतीच्या गाण्याला इथून ' माशाल्ला ! सुभानअल्ला ! ' अशी दाद मिळत असे

जुना दरबार खाली होता तिथेच शिवाजी महाराजाच्या मेसाजी ककने तेल

माखून सोडलेल्या हत्तीशी झुज दिली कोण येसाजी कंक आणि कोण शिवाजी !
पण या तल्लखीत गार वाऱ्याची झुळूक आल्यासारखी वाटली

सुलतानाचे हिंदू मंत्री, सल्लागार मुत्सद्दी अखना व माहुना यांची दोन मजली कचेरीही दाखविली गेली

एक खोली फासेखाना आणि एक मेलेल्यांना ' शाही स्नान ' धुण्याची जागा दाखविली गेली अजून तिथे कुबट घाण येत होती, पण ती घाण वटवाघळांच्या विष्ठेची होती

किल्ल्याच्या आवारात खूप कोनाडे आहेत तिथे दिवे लागत आणि होणाऱ्या मैफलींना रंग भरत असे बाकीच्या किल्ल्यांत आहेत तसे हमामखाने होते शिश-महल होते अस्त्रागार होते बायकांकरिता हरम होते घोड्यांचे तबले, उंटांचे ' शुतूर ' होते जवाहिरांचा बाजारही होता

' पतला ' बुरुजाच्या वाटेवर एक खोल अशी मोकळी जागा दिसली पूर्वी इथे तलाव होता तो सुवासिक पाण्याने भरला जात असे या ' कटोरा ' हौदात सुलतान बेगम नौकाविहार करीत आज राणीही नाही आणि पाणीही

एक ' बुरगचट्टू ' नावाचे झाड किल्ल्याच्या आवारात आहे. थोडे वर चढून पाहिले तर आत एक पलंग मावेल अशी जागा आहे सुलतान इथे बेगमेला घेऊन झोपत असे की नाही, कोण जाणे काही सांगता येत नाही जगावेगळे शौक करणारे हे सुलतान त्यांचा एक शौक स्वतःच्या हयातीतच स्वतःचे शेवटचे विश्रामस्थान बांधायचे १६१६ साली महमद कुली कुतुबशहाने कुराणपठणाच्या गंभीर स्वरात आपणच आपले दफन करून घेतले होते

कोसभर दूर ही इब्राहिम बाग दफनभूमी आहे यात गूळ, डिंक, अंड्यांची टरफले घालून चुन्याचा गिलावा केलेल्या अगदी ताज्या अशा दिसणाऱ्या ३० कबरी आहेत काही छोट्या, काही मोठ्या, काही एकमजली, दुमजली, काही साध्यासुध्या, थोड्या कारंज्यांनी नटलेल्या मंत्री, सत्री, सेनापती, सखेसोयरे ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणे, किमतीप्रमाणे

सगळ्यात मोठी कबर आहे ' बडे मालिक की ' महमद कुली कुतुबशहाची. तिचे क्षेत्रफळ आहे १०० चौरस फूट चौथऱ्याची २० फूट धरून सगळी उंची १२० फूट अशी ही कबर आहे चारी बाजूंनी पायऱ्या आहेत चौथऱ्याला २८ कमानी आहेत पहिली, दुसरी, तिसरी प्रत्येक कमान आलेल्यांना ' आलेकुम सलाम ' करते.

जवळ भागमतीची कबर आहे हिंदू राहून बेगमेची आदत व आदब सांभाळणारी, वेगळेपण जपणारी ही नर्तकी भागमती हिची कबरही वेगळेपण जपते. हिच्या कबरीवर वर गोल नाही

या कबरींवर हिंदू स्थापत्याचा असर आहे कबरीच्या प्रत्येक घुमटाखाली कमळाच्या पाकळ्या, पाने व द्राक्षाचे घोस व खाणाऱ्या खारी दिसतात कुणी दावा करील हे हिंदूचे होते किंवा दुसरा कुणी म्हणेल हे सुलतान सहिष्णू होते आणि कुणी म्हणेल, भागामतीचा असर राजावर असेल महमद कुतुबशहाला तर आठ राण्या, तेव्हा भागामतीचे कौतुक सुलतानाकडून झाले, असेही समजण्याचे कारण उरत नाही

काम करण्यास बोलावलेले कलाकार हे सर्वच धर्मातले होते हिंदू, पठाण, पर्शियन प्रत्येकाने आपापल्या मनाप्रमाणे काम केले, पण कौतुक इतकेच, या शिया सुलतानानी त्यांना मना केली नाही

शेवटी दाखवली जाते ती अकुल हसन तानाशहाची – शेवटच्या सुलतानाची दुर्दैवी कबर–काळ्या पत्थराची घुमट, मिनार काही नसलेली अशी बोडकी त्यानेही ती आपल्या हयातीतच बांधून ठेवली होती, पण तिच्या नशिबात आपल्या मालकाला कुशीत चिरशातता देण्याचे भाग्य नव्हते तो शेवटचे झोपला खुल्दाबादला आपल्या शत्रूच्या – औरगजेबाच्या सगतीने

आता पावसाच्या धारा सपल्या होत्या, पण घामाच्या धारा सुरू झाल्या होत्या

हैद्राबादला येण्याआधी आम्ही विजयवाडा येथे राहिलो विजयवाड्यामध्ये आम्हाला रस नव्हता ते एक औद्योगिक शहर. त्यातच विजयवाडा धुमसत होता कोणतरी काँग्रेस मत्री पळवला गेला होता आणि जिथे तिथे जाळपोळ,भोसकाभोसकी होती, सचारबदी होती पोलीस जुलमाविरुद्ध एका पुढाऱ्याने उपोषणाला बसून निषेध दाखविला होता एकमेकावरची ही चिखलफेक म्हणजे निवडणुकीवर डोळा ठेवून केलेले आधण होते

पण विजयवाड्याने आम्हाला एक आगळी चीज दाखवली आत शिरतानाच पालमुडी गावात गोदावरी नदीवरचा एक भला मोठा पूल लागतो हा भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा पूल आहे म्हणून कळले

विजयवाडा गावामध्ये आणखी एक चीज दिसली ती म्हणजे 'पनकल' नरसिंह मदिर नरसिंह स्वामीचे मदिर या नरसिंहाला गुळाचे पाणी शखाने पाजतात, या पाण्याला 'पनक' असे म्हणतात. हे पनक पाणी पिताना देव घटक् घटक् असा आवाज करतो पिताना खाली पडलेले पाणी मग तीर्थ म्हणून दिले जाते.

सैतानाचे तोंड पाहू नये, पण घर पाहायला काय हरकत आहे ? कुणीतरी एक ठिकाण दाखवले रझाकार कासीम रझवी इथे राहत होता

अगदी बायकासारखा अबाडा घातलेले, पण खाली लुगी डाव्या कानात

पितळी वाटोळी रिंग व डाव्या हातात पितळी कडे घातलेले पुरुष आणि त्याच्या-बरोबरच्या स्त्रियांच्या गळयात वक्षस्थळ झाकेल इतक्या माळा होत्या हे लोक नरसिंहाच्या जत्रेला चालले होते या चेंचू लोकांचा नरसिंह हा मेहुणा लागतो आणि शिव हा जावई होतो आमच्या वाटाड्याने माहिती दिली दोन देवांचे हे सोयरे आम्हाला मात्र हसता हसता पुरेवाट झाली

आम्ही नागार्जुन कोंडकडे वळलो

नागार्जुन कोंड, नागार्जुन सागर, जगातले हे प्रचंड धरण गुंटूर जिल्ह्यातल्या पालनाड गावात आहे ४०९ फूट उंच, लांबी एक मैल आणि ३२० फूट रुंदीचे हे धरण कृष्णा नदीवर बांधले आहे या धरणाखाली १०० चौरस मैल जमीन पाण्यात गेली आहे हा नागार्जुन सागर भारतात सगळयात मोठा आणि जगात याचा तिसरा नंबर लागतो या जलाशयाच्या पाण्यात कोंड हे डोंगरावरील गाव बुडून गेले आहे आता गावही नाही आणि नावही

पण दुसरा गाव नागार्जुन नावाच्या एका बौद्ध भिक्खूच्या – ज्याने इथे राहून सुवर्णसिद्धीचे प्रयोग केले, रसायन बनवले – त्याच्या नावावरून आपल्याला नाव पडले, हे ध्यानात ठेवतो

नागार्जुन हा एका लहानशा राज्याचा राजा होता, पण हा नुसताच राज्य-शालक हाकणारा नव्हता हा पंडित होता, ज्ञानी होता, संशोधक होता, शास्त्रज्ञ होता त्याला सुवर्णसिद्धी प्राप्त झाली होती

पण माणूस यशाचे एक सोपान चढला की त्याला वरचे सोपान चढावेसे वाटते वरचे आकाश त्याला भूल घालते निळाई बोलावू लागते त्याला आस लागते, प्यास लागते, ध्यास लागतो

नागार्जुनाचे हेच झाले सुवर्णसिद्धी तर हातात आली, पण ती आता त्याला मिट्टीसमान वाटू लागली भोवती चाललेला संहार पाहून त्याला वाटू लागले, त्याला वाटू लागले यावर एकच औषध – मरणाला पराजित करणे शुक्राचार्या-सारखी संजीवनी प्राप्त करून घेणे – ती अमृतवल्ली मिळविणे हा एवढाच ह्यास त्याने पुढे ठेवला आणि राज्य पुत्राच्या कर्णार्जुनाच्या ताब्यात दिले आणि दिगंतराला चालू लागला

तो रानावनात हिंडू लागला त्याने डोंगर, पर्वत पालथे घातले नदी–नाले ओलांडले माती–रेती तपासली झाडापेडावर प्रयोग केले वनस्पतींच्या पाळामुळांची रसायने बनवली सजीव, निर्जीव वस्तूंची चाळण केली आयुर्वेद कोळून प्याला चरक, शुश्रूत चाळून पाहिले साधनेत गुंग होऊन राहिला वेगळया जगात मिळून गेला

आणि एक दिवस नागार्जुन राज्यात परतला चेहऱ्यावर आनंद ओघळत होता तो सोन्याच्या कांतीने तळपत होता तेजाने रसरसलेला होता अमृताने ओथबलेला होता

पण त्याचा पुत्र जहराने भरला होता विषाने भारला होता त्याच्या मनात कालकूट होते त्याला कळून चुकले होते की, बापाला अमृतवल्ली सापडली आहे, सजीवनी हातात आली आहे आणि तो जर अमर राहिला, तर कुठले राज्य ? सिहासन, गादी या दूरच्या गोष्टी होत्या आणि त्याने ठरवले, आपला बाप सकाळची पूजा झाली की खुषीत असतो, तो दानधर्म करतो, तेव्हा त्याचा धर्म मागावा, आठवू द्यावा

आणि एक दिवस पूजा झाल्यावर नागार्जुनाने सकाळी–सकाळी पाहिले तर त्याचा पुत्र कर्णार्जुन हात जोडून बसला होता कुशल झाले आणि कर्णार्जुनाच्या पोटातले गरळ शब्दरूपाने बाहेर आले, ' तात ! मला दान हवे आहे आपल्या प्राणाचे !' त्या क्षणी त्याला वाटले, करटयाने अमरत्वाची आशा, आस धरायची होती, सुवर्णसिद्धी मागायची होती त्याला कळून चुकले, हा पुत्र नव्हे, ही नियती आपल्यापुढे उभी आहे आपण निसर्गाचा तोल बिघडवत होतो विश्वनियमाचा भग करीत होतो विधिचक्र रोखून धरत होतो माणसाला, प्राणिमात्राला, निसर्गाला मर्त्य ठेवण्यात आले आहे तेच योग्य आहे आपण मर्यादा ओलांडली देवत्वावर अतिक्रमण केले, त्याच क्षणी पायबद घालण्यासाठी नियतीने आपल्या पुत्राची निवड करून ठेवली आहे विषाला विषाचाच उतारा देऊन ठेवला आहे तो हसला आणि त्याने आपले डोके पुढे केले आणि म्हटले, ' हा, कर तुझ्या मनासारखे '

कर्णार्जुनाने तलवारीचा वार केला, पण ती बोथट झाली बापाच्या शरीरावर एक ओरखडासुद्धा उमटला नाही त्याने परत घाव घातला घावाची एक खूणसुद्धा दिसली नाही जणू अमरत्वाचा हा वज्रकठोर पुतळा पुढे होता

कर्णार्जुन ओशाळा झाला, पण नागार्जुन शात होता साफल्याचे मोल त्याला मिळाले होते, पण भ्रम दूर झाला होता तो आत वळला

थोड्या वेळाने कर्णार्जुनाने पाहिले, नागार्जुन हातात रसरसते, आग ओकणारे रसायन घेऊन उभा होता आणि तो त्याला म्हणत होता, ' यात बुडव आणि चालव तुझी ती तलवार '

नागार्जुनाच्या वधाबरोबर अमृतवल्ली नाहीशी झाली मात्र त्याचे सुवर्ण-सिद्धीचे सशोधन बौद्ध ग्रथात अजून सापडते म्हणतात

इथे बुद्धाचे मठ होते, विहार होते, बुद्धाचा स्तूप होता धातुगर्भ नावाच्या ८० फूट उच व १०५ फूट परिघाच्या या महाचैत्यात गौतम बुद्धाच्या अस्थीचा तुकडा होता, पण त्यावरच धरण बाधायचे ठरले तेव्हा तिथले बुद्धकालीन अवशेष,

बुद्धाच्या कमलासनावर बसलेल्या मूर्ती, दागिने, हत्यारे, पूर्ण घट, लोटीची भाडी, अश्वमेध यज्ञातला घोड्याचा सागाडासुद्धा उत्खननात मिळाला हे सर्व दुसऱ्या जागेवर नेण्यात आले आणि जे हलवणे शक्य नव्हते, त्याच्या प्रतिकृती करण्यात आल्या. बाकी सारे धुळीस मिळाले, नव्हे, पाण्यात गेले इजिप्तच्या आस्वान धरणाच्यावेळी हे असेच, हेच केले होते

पण आंध्र अभिमानात आहे

जावा, सुमात्रा, बाली इथे जी मूर्तिकला पोहोचली, तिचा उगम या आंध्रात आहे ही तर कलेची गंगोत्री आहे

मग आम्ही अमरावती पाहावयास गेलो

कृष्णेच्या काठावरची ही अमरावती म्हणजे २००० वर्षांपूर्वीचे बौद्ध संस्कृतीचे दर्शन . बौद्ध राज्याची ही राजधानी इथेसुद्धा बौद्ध मठ होते, विद्यापीठे होती कुठल्या कुठल्या देशाचे लोक इथे शिकायला येत

इथे जो स्तूप होता, तो मातीमध्ये गाडून गेला होता एका जमीनदाराच्या नोकराना काही खोदत असताना हा सापडला हळूहळू चारी अंगांनी तो मोकळा करण्यात आला

मी ऐकले होते, वाचले होते

हा स्तूप संगमरवरी विटाचा आहे त्याभोवती दोन प्रकार आहेत बाहेरचा कठडा १४ फूट उंच, तर आतला सहा फूट उंच आहे स्तुपाचा परीघ ८०३ फुटाचा आहे

इथले अमरेश्वराचे मंदिर आम्ही पाहावयास गेलो भले मोठे खांबासारखे उंच पितळी लिंग होते मी देवाची पूजा बांधली, पण ती अनाठायी तर नाही ना ? मला भास होऊ लागला

आणि हळूहळू ध्यानात आले हाच तर तो खालचा स्तूप नव्हता ? मी बाहेर आले मंदिराच्या बाहेर सगळी बौद्धकालीन चिन्हे होती, तोरणे होती, प्रतीके होती मी विस्कटून गेले म्हणजे ज्याला मी शिवलिंग म्हणून पुजले होते, तो बौद्ध स्तुपाचा भाग होता ?

मी पुढे वेशीपर्यंत गेले चार हातावर कृष्णा वाहत होती कोयनेच्या गळ्यात गळा घालून अल्लडपणे वाहणारी हीच ती अवखळ कृष्णा ! किती मोठी झाली होती ही ! किती विशाल, प्रगल्भ झाली होती ! हा तर प्रचंड सागर होता कृष्णा मला म्हणत होती, बेटी, दुनिया रंग रंगीली !

कोलार या सोन्याच्या खाणींच्या गावातून आम्ही सोन्याचा देव पाहण्याकरिता

तिरुपती शहरात आलो आणि आम्हाला कळले, तिरुपती बालाजी गावात राहत नाहीत, ते वर व्यंकटाचल पर्वताच्या माथ्यावर तिरुमलाय येथे राहतात दर युगात या पर्वताला निरनिराळी नावे होती कृतयुगात त्याला शेषाचल, त्रेतायुगात अंजनाचल तर कलियुगात व्यंकटाचल असे म्हणत

कलियुग म्हणजे कलकी युग, पापी युग ' व्यंका ' म्हणजे पाप आणि ' कटा ' म्हणजे अग्नी अग्नी कशाचाही बऱ्या–वाईटाचा नाश करतो तेव्हा पापाचा नाश करणारा हा व्यंकटाद्री

व्यंकटाचल हा मेरू पर्वताचा भाग एकदा मेरू व वायू यांच्यात स्वतःच्या अस्तित्वाबद्दल भांडण लागले आणि वायूने मेरू पर्वताची एक हजार शिखरे पाडायची प्रतिज्ञा केली आणि ती पाडलीही पण आदिशेषाने मेरूला संरक्षण दिले आणि वायूची गोची केली आणि हे शिखर राहून गेले

वर जाणारी २० कि मी.ची वाट थोडीच आहे, पण दम काढणारी आहे सळसळती वळणे आणि मध्ये मध्ये मिळणाऱ्या पायऱ्या आपल्याला साप–शिडी खेळाची आठवण येते

टेकडीवरच्या तिरुमलाई देवस्थानाच्या दारातल्या झुळूझुळू पाण्यात पाय धुऊन आम्ही पुढे सरलो गोविंदा, गोविंदा गजर होत होता

माणसाचे पाय मातीचे असतात हे जाणणारा, आल्याबरोबर ते स्वच्छ करायला लावणारा हा व्यंकटपती बालाजी स्वत मात्र मातीच्याच पायांचा होता

एक भाटिया, कुठल्या तरी बिस्कीट कंपनीचा मालक आपले ऋण फेडण्या-करिता आला होता ' भाव तेथे देव नाही, हाव तेथे देव ' पूर्वी त्याचा एक भागीदार होता कुणी कुणाला लुबाडले हे तिरूपतीच जाणे, पण परत कंपनी स्थापताना या भाटियाने या देवाला आपला भागीदार बनवले होते आता दरसाल तो उत्पन्नाचा अर्धा हिस्सा या देवाला देत असे महादेव काय देणार ? स्मशानातली मूठभर राख मग या लक्ष्मीपतीलाच जवळ करणे फायद्याचे

या मंदिरासमोर १९० फूट उंचीचा सोन्याने मढवलेला एक स्तंभ आहे सगळे मंदिरच सोन्याने मढवलेले तेव्हा या खांबाचे विशेष कौतुक करीत नाही मिडास राजासारखे याला सोन्याचे वेड ' प्रेमचि भाकर, प्रेमचि चटणी प्रेमचि कांदा, गूळ यांप्रमाणे हा सोन्याचीच भाकर, सोन्याचीच चटणी आणि सोन्याचा कांदा–गूळ खात असेल

या सोन्याबद्दल आपल्याला आश्चर्य वाटायचे कारण नाही कांचिपुरम्चे पल्लव राजे, मदुराईचे पांड्य, तंजावरचे चोल व नंतरचे विजयनगरचे नायक हे सोन्यासारखे राजे या मंदिराकरिता झिजले म्हणूनच या मंदिराला सोन्याचा पत्रा चढला यात नागपूरचा रघुजी भोसलेही होता

भक्त या देवाला देण्यात, अर्पण करण्यात धन्यता मानतात मंदिराचे वार्षिक उत्पन्न ६० ते ९० कोटी रु आहे मंदिरात हुंड्या ठेवलेल्या आहेत त्यात अलंकार होते, रत्ने होती, मोती-पोवळी होती, नोटांच्या चवळ्या होत्या, चेक्ससुद्धा होते. चिल्लर मोजणार कोण ? ती मोजण्यासाठी चाळण्या होत्या

पण आज या धनाचा उपयोग फक्त मंदिराला सोन्याचा पत्रा मढवण्यासाठीच होत नाही या पैशाचा सदुपयोग होतो या पैशाचा ट्रस्ट आहे आणि ही मंडळी या पैशांचा उपयोग दवाखाना, हॉस्पिटल, शाळा, विद्यापीठ चालविण्याकरिता करतात

मंदिराचे क्षेत्र दोन एकर इतके आहे देवाला वेढा घालणारा प्रदक्षिणामार्ग भला मोठा आहे या प्रदक्षिणामार्गावर आधी पोटोबा अशी हा विठोबा सोय करतो चहा, कॉफी, इडली, उतप्पा सारे काही मिळते

मंदिरात प्रवेश केल्याबरोबर ' रंगनायकुल ' हा मंडप आणि त्यात एक लहानशी देवळी आहे मुसलमान आक्रमणावेळी बालाजी व्यंकटेश्वर श्रीनिवास म्हणे, त्यात लपून बसले होते

जवळच्या प्रतिमा मंडपात विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय दोन्ही अंगांना साम्राज्ञी चित्रादेवी व तिरुमलदेवी यांना घेऊन बसला आहे मग अच्युतराय तरी मागे कसा राहील ? तो आपल्या वरदअम्माला आलिंगनात घेऊन बसला आहे

कांस्य धातूची दीपलक्ष्मी व घटिकाद्वार ओलांडून आम्ही आत गेलो गाभाऱ्यात १० फूट उंचीचा खांद्यापर्यंत कुरळ्या केसांच्या बटा, हातात शंख, सुदर्शन चक्र, गदा व चौथा हात आशीर्वचनपर असा बालाजी एका कमळावर उभा होता

दागिने, अलंकार म्हणजे निरुपयोगी संपत्ती अपरिग्रह पण याचा ' कटा ' करायला मात्र बालाजीजवळ शस्त्र नसावे किती याला दागिन्यांची लालसा ! स्त्रियासारख्याच याने पायात साखळ्या घातल्या होत्या म्हणून हसू आले आणि नजर वर गेली आणि बारकाईने पाहिले कुठे दागिने नव्हते ?! अगदी सजवलेल्या नदीबैलासारखे बालाजी दिसत होते! सारे शरीर हिरे, मोती, माणिक यांनी भरले होते गदेकरिता हात सोडला होता, त्या हातात कांकणे होतीच, पण बाहूत नागबंधन होते डोक्यावर रत्नजडित गोमेद नवरत्नांचा किरीट होता या मुकुटाला तीन इंच व्यासाचा पाचू होता कान मकरकुंडलांनी शोभले होते दोन्ही बाहूवर दोन सोन्याची नागफुले होती नवरदेव लग्नाला उभे होते, पण हातात तलवार होती

लहानपणी एक गोष्ट कहाणी ऐकली होती

एक जावई सासुरवाडीला जाण्यास निघाला त्याच्या मित्रांनी त्याला सांगितले, ' हे बघ, तू पहिल्यादाच सासरी जातो आहेस बुळ्यासारखा वागू

नकोस सासरघरची माणसे तुझे पाणी जोखतील त्याना जरब दाखव, भीती दाखव '

आणि जावई सासरला पोहोचला

दारात सासुबाई पायावर पाणी घालण्यासाठी उभ्या होत्या जावयाने गडूतले पाणी लाथेने उडविले जावई आत माजघरात गेला तिथे एक हडपा होता तो त्याने ढकलला मग तो मागल्या दारी गेला आणि कुइ कुइ करून जवळ येणाऱ्या कुत्र्याला ठोकरले आणि गोठ्यात जाऊन गुराची दावी सोडली

अर्थात सासरघरची मडळी भ्याली त्याच्या अगोचरपणाला, त्याच्या वेडसर-पणाला पद्मावतीबाईना भीती, जरब दाखविण्याकरिता तर ही तलवार बालाजी-रावानी घेतली नव्हती ?

आणखी एक विक्षिप्तपणा या बालाजीनी केला होता अगदी सजलेला अवतार आणि नाकाला पट्टी लावली होती अर्थात आपल्याकडे कथा, कहाण्या अगदी तत्पर असतात आणि वेळप्रसगी त्या धावून येतात ही अशीच एक

भृगुऋषीना एकदा एक शका आली व तिचे उत्तर विचारण्यासाठी ते कैलासा-वर गेले शकर पार्वतीला जवळ घेऊन प्रेमकुजन करण्यात दग होते ही समाधी युगानुयुगे चालणार होती ती मोडण्यास कुणीच पुढे आला नसता त्यांतून शकर म्हणजे बडे प्रस्थ देवाचा देव, महादेव ऋषी विद्वान पण गरीब माणूस शकरानी याकडे ढुकून पाहिले नसणार भृगू मग ब्रह्मदेवाकडे गेले ब्रह्मा सरस्वती व गायत्रीच्या आलिगनात होते त्याना तिथून तसेच हलणे अशक्य होते त्यानी ऋषीच्या कवनाकडे कानाडोळा केला ऋषी सतापले आणि धुमसत वैकुठाला आले तिथेही श्रीविष्णू लक्ष्मीला घेऊन शेषासनावर पहुडलेले

आता ऋषींचा पारा खूप चढला ते स्तुतिसुमने वाहायची विसरले आणि आत जाऊन श्रीविष्णूना एक जबरदस्त लाथ घालून त्यानी उठवले

पण विष्णू रागावले नाहीत उलट त्यानी ऋषींचा पाय हातात घेतला व तो दुखावल्याबद्दल क्षमा मागून तो कुरवाळायला सुरुवात केली भृगुऋषी पाण्यातल्या ढेकळासारखे विरघळून गेले आणि या ' कवडळ 'पणात आपण सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम देव हे बिरूद त्यानी घेतले

देवानी धोरणीपणाने असा फायदा पाडून घेतलाच, पण लक्ष्मीला हा अपमान सहन झाला नाही आणि निषेध दाखविण्यासाठी तिने श्रीविष्णूकडे फारकत घेतली व ती सरळ भूलोकी आली

पण श्रीविष्णूना अशी सखी, सहचरी, प्रणयिनी कुठून मिळणार ? आणि पाय चुरायला अशी दासी ? त्रिभुवन धुडून अशी मिळाली असती का ? ते अगदी रडकुडीस आले

पण ते श्रीविष्णू होते ते मुत्सद्दी, कावेबाज होते त्यानी धोरणीपणा महाण

ठेवला नाही तिच्यामागे जाण्याचा बाईलवेडेपणा त्यांनी केला नाही ते गुप्तपणे अरुणाचल पर्वतावर आले आणि एका गुहेत जाऊन ध्यानस्थ बसले श्रीविष्णूने जरी ताकास तूर लावू दिला नाही तरी या बेबनावाचा सुगावा ब्रह्मा, शकर यांना लागला त्यांनी त्या दोघात समझोता करण्याचा प्रयत्न केला, पण लक्ष्मी इरेस पेटलेली... ती घरी येण्यास तयार होईना आणि श्रीविष्णू नाकदुऱ्या काढायला येईनात देवाना कळले नाही, काय करावे ते !

पण नंतर लक्ष्मीचा पारा खाली उतरला देवांनी लक्ष्मीला युक्ती सांगितली. ब्रह्मा, महेश हे गाय–वासरू झाले आणि लक्ष्मीने गवळणीचे रूप घेतले राजाला ही गाय–वासरू नजराण्यादाखल दिली गेली

जेव्हा जेव्हा राजाचा गवळी गाय–वासराना घेऊन शेषाचल पर्वतावर चरायला घेऊन जाई, तेव्हा तेव्हा त्याने हेरले की, गाय कास रिकामी करते गवळ्याला मग राजाच्या संतापाला तोंड द्यावे लागे त्याची कानउघाडणी सहन करावी लागे

राजाच्या या कानपिचक्या ऐकून गवळ्याचा संताप अनावर झाला आणि त्याने गाईच्या मस्तकावर प्रहार केला श्रीविष्णू धावत आले तेव्हा तो प्रहार ओझरता त्याच्या नाकाला लागला व नाकातून रक्त वाहू लागले ती ही तिरूपतीने लावलेली मलमपट्टी

मंदिरात गेल्याबरोबर रुप्याचा टोप क्षणभर आमच्या मस्तकावर टेकवला गेला तिरूपतीने आम्हाला भेट देऊन उपकृत केले एवढ्या लांबवरून येण्याचे सार्थक केले धर्मदर्शन घेऊन आम्ही बाहेर आलो

देवाचे पाय मातीचेच बाहेरचे पुराण ऐकता ऐकता आम्हाला परत एकदा पटले

हरी व हर एका वेलांटीचा फरक हरी व हर ही परमात्म्याची दोन अगे. साधुसंत सांगून गेले, पण माणसाच्या मनात कलहाची बीजे रुजली की मग एखाद्याचा राग होतो आणि दुसऱ्याचा द्वेष होतो मग तट पडले जातात, गट पडले जातात, पक्ष निर्माण होतात, कलह–विसवाद होतात, शत्रुत्व निर्माण होते आपल्याच भोवती कुपणे उभारली जातात आडवे कुकू, उभा टिळा, त्रिशूळ, शखचक्र, बेल, तुळस ही सारी माणसाचीच करणी त्यामुळे सामान्य माणूस वेगळा पडला

असा शैव–वैष्णव धार्मिक विघटनाचा झगडा यादव राजाच्या काळात झाला आणि हा तटा मिटविण्यासाठी देवालाच साक्ष देण्यात भाग पाडण्यात आले देवाच्या गाभाऱ्यात शिव व विष्णू यांची त्रिशूळ व सुदर्शन चक्र ठेवण्यात आली देव जे धारण करील ते दैवत तो त्या देवाचा धर्म

रामानुजन रात्रभर गाभाऱ्याच्या दारात बसून राहिले, चिंतन, मनन करीत राहिले आणि गाभाऱ्याचे दार उघडले रामानुजनच्या इच्छेप्रमाणे देवाच्या हातात शंख होता, चक्र होते देव हर नव्हता, हरी होता

रामानुजन हे धर्मसंस्थापक होते ते एका विशिष्ट गटाशी, पंथाशी बांधील होते याच लोकांनी नियम केलेले असतात, बंधने घातलेली असतात त्याच्या मागे त्याचा सांप्रदाय असतो या उच्चपदावरील लोकांना वेळ, काळ, ताळतंत्र पाहूनच वागावे लागते कदाचित आपल्याला देवत्व लाभावे, पुढारीपण मिळावे ही सुप्त इच्छा त्यांच्या मनात असावी

पण ज्या मुखांनी भेदाभेद अमंगळ ' अशी शिकवण देवानी दिली, त्या देवानीच हा वाद मिटवायला हवा होता त्यानीच दोन्ही आयुधे हातात घ्यायला हवी होती समाज दुभंगवणाऱ्या या कृत्याला मूठमाती द्यायला हवी होती सारे ब्रह्म म्हणजेच शिव व विष्णू हरी हर ही परमात्म्याची दोन अंगे, हे सप्रमाण पटवून द्यायला हवे होते देव ही विशिष्ट गटाची मिरासदारी नाही, हे सांगायला हवे होते शंख, चक्र, त्रिशूल, डमरू घेतलेल्या हरिहराची मूर्ती पुजायचा आदेश द्यायला हवा होता

मंदिराच्या दारात डाव्या हाताला भक्तांची मुंडणे चालली होती मऊ केसांची रास पडली होती ' केशदान महापुण्यम् ' म्हणत देवाला सर्व केस अर्पण केले जातात. त्यात पुरुषच असतात असे नाही स्त्रियाच जास्त असतात तुळतुळीत डेव्हिड छाप गोटा केलेले स्त्री–पुरुष आमच्याभोवती कितीतरी होते

आम्ही उभे होतो तिथेच एका वर्षाच्या, चार–पाच वर्षांच्या मुलावर हे संस्कार चालले होते आणि ती अम्मा, अप्पा म्हणत किंचाळत होती, हातपाय बडवीत होती तोंडाने देवाचे स्तोत्र म्हणत आईबाप त्यावर गंध चोपडीत होते. एका पाच वर्षांच्या मुलाला बापाने काहीतरी सांगितले, समजावले ' स्वामी, बा बा ' बहुधा चॉकलेट घेऊन देण्याचे वचन दिले असावे

देवस्थानचे हे एक मोठे उत्पन्न आहे दर दिवशी २६ हजार लोक देवाला केस अर्पण करतात रोज टनावारी केसांची आवकजावक होते कापणारे, साफ करणारे, खरीदणारे, रंगवणारे मग या केसांची गंगावने होतात, विग होतात, टोप होताल ते कापडांत वापरतात, असेही ऐकले, तसेच त्यापासून औषधे, रसायने होतात, हेही ऐकले

नवल नाही, केसाने गळासुद्धा कापतात

पर्सिस खंबाटा या अभिनेत्रीने एका अमेरिकन चित्रपटाकरिता चमनगोटा केला तिच्या चाहत्यांना, फॅन्सना ती इतकी मादक वाटली की थोडावेळ अमेरिकेत ती फॅशनच झाली होती

खबाटाच्या अमेरिकन चाहत्याचे सोडून देऊ या त्याना तो अड्यासारखा गोटा आवडला असेल आम्हालाही बेंजामिन फ्रँकलिन अनुपम खेर आवडले होते, पण डोक्याचा चमनगोटा, कपाळाला पैशाएवढे कुकू, भरजरी साडी सौंदर्याची ही विटबना वाटते

सौंदर्य कशात असते ? रगात, बांध्यात, नाकाडोळचात ? सौंदर्य केसातही असते आमच्याजवळून एक कृष्णवर्णी, पण तरतरीत व रेखीव मुलगी गेली शापू लावून धुतलेले आणि मोकळे सोडलेले तिचे काळेभोर पाठभर सळसळणारे केस म्हणजे सौंदर्याचा आविष्कार होता

जिच्याकरिता हे उतावळे नवरे गुडघ्याला बाशिग बाधून राहिले आहेत, ती नवरी पद्मावती खाली आहे तिचे देऊळही आम्ही पाहून घेतले

तिरुमलाय उतरून आम्ही खाली कोदडनाथ मदिरात गोविंदस्वामीचे दर्शन घेतले आणि पायथ्याशी असलेल्या कलहस्तीकडे आलो

पचमहाभुताची प्रतीके म्हणून पाच शिवलिंगे आहेत ती सारी दक्षिणेत काची येथील एकांबरनाथ हे पृथ्वीलिंग, जबुकेश्वर हे आपलिंग, अरुणाचलेश्वर तिरुवन्ना-मलाय येथले तेजाचे लिंग, चिदबरम् येथील चिदबरेश्वर हे आकाशलिंग आणि कलहस्ती येथील कलहस्तीश्वर हे वायुलिंग

कलहस्ती मदिराच्या जवळ असलेल्या टेकडीला कैलासगिरी म्हणतात या कलहस्तीचे महत्त्व खूप आहे पुजारीही या लिंगाला स्पर्श करू धजत नाहीत जवळ एक सोन्याचे लिंग आहे, त्यालाच स्नान, अभिषेक, पूजा, नैवेद्य केले जाते

मध्याकाळ झाली होती अधारून येऊ लागले होते सर्वत्र नि:स्तब्धता होती झाडांच्या सावल्या झुकू लागल्या होत्या वाराही विचित्र वागू लागला होता रातकिडे किरकिर करू लागले होते आणि अवसेला अमावस्या भेटायला आली आधीच काळे, दाढीमिशाचे जगल असलेले, काळे कपडे घातलेले शास्ता, शबरी मलायचे भक्त भसाड्या आवाजात स्तोत्र म्हणत चालले होते हे शबरी मलायच्या जत्रेला चालले होते

काळपुरुषासारखे हे लोक पाहून मनावर झाकोळ आल्यासारखे वाटले मनातली अस्वस्थता आणखी वाढू लागली आणि आम्ही बसलो आमच्या गाडीत धूम ठोकण्यासाठी

दुसऱ्या दिवशी मद्रासला जाण्याकरिता आम्ही बाहेर पडलो आणि वाटेत चहासाठी एका हॉटेलात थाबलो बिचारे हॉटेल साधे होते आणि हॉटेलमालक तर त्याहून सरळ होता एवढी मडळी आल्याचा आनद त्याच्या डोळचात तरळू लागला

आणि फेसून आणलेली कॉफी आणखी फेसाळून त्याने दिवाळी–दसरा साजरा केला वेलची पूड, मलई घातलेली कॉफी खरोखर छान झाली होती. थोडे ती आणखी मागवून पिऊन घेत होते आणि आमचा ड्रायव्हर धावत आला आर टी ओ पोलीस आम्हाला दड देण्याकरिता थांबले होते आम्ही टाडा येथे आंध्र–तमिळनाडू या सीमेवर होतो

आमच्यापैकी दोघेजण बाहेर गेले आणि परत आले कुचूकुचू बोलले कुणालाच काही कळेना ससा पळाला म्हणून मी पळालो ही म्हण खरी करीत सगळेजण धावत सुटले आणि कुणालाच आठवण राहिली नाही, त्या हॉटेलवाल्याचे, बिचाऱ्याचे पैसे द्यायचे राहिले आहेत ही गोष्ट मग मनाला लागून राहिली

टाडा हा गाव तमिळनाडू–आंध्र सीमेवर आहे तिथे कित्येक चेक पोस्ट होती त्यातच आर टी ओ ऑफिस होते त्यांनी आमचा टेंपो अडवला कारण टेंपो ही मिनी बस ना मोठ्या वाहनामध्ये, ना छोट्या वाहनाच्या व्याख्येत बसते आणि त्यांनी १००० रु दड फर्मावला आमच्या पुरुषमडळींनी त्याला बाबा पुता करून पाहिले वादविवाद केले, पण तो साहेब मख्ख अगदी 'बाणीर बोट' ठेवून बसलेला दड भरा मुलुख परका खेडेगाव अर्धा तास मिनतवाऱ्या झाल्या, मन-धरणी झाली आणि त्या काळच्या कातळाला पाझर फुटला आणि तो म्हणाला, 'चला, फुटा इथून तुम्हाला एक मिनिटभरदेखील इथे राहता येणार नाही ' आणि हे रामायण घडले

तमिळनाडू आले हे मघापासून कळत होते कॉफी कडक झाली होती आणि हिंदीचा द्वेषही दोन–तीन ठिकाणी हिंदीतून काही विचारले आणि उत्तर इंग्रजीतून आले हा द्वेष इतका कडू, कडवट आहे 'हमलोग' चित्रमालिकेत अशोककुमार हिंदीत बोलत असे तर त्यांनी ती तमिळ मालिका बद करून टाकली मद्रास दूरदर्शनवर आता हिंदी चित्रपट दाखविले जात नाहीत

या लोकांना भाषेबद्दल खूप अभिमान शकराच्या तांडवनृत्यावेळी हातातल्या डमरूतून मधुर ध्वनी निघाला ती ही तमिळ भाषा सस्कृत भाषा नतरची इथल्या मदुराई व बाकीच्या मदिरात पूजा सस्कृत भाषेमधून होत नाही, ती आता तमिळ भाषेतून होते

नाहीतर सस्कृत ही मरती भाषा ॐ प्राणाय स्वाहा, ॐ अपानाय स्वाहा, ॐ व्याना स्वाहा, ॐ उदाना स्वाहा, ॐ ब्रह्मणे स्वाहा, आपल्याला काय समजले? आपणही त्या आपल्या पुरोहितासारखेच वागतो

एका लग्नात एक भट व त्याचा मुलगा लग्न लावीत होते त्या बापाच्या मनात होमहवनाकरिता ठेवलेले तूप चोरण्याचा विचार आला तो मत्र म्हणत मुलाला शिटकावू लागला, ' मुला ! घृतम चोरी घृतम चोरी ! ' अण्णा !

कशातु   कशांतु ?' मुलगा भावडेपणाने विचारू लागला 'नव्या कन्यातु कन्यातु' बापाने समजावून सांगितले, 'नव्या कन्यातु  जिरतु ?' मुलाने शका काढली 'नव्या कन्यातु जिरतु ! तुझ्या बापाचे काय सरतु ?  '

परतु नवरानवरीचे आईबाप व वऱ्हाडी मात्र जाम खूष होते या भिक्षुक जोडगोळीवर त्यानी अस्खलित मत्र म्हणून कार्य आटोपून घेतले म्हणून आणि बापाईपेक्षा पोरगा सवाई निघाला, त्याच्यापेक्षा विद्वान निघाला म्हणून ते त्याचे कौतुक करीत होते

अर्थात हा तमिळनाडू तमिळाचा प्रदेश मग तामिळ बोलावी तामिळ ही आर्य भारतात येण्याआधीची ४००० वर्षांपूर्वीची भाषा  द्रविड मुन्नेत्र कळघम काय सागते ? तेलगू देशम काय म्हणते ? राजकारणी मग या शिडचा लाभनात वर्णद्वेष, भाषाद्वेष याचा मग आधार घेतला जातो

ही चीड मग वेळोवेळी दिसून आली एकदा तर तोंड निळे--जाभळे करीत, हातात लुगी धरीत एकटा तावातावाने बोलू लागला द्रविड सस्कृती आगळीवेगळी आर्य आल्यामुळे द्रविड पुढे सरकले ही गोष्ट कुणा सुपीक आर्यांच्याच डोक्यातून निघालेली थाप आहे आर्यांसारखे द्रविड उदीर कसे डोंगरातूनच आले नाहीत ते समुद्रमार्गे आले किंवा इतकी जुनी मुरलेली सस्कृती, इतकी जुनी राज्ये दक्षिणेत आहेत हे कितो काळ आर्यांना माहीतही नव्हते

मैलापूर मैलापूरच्या तीन कोटी खर्च करून बाधलेल्या ३२ फूट उच अशा रथातला तिरुवेल्लूर याचा पुतळा 'कुरूल' ग्रथातल्या २६६० ओळी पढवतो माणसाचा धर्म सागतो त्याने कसे वागावे हे शिकवितो

पण माणसामाणसांतील या भिंती वाढतच आहेत भारताच्या सार्वभौमत्वाला धक्का लावू पाहताहेत शेष भारतापासून फुटून जाऊ पाहताहेत

हे सगळे असले तरी आम्हाला माणुसकीचे दर्शन मात्र वेळोवेळी होत होते

एक मुबईचा पर्यटक आम्ही राहत होतो, त्या ब्लू डायमड हॉटेलमध्ये होता त्याचा मुलगा आकस्मात आजारी पडून अत्यवस्थ झाला चार लोक चारीकडे धावले आणि त्यानी डॉक्टर्स जमा केले आणि मुलगा वाचला असेच एकदा सकाळी सकाळी नाश्ता करून आम्ही बाहेर आलो हॉटेलपुढे एक बगला अबोलीची फुले केळीच्या पानात बाधावी तसा दुरून दिसत होता आम्ही त्याच्या शेजारच्या उचवटयावर जाऊन बसलो छान, गुळगुळीत कितीतरी सोपे होते आमच्या गप्पा चालल्या होत्या एकाने एक किस्सा सांगितला

त्याच्या गावात एक दगड ग्रामपुरुष म्हणून होता होता होता आणखी एक दगड देव झाला आणि मग हळूहळू शेजारचे पुष्कळ दगड शेंदूर फासून बसले त्याचे वडील गावचे मुख्य 'रेजिदोर' होते मग त्याना कळले की कुणीही देवाला आला

की तो शेंदूर वाहिल्यानंतर तो हात काढून शेजारच्या दगडाला पुसे मग तिसऱ्याला, चौथ्याला आणि असे त्रैलोक्य कोटी देव नादायला आले हेही दगड तसेच असावेत असे वाटले, पण दोन–तीन इसम आमच्याकडे धावत आले आणि घाबरून सांगू लागले, ' डोंट सिट्ट ऑंटी इट इज बेड्डा ऽ ऽ अकल !' आणि कळले, त्या मेलेल्या माणसाच्या समाध्या होत्या

भयंकर उकडत होते सृष्टी बदलली होती, वैराण झाली होती हवा कटाळवाणी, आळशी, निरुत्साही होती ताडाची, शिंदीची झाडे, माडांचे उंच बांधे स्तब्ध झाले होते

कडुनिंबाचा मंद, मदिर वास नकोसा वाटत होता पिवळे रानफुलांचे गुच्छ रुक्ष दिसू लागले होते भगव्या रंगाची अबोल अबोली ढोंगी वाटू लागली होती आणि एका घराच्या कोपऱ्यावर सोडलेली गारवेल गार वाटत नव्हती

एका घराच्या अंगणात काढलेले सूर्य–चंद्र गोपद्माचे जोडे, रांगोळी पिवळी पडली होती आणि तुळशी वृंदावनातली तुळस पिकुटलेली वाटत होती

बंगलोरपासून नव्हे तर बेळगावपासून मागे लागलेले सारम, रसम आता गळ्याशी येत होते वाळ्याच्या पाण्याचा सुगंध नकोसा वाटत होता जिऱ्याचे पाणी घशाखाली उतरत नव्हते गवती चहाचे पाणी ओकून टाकावे वाटत होते गजन जवळ नको त्याचे तोंडसुद्धा पाहावेसे वाटत नव्हते कापराचा वास असलेले ' पायसम् ' अगोड वाटत होते आणि आंबट ताक तर तूर लावू देत नव्हते

पण डोळे निवले ते दक्षिणेचे ताट पाहून केळीचे पान बघून घर व मोठमोठी हॉटेल्ससुद्धा जेवणाला ही पानेच वापरीत

एकदा इथला एक माणूस परदेशात गेला आणि तिथे एकाकडे जेवायला गेला जेवल्यानंतर आवरता आवरता गृहिणीने गोष्टी सुरू केल्या, ' तुमच्याकडे तर नोकर असतात, तुम्हाला या बशा, ताटे धुण्याचा त्रास नसेल ' ' नाही ! तसं नाही, आम्ही हा जंजाळ ठेवतच नाही, ' तो म्हणाला, ' आम्ही जेवणाच्या प्लेटस् सरळ फेकून देतो ' ' अस्स !' गृहिणी उद्गारली, ' तिथे इतकी श्रीमंती आहे ? इंडिया गरीब, गरीब म्हणून इथे उगाच नाके मुरडतात तर !'

पर्ल बकने एके ठिकाणी म्हटले आहे, ' हिरव्यागार केळीच्या लुसलुशीत पानावर स्वतःच्या हाताने जेवणे यासारखे सुख आहे का ? त्यावरचा तो पांढराशुभ्र भात, ते पिवळे वरण, सांबार, टॉमेटोची लाल कोशिंबीर, तांबडी–हिरवी मिरची घातलेली ती बटाट्याची भाजी, डावीकडचा तो केशरी भात, हिरवा मसालेभात आणि लाल लाल अचार लोणचे अमेरिकेत आपण चमच्याने जेवतो, चीनमध्ये बांबूच्या काड्यांनी, पण स्वतःच्या हाताने या पानावर जेवणे यासारखे सुख आहे का ? आणि स्वच्छता तरी '

पोंगलचा सण पुढे यायचा होता जिथे तिथे मातीची भाडी विकायला काढली होती ही भाडी आता रगवण्यात येणार होती त्याना फुलाच्या माळानी नटवण्यात येणार होते हळदीच्या पानाचा शालू नेसवण्यात येणार होता सोनकीच्या फुलाची शाल वर पांघरण्यात येणार होती

हा सण नतर आम्ही हॉटेल ब्लू डायमडमधल्या खिडकीत बसून पाहिला सूर्याच्या उन्हात मातीच्या चुलीवर असलेली मातीच्या भाड्यातली सफेद खीर उतू गेली आता सुखसमृद्धीसुद्धा उतू जाणार होती ' कोलम 'च्या रांगोळीत बसलेली लक्ष्मी प्रसन्नतेने हसली

अर्थात हा आमच्या रथसप्तमीसारखा दोघामधला दुवा मनात बाळगून आम्ही मद्रास पाहण्याकरिता बाहेर सरलो, पण मद्रास ' उलटे ' निघाले

स्त्रियांचे पोशाख म्हणजे उलटे प्रतिबिंब उजव्या नाकपुडीत चमकी, उलटे नेसण सूर्याबाबतीत तेच नाथाघरची उलटी खूण आम्हाला सूर्य समुद्रात डुबताना दिसतो तर मद्रासचा सूर्योदय पाण्यात

आपला कार्तिकेय ब्रह्मचारी तर इथे गणपती

आपण अमावस्येला शुभ काहीच करीत नाही, पण याना अवसेलाच मुहूर्त सापडतो आपण नाव लिहिताना आपले नाव प्रथम, नतर वडिलाचे नाव आणि नतर आडनाव लिहितो हे लोक प्रथम गावचे, मग वडिलाचे व शेवटी आपण स्वत राहतात आपण मामेभावाशी लग्न लागायची वाट पाहतो, पण हे लोक मामाशीच लग्न लावून की हो मोकळे होतात !

आम्ही मरिना किनाऱ्यावर फिरायला गेलो हा किनारा जगातल्या दुसऱ्या नबरचा एकाने अभिमानाने सांगितले असेल, तसा हा किनारा मोठा आहेच सरळ रस्त्याने गेलो तर आठ मैल होतो म्हणे !

पण आमचा गोमतक तर हरितधवल अशा वाळूवरच पहुडलेला हरमल, बागा, कळगुट, कोलवा, माजोर्डा, कासावली, पाळोले सगळा किनारा एकच कुणी राम म्हणतो, कुणी शाम म्हणतो केशव म्हणा अथवा माधव रूप एकच

या किनाऱ्याची सुरुवात अण्णादुराई स्मारकाने होते तमिळ ही भारताची आद्य भाषा हा दावा करणारे द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे सस्थापक प्रथम हा दावा पेरियर नायकर, पेरियर अय्या, सस्थापक द्रविड कझागम – यानी केला मद्रास विद्यापीठासमोर हे स्मारक उभारले आहे

पाढऱ्या शुभ्र कमानीच्या आत आम्ही गेलो कुशीला सतकवीचे पुतळे होते काळ्या सगमरवरी चबुतऱ्यावर मोठा स्तभ होता पुढे अखड ज्योत पेटत होती

मद्रासला अण्णादुराई इतकाच राजगोपालाचारी, पट्टाभीसितारामअय्या, रामस्वामी अय्यगार, कामराज, कृष्ण मेनन, गिरी, एम जी रामचद्रन याचा

अभिमान आहे रामचद्रनचे तर देऊळ झाले आहे तिथे दर शुक्रवारी त्याच्या दोन फूट मूर्तीसमोर आरती, भजन होते

या लोकांनी ब्रिटिशांची भाषा स्वीकारली, पण पोशाखी सस्कृती मात्र झिडकारली त्यांनी पोशाखाचे अवडबर माजवले नाही परपरागत वेष सोडला नाही आठ महिने उन्हाळा असल्याने लुगी, सदरा हा पोशाख सोईचा

राजगोपालाचारी हे गव्हर्नर होते, तरी त्यानी आपला पारपरिक पोशाख सोडला नव्हता कामराज लुगी--सदरा, खाद्यावर एक जरीचे उपकरणे असाच पोशाख करीत

मुबईच्या विलिग्टन या क्लबमध्ये एम एफ हुसेन हे नामांकित चित्रकार अनवाणी गेले त्याना प्रवेश नाकारला त्याच्याकरिताच हा समारभ आयोजित केला होता

आनद शकर हे सुप्रसिद्ध नर्तक मुबईच्या एका स्विमिग क्लबमध्ये पायजमा घालून गेले त्याना अडवले गेले म्हणजे कपड्याकरिता माणूस की माणसाकरिता कपडा ?

कपडे हे अग झाकण्याचे साधन एक नूर आदमी म्हणत म्हणत सस्कृतीच्या ओघात कपड्याचे महत्त्व दसनूर वाढत गेले

उत्तर प्रदेशात मोरादाबाद जिल्ह्याच्या जब्बार गावात दोन लग्ने एका दिवशी, एकाच मुहूर्तावर झाली. दोन्ही नवरे एकाच गाडीने लग्नाला गेले आणि लग्न झाल्यावर परत आले वाटेत मेवानवाडा इथला नवरा वधूला घेऊन प्रथम उतरला

दुसऱ्या दिवशी सासूने पाहिले व तिला कळले की नवरी बदलली आहे चेहऱ्यावरचा बुरखा दूर करून नवरी अघोळीला गेली तेव्हा सासूने पाहिले, तिने लग्नात आहेर केलेले कपडे सुनेच्या अगावर नव्हते

एका टोकास अण्णा दुराई तर दुसऱ्या टोकास विवेकानद उभे होते विवेकानद जिथे वसतीला राहिले, ती ही जागा 'आइस हाऊस' या नावाने ओळखली जाते

तसाच अर्काटच्या नबाबचा चेपोक राजवाडा आता पी डब्ल्यू डी चे कार्यालय झाला आहे दक्षिणेकडचा खास महाल व उत्तरेकडचा हुमायून महल आहे त्याच नावाने नोंदवले गेले आहेत या राजवाड्याचे मैदान म्हणजे चेपोक मैदान, क्रिकेटचे मैदान

मरिना किनाऱ्यावरच्या रस्त्यावर अनेक पुतळे आहेत त्यात 'श्रमाचा विजय' हा एक पुतळा आहे एक प्रचड दगड लाकडाचा जोर लावून कामगार लोक उलथून टाकीत आहेत त्याच्या पायाखाली एक भिकारी भीक मागत बसला

होता आणि शेजारचे दीपगृह लुकलुक करून डोळे मिचकावीत हसत सुटले होते,

नेपियर पुलावरून गेलो तर दारातच सेंट थॉमस हे चर्च लागते

सेंट थॉमस नावाचा एक पाद्री मैलापूरला आला आणि नमस्कार–चमत्कार करीत त्याने भोळ्या लोकाना कळपात ओढले मद्रदेशाला हा अत्याचार मानवला नाही त्याने या सताला टेकडीवर नेले आणि मारून टाकले पाणी घातले तर आग मालवतेच असे नाही या उलट ती धुम्सते ती विझू दिली तर आपोआप मालवते पण दुर्लक्ष केले असते तर या सताने सारा मद्रदेश बाटवून ठेवला असता असे हे उलटसुलट धागे पडले होते, पण जाताजाता या सताने आपले भले करून ठेवले या वधामुळे त्याला हौतात्म्य प्राप्त झाले आणि इथे हे चर्च निर्माण झाले ही वास्तू अनेकदा मोडली गेली आणि तितक्याच प्रयत्नानी परत बाधली गेली. आम्हाला ती गोमतकातल्या चर्चसारखी वाटली निमुळते शिखर असलेली ही वास्तू तशीच आहे १८९६ मध्ये बाधलेले हे चर्च आपण आशियातील सर्वांत जुने असा दावा करते

अडयार व कुम या दोन नद्याच्या दुआबात असलेल्या या शहराचा खूप बोलबाला झाला होता भिक्षादेही करीत पोट जाळण्यासाठी प्रथम इथे पोर्च्युगीज आले, इथेच रमले सेंट थॉमस हे चर्च या काळचे आहे

या पोर्च्युगिजामध्ये माद्रा नावाचा एक इसम होता त्याच्या नावावरून मद्रास हे नाव पडले एक कथा महाभारताचा धागा पकडते मद्रदेश पाडू राजाच्या माद्री या राणीचा माहेर देश

या पोर्च्युगिजाच्या ढुगणाला ढुगण लावून ब्रिटिश आले विजयनगर साम्राज्याची तीन मैल लाब व एक मैल रुद अशी समुद्राची किनार सर फ्रान्सिस डे या माणसाने प्रथम मागून घेतली आणि नतर राजा चद्रगिरीकडून २२ जुलै, १६३९ रोजी कराराने विकत घेतली आणि मैलापूर चिन्नापट्टण येथे वखारीच्या रूपात आपले पाढरे पाय रोवले याचे नाव पडले मद्रासपट्टणम म्हणजे समुद्रावरचे खेडे

इथेच, या किनाऱ्याजवळच सेंट जॉर्ज हा किल्ला नदी, सागर तिन्ही बाजूनी वेटोळे घालून घेतलेला आता वार्धक्याच्या खुणा पांघरतो 'लडकपन खेल में खोया' आता बुढापा आला आता 'रोया रोया' राहायचे

ब्रिटिश कारकीर्दीचा हा किल्ला साक्षीदार इथल्या सेंट मेरी चर्चमध्ये सर रॉबर्ट क्लाईव्ह व मार्गारेट मास्कारेन्यास याच्या विवाहाला हा साक्षीदार होता.

कर्नल वेलस्ली वॉटर्लू लढाईनतर हा 'ड्यूक ऑफ वेलिंग्टन' झाला, तेव्हा यानेच त्याचे अभिनदन केले होते चारनोक याच्या मुलाचा बाप्तिस्मा झाला,

तेव्हा यानेच त्याचे कौतुक केले

मद्रास शहर भारतातले चौथ्या क्रमाकाचे शहर कुशीने शेती होती. भरपूर पाणी तादूळ गोटा घरात आलेला घरदार भरलेले दिसत होते धष्टपुष्ट असे बैल सजवलेले, शिगाना बक्षिसे खोचलेली मद्रासच्या पॅरीज कोर्नर या गजबज-लेल्या ठिकाणीसुद्धा दिसत

इथे जवळच एक जत्रा भरली होती धक्काबुक्की, रेटारेटी चालली होती. पिपाण्या वाजत होत्या फुगेवाले कर्कश ओरडत होते पोरे किंचाळत होती त्याच्याही-पेक्षा मोठ्याने आईबाप डाफरत होते

रहाटचक्रे गरगरत होती तबूत सिनेमा चालला होता एका दरवेशाचा खेळही चालला होता वातावरणात झिंग होती बायाबाप्याची खरेदी चालली होती एका रिबिनच्या दुकानासमोर एक पोक्तशी बाई आपल्या नवऱ्याला अजिजीने म्हणाली, ' स्वामी ! '

पण हिचा स्वामी तिच्यावर करवादला, तडकला ती आपल्याकरिता नव्हे तर नातवडाकरिता, सुनेच्या मुलीच्या मुलीकरिता रिबन मागत असावी त्याने उद्याचा वायदा केला असावा शब्द इतके फसवे असतात

पण तमिळनाडूचे कौतुक वाटते जागतिक मुलीच्या वर्षात तर जास्त वाटते

तमिळनाडूमध्ये ' कोलबू ' म्हणून मुलीचा सण आहे सारा तमिळनाडू तो पाळतो या सणात मुलीच्या साऱ्या बाहुल्या जमवल्या जातात त्याची आरास केली जाते सरस्वतीसगे त्याची पूजा केली जाते म्हणूनच सुब्बलक्ष्मी अम्मु, स्वामिनाथन, रुक्मिणीदेवी अरुडेल अशा सरस्वतीसारख्या तेजस्वी स्त्रिया इथे जन्माला आल्या आहेत फक्त जपानमध्ये असा मुलीचा सण आहे

निसर्ग व मानव याचा गूढ शोध घ्यायला भारत ही भूमी योग्य होती, आदर्श होती थिऑसॉफिकल सोसायटी ही जरी न्यूयॉर्क येथील ब्लोरावस्की या रशियन स्त्रीने जन्माला घातली तरी तिचे लालनपालन ॲनी बेझट या थोर विदुषीने केले ' विश्वबधुत्व ' हा या सोसायटीचा धर्म

ॲनी बेझट ही एरवी सुस्वभावी तिचा पती रेव्हरेड फ्रान्सिस हा धर्मोपदेशक हाही चागल्या स्वभावाचा होत्या ही दोन प्रचड माणसे एकत्र आली होती, पण या जोडप्याचे जमले नाही सावरून घेणे, लुटूपुटूचा, भातुकलीचा खेळ झाला सूर बिसवादी झाले छत्तीस त्रेसष्ट झाले

कदाचित नियतीला मजूर झाले नसेल या दोघानी चिऊकाऊचा ससार करावा त्यानी मोठा ससार करावा अशी नियतीची इच्छा झाली असेल विधात्याला ही सस्था जन्माला घालायची होती, म्हणून त्याने ही कळसूत्री बाहुली थोडा वेळ नाचवली

मराठी ... ग्रंथ
क्र. ६७

समोर भली मोठी दगडी चिरेबद वास्तू दगडी चेहऱ्याने उभी होती कुशीचे भले मोठे आवार, त्यात मोठमोठे वृक्ष, गर्द झाडी होती पिवळी, पाढरी, किरमिजी, गुलबक्षी फुलली होती जास्वदीची लालभडक फुलानी भरलेली एक फादी इतकी वाकली होती की त्यावरची खारोटी जमिनीला पाय न लावता खालीवर करीत होती, सागत होती असामान्याने सामान्याशी नाते सागावे कधी कधी चद्रिकेने खाली येऊन जळाच्या आरशात चेहरा निरखावा शिखरानी दोन पावंडे खाली उतरून धरतीशी आकाशाच्या चुगल्या कराव्यात, हिरवळीशी हितगुज करावे

आतल्या भव्य दालनात ‘ मुले ’ हे चित्र होते व ॲनी बेझटचा पुतळा होता हॉलमध्ये बुद्ध महावीर, धरतृष्ट, येशू ख्रिस्त, श्रीकृष्ण याचे पुतळे सत्यापेक्षा धर्म श्रेष्ठ आहे का ? विचारतात

विश्वबधुत्वाची ही कल्पना श्रीकृष्णाची गीता, बुद्ध, महावीर यांची वचने, महमद पैगबर याचे कुराणातले आयते, धरतृष्टाचे विचार, जपानचा शिंटो धर्म, येशूचे सर्मन

अडियार अडचार म्हणजे जिथे तुम्ही पोहोचत नाही, पोहोचू शकणार नाही, तुम्हाला पोहोचता यायचे नाही

आणि खरोखरच आम्ही पोहोचूनही पोहोचलो नाही. सोसायटीच्या लायब्ररीचा एक तिरसिगराव आम्हाला भेटला त्याने आम्हाला लायब्ररी दाखवली नाही काहीच दाखवले नाही तो आमच्याशी नीट बोललाही नाही बोधवचने जणू हिणवू लागली आम्ही परत गेलो

पण आम्ही परत फिरलो, अडचार इथला वटवृक्ष पाहण्याकरिता, कारण आशिया खडातला हा सर्वांत मोठा, विस्ताराने मोठा वृक्ष आहे वयानेही मोठा आहे याचे वय १००० वर्षे तरी असावे

कलकत्त्याच्या वृक्षाप्रमाणेच हाही सरळ एका खोडाचा वाटत नाही त्याच्या ओथबलेल्या फाद्या, पारब्या सरळ जमिनीत घुसल्या असल्याकारणाने मडप घातल्यासारखे हिरवे हिरवे रान वाटत होते मानवी ससार व वटवृक्ष एक आहेत, समान आहेत. माणसाच्या पिढ्या, वडाच्या पारब्या रुजत, फुलत, फळत असतात

वटवृक्ष हे शिवाचे निवासस्थान एकदा दुर्गा शिवावर रागावली आणि तिने शिवाचे रूपांतर वटवृक्षात केले अर्थात हे असे वलय असल्याने हा पुजला जातो इथे जवळपासच्या त्रिकालातुर या गावी एक वटवृक्ष होता अगस्त्य ऋषींनी त्याच्या पारावर बसून तप केले होते म्हणतात किती शतकानी तो कोसळला आणि त्याच्यावर ब्राह्मणासारखेच अत्यसस्कार झाले

धर्म कोणताही असो, देश कुठलाही असो, वडाला मोठेपण आहेच वडाचे झाड सभोवती असले की पिकावरील कीड नाहीशी होते त्याशिवाय हे झाड

वातानुकूलता ठेवते चोवीस तासात ४०० लिटर्स पाणी बाष्परूपाने फेकून हे आर्द्रता निर्माण करते

आम्ही उभे होतो पुढेच एक काळीसावळी तरतरीत मुलगी कडेवरचे मूल सांभाळीत रिक्षामधून उतरली आणि आपल्याच नादात चालू लागली तिच्या खांद्यावर पर्स लोंबकळत होती मुलाला एका खांद्यावरून दुसरीकडे घेत अवघडलेला हात तिने मोकळा केला याच वेळात एक बोहरा स्त्री तिला खेटून खेटून चालली होती आणि चटकन तिने तिची पर्स उघडून पैसे काढून घतले आमच्यासारखेच बाकीच्यांनीही हे पाहिले वाईट वाटले, सत्य हाच देव म्हणणाऱ्या वास्तूसमोरच हे घडले होते

या वटवृक्षाप्रमाणेच इथे खूप संस्था फुलत, फळत आहेत आणि त्यांपैकी एक म्हणजे कलाक्षेत्र कलेमधे जे सौंदर्य असते, तेच माणसाला सुसंस्कृत, प्रगल्भ बनवते, असे ॲनी बेझंट म्हणत असत १९६६ मध्ये जन्म पावलेले हे अड्यारचे गुरुकुल भरत-नाट्यम्, कथाकली या नाट्यनर्तन कलेचे शिक्षण देते गोट्टुवाद्यम्, टोट्टुवाद्यम आपल्या घुमटवाद्यासारखेही शिक्षण इथे मिळते

इथे कडुनिंबाची फुले तुपात परतून, साखरेत घोळवून खातात या प्रदेशाची चवही आम्हाला तशीच वाटली थोडी कडू, थोडी गोड आपले कार्ले तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडू ते कडूच असते

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, पुरी, द्वारकावती, सप्तैला, मोक्षदायिका या मोक्ष देणाऱ्या सप्तपुरींतील तीन क्षेत्रांत शिव वास करतो तीन क्षेत्रांत विष्णू आणि दोघांचे मिलनस्थान ही कांचीपुरी

या वेगवती नदीच्या काठावर भक्तमंडळींनी हरी व हर या दोघानाही पुजून टाकले, म्हणून या स्थानाचे वेगळे महत्त्व आहे

ब्रह्मा विश्व निर्माण करतो, विष्णू पालन आणि शिव या विश्वाचा नाश, पण या दक्षिणेत सारे काही शिवच करतो पित्याच्या कर्तव्याने जन्माला घालतो, आईच्या वात्सल्याने लालनपालन करतो आणि तोच शेवटची अंगाई गातो, विश्राम देतो आपण निर्मिलेले हे विश्व आपणच ठोकरून देतो या साऱ्या गुंत्यात गुंतून आपला पाय आपणच मोकळा करतो

काशी व कांची शिवाचे हे दोन नेत्र हे वैदिक पीठ आहे या कांचीचा महिमा वेगळाच पुष्पेशु, जाई, पुरुषेशु, विष्णु, नदीशु, गंगा, नगरेशु, कांची देवीच्या ५१ शक्तिपीठांपैकी हे एक मृत सतीला घेऊन शंकर शोकाने हिंडले तेव्हा तिचा पंजा इथे गळून पडला म्हणतात अशा या कांचनपूर शहरात जन्म-मरण सौभाग्याचे मानले जाई आम्ही मात्र वेडे या कांचीला फटाक्याकरिता ओळखत होतो आणि कांजीवरम् साडी जाणत होतो आणि त्या पाहायला आम्ही

काजिवरम् कलाकेंद्रात जाऊन बसलो

जरीचा तो झगमगाट ते भडक रग आणि मृद्गधासारखा तो कोऱ्या वस्त्राचा अनवट वास कुठली काची आणि कुठला रामेश्वर ! या साड्याच म्हणजे ब्रह्म होते ढिगारे उलथेपालथे करताना आम्हाला वाटत होते

या मोक्षदायक पुरीत १८१ देवळे आहेत पूर्वी आणखी खूप होती त्यातली १०८ शिवाची व १८ विष्णूची आहेत चालुक्य राजा पुलकेशी याने हे शहर पल्लव राजाकडून घेतले यातली थोडी चोल राजानी, काही पल्लवानी आणि काही विजयनगरच्या राजाकडून बाधली गेली

आम्ही हर व हरी या दोघानाही सोडले आणि स्त्रियाना प्राधान्य म्हणत रगीबेरगी गोपूर असलेल्या कामाक्षी मदिराकडे जाऊ लागलो

या कामाक्षी अम्मनची कीर्ती ऐकावी तितकी थोडी आणि त्यापेक्षाही शकराचार्य जाणून घ्यावेत त्यांच्या कथा ऐकाव्यात, कौतुक करावे

एरवी श्रीविष्णू निळे–सावळे, पण रेखीव, सुदर एक दिवस श्रीलक्ष्मीने त्याची चेष्टा केली विष्णू चिडले त्यांनाही ते बेंबीतून आलेले ब्रह्माचे ध्यान टोचत असावे, डाचत असावे

भक्त काय, वक्रतुड महाकाय म्हणत गणपतीला गौरवतात लबोदर म्हणत त्याला आणखी खाऊ चालतात काळा रग सतेज म्हणत कालीचे कौतुक करतात सुदर ते ध्यान म्हणत त्यांनी कामाक्षीचे कौतुक केले असते

पण श्रीविष्णूचे काय ! लैलाला आपल्या डोळ्यानी पहा म्हणायला ते मजनू थोडेच होते ! ही अवदसेसारखी बायको त्याना कशी चालली असती ? कैलासावर पार्वतीकडे, इद्राच्या इद्राणीकडे, सुदर सावित्रीकडे, सुरेख गायत्रीकडे ते कसे गेले असते ? अपराध लक्ष्मीचा होता, पण शिक्षा त्यानाच झाली होती आणि त्यानी सुचवले, तू तप कर ती ही कामाक्षी

कामाक्षीने मग जरी सर्वांगसुदर करून घेतले तरी तिचे मन कवडलासारखे कुरूपच राहिले ही कामाक्षी आपले पूर्वीचे रूप घेऊन रात्रीची बाहेर जात असे ही ज्याच्या नजरेस पडत असे, तो एक तर गलितगात्र होऊन, फेफरे येऊन पडत असे किंवा गतप्राण तरी होत असे लोक बाहेर जायला कचरू लागले

देवी कशालाच, कुणालाच आटोक्यात येत नाही ही गोष्ट शकराचार्याना कळली त्यानी युक्ती केली तिची स्तुती आरभली तिचे कौतुक केले तिला भक्तीने आळवले आणि देवी शेवटी स्त्रीच ठरली ती जाळ्यात सापडली, शब्दाला फसली आचार्यांनी तिला आपल्या अनुज्ञेशिवाय बाहेर जाण्यास बदी घातली

हे शंकराचार्यांचे उपकार अजून स्मरले जातात आजसुद्धा पालखीतून देवी नगरसंचाराला जाते, तेव्हा ती मंदिरातल्या शंकराचार्यांचा शब्द घेते, त्यांची अनुज्ञा घेते आणि मग बाहेर सरते पुरुषांपुढे दुय्यम राहणे, पडखाऊ नरमाईने वागणे, नमते घेणे, लाचार बनणे यातच तिला गोडी वाटते ? हाच तिचा धर्म ? धीटपणाचा मुखवटा घातलेली ही कामाक्षीसुद्धा ? मला स्वत:चीच कीव वाटून गेली

मंदिरात हातात पोपट नाचवीत कामाक्षी बसली होती, तर लक्ष्मी एका पायावर तप करीत होती साऱ्या मंदिरभर शंकराचार्यांचे पराक्रम गाइले होते पौरुषाची पूजा करायला आमची ' ना ' नव्हती

माणूस काय खातो ? तो सगळे काही खातो उडणाऱ्यात कावळा व बुड-णाऱ्यांत बेडूक सोडून सगळे खातो हे म्हणीपुरते झाले आज बडया बडया बेडकांना खूप मागणी आहे आणि हे खाणाऱ्यात चीन अग्रेसर आहे चिनी लोक काय खात नाहीत ? ते साप तळून खातात, झुरळाचे लोणचे, विंचवाचे सूप पितात इंग्लिश लोक टोळ खारवून खाणे ही Delicacy समजतात आणि आफ्रिकेत लोक कुत्री-मांजरे खातात आपल्याकडेही रानउंदीर, शेतउंदीर खाणारे आहेत

मध्य प्रदेशात बस्तर जिल्ह्यात मुंग्या वाळवून खातात, मुंग्यांची खीर पितात, मुंग्याचे लोणचे खातात आणि आता असे कळते की, या मुंग्यामध्ये खूप प्रोटिन्स आहेत, चिकनपेक्षा गाईच्या मांसापेक्षा जास्त असतात कोळंबी, सोयाबिनपेक्षा ती जास्त असतात, त्यामुळे थकवा दूर होतो, थंडी दूर पळते आणि त्यामुळे हृदयविकार होत नाही म्हणजे हे बत्तीस गुणाक्षरी झाले

आता उद्याचे डॉक्टर्स प्रिस्क्रिप्शन देतील –

१ पसा वारुळातील मुंग्या

१ पसा लाल मुंग्या

½ पसा डोमळे

पण माणसाला माणूस खातो हल्ली हल्लीच काही वर्षांपूर्वी एक विमान कोसळले आणि प्रवासी एका निर्जन डोंगरावर जाऊन पडले हाडे गोठविणारी बेसुमार थंडी आणि पोटात भुकेचा वणवा एकएकटा भुकेने मरून पडू लागला आणि शेवटी जे कुणी जिवंत उरून परत आले, त्यांनी आपल्या सहाध्यायांचे मेलेले मांस खाल्ले होते

हे भुकेपोटी झाले विद्वान अशा विश्वामित्राने कुत्र्याची तंगडी खाल्ली होती, पण परवा परवा रशियात निझनी टांगिल येथील उरला या खेड्यात एका लिथुआनियन माणसाने आपल्या बायको-पोरांना फाडून खाल्ले पोलिस आत जातात तर हा तव्यामध्ये बायकोचे काळीज तळत बसला होता

या दक्षिणेत येऊन आम्ही काय काय खाल्ले ? काय काय प्यालो ? कुठे

जिऱ्याचे उदक प्यालो, कुठे कोथिंबिरीचे पाणी घेतले, कुठे वाळ्याचे सरबत तर कुठे कषाय गवती चहा, कुठे सुवासिक गुलाबपाणी, तर कुठे कापूर घातलेले दूध सारम्, रसम्, साबार, उरकाय हे नेहमीचे जेवण झालेच, तर कुठे आबट वरण आणि विस्वोण बांगड्याचे ' हुमण 'ही खाल्ले

एके ठिकाणी जेवणात केळ्याची भाजी होती खरे म्हणजे ती केळीच्या गाभ्याची भाजी होती आम्ही वेटरला विचारले, ' यात केळी दिसतच नाहीत ? सगळ्या फोडी गाभ्याच्याच दिसतात तुम्ही प्रमाण काय ठेवलेत ? ' ' एका केळ्याला एक केळीचा गाभा सर ' वेटर सांगू लागला

एके ठिकाणी आम्हाला कोंबडी खायची तल्लफ आली आम्ही हॉटेलमध्ये गेलो आणि कोंबडीची ऑर्डर दिली तास झाला, दोन तास झाले हॉटेलवाला मजबूर झाला तो उमगला, आम्ही कोंबडी खाल्ल्याशिवाय हलणार नाही अर्थात मग एका कोंबडीचे कुटुंब हुतात्मा झाले

असेच आणखी एके ठिकाणी आम्ही रेस्ट हाऊसमध्ये उतरलो अर्थात सरकारी कारभार आम्हाला पाहिल्यावर तिथला खानसामा अंडी व पीठ आणायला गेला, पण त्याची बायको उठेना आरामात पोरीचे केस विंचरत बसलेली. अर्थात आमच्यापैकी एक उठली आणि म्हणाली, ' बाई ग ' केस विंचरून झाले ना ? आता पाहिजे तर मी तुझ्या पोरींना न्हाऊ घालते, पण आम्हाला जेवण करून वाढ ' अर्थात तिच्या पोरींना न्हाऊ नाही घातले, पण तिच्या चपात्या लाटून दिल्या या जेवणासाठी आम्ही दाहीदिशा हिंडलो आणि दहाही कामे केली

वरदराज पेरुमल हे विष्णुकांचीचे देऊळ मोटारस्टँडजवळ लहानशा टेकडीवर आहे दक्षिणेतील देवळे खूप मोठी असतातच याचे गोपूर सात मजली, नऊ कळसांचे, १२५ फूट उंच आहे त्याला सहस्र खांब, मंडप आहे याच प्रकारात अनंततीर्थम् नावाच्या तळीत चार स्तंभाच्या एका लहानशा मंडपाखाली वरदराजाची मूर्ती निजली आहे मुसलमान आक्रमणावेळी देव इथे आपला तो बाब्या ! देव निजलेत म्हणून त्याचे कौतुक वर्षातून एकदा शहनाई, शंख वाजवीत देव उठतात

या मंदिरावर खोदलेले शिलालेख, तशाच शिल्पाकृतीही दिसतात आता हल्लीसुद्धा उत्खननात अशी चित्रे मिळाली चारही कोपऱ्यात अखंड साखळ्या दिसल्या त्या लोखंडाच्याच आहेत असे वाटते, पण त्या नव्हत्या त्या पाषाणाच्याच होत्या कोपऱ्यातल्या खांबावर, घोड्यावर बसून शस्त्र हातात घेतलेले योद्धे दिसले हे विजयनगरचे राजे होते विजयनगरच्या राजांनी देवाला राजाश्रय देऊन, त्याच्या निर्वाहाकरिता गाव बहाल केला होता

आम्ही आत गेलो वरदराजाची शाळिग्रामाची मूर्ती अगदी रत्नजडित होती भरजरी पितांबर, गळ्यात वैजयंती माळा, कमलनयन उभे होते वरदराज म्हणजे

श्रीविष्णू अर्थात दागिन्यांचे, वैभवाचे भोक्ते प्रेमाने आणलेल्या जवाहरांना ते नको का म्हणणार ? कशाला म्हणतील ? अगदी गव्हर्नर रॉबर्ट क्लाइव्हनी दिलेले दागिनेसुद्धा त्यांनी घेतले आहेत

माणसाला फुकटात घेण्याची सवय झाली म्हणजे हे असे होते देवालाही तेच आजसुद्धा हे देव घेण्यात अनमान करीत नाहीत

एक बाई आपले दागिने देवाला अर्पण करण्यास आली होती देव स्वप्नात आले म्हणे मनुष्यस्वभाव इतका निरिच्छ कुठून असतो ? तिला ते दागिने देताना दुखले असावे आपली कवळेची शांतादुर्गा, फातर्पेचीही देवी स्वप्नात येऊन दागिने, कपडे मागते म्हणतात बायकाच त्या भांडून–तंडून, मागून–मिळवून, काहीही करून आपला सोस पुरा करणारच पण हेही ईश्वरा वरदराजा, तू सर्वसाक्षी आहेस आणि सर्वभक्षीही

आम्ही बाहेर आलो

सहस्र मंडपात भात सुकत घातले होते आणि दोन स्त्रिया ते पायांनी सारत होत्या त्यांच्या अंगावर साधेच, बारीक रेघांचे सुती नेसण होते अंगावर कुठलाच दागिना नव्हता

आणि इथे हे देव जडावलेले व पितांबरधारी ईश्वरा, वरदराजा म्हणत आम्ही परत नमस्कार ठोकला

परमेश्वराने म्हणजे पितांबरधारी परमेश्वराने नव्हे तर परमेश्वर नावाच्या राजाने बांधलेले हे ' वैकुंठ पेरुमल हे मंदिरही खूप मोठे आहे ते नगरच आहे. त्याला पूर्वी ' वीणानगरम् ' म्हणत पल्लव काळातल्या शिल्पकलेचा हा एक आगळावेगळा नमुना म्हणून हे देऊळ दाखविले जाते

या देवळात विष्णूची खूप स्तुती गायली आहे जिथे तिथे भिंतीवर, खांबावर विष्णूचे अवतार दिसतात त्याशिवाय पल्लव राजा नंदी वर्मन याच्या आयुष्यातील वेचक प्रसंगही दिसतात

गाभाऱ्यात छतावर दोन पाली एक सोन्याची, एक रुप्याची पण या सोन्या-रुप्याकरिता जीव टाकणाऱ्या देवांच्या जवळ राहणेच नकोसे झाले आणि पालींचा इतिहास तिथेच राहिला

मंडपाच्या ओवरीत गाई बांधलेल्या होत्या आणि गुराखी पोरे सागरगोट्यांनी खेळत होती नाहीतर भर दुपारच्या उन्हात या मंडपाचा काय उपयोग होता आणि ते सहस्र खांब तरी कशाकरिता होते ?

ती क्रूर कामाक्षी नको आणि तो बुळचा वैकुंठ पेरुमल नको आणि तो लोभी वरदराजही नको, असे आम्हाला होऊन गेले आणि आम्ही उलगलनहा पेरुमल या वामन व बळीराजा मंदिराकडे आलो

एकदा सत्य व असत्य या दोघी नहायला नदीवर गेल्या दोघीही पाण्यात डुबू लागल्या डुबकी घेता घेता सत्याने डोके वर काढले आणि पाहिले तर असत्य लगबगीने जाऊन वाळवटात सत्याचे कपडे घालीत होती 'ए ! तू चुकतेस ! तू माझे कपडे घालीत आहेस सत्याने वर येता येता सांगितले ' नाही ! ' असत्य खदखदा हसत म्हणाली, ' मी मुद्दामच ते घातले आहेत आता मला तू समजतील आणि तुझ्यात मला शोधतील '

नाव जरी वामनाचे असले तरी हे मंदिर बळीराजाचे आहे बळी हा प्रल्हादाचा नातू इतका उदार, न्यायी होता, की देवाना याचा मत्सर वाटायला लागला त्याला पाडण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावायला लागली इडापीडा टळो आणि बळीचे राज्य येवो, असे आपण म्हणतो बलीप्रतिपदा पाळतो आपल्या मनाचा कोपरा हा असा ओला आहे

या मंदिरात बारा फूट उचीची वामनाची मूर्ती आहे बळीचे फक्त मस्तक दिसते त्याचे शरीर जमिनीखाली आहे मस्तकावर वामनाचा मस्तवाल पाय आहे

हा बळी मग ' सुतळा 'त म्हणजे केरळात गेला खरे म्हणजे या अनार्याला आर्यांनी दक्षिणेत पिटाळून लावला

बळीच्या औदार्याचा फायदा घेणाऱ्या खुज्या, किरट्या व मोठ्या पोटाच्या या ब्राह्मण पोराचा राग आला, किळस आली आणि वाईट वाटले, या केरळच्या करणीचे त्यानी आपल्या या राजाचे, बळीराजाचे हे पराजित रूप का ठेवले ? त्याना ते का ठेवावे वाटले ?

समुद्रमथन एकट्याने होत नव्हते त्याकरिता दैत्याची मदत हवी आणि अमृतमथनात अमृताचा शिसा आणण्यात दैत्याचा वाटा जास्त अमृत दिले तर हे वरचढ होतात धरले तर चावते आहे आणि नाही असा हा तिढा होता त्यानी दोन-तीनदा या दैत्य राजास, बळीस ठार केले, पण शुक्राचार्यांच्या कृपेने संजीवनीने बळी परत उभा शेवटी देवानी माणूसधर्म आचरला बळीराजाच्या दातृत्वाचा फायदा घ्यायचा त्यानी ठरविले. विष्णूने बटू वामनाचे रूप घेतले आणि बळीकडे तीन पावले जमीन मागितली पाहता पाहता बटू मोठा झाला त्याचे एक पाऊल पृथ्वीस उणे पडले दुसऱ्यात स्वर्ग सपला आणि बळीस कळले, कृतात काळ पुढे ठाकला आहे बळीने आपले मस्तक पुढे केले ही श्रींची इच्छा

दया, क्षमा, शाती व औदार्य हे गुण देवाजवळ असतात देवाजवळ देवत्व असते आणि दानव हा दानव असतो त्याच्याजवळ माया, मोह, मत्सर, अहकार, द्वेष हे दुर्गुण असतात त्याची अदलाबदल होते आणि मग देव हा देव राहत नाही आणि दानव हा दैत्य उरत नाही

विष्णूचे हे काळे कृत्य महादेवाना कधीच मानवले नसते आम्हाला खात्री

आहे, शिव म्हणजे सत्य, शिव, सुंदर या देवाची भेट घ्यायची सोडून कुठल्या कुठल्या आडवाटेला गेलो असे होऊन गेले आणि आम्ही एकाबरनाथ मंदिरात पोहोचलो

आता २३ एकर भूमीवर असलेले हे मंदिर आणखी खूप मोठे होते पल्लव, चोल व विजयनगरचे नायक राजे यांनी आपली हयात हे मंदिर उभे करण्यात अर्पिली सध्या असलेले १९२ फूट उंच, दक्षिणेतल्या चार प्रमुख गोपुरांपैकी एक हे राजा कृष्णदेवराय याने बांधले

या मंदिराला पाच मोठी दालने आहेत सहस्र खांबी मंडप आहे ' थिरुकाच्ची एकाबर ' म्हणजे भले मोठे गाव वाटते आणि तिथे गावाकडच्याच गोष्टी चालल्या होत्या

एका हॉलमध्ये दोन पोरांचा क्रिकेटचा खेळ चालला होता, तर कोपऱ्यात मुलींची भातुकली चालली होती एक आई मुलीच्या उवा काढीत होती आणि दोन बायका फुतूफुतू गोष्टी करीत होत्या

या मंदिराचे नाव मात्र थिटे वाटते एका आम्रवृक्षाचा धनी याचे कारण मंदिराच्या मागे एक अतिशय जुना, जीर्ण आंब्याचा वृक्ष आहे त्या वृक्षाने उमा–महेश्वराचा विवाह पाहिला होता आतासुद्धा ' पानगुनी ' म्हणजे चैत्र महिन्यात हा विवाह समारंभ साजरा होतो मोठा थाट असतो कित्येक जोडपी पुजली जातात देवत्वाची वलये आली म्हणजे किती यावीत! इथे धनप्राप्ती होते, पुत्रप्राप्ती होते मागेल ते मिळते

एक मुलगी लग्नानंतर माहेरी आली व म्हणाली, ' आई, मी सुखात आहे मी मागते ते ' हे ' देतात ' ' मूर्ख आहेस ! ' आई म्हणाली, ' अग ! तुझा नवरा तुला प्रत्येक गोष्ट देतो ? म्हणजे तू नीट मागितले नसावेस किंवा तुझा नवरा पुरुष तरी नसावा '

या झाडाच्या चार फांद्या म्हणजे चार वेद मानले जातात याला येणाऱ्या फळांची रुची चार तऱ्हेची गोड, आंबट, तुरट चवथी कुठली कोण जाणे !

पार्वती म्हणजे उमाने एकदा लाडाने महादेवाचे डोळे आंधळी कोशिंबीर खेळात बंद केले या ' आपालिपा ' खेळामुळे विश्वात अंधकार पसरला, हाहाकार माजला सगळे व्यवहार बंद झाले रोगराई पसरू लागली उमेवर शिव्याशापांची लाखोली पडू लागली तिच्यावर पापाचा बोजा पडला आणि ही साधीभोळी कन्या भ्याली तिने शिवाचीच करुणा भाकली. तिने वाळूचे लिंग केले आणि त्याचे पूजन सुरू केले

युगे लोटली आता शिवाला तिची परीक्षा पाहण्याची लहर आली त्याने आपल्या माथ्यातील गंगेचा लोट उमेवर सोडला प्रलय माजला. महादेवांनी उमेला

पुरी आणली नव्हती उमा म्हणजे कुणी माकडीण नव्हती की जिने स्वतःला वाचविण्याकरिता पोटच्या पोरालाच पायाखाली घातले होते पार्वतीने लिंग सोडलेच नाही उलट घट्ट कवटाळून ते छातीशी धरले घुसमटून उमा बुडू लागली, पण आकाताने लिंग सांभाळू लागली आणि शिवाला तिची खात्री पटली तिचे प्रेम उमगून आले

जसे कलहस्तीचे वायुलिंग तसे हे गर्भलिंग, पृथ्वीलिंग पृथ्वी सहस्र अगानी वरुणाला भेटले, पण इथे या लिंगाला केव्हाच स्नान नाही, केव्हाच अभिषेक नाही चमेलीचे अत्तर लावले, परिमल द्रव्याचा लेप लावला की झाले स्नान

इतिहास सांगतो, थोडे सम्राट गलिच्छ असत त्यानी कधीच स्नान केले नाही त्यांना दोनदाच आयुष्यात स्नान घातले गेले एकदा जन्माच्या वेळी व दुसऱ्यांदा शेवटचे मरणवेळी पण हे दक्षिणेचे देव यावरही कडी करतात

मीनाक्षीपुरम्‌ला ६०० हिंदूनी मुसलमान धर्म स्वीकारला जयेंद्र काचीचे धर्मगुरू यानी मीनाक्षीपुरम्‌ला भेट दिली व हिंदूचे पुनर्स्थापन केले

मागे काचीचे शकराचार्य जयेंद्र सरस्वती यानी आपल्याकडून धर्मसरक्षण होत नाही, म्हणून पीठाचा त्याग केला होता पीठ सोडून ते कैलास आश्रमात जाऊन राहिले होते

आणीबाणी जाहीर झाली इदिरा गाधी काचीपुरम्‌ला भेट देण्यासाठी आल्या, पण पीठाधिशानी त्याना भेटण्यास नकार दिला.

काचीपुरम्‌ला आम्ही नायकराचा पुतळा बघितला खाली लिहिले होते, देवावर विश्वास ठेवतो तो मूर्ख हे काचीपुरम् इतके प्रगल्भ आहे, कल्पना नव्हती नायकराच्या पुढील ज्योत फडफडली म्हणाली, 'कांची ही अशीच आहे काचिपेडू, काचनपुरम्, काचीवरम्, काञ्छि ' ती पुढे म्हणाली,

'देवा सुदरेश्वरा, तू साक्षात येऊन उभा राहिलास तरी सत्य त सत्यच म्हणणारा अपय्या इथलाच '

'माझे सर्वस्व गेले तरी चालेल, पण माझी बुद्धी मात्र मला सोडून नाही गेली म्हणजे पुरे ' असे म्हणणाऱ्या आर्यचाणक्याचा जन्म इथेच झाला

पशुपक्ष्यावरून बोध करून सकल जनाला सुजाण करून सोडणारा विष्णुशर्मा याच गावचा

सस्कृत कवी दडी व भारवी हे याच दरबारातले

पण कुशीचा वेल्लोर गाव म्हणजे

'एका सुईच्या अग्रावर वसले तीन गाव

दोन ओसाड रे .. एक वसेचिना ' असा कूट काव्यातला

वेल्लोर गावची ही ख्याती अशी होती इथे एका किल्ल्यात एक शिवालय

होते, पण ते शापित होते, तिथे देव पुजला जात नसे

तिथे पालट नावाची एक नदी होती तिचे पाणी प्रदूषित, घाण होते ते पाणी प्याले की, माणूस आजारी होत असे त्याच्या पोटात दुखत असे

इथे स्त्रिया होत्या त्या कुरूप होत्या, काळ्या होत्या, असुंदर होत्या आणि पुरुष होते ते नामर्द होते पुरुषार्थ गाजवण्यास ते कमी पडत

पण आज या गावाला उ:शाप मिळाला आहे आता इथे मेडिकल कॉलेज आहे, हॉस्पिटल आहे कुठल्या कुठल्या गावचे रोगी इथे येतात कात टाकतात. दुसरे जीवन जगण्यासाठी परत जातात

आयडा स्कडर या स्त्रीने हा वेलू लावला डॉक्टर असलेली ही अमेरिकन तरुणी आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी इथे आली होती आज हा वेल गगनावरी पोहोचला आहे

तिरुकुलूकुदरम् येथील पक्ष्याच्या जोडीबद्दल आम्ही खूप ऐकून होतो एक गृध्र पक्ष्याची जोडी नियमितपणे हिमालयाच्या मानस सरोवरातून बाहेर सरून रामेश्वरकडे जाते आणि वाटेवरचे हे जेवण घेते

गिधाडाचे अन्न एरवी कुसके–नासके मेलेली, सडकी जनावरे असे असते मद्रासजवळ अशी खूप गिधाडे आहेत, असतात, कारण त्यांना ही दमट हवा मानवते मग हीच ब्राह्मण सवाष्णीसारखी जोडी हे सोज्वळ अन्न का घेते? ही विशिष्ट अशी जोडी आहे का ? शास्त्रज्ञाना हे कोडे होते आणि त्याचा विचार होता या पक्ष्याच्या पायांत वाळे घालावेत, पण सनातन्याचे मोहोळ उठले आणि तो बेत शीतपेटीत टाकावा लागला

हे दोन गिधाडपक्षी म्हणजे पुशा व विधाता नावाचे दोन साधू होते याच्या हातून काही आगळीक घडल्यामुळे या दोघांना शिवाच्या कोपाला बळी पडावे लागले, पण पिंड साधूचा असल्याने हे नासके–कुसके काही खात नाहीत, शिळेपाके भक्षीत नाहीत

बारा वाजले होते पुजारी माथ्यावर कपडा टाकून हातात सोजीचे भांडे घेऊन उभा होता लाह्या फुटतील, असे ऊन होते तरी भाविक लोक पक्ष्यांचा उष्टा प्रसाद मिळावा म्हणून ताटकळत होते अर्थात या उष्टया प्रसादात आम्हाला रस नव्हता, रूची नव्हती

पुढे एक इसम आम्हाला म्हणाला, ' पुशा व विधाता केव्हाच उःशापाला गेले असतील. आता येतात ते पक्षी माणसाळलेले होते, पाळलेले होते अन्नासाठी दाहीदिशा नाही, त्याना एकच दिशा माहीत होती त्या तिरुकुलूकुदरम्च्या दिशेकडे ते सरळ येतात. पुजाऱ्याच्या हातचा नैवेद्य खातात आणि परत जातात '

दिवसातून एकदा हे प्रदर्शन होते ' दुनिया झुकती है, लेकिन झुकानेवाला

चाहिऐ ।' 'जय शकरा तिरुकुलूकुदरा  तुझी लीला अगाध आहे 'आम्ही घोष केला

खाली येताना थकवा आला होता पाय गळले होते  पण एक दृश्य दिसले आणि आमच्या हसून मुरकुड्या वळल्या दोन माकडे एका कुत्र्याला चिथावत होती ती या झाडावरून त्या झाडावर जायची  कुत्रा त्याना धरायला बघायचा जणू आट्यापाट्याचा खेळ चालला होता त्यातच एक बॅ बॅ पाडऱ्या शुभ्र लोकरीचे गाठोडे नाचत होते

मद्रासपासून दक्षिणेस दूर ६० कि मी अतरावर असलेल्या महाबलीपुरम्‌कडे आम्ही निघालो, तेव्हा सध्याकाळचे चार वाजले होते. दुपार सुस्तावलेली सगळे आळसून पडलेले होते

ग्रॅनाइट दगडाचे हे मदिर दीड हजार वर्षे सागराची मस्ती सहन करीत उभे आहे अशीच महा मदिरे समुद्रात नहात होती. या सात पगोड्यांची पितळी शिखरे अथाग सागरात खलाशाना दिलासा देत

सागर झाला तरी पुरुषच निगरगट्टपणा हा त्याचा गुण त्याला या सात ओलेत्या सुदरी आवडल्या असणारच, पण सागराची ही दाडगाई त्यातल्या सहा-जणींना मानवली नसावी, तोसली नसावी, खपली नसावी हे मदिर मात्र खबीर राहिले सागराला पुरून उरले आजसुद्धा सोनेरी उन्हात हे महाबलीचे पुरम् तळपत होते

मुळात हे मदिर अजस्र होते यानेही स्वत:ला वाळूच्या बुरख्यात दडवून घेतले होते मग वाळू दूर करून, सारून त्याला वर काढण्यात आले सभोवती खदक बांधून त्याला सागरापासून दूर ठेवण्यात आले, पण आत्ताही लपट समुद्र दुश्शा देत होता, साद घालीत होता लाटाची धिंगामस्ती करीत भुरळ घालीत होता, अनुनय करीत होता पण मदिर–सुदरी त्याला दाद देत नव्हतीच, 'हे वागण बर नव्हं ! अव दाजिबा ' असे दटावत होती तिला आता त्याच्या बलात्काराची भीती नव्हती तिला आता खदकाचे सरक्षण होते

पल्लव राजे हे शिवभक्त याच कुळातील राजा सिंह विष्णुवर्मा याने या मदिराचा पाया घातला त्याचा मुलगा महेंद्रवर्मा हा शूर, प्रतापी पुरुष होता त्याला अनेक नावानी पुकारण्यात येत होते त्यात 'चिट्टुकरी' म्हणजे मदिर उभारणारा असेही नाव होते त्याच्या राजवटीत ही शकराची देवळे बांधण्यात आली प्रथम हा राजा जैनधर्मीय होता, पण अप्पर नावाच्या एका शैव साधकाच्या प्रभावाने त्याने हिंदू धर्म स्वीकारला आणि हा वैदिक धर्माचा कट्टा पुरस्कर्ता झाला स्वत: बाधलेली जैन मदिरे त्याने अगदी स्वत:च्या हातानी मोडून टाकली बांधकामाप्रमाणेच राजाचे मनही चिरेबदी नसावे मातीच्या पायाप्रमाणे मनही मातीचेच  दुसऱ्याची मदिरे

मोडली आता परत बांधलेली तरी टिकतील ना ? कुणीच राजाला हा प्रश्न विचारला नसावा ? यथा राजा तथा प्रजा सारेच ढासळलेले असावेत

पण हा राजा कलासक्त होता, कवी होता, नाटककार होता, शिल्पकारीचा चाहता होता, गुणाचाच भोक्ता होता जगातल्या खडकात कोरलेल्या पहिल्या शिल्पाचा पाया घालणारा राजा इतिहास त्याला या नजरेने पाहतो

एकदरीत ऐषआराम होता आयुष्य सथपणे, अडथळे न येता चालले होते आणि चालुक्य राजा पुलकेशी याने या राज्यावर स्वारी केली आपला पराभव होईल, असा विचार राजाने कल्पातापर्यंत केला नव्हता, पण तो झाला

त्याचा मुलगा नरसिंहवर्मा हा शूर योद्धा तर होताच, पण भलताच चाणाक्षही होता स्वप्न व वास्तव याचे भान ठेवणारा

त्याला वडिलाची ही धरसोड वृत्ती आवडत नव्हती आणि त्याने बरोबर ध्यानात ठेवले शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, असे आडवळण घेऊन त्याने पुलकेशीचा शत्रू असलेल्या लकेच्या राजाकडे मैत्री केली आणि राजकारण खेळला त्याने गोडीगुलाबीने, अगावर ओरखडा न काढता राज्य परत मिळविले

बापासारखाच हाही कलासक्त होता एक गुण असला की बाकीचेही ओळीने येतात आणि इतिहास त्याला कौतुकाने ' मामला ' कलाप्रेमी म्हणून त्याचे कौतुक करतो आणि त्याने पुऱ्या केलेल्या मदिराना 'मामलापुरम्' महाबलीपुरम् म्हणायला लावतो

खडक आतून–बाहेरून कोरून केलेली ही लहान लहान मदिरे म्हणजे पाच पाडवांचे रथ कुठलीही प्रेमकाव्ये, शृगारगीते ही राधा–कृष्णाच्या नावावर चालतात आणि धाकटे–मोठे शिल्प पाडवाच्या नावावर खपले जाते

युधिष्ठीर हा ज्येष्ठ पांडव भरतवर्षाचा सम्राट अर्थात याचा रथ शिल्पकारानी तीन मजली उभारून ठेवला आहे ' नशिबान घोव मेळचो ' म्हणतात म्हणजे काहीही न करता, कुठलेच कलाशिक्षण नसताना, कसलेही कर्तृत्व नसताना ' मम ' म्हणून जशा मोठ्या पुरुषाच्या बायका वाटेकरू होतात, तसाच हा युधिष्ठीर धर्म कुतीच्या मौनामुळे अधिपती आणि तिच्या कृपेमुळे द्रौपदीपती झाला. कुठलीच राज्यकर्त्याची अगे नसताना ' जेवायला आधी, निजायला मधी आणि कामाला कधीकधी ' असे म्हणणाऱ्या आळशी पोरासारखा हा उपभोग घेत राहिला सम्राटाचा रथ अर्थात नरसिंहवर्माने त्यात स्वत ला जागा करून घेतली आहे

भीम आडदाड, रागडा, साल वृक्षाच्या रानातल्या हिडिबेशी लग्न करणारा. त्याला कशाला हवा प्रासाद, हवेली, झोपडी ? बस्स हा त्याचा रथ त्याच्याचसारखा साधासुधा आहे कोरीव काम नाही, गोपूर नाही, कळस नाही एखाद्या

बौद्ध स्तुपासारखा अनलकृत

झोपडीचा आकार एरवी भीमाच्या रथाला असायला हवा होता, पण तो आहे द्रौपदीच्या रथाला ही एरवी इद्रप्रस्थाची साम्राज्ञी पाच पतिव्रतापैकी एक पण स्त्री म्हणजे नगण्य अर्थात तिला झोपडी, पण बाजूला द्वारपाल आहेत, पण तेसुद्धा तिच्यावर नजर ठेवायला असावेत पाच धोवाची बायल निर्वाळा कुणी द्यावा !

उद्धवा, अजब तुझे सरकार !

तृतीय पाडव अर्जुनावर सर्व पाडवाची भीस्त हा कर्ता–सवरता याचा रथ दुमजली आहे द्रविड पद्धतीच्या या रथात मूर्ती–बिर्ती काही नाही

नकुल–सहदेव उपेक्षणीय दोघाना दोन मदिरे बाधण्यास या शिल्पकाराना खिशातली चवली काढावी लागली नसती त्यातून त्याची आई माद्री इथलीच या मद्रदेशाची माहेरवाशीण या आईवेगळ्या मुलाचे निदान या आजोळी तरी कौतुक व्हावे !

पण हे दोघे दुर्दैवीच या नकुल–सहदेव रथाची आपणसुद्धा उपेक्षा करतो आपले लक्ष्य वेधलेले असते मागच्या ९६ फूट रुद व ४९ फूट उच अशा हत्तीच्या प्रचड शिल्पावर, पुढल्या सिंहावर आणि मागल्या भित्तिचित्रावर

या हत्तीच्या शेजारी एक प्रचड शिलाखड अधातरी लोंबल्यासारखा वाटतो हा वाटोळा असल्याने त्याला कृष्णाचा लोण्याचा गोळा म्हणतात महाबलीपुरम्‌चा हा लोण्याचा गोळा हा या हत्तीच्या शिल्पाचा एक भाग आहे ब्रिटिश काळात हा हलवायचा प्रयत्न झाला, पण हा ढिम्म हलला नाही

इथे ऋषी तप करतात त्यांचा असर साऱ्या आसमतावर पडला आहे मांजर-सुद्धा ध्यानस्थ आहे. अगदी त्याच्यासमोर उदीर खेळले तरी आणि सिंहाच्या समोर हरीण बागडते आहे एरवी त्यांचे विळ्या–भोपळ्याचे सख्य

शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून हे विष्णूचे मदिर दाखविले जाते

पण महाबलीपुरम्‌चे मुख्य शिल्प म्हणजे अर्जुनाची तपस्या हे जगातले पहिले शिल्प, भित्तिचित्र कुठल्याच देशात शिल्पकला अशी उच्च पातळीवर पोहोचली नव्हती ९० फूट लाब व ३० फूट उच अशा या खडकावर १६० आकृत्याची खिचडी आहे. अर्थात मुख्य पात्रे, अर्जुन व पाशुपतेश्वर अर्जुनाला महादेवाकडून पाशुपतशस्त्र हवे असते आणि त्याकरिता तो एका पायावर तप करण्यास तयार असतो आणि ते तो करतोही

पल्लव राजाची राजधानी जरी कांचीला असली तरी त्याचा व्यापारउदीम इथून समुद्रमार्गे चाले या राजानी समुद्राला सूत घातले होते बर्मा–लका ही राज्येसुद्धा आपल्या ताब्यात आणली होती बोला कानेश्वर हे एक्कलनाथाचे

मदिर येत-जात असलेल्या जहाजाना दीपगृह बनून वाट दाखवीत असे अर्थात त्याच्याकडून ते होईना तेव्हा शेजारी नवे दीपगृह बाधले आहे अजूनही ते प्रकाश दाखवीत असावे खदखद हसणाऱ्या सूर्यफुलाकडे पाहून हिरमुसल्या होणाऱ्या ओक्याबोक्या गुलमोहरला त्याचे पडझड झालेले चिरे समजावत होते,

‘मोर सुदर नाचतो म्हणून आपण का सुन्न व्हायचे ?

कोकीळ सुदर गातो म्हणून आपण का खिन्न व्हायचे ?’

शिल्प, शिल्प आणि शिल्प गोड असले म्हणून कुणी दिवसभर गोड खाऊन राहू शकत नाही आता थोडा बदल हवा आम्ही वेदातथगल या पक्षी अभयारण्याकडे वळलो

एक छोटेसे तळे त्यात एक चिमुकले बेट आणि त्यावर एक छोटासा मनोरा आणि त्यात आम्ही

‘किलबिल किलबिल पक्षी बोलती पानोपानी फुले बहरती ’

फुलपाखरे वर भिरभिर नव्हे, पानोपानी फुले नव्हे, फुलपाखरेसुद्धा नव्हेत तर पक्षीच भिरभिरत होते तळ्यातली झाडेझुडपे भरून गेली होती पक्षी येतात आणि जातात आम्ही मात्र वेडे काडीतून माडी बाधायला बघतो जीवनातली गोडी घालवून बसतो

मध्ये मध्ये ते सूर मारीत, तळ्यातले बेडूक, मासे, पाणकिडे पकडून आणीत. त्याना पायात धरून त्यांच्या चिध्या करीत व पोटात रिचवीत पोटापाण्याची अशी सोय करीत

मधल्या मनोऱ्यावरून दुर्बिणीच्या साहाय्याने हे सगळे बघता येत होते. माणसाच्या जगातल्या गोष्टी एक जोडपे अगदी चिकटून बसले होते ‘तिन्हीसाजा सखे मिळाल्या ’ तर दुसऱ्या युगुलातला एक ‘या वेळी पाहिजेस तू जवळी ’ विव्हळत होता तिसरा गुलछबू एका मादीभोवती रुजी घालीत होता ‘तुझी-माझी प्रीत घडल घडल घडल ’ त्यालाच नव्हे तर आम्हालाही खात्री होती

हिवाळ्यातली कडक थडी असह्य होण्यापूर्वीच हे पक्षी या तांबडी माती, हिरव्या वनराईच्या उबदार देशात आले होते, पण इथे उन्हाळ्याची झलक लागली की परत आपल्या मायदेशात पसार होणार होते याचा मायदेश मूळ प्रदेश कोणता, हे जाणून घेण्यासाठी या पक्ष्याना ॲल्युमिनियमचे वाळे घातले गेले आणि ते पक्षी परत भेटले सायबेरियाला

आपल्या प्रवासाची दिशा ते कशी ओळखतात ? असे कुठले बळ त्याच्या चिमुकल्या पखात येते ? बदलत्या ऋतुचक्राची चाहूल त्याना कशी लागते ? मार्ग कापताना ते कसे गोधळत नाहीत ? असे वाटते निसर्गातली कोणती तरी अदृश्य शक्ती त्याना मार्ग दाखवीत असावी, राह दाखवीत असावी, त्याना शक्ती देत

असावी नाहीतर वर्षानुवर्षे आभाळ कोसळते, विसावते आणि हेही येत–जात असतात

आसामात जतिंगा पक्ष्याच्या झुंडी ठराविक दिवसांत येतात त्याच पर्वतावर जाऊन आत्मबलिदान करतात

सामन मासे खाऱ्या पाण्यातून, समुद्रातून प्रवाहाविरुद्ध पोहून गोड्या पाण्यात येतात आपल्या जन्मभूमीत सृजन करतात आणि कृतार्थतेने आपले जीवन संपवतात

जावा बेटावर पेंगवेच नावाचा एक ज्वालामुखी पर्वत आहे त्याच्याशेजारी झाडे आहेत जेव्हा जेव्हा हा ज्वालामुखी संतापाने उफाळायचा असतो, त्यापूर्वी ही झाडे लालेलाल होऊन वरच्या पक्ष्यांना शिरकावणी देतात सारे आक्रित होऊन गेले म्हणजे पक्षी परत आपल्या घरात येतात

केलामवक्कम् येथे चहा घेण्याकरिता आम्ही थांबलो आणि प्यायलो कॉफी या दक्षिणेत येऊन चहा पिऊ नये, कॉफी प्यावी हे शहाणपण आता आम्हाला आले होते, पण आमच्या कॉफीची रुची कडू झाली ती गळ्यातच उरली एका १४–१५ वर्षाच्या मुलाचे मढे बसवून, फुलांनी सजवून अगदी आमच्या शेजारून नेले हा मुसलमानाचा जनाना नव्हता इथे खालच्या जातीत प्रेत ताटीवर निजवून नेत नाहीत, असे कळले

दुसऱ्या दिवशी आम्ही पाँडिचेरीकडे रवाना झालो

पाँडेचेरी ही आमच्या गोमंतकासारखीच एक भूतपूर्व वसाहत पूर्वपश्चिम संगम ती पाहावी असे खूप मनात होते.

ही फ्रेंचांची . भारतात प्रथम पोर्च्युगिजांचे पांढरे पाय लागले त्यांचे हात धरून ही मग बाकीची भुतावळ आली डच आले, फ्रेंच आले, ब्रिटिश आले ब्रिटिशांना ही दोन्ही ठाणी सहज काबीज करता आली असती, पण एक मित्र व दुसरा वैरी एक सोयरा आणि दुसरा धायरा आणि पोर्च्युगीज व फ्रेंच दोघेजणही टिकून राहिले

एरवी फ्रेंच जायचे होते १७५० मध्ये, पण हेही पोर्च्युगिजांसारखेच गोचीड असे चिकटले आणि भारताच्या स्वातंत्र्याबरोबर ब्रिटिशांसह त्यांनीही गाशा गुंडाळला

एरवी हे राज्यकर्ते वसाहतवादी तो एकच त्यांचा गुण वाईट होता लोक सुसंस्कृत व्यापाराकरिता आले तरी व्यापारी काळेबेरेपणा नसलेले जीवनातला आनंद भोगणारे, कलेचे भोक्ते, स्वच्छतेचे चाहते, दुसऱ्याचे आवर्जून कौतुक करणारे. Linda, Bonita हे शब्द त्यांच्याच तोंडून ऐकावेत Madam, Mademoiselle या शब्दांचे लालित्य जाणून घ्यावे

ही फ्रेंचांची नगरी पूर्वाश्रमीचे पॅरिस पॅरिस म्हणजे नित्यनवीन

उन्माद कलात्मकता, रगेलपणा, काहीसा बेछूटपणा याचा असर शहरावर अजून असेल तो पूर्वपश्चिम सगम असेल Liberte . Tranquilite Equalite फ्रेंचानी दिलेला हा मत्र अजून टिकून आहे का ? हे पाहायचे होते

समुद्रकिनाऱ्यावरची पॉडी ८०० चौरस किलोमीटर पसरलेले शहर जुन्या पणजीसारखे रस्त्याची नावे Duma रस्ता, Rudal Marina रस्ता तसेच Allienea Francais सारख्या सस्था, Anglode Notre सारखे चर्च आणि तशीच माणसे Veil घालून चर्चला जाणारी, बूट स्टॉकिंग घालून मिरवणारी ! विशेष थडी नव्हती तरीही स्वेटर घालून बाहेर सरकलेली नाजूक गळ्यातल्या गळ्यात बोलणारी जुन्या पणजीतल्यासारखीच

किनाऱ्यावरचे फिक्कट बगले चकाकतात हवेल्या चमचमतात लखलखणारी झुबरे श्रीमती प्रदर्शित करतात पडदे सळसळतात मसाल्याचा ओला स्वाद दरवळलेला असतो पायातल्या नाजूक सपाता आत–बाहेर करतात

क्लबना या वेळी जाग आलेली असते लाटाच्या नर्तनाबरोबर तिथे जाझ सगीत, मद्याच्या बाटल्या फसफसतात पायघोळ झगे, वासना चेतवतात कशाला उद्याची बात ! म्हणत पैशाचा धूर होतो

भारतात ऐश्वर्य आहे का ? पॉडी पाहावी दारिद्र्य आहे का ? चॅरी निरखावी

हिंडता हिंडता चॅरी दिसू लागते

रस्त्यातून वाहणाऱ्या गटारगगा ओळीने एकास एक लागलेली घरे मागल्याचे घाण पाणी पुढल्याच्या दारात अर्थात घोंघावणाऱ्या माशा, डास, सडलेल्या घाणी, तशीच उघड्या शरीराची माणसे, त्याची खरूजेने नासलेली मुले माणसे मरतात त्यापेक्षाही जन्माला जास्त येतात पोटात वणवा पेटलेला, मग कचरापेटीतले कचरा हेच अन्न

लुगीस चार वार कापड लागते नेसायची साडी पाच वार साडेतीन हात देहाला किती कपडा लागतो मग लगोटी हे वस्त्र ते बऱ्यापैकी अग झाकते ससारच फाटका कुठून आणायचे मग पैसे ? मग एका तेलाच्या थेंबासाठी रात्र गहाण ठेवावी लागते आणि एक कपभर चहासाठी रक्त आटवावे लागते अशी ही पॉडी आणि अशी ही चॅरी श्रावणाने फाल्गुनाशी लग्न लावूच नये कधी

हिंडता हिंडता आम्हाला एक असामी भेटला फ्रेंच गेल्यास कितीतरी वर्षे झाली तरी हा अजून त्यांच्याच देशात होता Rip Van Winkle सारखा अजून झोपेतच असावा केस तांबूस, डोळे कुशीच्या समुद्रासारखे अथाग आणि गाजरासारखा तांबूस रग फ्रेंच लोकांची आठवण देत होता

हा असामी आपल्याच तारेत होता अर्थात आम्हीही भूतकाळातल्या

Aqui & Portugal 'मध्ये दिवस काढलेले लोक कुणीतरी त्याला Bonjour, Nonsieur केले आणि हा ताडकन उठला आणि दुसऱ्याने Comment Vous, Portez Vous केले मात्र हा पाघळला, पाझरला जणू सोयरे भेटल्यासारखे भडभडा बोलू लागला

त्याचे म्हणणे फ्रेंच लोक चागले होते फ्रेंच राज्य चागले होते या नेटिव्हना बदुकीने मारायला हवे हे वैफल्य होते, हा आकस होता

आमच्या गोमतकातसुद्धा थोडे हे असेच बोलतात, पण स्वातंत्र्यानतर गोव्याची जी प्रगती झाली, ती पोर्च्युगिजाच्या लिलीपुटच्या राज्यात शक्य तरी होती का ? ' इतलो कोको, इतले मेमे ' म्हणतच आम्ही दिवस काढीत होतो

हा बिचारा पॉडिचेरीचा सियार असामी पूर्वपुण्य स्मरून, रम्य वर्तमानकाळ विसरून सागराकडे तोंड करून उभा असलेल्या डुप्लेच्या पुतळ्यासारखा वर्तमान-काळाकडे पाठ करीत उभा होता

दिवसभर हिंडून आम्ही तिन्हीसाजेला अरविंदांच्या समाधीकडे वळलो आपण जरी हे तमिळनाडूतले पॅरिस म्हणून ओळखत असलो, तरी परदेशी लोक ही अरविंदाची पॉंडिचेरी म्हणून ओळखतात आपली एकादशी तर त्याची दुप्पट खाशी

थोडे लोक वेडयाच्या बाजारातून आलेले असतात काय ? एक सुटाबुटातला असामी विचारीत होता, ' अरविंद कुठे आहेत ? आणि माताजी ?'

अरविंद म्हणजे कमळ, पकज याचा जन्म चिखलातच झाला होता प्रख्यात बॅरिस्टर कृष्णधन हे त्याचे वडील होते बॅरिस्टरना परदेशाविषयी खूप आकर्षण होते नेटिव्ह या शब्दाचाच त्याना तिटकारा होता

घरात वडेजाव होता पाश्चात्त्य सस्कृती नादत होती मोझार्ट सगीत वाहत होते पाश्चात्त्य पुस्तकांचे वाचन होते कुकबटलरचे राज्य होते काटचा–चमच्यानी सूप सॅलेड सर्व्ह होत होते

अरविंद हा तेज मुलगा होता बुद्धीच्या धारेवर हा सगळ्या गोष्टी घासून पाहत असे भावनावश होणे, हळवे बनणे, मृदु वागणे या गोष्टी त्याने कधीच केल्या नाहीत त्याला त्या जमल्या नाहीत

दार्जिलिंग इथल्या सेट लॉरेन्समध्ये शिक्षण घेऊन हा पुढच्या शिक्षणासाठी केंब्रिजला गेला, तिथे आय सी एस पास झाला आणि पास हा टिळा लागण्या-आधीच अरविंदाच्या विचारात बदल झाला एकूण इतके शिकून ही बुद्धी, हे शिक्षण ब्रिटिश सरकारच्या चुलीतच घालायचे ना ? त्याचेच गुलाम व्हायचे ना ? त्याने अश्वारोहण परीक्षेत बसायचे नाकारले त्याला परत सधी दिली, पण नाही अरविंदाच्या मनाने एक आणि एकच घेतले

सयाजीराव तेव्हा इग्लंडला आले होते ते रत्नपारखी ते अरविंदाना घेऊन

बडोद्याला आले वयाच्या २१ व्या वर्षी अरविंद, गायकवाड दरबाराच्या नोकरीच्या 'जू 'ला बांधले गेले अग्नी जणू ओंजळीत पकडला गेला, वारा बंदिस्त झाला, तेज झाकोळून ठेवले गेले

अरविंद जळाविना मासोळीसारखे तळमळत, सैरभैर होत वयाच्या तेराव्या वर्षी त्यांना गूढ अनुभव आला होता, साक्षात्कार झाला होता पण घनदाट अरण्य पुढे होते वाट सापडत नव्हती प्रकाशाची तिरीप दिसत नव्हती

आणि १९०५ साली बंगभंगाची चळवळ सुरू झाली सारा बंगाल या चळवळीमागे होता लॉर्ड कर्झनला तर काळा चष्मा लावल्यासारखे सारे काळेच वाटत होते सारे वाईट भासत होते सारेच क्रांतिकारक वाटत होते आणि त्यांना ठेचण्यासाठी तो कुठली ना कुठली कारणे शोधत होता, युक्त्या काढत होता वडाची साल पिंपळाला लावत होता माणिकतोळा बॉम्ब प्रकरणात एरवी अरविंदबाबूंच्या भावाचा – वारिंद्रनाथाचा – हात होता, ' पण तू नाही तर तुझा भाऊ,' ह्या लांडगा कोकरू ' न्यायाने पकडले अरविंदांना

आणि अलिपूरच्या उत्तरपारा तुरुंगात त्यांना मोकळा वेळ मिळाला त्यांनी दिवसभर सतावणाऱ्या, कूरकूर करणाऱ्या मनाला उगी केले, ते अध्यात्माचा अभ्यास करू लागले योगसाधना सुरू झाली आणि ते त्यातच गुंग झाले

आणि एक दिवस त्यांना श्रीकृष्णदर्शन झाले जळी–स्थळी–काष्ठी–पाषाणी त्यांना श्रीकृष्णाचे रूप दिसू लागले, छळू लागले ते श्रीकृष्णमय झाले त्याच्या मुरलीचे सूर त्यांना झोपेत, जागेपणी कानात झिरपू लागले त्यांची भूक–तहान हरपू लागली श्रीकृष्णच आपल्याला जोजवतो, कुरवाळतो,मांडीवर घेऊन निजवतो, आपल्याला दहीकाल्याचे घास भरवतो, वृंदावनात घेऊन जातो, आपल्याबरोबर रास खेळतो आपणच ती राधा–गवळण आपणच ती कुब्जा तो लंगडा पेंद्या आपणच ते यमुनाजळ तो कदंब वृक्ष आपणच त्याच्या अधरावरील मुरली व मुकुटावरील मोरपीस तो व आपण वेगळे नाहीतच एक जीव, दोन शरीरे, एक प्राण, दोन बहीश्चरे

आणि मग एक दिवस त्यांनी श्रीकृष्णाला जाब विचारला, ' देवा ! भगवंता ! आपली काहीच चूक नसताना, अपराध नसताना आपण या तुरुंगात का कोंडले गेलो आहोत ? आपल्यावर हा वृथा आळ का ? आपल्याला ही शिक्षा का म्हणून?'

आणि तुरुंगात असताना एक दिवस त्यांना श्रीकृष्णाचा संदेश आला देवांनी त्यांच्या डोळ्यावरील पटल दूर केले श्रीकृष्ण बोलत होता सुख व दुःख, रात्र व दिवस, शोक व आनंद ही एकाच जीवनाची दोन अंगे ती तुला समजावून द्यायला हवी होती तुझ्या डोळ्यावरील भ्रम दूर व्हायला हवा होता त्या पलीकडे तुझी नजर पोहोचायला हवी होती पृथ्वीवरील निर्मितीची मानवजात हा शेवटचा

टप्पा नव्हे उत्क्रांती चालूच राहील व ती मानवजातीला मागे टाकील या जीवन-श्रेणी आगमन कार्यात आपल्याला सहभागी व्हायचे असेल तर त्याच दिशेने, त्याच वेगाने मार्ग कापायला पाहिजे हे ज्याचे त्याने जाणून घ्यायला हवे 'कर्मण्येवाधिकारस्ते' गीतेचे हे सार तुला समजायला पाहिजे होते, ते तू पचवायला हवे होते म्हणून हा प्रपंच करावा लागला आता फार दिवस तुरुंगात राहणे नाही

आणि तुरुंगातून सुटून येऊन अरविंद कमळाच्या पानावरील थेंबाप्रमाणे अलग झाले, राजकारणातून ते निवृत्त झाले आणि १९१० मध्ये कुणालाही न कळवता ते चंद्रनगर इथल्या फ्रेंच वसाहतीत आले त्यांनी तिथे आश्रम काढला नंतर माताजीही वेगळ्या जगाचा शोध घेत घेत इथेच महाकाली, महासरस्वती, महादुर्गा. अरविंदांनी विवरण केलेली ही शेवटपर्यंत इथेच होती जणू माया व ब्रह्म, शक्ती व शिव, राधा व गोविंद, रमा व रमण यांचे हे मिलन होते

५ डिसेंबर, १९५० रोजी अरविंदांनी समाधी घेतली नऊ डिसेंबरला त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले झाडाला टेकून बसलेल्या अरविंदाच्या चेहऱ्यावर स्मित, शांती होती कांती तशीच टवटवीत होती हे वलय ११० तास अरविंदाच्या चेहऱ्यावर होते जणू हा उत्तरयोगी अथांगाशी विलीन झालाच नव्हता अरविंदाचा एक साधक त्या वेड्या पिराला म्हणाला आणि पुढे म्हणू लागला

पण पुढे आम्ही ऐकलेच नाही मला चीड आली होती, अरविंदाच्या या धरसोड वृत्तीची ! जळजळीत लेख लिहिणारे ते हेच अरविंद ? असेच आयुष्याच्या एक ना घड भाराभर चिंध्या होतात त्या मानानेच माताजी ठाम होत्या आपल्या पतींना घटस्फोट देऊन येतानासुद्धा त्या शांत होत्या

अभ्यागतगृहाच्या दारात अरविंदाचे भव्य छायाचित्र आहे ध्यानधारणा मंदिरात माताजी व अरविंद यांची भव्य चित्रे आहेत दालनादालनांतील ही चित्रे वातावरण गंभीर, आध्यात्मिक बनवतात आराधना मंदिर आश्रमाच्या पहिल्या मजल्यावरील बैठकीची खोली ते मृगाजिन बाहेरील मेंदीचे कुंपण दारातले कॅक्टस् फाटकातून आत शिरतानाच इशारा देतात, दबक्या आवाजात सांगतात, 'शांतता राखा ! '

दारात पांढरा चाफा ध्यानस्थ झाला होता गुलमोहरानेही त्याचा वसा घेतला असावा जाईजुईची झुडपे अवाक् झाली होती, न बोलणारी अबोली आणखी अबोल झाली होती

आम्ही आवारातल्या त्या झाडाकडे समाधीपाशी गेलो समाधीच्या चबुतऱ्यावर विदेशी लोक डोके टेकून बसले होते जवळच माताजींचीही समाधी होती सातासमुद्रापलीकडून आलेले हे लोक! काय उणे होते यांना ! कसली तहान ही !

सगळीकडेच फुलेच फुले पिवळीधमक शेवती, शुभ्र शेवती, निळी जाभळी शेवती, पिवळी, लालभडक, शेंदुरी जास्वद, पाढरा, ताबूस, गुलाबी छटेचा सोनचाफा, पिवळा चाफा। गवतासारख्या पानात मृद्‌गधाकरिता अडून बसणारा भुईचाफा, कठीण दिसणारा कवठी चाफा, रगीबेरगी डेलिया, पाढरा निशिगध, मोत्यासारखा मोतिया। निळी कृष्णकमळे व पिवळी सूर्यकमळण याची समाधीवर आरास होती

धवल मनाच्या महादेवाला जाईजुई, चपक, मालती, चमेली ही सुवासिक पांढरी फुले आवडतात त्याच्याचसारखी 'कुदेंदु तुषार हार धवला' घालून सरस्वती मिरवायला पाहते श्रीविष्णूला निळी गोकर्ण, काळी सावळी तुळस-मजिरीशिवाय चैन पडत नाही गणपती गजानन लाल जास्वद, मदार फुलाना जवळ करतो, तर मारुती बापडा रुईच्या फुलांवर सतुष्ट होतो काली लाल फुलानी नटते लक्ष्मी कमळावर फिदा असते ती कमळावर निजते, कमळच पाघरते

हिंदू धर्मात फुलांना खूप महत्त्व 'आमची माळियाची जात ' फूल हे सेवा, त्याग याचे प्रतीक बारशाची अगाई ते बाराव्याचे रामनाम या फुलांशिवाय होत नाही पुजेला फुले, नटायला फुले, सुशोभनाला फुले, सोळा सस्काराना फुले फुलाचा आणखी एक उपयोग–मानसिक अपग असलेल्याच्या मदतीसाठी देशोदेशीची फुले विकून पैसे दिले जातात

पण या परकीय बाईने या फुलाचे मर्म शोधले त्याचा धर्म शोधला त्या त्या फुलाचे वास, रग, ढग, जात, कुळ, ठेवण, आकार लक्षात ठेवून त्यांचे नवे बारसे केले कमळ, गुलाब, डेलिया, चाफा, शेवंती, निशिगध, जाई, जुई, मोगरी याना ध्यान धारणा, साधना, समर्पण, श्रद्धा, आराधना, प्रेम, त्याग, सेवा या नव्या नावाने पुकारण्यात येऊ लागले

समाधीवरील भगव्या डेलियाच्या फुलांची आरास जरी आम्हाला सुदर भासली तरी कुशीच्या निर्माल्याची कुजट घाण मारत होती आणि अशीच कुजट घाण आश्रमाच्या कारभारावरही असावी अरविंदानी तर केव्हाच देह सोडला होता माताजीही गेल्या होत्या ना आई, ना बाप अशी सस्था पोरकी होती आणि शिते एकत्र करण्याकरिता भुते जमा झाली होती ध्यानधारणा मदिरावरचे अतिमानवाचे अवतरण चिन्हही ओशाळे वाटत होते

समाधीएवढाच आश्रमाचा परिसर नाही कुठेही निळचा, करड्या रगाचे घर दिसले की बेलाशक समजावे ही आश्रमाची वास्तू अरविंदाना कुणी तरी विचारले म्हणे आश्रमाचा साधक जिथे जिथे राहतो ते घर म्हणजे आश्रम अरविंदानी उत्तर दिले

त्यामुळे सगळीकडे आश्रम भरून राहिला आहे इथे गोशाळा तर तिथे

दुग्धशाळा, इथे फर्निचर कारखाना तर कुठे कागद तयार करणे आणि संस्थेची स्वत ची शेतीभाती आहे तिथे भाजीपाला पिकवला जातो अन्न उत्पादनात संस्था परिपूर्ण आहे. ताज्या फळांची प्रक्रिया करण्याचा उद्योग आहे कपडे धुण्याची लाँड्री आहे पाहुण्याना राहण्यासाठी घरे आहेत, बगले आहेत भोजनगृह तर इतके मोठे आहे, २५०० माणसे बसली तरी जागा उरते स्वयपाकघरात अन्न अग्नीवर नाही, वाफेवर शिजवले जाते पगतीला सगळ्याना एक भात, दही, डाळ, भाकरी एकाच वेळी सगळे पानात घ्यायचे परत आग्रह नाही

आम्ही मुद्दाम स्वयपाकघर पाहावयास गेलो स्वयपाकघर स्वच्छ होते. स्टीलची भाडी चकाकत होती डाळ शिजली होती दही विरजून होते भाताच्या राशी गरम वाफेवरल्या होत्या मोठमोठ्या स्टीलच्या पत्र्यावर पोळ्यांचा माड मांडला होता कुशीला पोळ्याची रास पडली होती सारे काही ठीक होते

माझे मन मात्र मला परत परत विचारीत होते, माताजीच्या देशातून आलेल्याना, खमगटमग खाणाऱ्याना .. जिभेचे चोचले असणाऱ्याना हे चालते ? सपक अन्न !

एरवी सस्थेला खानदानत्व होते, थोर परपरा होती १२१ देशातील व भारतातील २३ राज्यांतले प्रतिनिधी इथे एकत्र जमले होते इथे 'आँखे हाल,' 'ऑरोविल,' 'सिटी ऑफ डॉन' ही सस्था जन्माला घातली होती एका कमळाच्या आकाराच्या घरात त्या त्या देशातील माती घेऊन ११० कोटीच्या वास्तूचे पूजन झाले होते अर्थात ही सस्था 'वसुधैव कुटुबम्' अशी होती इथे ऑरोविलमध्ये यायचे झाले तर व्हिसा नाकारला जात नाही आणि चरस, गांजा घेऊन येणाऱ्या हिप्पीना तो नाकारायचा कसा ? यातूनच घाण जतू या सस्थेत शिरले तेढ निर्माण झाली, भाडणे होऊ लागली

फ्रान्सला या आश्रमाचे खूप कौतुक त्यानी या आश्रमाला दोन मोटारी पाठवल्या अर्थात इथले फ्रेंच दादागिरी करू लागले अशी सस्था अडचणीत आली होती आणि पतप्रधानानी यात लक्ष घालावे, अशा तक्रारीच्या तारा, पत्रे, निरोप पतप्रधानाकडे गेले होते

नदीचे मूळ पाहावे तिथेच आपल्याला गगोत्री दिसते नदीप्रमाणेच सस्थाही पुढे प्रदूषित झालेली असते

चणीने ठेगू, काळे, केस कुरळे आणि नाक थापाडे असे निग्रोंसारखे एक जोडपे दारात उभे होते त्या स्त्रीच्या गळ्यात थाळी होती हाताच्या पाचही बोटात अगठ्या होत्या दोघानीही कमरेला फडके बाधलेले होते व वरून एक फडके पाघरलेले होते ती गवताने भरलेले कोल्हे घेऊन आली होती कुणीतरी ते घेतले आणि घरी येईतो त्याचा पार भुगा झाला होता

बावनकशी सोने सोडून आम्ही पितळेच्या शोधार्थ निघालो

सावळे सुंदर शिल्प सोडून आपण कुठे अडकलो . कुठल्या आडवाटेला लागलो असे आम्हाला होऊन गेले आणि आम्ही चिदंबरनगरकडे वळलो वाटेवरची कुडलूर, वडलूर ही गावे आमच्या उधगाव, मूळगावासारखी खेडी, पण शहराचा वसा घेऊ पाहणारी

चिदंबरम् म्हटले की आपल्या डोळ्यापुढे तांडवनृत्य करून शांत, श्रांत झालेले महादेवाचे, नटराजाचे रूप येते, पण पुजारी आत नेऊन गाभाऱ्यातला पडदा वर काढतात आणि मागली भिंत दाखवतात, ते आकाशलिंग आहे हे पटवतात आकाश म्हणजे निराकार, निर्विकार असा दावा करतात भाविक ती सपाट भिंत लिंग मानतात, भ्रम, माया मानतात आणि शांत मनाने, समाधानाने बाहेर येतात

आमच्यासारखे पर्यटक मात्र ती सौम्य, सुंदर मानवी मुद्रेची नटराजाची प्रख्यात मूर्ती शोधत असतात ती मिळतेही नृत्यसभेत, कनकसभेत या जागीच नटेश्वरांनी ते पुरातन नृत्य केले

प्रत्येकाचा देव वेगळा असतो कल्पना वेगळी असते आशय वेगळा असतो पार्वतीसारखेच चौल राजाला महादेवाचे ते चिताभस्म, त्या कवटयांच्या माळा, सापाचे अलंकार, ते व्याघ्राबर हे ओंगळ रूप आवडत नसावे ' रूप पाहता लोचनी, सुख झाले हो साजणी ' देव हा असा असावा त्याने आपला देव सौम्य, सुंदर रूपात चिंतला, चित्रीला

मागच्या हातात अग्नी, उजव्या हातात डमरू, पुढचा हात अभयमुद्रा. . केशसंभार बांधलेला तरी अवखळ सुटलेल्या बटा, लय, स्थिती, मुक्ती, अभय हे चेहऱ्यावरचे भाव डावा पाय उचललेला, उजवा गुडघ्यात वाकलेला गुडघ्यातला तो जबरदस्त आत्मविश्वास डावीकडून उजवीकडे होणारे त्याचे पदन्यास ते अंगविक्षेप, शरीराची होणारी ती लयबद्ध हालचाल एक पाय वर उलटा गेलेला, पायाची बोटे गालाला लागलेली कधी केसांशी खेळत आहेत हे ' नटण ' आजच्या कसलेल्या नर्तकाला जमेल असे वाटत नाही.

नृत्य करता करता महादेवाच्या कानातले कुंडल खाली पडले, पण शिवांनी नृत्य थांबवले नाही नृत्य करता करता पायांनीच कुंडल काढून त्यांनी ते कानात घातले

पार्वती ही कसलेली नृत्यांगना भिल्लिणीच्या वेषात तर तिने महादेवांना मोहित केले, पण तिला कुठे माहीत आहे हा पतिराजाचा गुण ! तिने पाहिले फक्त त्याचे जोगडे रूप त्रैलोक्यजननी, शर्वाणी, मृडानी अशा उमा भुवनेश्वरीला प्रदोषकाली सांध्य मुहूर्तावर, ब्रह्मांडाच्या वेदीवर रत्नजडित सिंहासनावर बसवून या मुद्रा,

हे पदन्यास करून दाखविले

देवालयाच्या पार्श्वभूमीवर हे सर्व भरतनाट्यातील १०८ पदन्यास दृष्टीस पडतात अशाच मुद्रा गोपुरावर आहेत मूर्तीभोवती ५६ स्तंभ आहेत त्यावरही हे असेच आहे

मंदिरात गेल्यावर पुढेच पालखीत शेषशायी विष्णूची मूर्ती या पालखीला गोविंदराजाची पालखी म्हणतात या गोविंदराजाच्या तुळशीच्या पानाच्या पुड्या आम्हाला प्रसाद म्हणून मिळाल्या

इथला सोन्याने मढवलेला एक दक्षिणावर्त शंख कुणीतरी दाखविला एकमुखी रुद्राक्ष, हत्तीच्या गंडस्थळावरील मोती, सर्पाच्या फणीवरील मणी आणि हा शंख हे अप्रूप समजले जाते तसाच एक भला मोठा गणपती इतका प्रचंड उजव्या सोंडेचा गणपती भारतात दुसरा नाही

शिवगंगा तलावावरचे चार एकर जमिनीवरचे हे 'तिलाई' नावाचे देवालय खूप जीर्ण आहे. पण मूर्तीच्या वरचे छत सोन्याने चकाकते आणि मूर्ती ही हिऱ्या-मोत्यांनी भरली आहे 'मार्गली' माघ महिमा त्यात आर्द्रा नक्षत्र होते देवाला 'कालि' पीठाच्या पदार्थाचा नैवेद्य दाखविला जात होता मंदिरात तेलाचे दिवे, अर्थात काहीच दिसत नाही, म्हणून आमच्यापैकी कुणीतरी विजेरीचा प्रकाश टाकला तर भटजी तांडवनृत्य करीत आमच्यावर चालून आले शेंडीला झटके देत राहिले

चिदंबरनगरला जाताना वाटेत चुना फासलेल्या घोड्याच्या मूर्ती दिसल्या नंतर कळले की हे ग्रामरक्षक होते पिसाळलेला कुत्रा चावला आणि याला नवस केला तर कुत्र्याची बाधा होत नाही आणि एका झाडावर भाला, विळा, गदा साखळीने बांधलेली हे ग्रामदेवतेला आमिष होते तिने नरहत्याचे होते करून दाखविले होते

मंदिरे ही राजाची, सम्राटांची, वैभवाची, सुबत्तेची खूण होती

आपल्यानंतर काय ? असा प्रश्न कित्येक राजांना पडला असावा आणि थोडी मंदिरे घिसाडघाईने बांधली गेली थोड्या राजांना मंदिरे बांधणे हा विसावा होता आणि थोड्यांनी कलेला उत्तेजन देण्याकरिता या अशा वस्तू बांधल्या, पण कौतुका-स्पद म्हणजे इजिप्तमध्ये मंदिरे गुलामांकडून बांधून घेतली होती तशी वेठबिगारी इथे झाली नाही हा स्वखुषीचा मामला होता मोबदला देऊन ही कामे झालेली होती

ही दक्षिणेची मंदिरे म्हणजे छुपे किल्लेच केवढी मोठी अजस्र देवालये ही ! सगळा गाव एकत्र होण्याकरिता ही बांधली असावीत कुंभकोणम् इथल्या कुंभेश्वर मंदिराची ओवरीच ९०० फूट लांबीची आहे तीच गावची बाजारपेठ झाली आहे

दुतर्फा दुकाने असल्याने ही चिचोळी भासते या मंदिरावरूनच भोवतालाच्या गावाला कुंभकोणम् हे नाव पडले

गाव आधी की पाणवठा आधी हा संशोधनाचा विषय आहे आणि मंदिर आधी की आख्यायिका हीही विचार करण्यासारखी गोष्ट आहे

गोकर्ण क्षेत्री महादेवानी आत्मलिंग काढून रावणाला दिले, तर इथे आपले लिंग आपणच बनवले मात्र या मंदिराची आठवण राहिली नाही कायम ध्यानात राहिले ते सारंगपाणी मंदिर

भूक, तहान, निद्रा तसेच मैथुन तीही आपल्या जीवनाची गरज त्यात लाज वाटण्याचे काहीच कारण नाही आणि त्याकरिताच ही संभोगशिल्पे निर्माण झाली, पण या नग्न शिल्पावर भडक, उभ्या पट्टयाच्या चड्डया रंगवल्या होत्या आणि नंदीला कमरेवर फडके बांधले होते

कुंभकोणम् दारासुरम् पार करून आम्ही तिरुचिरापल्ली, तीन तोंडे असलेला रावणाचा पुतण्या त्रिशुरासुराने बांधलेले त्रिचीचे देऊळ खालूनच पाहून घेतले पक्षितीर्थ चढून पायात आलेले गोळे अजून उतरले नव्हते तशातच तीन तोंडे असलेला त्रिशुरासुर हे ऐकून वाईट वाटले माणसानेच माणसाच्या या किती ' भगूल्या ' टवाळी करावी

कावेरी नदीवरचे तंजावर शहर म्हणजे भोसल्यांची राजधानी शिवाजी महाराजाचे सावत्र भाऊ व्यंकोजी ऊर्फ एकोजी हा त्यांच्याचसारखा पराक्रमी होता, हा महाराजाबरोबर महाराष्ट्रात जर राहिला असता तर मराठ्यांचा इतिहास वेगळा लिहावा लागला असता कदाचित दुसऱ्या पिढीत संपलेले मराठ्यांचे राज्य दीर्घकाळ टिकले असते गोब्राह्मणप्रतिपालक हे बिरूद या शहाजीराजाच्या ज्येष्ठ पुत्राने मिरवले असते याला युवराज्याभिषेकसुद्धा झाला होता हा घरादाराचा स्वामी भोसल्यांची कुलदैवते शहाजीने याच्याच स्वाधीन केली होती कोण जाणे . कदाचित याने दुही माजवली असती कदाचित हा भरडूनही गेला असता

जर आणि तर याला काहीच अर्थ नसतो आत्याबाईला मिशा असत्या तर ती काका होतीच असेही नाही

पण हा शिवाजीराजाकडे राहिला नाही राजानी व्यक्त केलेली इच्छा या एकलकोंड्या एकोजीने मानली नाही या धोरणी माणसाने आपली वेगळी केलेली चूल मोडली नाही, पण सावत्रपणा आणला नाही गळेपडूपणाही केला नाही व्यक्ती ही बेटासारखी अलग केली आणि दांड्याने पाणी कापले म्हणून ते वेगळे होत नाही, हे त्याने जाणले

शिवाजीराजाप्रमाणेच या राजाने सहिष्णुता अंगात बाणवली आपला—तुपला भेद मानला नाही बृहदीश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला, तसेच बाकीच्या

धर्मांनाही मदत केली 'शागुल हमीद' या दर्ग्याला खूप दान दिले त्याला वर्षासन देऊ केले त्यामुळेच या दर्ग्याच्या उत्सवाच्या वेळी, उरुसावेळी तंजावर राजाचे मराठ्याचे निशाण नाचविण्यात येते तंजावर राजाची शाल दर्ग्याला पांघरूण म्हणून घालण्यात येते

चारशे वर्षांपूर्वी गेलेले मराठे तिथलेच झाले अक्का, अप्पा, अत्तै, मामी म्हणत आपली मराठी विसरले नाहीत कावेरीच्या कुशीत शिरले, पण मनाने कृष्णा-भीमेच्या पाण्यात डुबत राहिले वरणभाताशिवाय दुसऱ्या अन्नाला शिवले नाहीत. राजाराम महाराजाना जसे माहेर मिळाले तशी आपल्यालाही इथे विसाव्याची जागा आहे, असे वाटले. 'निश्चयाचा महामेरू, सकल जनाचा आधारू' अशा श्रीमंत योगी शिवाजीमहाराजाची तसबीर पाहून तर जास्त उचंबळून आले

'असू दूर पेशावरी उत्तरी वा असू दक्षिणी दूर तंजावरी ' पण इथले अन्न हेही महाराष्ट्रीय वरण—भात असे वाटले होते आणि तिथे तसे मिळते असे आम्हाला कुणीतरी सांगितले आणि आम्ही अन्नब्रह्माच्या शोधार्थ निघालो

अन्नाची निंदा करू नये आणि प्रवासात जिभेचे चोचले करायचे नसतात, हेही आम्ही मानतो, पण पुढे उकडच्या तांदळाचा भात, वरण नावाचा डाळीचा काहीतरी प्रकार आणि 'अवियल' हा एक गोड पदार्थ होता

एक गोष्ट ऐकून माहिती होती

एक माणूस एका हॉटेलमध्ये गेला आणि त्याने मिसळ मागितली मिसळीत झुरळ होते, ते त्याने हॉटेलच्या मालकाला दाखविले, पण 'दोन रुपयाच्या मिसळ-मध्ये हत्ती—घोडे कुठून असणार ?' मालक उद्‌गारला

तसे आम्ही खूपजण असल्याने किफायत असे साधेच हॉटेल आम्ही निवडले होते, पण आबोण फक्त गुरेच खातात, माणसे नाही

या दरबार हॉलमध्ये शेजारीच आर्ट गॅलरी आहे मोरावर बसलेला कार्तिकेय, अर्धनारीनटेश्वर नृत्य करणारा गणपती आहे या गॅलरीत इतकी वर्षे नृत्य केले तरी याची तुंदिलतनू काही इंचभर कमी झाली नाही १६०० साली बांधलेला हा हॉल अजून आपले छतावरचे रंगकाम टिकवून आहे

एकेकाळी हा दरबार हॉल वैभवात असावा, पण राजाच्या अठरा राण्या येण्याजाण्याचा दरवाजा आणि दारातला मिशाना पीळ देणारा दरवान आपली 'खिणा' दाखवून गेले

आणि हा आपला सारा संसार सावरीत, सभोवती चार सिंहानी सावरून धरलेल्या सिंहासनावर बसून सरफोजीराजे आपले स्वागत करतात राजे व्यंकोजी-राव यांचे सरफोजी ऊर्फ शरभेंद्र हे दुसरे चिरंजीव, पण शिवपुत्र संभाजींप्रमाणे हा राजा नुसता पराक्रमीच नव्हता, विलासी तर नव्हताच नव्हता राजनीतितज्ज्ञ

होता, विद्वान होता, विद्यासपन्न होता नृत्य, गायन, शिल्प, चित्र या सकल कलाची त्याला आवड होती हा वेधक ज्योतिषशास्त्रज्ञ होता मराठी–तमिळ या मायभाषा, पण इंग्रजी, फ्रेंच या भाषा त्याने मिशनरी म्हणवणाऱ्यांकडून शिकून घेतल्या होत्या ' करूनी पर्यटन, मनुजा चातुर्य येतसे ' यावर त्याचा भर असावा भारतभर यात्रा करून त्याचे वर्णन ' शरभेंद्र तीर्थावली ' या ग्रथात त्याने केले आहे

या भरतनाटचम् हॉलमध्ये कधी तमाशाचे चाळ वाजले नाहीत, डफ–तुणतुणे वाजले नाही, सोंगाड्या नाचला नाही, याने कचनीतगे रात्री जागवल्या नाहीत यक्षगान आपले मानले कुत्राला कुरवजी नाटचाचा जन्म इथेच झाला. भरतनाटचम्चे नवे नवे रग इथे रगत आले

या हॉलचा शास्त्रयुक्त विचार होऊन ध्वनियत्ररचना झाली तशीच त्याने स्थापन केलेल्या नवकलानिधी नावाच्या छापखान्यात दगडी खिळचाच्या साहाय्याने छापण्याची सोय केली होती धन्वतरी महाल रुग्णालयामध्ये रोगी मोफत तपासून घेत, मोफत औषधाची सोय होती

याचे सरस्वती मदिर म्हणजे नुसते पुस्तकाचे वाचनमदिर नाही ते विद्या, कला याचे आगर आहे तो खजिना आहे. या अनमोल भाडारात ४० हजार ग्रथ आहेत भुर्जपत्रावरील, ताडपत्रावरील सस्कृत, तमिळ, तेलगू हस्तलिखिताचा साठा आहे हाताने बनवलेल्या कागदावरील मराठी हस्तलिखिते, मोडी भाषेतील १५०० दुर्मिळ ग्रथ, ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारताच्या पोथ्याही जपल्या आहेत काळाच्या उदरात हे वैभव नामशेष होईल म्हणून Microfile करून ठेवले आहे

एखाद्या पिरॅमिडसारखे असलेले बृहदीश्वर मदिर म्हणजे स्थापत्यकाराची कमाल म्हणावी एक हजार मागच्या राजराजेश्वर चोला या राजाने मदिराची कोनशिला बसवली. पण याच्या हयातीत काही हे मदिर बाधून झाले नाही तीन पिढ्या सपल्या, पण ते या नावाला जागले ते आपल्या स्वामीचे राजराजेश्वर हे नाव लेवून उभे आहे.

एक दिवस राजाला स्वप्न पडले नर्मदा नदीतून एक अशी ठेव वाहून येईल, ती तू पूज तुला पाहिजे ते देवत्व ते असेल '

आणि वाहून आला दगड, पण राजा नाउमेद, निराश झाला नाही त्याने अत चक्षूनी तो दगड लिगरूपात पाहिला आणि त्याला तसा आकार दिला हे लिंग २३ फूट घेराचे आणि पाच फूट उचीचे होते अर्थात त्याला वास्तूही तशीच हवी होती आणि राजाने हे शिवालय बाधले

मदिराला दोन अगणे आहेत एक ५०० फूट लांब, २९० फूट रुद तर दुसरे

त्याहूनही मोठे ८५० फूट लांब, ४९० फूट रुंद त्याशिवाय अर्धमंडप, महामंडप, नृत्यमंडप, वाद्यमंडप हे आलेच ही अशी प्रचंड दालने मनावर दडपण आणतात

मंदिराभोवतीची प्रचंड भिंत २०३० नंदींनी सजलेली आहे आणि एका प्रचंड खंदकाने भिंतीला वेटोळे घातले आहे

दक्षिणेत मंदिराची गोपुरे ही ' अंगापेक्षा बोंगा जड ' अशी असतात, पण या मंदिराचा आकार जरी प्रचंड चौकोनी असला तरी गोपूर सुबक, सुंदर, फक्त ९० फूट उंचीचे आहे

गर्भगृह दुमजली आहे तेच ५० फूट उंच आहे गर्भगृहावर १९० फूट उंचीचे १३ मजली विमान आणि वर तांब्याचे, अखंड पाषाणाच्या घुमटावरचे शिखर तर आपले आकाशाशी नाते जाहीर करते या प्रचंड गोपुरावर एकाच दगडाच्या कळसावर एक प्रचंड पत्थर या प्रचंड पत्थराप्रमाणेच आपल्याही मनात एक प्रचंड विचार येऊन उभा राहतो आणि प्रत्येकाच्या मनातली ही शंका चाणाक्ष गाईडच्या ध्यानात आलेली असते आणि ती तो उकलून सांगतो

गोपुराच्या उंचीपर्यंत तीन–चार मैलांचा चढणीचा रस्ता केला गेला होता आणि त्यावरून हा पत्थर घरंगळत वर नेण्यात आला पिरॅमिड बांधण्यावेळी इजिप्तमध्ये हेच तंत्र वापरले होते दक्षिणेत मेरू पर्वत नाही ही उणीव राजाच्या मनात भरून होती

म्हणूनच या मंदिराला दक्षिणेचा मेरू म्हणतात

यजमान बडा असला की त्याचे सगेसोयरे सगळेच बडे मोठ्याचे सगळेच मोठे

मंदिरासमोरील द्वारपाल १८ फूट उंचीचे आणि दारातला नंदी १२ फूट उंच आणि २० टन वजनाचा विशालतेत याचा दुसरा नंबर लागतो म्हणे ! तरी हा नंदी कणाकणाने मोठा होत होता कदाचित हा आढे तोडून–मोडून बाहेर निघायचा. मालकालाच घेऊन परदेशी व्हायचा मग त्यावर उपाय करण्यात आला त्याला जायबंदी करण्यात आले त्याच्या पाठीत शिक्षा म्हणून खिळा ठोकण्यात आला, गाईड म्हणाला

पण याचे मोठेपण शारीरिक नाही काळ्या पाषाणातला हा नंदिकेश्वर रेखीव, अतिशय सुंदर, प्रमाणबद्ध आहे तो आताच घुंघरू वाजवीत उठेल पाठी-वरची झोळ फाकडील आणि पार्वती परमेश्वराला पाठीवर घेऊन देवळाला प्रदक्षिणा करून येईल

हे मंदिर जरी चोल राजाने बांधले तरी त्याचा कायाकल्प सरफोजी राजाने केला

मंदिराच्या दक्षिणेकडील ओवरीत भोसले घराण्याचा इतिहास याने कोरून

ठेवला आहे याचा तमिळ व इंग्रजी ११ पानांचा सारांश सरस्वतीमंदिरात आहे 'शिवाजी व अफजलखान एकास एक भेट झाली खानाने राजास चिरडून धरले आणि कमरेची कट्यार काढून ' आपण स्तब्ध होतो आपल्या अभिमानाचा पारा क्षणात खाली उतरतो, कारण चोल राजाच्या शिलालेखावर हे शिलालेख आहेत असे कळते वाटाड्या म्हणाला

आम्ही उद्वेगाने बाहेर आलो आणि कावेरीकाठी गेलो

नदी ही लोकसंस्कृतीची जननी ही कावेरी तर अगस्ती ऋषीच्या कमंडलूतून आलेली शुचितेचे हे माहेर आणि ही आपली मुळाला, नव्हे कुळाला जागत होती पाणी स्वच्छ होते

कावेरीवरचा 'ग्रँड ॲनिकट' हा चोल राजांनी बांधलेला आणि त्यावरचे आजचे पुतळे पाहिले होते ह्या कावेरीस रोखण्यास अडसर घातला, कारण ती आपले पात्र बदलून लोकांना धाय धाय रडवीत असे

एक ७०–७५ चे आजोबा-आजीचे अमेरिकन जोडपे इथे आम्हाला भेटले चांगली खुदखुदत होती हे लोक म्हातारपणाचा बाऊ करीत नाहीत या वयातही जीवनात रस घेतात गोवऱ्या गेल्या मसणात, पण म्हातारीचे लिपस्टिक गडद होते आणि म्हाताऱ्याचा स्कार्फ ही प्रपंचातली सुटका नव्हती, हा दुसरा हनिमून असावा

आम्ही हिंडत होतो हॉटेलच्या जवळच एक मांडव घातला एक रांगोळी काढली आणि त्यावर एक देवी पुजली गेली आम्ही परत आलो आणि पाहिले तर देवी नव्हती मांडवही गायब देवीला भक्ताचा भार नको होता की तिला भक्ताचा भरोसा नव्हता ? की या 'नवी पिढी' देवीला नवी विटी, नवा डाव मांडायचा होता ?

क्षुधा, तृषा, वसती हे नित्यकर्म, पण प्रवासात वसतीसाठी हॉटेल शोधायचे हे मुख्य कर्म असते आणि रामनाथपुरम्‌ला ते आम्ही करीत होतो गाव गरीब मिणमिण दिवे जळत होते आणि मध्येच एके ठिकाणी झगमगाट दिसला दारात गजबज दिसत होती रात्रीच्या अंधारात हॉटेल अशी पाटीसुद्धा आम्हाला दिसली

आत खाटा दिसल्या स्वच्छ असे पलंगपोस दिसले मच्छरदाण्या दिसल्या एकूण छान होते अवघडलेले पाय मोकळे करण्याकरिता मीही पाणदीकराबरोबर उतरले दारात पाऊल टाकले आणि रडण्याचा उडालेला कल्लोळ कानांत पडला आम्हाला जे हॉटेल वाटले होते, ते हॉस्पिटल होते कुणा बिचाऱ्याने शेवटचा श्वास सोडला होता

शेवटी रामनाथपुरम्ला आम्हाला हॉटेल मिळाले हॉटेल अशोक हे हॉटेल म्हणजे गुराचा गोठा होता संडास, पायखाना, घाण आढचाला कोळिष्टके या खोलीत रात्र काढायची ? सकट होते बिछान्यावरच्या ढेकणानी आणि डासाच्या गुणगुणाटाने झोपेचे अगदी खोबरे होऊन गेले

शेक्सपीयर म्हणतो नावात काय आहे ? तो जिवत नाही तरी त्याला विचारावेसे वाटते, नावात काय नाही ? दिलीपकुमार हा रगेल, कणखर युसुफखान शोभला असता, पण सजीवकुमारचे हरी जरीवाला हे नाव काय सिनेसृष्टीत शोभले असते ? अशोककुमारला नरेंद्र गांगुली म्हणून कुणी मानले असते ? आणि टुणटुण ही उमादेवी हे सांगितले असते तर घोटाळा नसता का झाला ? तेव्हा गुलाबाला कोणी कण्हेर म्हणू नये आणि गुलबक्षीने गुलाबाशी पैजा मारण्याची भाषा बोलू नये

दुसरा दिवस उजाडला डोळे कसकसत होते अग आंबून आले होते मन मात्र ताजेतवाणे होते ते धावू लागले होते

काशी व रामेश्वर हिंदू माणसाच्या जीवनाची दोन अगे रामेश्वरहून वाळू नेऊन ती काशीतल्या विश्वनाथाला चोपडायची आणि काशीतल्या गगेने रामेश्वरला स्नान घालायचे, पण हे नुसते कर्मकांड नव्हते आपल्या जाणत्यानी ही चार धामे वर, केदारनाथ खाली, हा रामनाथ डावीकडे, पश्चिमेला द्वारका आणि पूर्वेस जगन्नाथपुरी अशी ठेवली होती की त्यानिमित्ताने सारा भारत पाहून होत होता त्याशिवाय बारा ज्योतिर्लिंगे होती दत्तात्रयाची स्थाने होती अष्टविनायकाची देवळेही चोपन्न शक्तिपीठे होती

या हॉटेलात रात्रीचा आराम करून आम्ही पुढे जाऊ लागलो, पंबम पामबन खाडीवरचा पूल झाला नव्हता तो पडला होता रेल्वे पाण्यातून नाव चालावी तसा रस्ता कापीत होती आजूबाजूला काहीच दिसत नव्हते ना झाड, ना पेड कुणीचे दगड ही झुकझुक पाहून हसत होते

आम्ही मडपम्ला पोहोचलो हातात शख घेऊन कितीतरी लोक शखनाद करीत गाडीत शिरले शखावर राम, लक्ष्मण, सीता व पायाशी हनुमान अशी चित्रे रगवलेली होती आपण आपले नाव सागायचे रामेश्वरहून परत येताना नाव घातलेले शख हे लोक परत आणून देत

शेवटी आम्ही रामेश्वरला पोहोचलो

आता जणू वेगळे वाटतच नव्हते ही तर पायांखालची वाट होती सोनेरी वाळू झगमगता दर्या, पोफळीची, नारळीची झाडे, केळीची कुळागरे, सुकत घातलेल्या खारट मासळीचा हिवट वास आणि शेवग्याच्या फुलांचा घमघमाट

तोंडाला पाणी आणू लागला आणि हे पाहून शेजारचा विरक्त चाफा 'कुठला रामेश्वर आणि कुठली काशी' म्हणत कुत्सितपणाने हसत सुटला

रामेश्वर हे द्वीप बेट त्याचा आकार इथे मिळणाऱ्या पांचजन्य शंखासारखा. अकरा मैल लांब व सात मैल रुंदीचे हे बेट म्हणजेच शिवलिंग अर्थात इथे पेरीत नाहीत, पिकवीत नाहीत

रामेश्वर म्हणजे रामाने पुजलेला ईश्वर एका आर्य सम्राटाने, एका जेत्याने पुजलेला जिताचा देव याचे नाव रामनाथ रामनाड स्वामी

रावणाचा वध करून राम परत अयोध्येला चालला होता तेव्हा गंधमाधन पर्वतावरील ऋषींनी रावणवधाकरिता रामाला दोष दिला आणि शिवलिंगाची स्थापना केल्याने हे पाप नाहीसे होईल आणि रामाला मुक्ती मिळेल, अशी ऋषींची धारणा होती

रावण ही आर्यविरोधी सत्ता जर आर्यीकरण व्हायला पाहिजे तर रावणाचा वध व्हायला हवा होता आणि तो झाला होता एका सुविद्य, दशग्रंथी, दशकंठी ब्राह्मणाच्या हत्येबद्दल रामाचे मन त्याला खात होते राम पुरेपूर जाणून होता, हा विजय त्या लोकांमध्ये आपण फूट पाडून मिळविला आहे

आणि खरोखर रावण हा साधासुधा असामी नव्हताच विश्वस्त मुनींचा पुत्र, ब्रह्माचा नातू हा लंकाधिपती राक्षसराज बलाढ्य, शूर, पौरुषाचा पुतळा होता कुबेराचा पराभव करून त्याने त्याची लंका तर घेतली होतीच, पण त्याचे पुष्पक विमानही हिरावून घेतले होते इंद्रादी देव दाती तृण धरून होते नवग्रहांना पालथे घालून, त्यावर पलंग घालून हा झोपत असे त्याच्या राज्यात उत्कर्षाने कळस गाठला होता कला, संगीत, नृत्य, वैभव पराकोटीस पोहोचले होते सोन्याची लंका म्हणतात, त्याचा अर्थ हाच असावा

रावण हा उत्तम प्रशासक होता तो लोकशाही बाणवीत असे रामाबरोबर युद्ध खेळण्यापूर्वी त्याने मंत्रिगणांची, सभासदांची संसद सभा बोलावली होती

सेतू बांधण्याच्या वेळी रामाने यज्ञ केला, पण सीतेशिवाय तो अपूर्ण होऊ लागला, तेव्हा सीतेला घेऊन रावण स्वत इथे आला व त्याने पौरोहित्य केले, असे सांगतात

इतकेही असून रावणाचा पराजय झाला, याचे कारण रावणाचे गणगोत त्याला साजेल असे नव्हते रिकामी होडी किनाऱ्यावर हिंदकळत उरते, त्याप्रमाणे हा दशासन भरकटत गेला

भाऊ कुंभकर्ण हा आळशी होता खावे, प्यावे, झोपावे राम-रावण युद्धात घोडे खिंकाळू लागले, हत्ती चित्कारू लागले, शंख-दुंदुभी निनादू लागल्या, कानठळ्या बसू लागल्या, घनघोर युद्ध होऊ लागले, पृथ्वी कंपायमान होऊ लागली तरी हा

साखरझोपेत धुमाक्ष्य, वज्रदृष्ट, अवर्षण, वसतक, कुंभहनु, महानाद, सम्मवर हे महाबलिष्ठ राक्षस युद्धात मारले गेले तरी हा ढाराढूर झोपलेला

बिभीषण हा फितुर होता, घरभेदी होता शौर्य, पराक्रम नसलेल्या या कर्तृत्वशून्य, अवसानघातकी व निरर्थक बडबड करणाऱ्या माणसाने रावणाचे कधीही हित पाहिले नाही उलट त्याचे मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न केला सत्तेच्या लोभाने रामाला सामील होऊन त्याने रावणराज्यातली लष्करी गुपिते मात्र सांगितली एकत्र राहून एकटा राहण्याचे दु:ख या रावणाने भोगले, पण हा दशकंठी दशानन सगळ्यांना पुरून उरला असता तो एका नाजूक पाशात अडकला होता मंदोदरीच्या शब्दात सापडला होता, त्यापेक्षाही स्वत:च्या सदसद्विवेक-बुद्धीच्या

नाहीतर सीतेवर बलात्कार करणे त्याला कठीण का होते ? महापार्श्व राक्षस तर त्याला हे सतत सुचवीत होता

पण रावणाने हा अत्याचार, अनाचार कधीच केला नाही तिने आपल्याकडे स्वखुशीने यावे, आनंदाने रममाण व्हावे, असा रावणाचा आग्रह होता आणि याकरिता त्याने तिला वर्षाचा अवधी दिला होता त्याने तिला आपल्या महालात नेली नाही, तर तिला दूर अशोकवनात ठेवले होते

आपल्या अपहरणाबद्दल सीता त्याला नाही नाही ते बोलली. तिने त्याला दूषणे दिली, पण तिला त्याने शिक्षा केली नाही तिचा राग धरला नाही उलट तिला खूष ठेवावी, तिची प्रत्येक इच्छा पुरवावी, असा त्याचा सक्त आदेश होता इतका समंजसपणा, इतके सौजन्य रामाजवळ होते का ?

सीता या साऱ्या गुणावर लुब्ध तर झाली नसेल ? पण समाजपुरुषाने आखून दिलेल्या रेषेबाहेर जाता येत नाही दावणीला बांधलेल्या गायीसारखे परत यायला हवे नाहीतर सामाजिक मूल्याचा ऱ्हास होतो सीतेला वाटून गेले असेल हा माणूस थोडा आधी भेटायला हवा होता आयुष्याला शितलाई लाभली असती, पण आम्हा बायकांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे,

‘ सीता होऊन लिहावे, पुन्हा एक रामायण
नारीसाठी दोन नाही राम आणि रावण ’

आणि इतका शुचिर्भूत, पुलस्य, कुलसपन्न, वेदसपन्न ब्राह्मण आपण असत्याने मारला, दक्षिणेचा सम्राट आपण आपल्या स्वार्थाकरिता तुडवून टाकला तेव्हा दोष थोडा, पण जनतेचा रोष होईल, हे जाणण्याइतका रामराजा सुबुद्ध होता, धोरणी होता तेव्हा त्यांचाच देव जर आपण पुजला तर त्याच्याविषयी आदर दाखविल्या-सारखे होईल दोघामधला कडवटपणा नाहीसा होईल, कलह मिटेल, म्हणून त्याच्या जखमावर रामाने फुकरही मारली हे गुलाबपाणी शिंपडले

रामाने आणखी वेळ केला नाही त्याने तातडीने लिंग आणायला हनुमानाला कैलासावर पाठवले कैलास काही हाकेवर नव्हता हनुमानाला यायला वेळ झाला

असत्य हे अस्वस्थ असते रामाला एक पळ एक एक युग वाटू लागले आणि सीतेने केलेले वाळूचे लिंग त्याने पुजून टाकले तो हा रामनाड, रामेश्वर

हनुमान कैलासावरून लिंग घेऊन आला आणि रामाचा हा घायकुतेपणा पाहून चिडला त्याने शेपटीचा फास घालून लिंग उपटण्याचा प्रयत्न केला

देवळात चित्र कोरलेले आहे राम सीतेसह पूजा करतो आहे हनुमान सताप अनावर होऊन लिंगाला फास घालतो आहे आणि पूजा करताना राम त्याला स्निग्धपणे बघतो आहे, शातपणे समजावतो आहे, असा सताप, आततायीपणा चागला नाही, हा आक्रस्ताळेपणा आपल्याला आवडला नाही

आणि खरोखर मर्यादापुरुषोत्तम रामाने या भोळ्याभाळ्या, रागड्या वानराचे सात्वन केले त्याच्या लिंगाची प्राणप्रतिष्ठा केली या लिगाची प्रथम पूजा करावी, असा आदेश दिला

किती किती शतके झाली सागराच्या लाटा येत राहिल्या किती तरी वेळा भरती, ओहोटी या सृष्टीने पाहिली

नावाप्रमाणेच पराक्रमी असलेल्या पराक्रमी बाहू लकेच्या रावणाने इथून जात असताना एक साधू लिंगाची पूजा करीत असताना पाहिला आणि इथे मदिर उभारायचे राजाने ठरविले जिथे शिवलिंग होते, त्यावर गाभारा बाधण्यात आला खूप राजानी नतर त्याला हातभार लावला

काशी व रामेश्वर शिवाचे हे दोन नेत्र पण दोन्ही नेत्रामधे खूप फरक आहे काशीचे मदिर लहान आहे, पण रामेश्वरचे मदिर खूप मोठे आहे

या मदिराची पूर्व–पश्चिम लाबी ४९६ फूट व दक्षिण–उत्तर लाबी ६५७ फूट आहे बाहेरचा स्तभ तर ३३० फूट उच आहे महादरवाजा पश्चिमेकडून आहे आमच्या गोमतकातल्यासारखाच तो चादीचा आहे

पूर्वेचे नवताल गोपूर महाद्वारावरचे हे पाच मजली गोपूर अगदी शोभून दिसते उत्तर–दक्षिणेची गोपुरे अपुरी आहेत कित्येक शिल्पकार हे अपुरे काम करण्याकरिता वावरत होते

मदिराचा प्रदक्षिणामार्ग चार हजार फूट लांब आहे या ओवरीतून प्रदक्षिणा घालायला भक्तमडळीना पाऊण तास, तासभर लागतो आणि कुठल्याही कारणाने का होईना ही ओवरी मुद्दाम पाहावी हा देवालयाचा दागिना आहे, मानबिंदू आहे

ओवरीच्या बाजूला स्तभाची रागच राग आहे हे १२१२ स्तभ म्हणजे

प्रचड दगडी शिळा आहेत कॅडीच्या प्रदेशात एक विशिष्ट दगड मिळतो, त्यापासून हे स्तभ बनविण्यात आले

१८९७ साली स्वामी विवेकानदानी देवालयाला भेट दिली त्याची वचने कोरलेली आढळली

काशीहून आणलेल्या गगेने रामेश्वरला स्नान घालायचे आणि इथली वाळू नेऊन विश्वेश्वरला चोपडायची हे नुसते कर्मकाड नव्हते पर्यटनाला चालना मिळावी, त्यांत सुसूत्रपणा यावा म्हणून ही धर्माज्ञा होती

पण आम्हा करटचांना हे कळत नाही, या देवालयात २२ आड–बाव आहेत या लक्ष्मी, सरस्वती, गायत्री, कावेरी, गोदावरी अशी तीर्थे मानली जातात आणि आम्ही करटे शेजारच्या समुद्रात डुबण्याऐवजी या बावेत डुबक्या घेतो इथल्या पोराकडून या बावेतले पाणी बादलीने काढून आपले अग ओले करून घेतो

रामाचा झरोका ही जागा जवळच आहे सैन्यावर नजर ठेवायला ही जागा होती तशीच गधमाधन पर्वतावरून हनुमानाने लकेला जाण्याकरिता समुद्र पार करण्याकरिता रामाची अनुज्ञा घेतली या टेकडीवर रामाचे पाऊल दाखविले जाते

या प्रचड देवालयाचा नदी तितकाच प्रचड, २२ फूट लाब व ११७ फूट उच आहे होयसाळेश्वर, चामुडेश्वर, बृहदीश्वर यांच्या सेवकासारखा काळा नाही आपल्या स्वामीसारखा कर्पूरगौर आहे अगदी कपिला गाईचा पुत्र शोभतो चुना व वाळू यानी बनविलेला हा नदी अगदी लहान बाळासारखा निरागस वाटतो

या नदीची जीभ बाहेर आली आहे आतासुद्धा एक गवताची पेंडी दिली तर तो लाल लाल जिभेने खाऊन रवथ करील आणि ढेकर देईल अशीच थट्टा पूर्वी कुणीतरी केली म्हणे आणि याने खरोखरीच गवत खाऊन दाखविले

गोमतकातल्यासारखेच गर्भगृह चादीने मढवलेले, पण दारातला कुशीतला सिहमुखी स्तभ मात्र सोन्याने चकाकतो

एरवी शकर हा गरीब, स्मशानातला गोसावडा, पण यानी दक्षिणापथ ओलांडला की हे किती नखशिखात बदलून जातात याना आठवण उरत नाही त्याच्या चिताभस्माचे मग उटणे होते, कवटयाचे मोती होतात, सापाचे हिरेजडित रत्नहार होतात, तिसरा डोळा नीलमणी बनतो.

व्याघ्रचर्म सोडून, सोन्याचे शेले–शालू पाघरून, सोन्याची झूल पाघरलेल्या नदीवर बसून सप्तमातृका व गण याचे वऱ्हाड घेऊन हे पार्वतीशी लग्न करण्यास निघतात तेव्हा वाटते, हे दक्ष राजाने बघायला हवे होते

पण तरीसुद्धा हे महादेव जुनी सस्कृती जपायला बघतात सगळीकडे बिजलीचा लखलखाट आला तरी याच्या या मदिरात करजीच्या तेलाचे दिवे आणि नखशिखात अलकार लेवूनसुद्धा चेहऱ्यावर भस्मर्चचित वैराग्य पाण्यातल्या तेलाच्या

थेबासारखे हे अलग राहतात, अलिप्त राहतात

निलगिरीने एकदा हुलकावणी दिली होती, पण आम्ही आता शेंडी तुटो अथवा पारबी निलगिरी अनुभवून यायचाच असे ठरवले होते आणि आम्ही चालायला नव्हे, चढायला लागलो

निलगिरी हा एक पर्वत नाही हिमालयासारख्याच या पर्वतरांगा आहेत हिमालयापेक्षा जुन्या हिमालय जेव्हा जन्माला यायचा होता, तेव्हा या रांगा पोक्त्या पुरवत्या होत्या

या वेळेसही आमच्या मिनी बसने नखरेलपणा सुरू केला ती आडमुठेपणा करू लागली, पण तिला कधी दटावणी देत तर कधी तिची मनधरणी करीत आम्ही पुढे झालो तिची प्रकृती गरम झाली की आम्ही उतरावे, नरम झाली की झालोच आम्ही पुन्हा स्वार आणि मध्येमध्ये तिच्या नाकात वेसण घालून आम्ही पालनी पर्वताचा घाट ओलाडला

चालायचा त्रास नव्हता पुढे वाट खिदळत होती भर दुपार होती तरी अंगात शिरशिरी भरत होती सिल्व्हर ओक, फर, पाईनची प्रचंड झाडे सूर्यकिरणाला आत जायला मज्जाव करीत होती उंच उंच युकॅलिप्टस, कॅझुरिनाची झाडे उन्हाचा कवडसा बाहेर पडू देत नव्हती रस्ता तर टिकल्याचा खेळ खेळत होता आणि मध्येच एखाद्या घरापुढची, दिवाळीतल्या दीपमाळेतल्या लटकणाऱ्या लोलकासारखी शेंदुरी लाल सत्री शेजारच्या झेंडूच्या फुलांना ' कोण सुंदर ' म्हणत खिजवत सुटली होती दोन्हीही सुंदर देवाजीने तुम्हाला निर्माण केले, तो दोन्ही हातानी देतो, डावे-उजवे करीत नाही, अशी आम्ही मध्यस्थाची भूमिका घेतली, पण त्याआधीच शेजारच्या रथवृंदाने, फरच्या झाडाने त्याना गळी पडून समजावले

आता मात्र आमची गाडी खरेच अडली आणि आम्ही रस्त्याच्या कुशीला जाऊन बसलो रस्त्यावरून गुराख्याची पोरे जात होती ती आम्हाला खुणा करीत काहीतरी सांगू लागली, दाखवू लागली ती भीक मागत नव्हती, काही मागत नव्हती

आणि आम्ही सहज मागे पाहिले आणि आम्ही दचकलो आमच्या मागची सरळसोट मोहाची झाडे मुंगळ्यांनी भरून गेली होती आमच्या शेजारूनही मुंगळ्यांच्या रांगा लागल्या होत्या मागे अगदी काळेकभिन्न वाटत होते अस्वलांना ही मोहाची फळे खाऊन गुंगी येते ती मोहाच्या फुलांवरसुद्धा लट्टू असतात माणसे तर नशेकरिता याची दारू पितात मग हे मुंगळेही झिंगले होते का ?

मेंढ्याचे, गुराचे कळप येतच होते फाटके-तुटके कपडे घातलेले आणि

त्याच्यामागून येणारे चिमुकले मेढपाळ केंदूच्या पानातून आणलेली काळी-तांबडी स्ट्रॉबेरी दाखवीत स्ट्रॉबेरी म्हणजे आमची 'आमोरां' होती एरवी या आंबटगोड आमोरांकडे आम्ही ढुकून पाहिलेही नसते, पण या आमोरांच्या मालकाकडे मात्र पाहावेसे वाटत होते आमोरांनी ओठ रंगवलेले आम्ही ती आमोरां घेतली आणि त्याच्या हातावर पैसे टिकवले ते हसले हसताना त्याचा चेहरा उजळला, दात चमकले ते म्हणत असावेत, 'हम काले हैं तो क्या, दिलवाले हैं हम तेरे तेरे तेरे चाहनेवाले हैं।'

आमचा कणखरपणा आणि गाडीचाही पारा खाली आलेला दोघांची दिल-जमाई झाली आणि आम्ही सिल्व्हर कॅस्केड या धबधब्याकडे वळलो शिकेकाई, तमालपत्र, वावडिंग, उंच उंच चंदन, जांभूळ, किंजळ, रानफणस, साग ताठ वृक्षांची मालिका सभोवती खडी तालीम देत होती

सभोवती कळकीचे रान माजले होते या तटबंदीच्या कुंपणानेच शेत खाल्ले होते या बांबूची एक जात अशी आहे की चोवीस तासात ती चार फूट वाढते एक आदिवासी आपली कुऱ्हाड विसरला तर ती त्याने कळकीच्या कोंभावर ठेवली होती दुसऱ्या दिवशी त्याने येऊन पाहिले तर ती दूर डोक्यावर गेली होती

शेजारीच निलगिरीची झाडे निळे निळे तुरे फुलारून अत्तराचे फवारे सोडीत होती सोनकीची पिवळी फुले आणि लाल लाल झेंडू एकमेकात मिसळून गेले होते आणि मधमाशांचा थवा गुंजारणे विसरून गेला होता एक खार मात्र हातातले फळ खातानासुद्धा टवकारून बघत होती

कोणत्याही झाडाचे वय त्याच्या बुध्यावरून मोजावे 'घेंगान वाढलो' म्हणून तो मोठा होत नाही हे सूचिपर्ण तुच्छतेने सांगत होता, पण हे सांगणे धबधबा मोठा आवाज करून ऐकूच देत नव्हता

इथे जवळच एक हॉटेल होते त्याजवळचा एक वळणाचा रस्ता आणखी वळणावळणाने झाडीत गडप झाला होता त्या कच्च्या रस्त्यावर एक लग्नाचे वऱ्हाड झाडाखाली बसले होते हे लोक भांडत कचाकचा बोलत होते बहुधा लग्नात मानपान नीट झाले नसावे

यातला नवरा आठ-एक वर्षांचा तर नवरी होती चार वर्षांची तिच्या कपाळावरचा मळवट नाकातोंडावर ओघळत होता ती झिपऱ्या सावरीत मध्येच भाकर खात होती, टुकूटुकू पाहत होती आणि डाव्या हाताने घामाबरोबरच शेंबूडही पुसत होती तिच्या मते हे लग्न, ही भांडणे हे मिथ्या होते या साऱ्या फजूल गोष्टी होत्या हातातला भाकरीचा तुकडा हे सत्य होते, ब्रह्म होते परमेश्वर येतो तो भाकरीच्या रूपातच येतो

ती काय बोलत होती ? का भांडत होती ? आम्हाला कुतूहल वाटले अशा

वेळी मात्र वाईट वाटते, एका भारताचे आम्ही लोक, पण भाषेमुळे आमच्यात दरी उत्पन्न होते शब्द मुके होतात भाषा वाझ ठरते अशा वेळी वाटते, स्पर्शाची भाषा चागली सादाची भाषा गोड पक्षी कसे चिवचिवून सांगतात पशू कसे ओरडून साद घालतात मुग्या कशा स्पर्शून एकमेकाशी हितगुज करतात

आम्ही त्या मुलीला खाऊसाठी पसे दिले त्या बद्या रुपयाची भाषा वेगळी होती ती व्यावहारिक भाषा सगळ्याना कळते

सगळा पर्वत लागवडीला आणला होता मका, सातू, वरी, नाचणी. खालची भाताची खाचरे, सोंगटचा कशी दिसत होती

खाली गडद व वर फिक्का पोपटी असे चहाचे मळे लागले पाढरी पाढरी फुले असलेली कॉफी हजेरी देऊ लागली कॉफीच्या मोहराचा घमघमाट मन बेचैन करू लागला

झाडांचा माडव घातल्यासारखा एकाच तऱ्हेच्या, एकाच अगलटीच्या, एकाच उचीच्या रेखीव रांगा जणू काय कवायतीला उभ्या असलेल्या सैनिकाच्याच रागा वाटू लागल्या आकाशाचा तुकडा दिसत नव्हता आणि खाली हे जाळे जीव गुदमरून जाऊ लागला

चिरा काढलेली रबराची झाडे उसासू लागली करवटीत एकेक थेंब जमा होत होता रक्ताचे पाणी नव्हे, चिक होत होता. ' जया अगी मोठेपण अशी समजावणी आणि थोडी दमदाटी देऊन आम्ही पुढे झालो आम्हाला रडगाणे नको होते आम्ही खुषीत होतो

कानठळ्या बसवणारे ढोल ऐकू येऊ लागले नगारे, ताशाचा खणखणाट कान बहिरे करू लागला किंकाळ्या, किचाळ्या ऐकू येऊ लागल्या फडफड पताका, उधळलेला गुलाल, देवीचा मुखवटा आणि खाली वस्त्र असे तरग अब्दागीर, पाठमोरे, सामोरे झेलकाडत येऊ लागले गदारोळ उठला काळ्या माणसांचा समुद्र जवळ येऊ लागला ती आदिवासींची मिरवणूक होती फट म्हणता ब्रह्महत्या आम्ही कडेला झालो

गुलाल फासलेले पाचसहा रेडे आणि त्याच्यामागोमाग एक गुलाल फासलेला, लाल लाल डोळ्याचा यमधर्मासारखा बलदड पुरुष छाती पुढे करून चालला होता. त्याच्या पाठीला गरे टोचलेले होते आणि या गऱ्याना टोचलेली साखळी देवाच्या रथासारख्या एका गाडीला जोडलेली होती गाडी निमूटपणे त्याच्या मागून जात होती

या गाडीच्या पुढे-मागे दहा—बारा वर्षाच्या, मळवट भरलेल्या, अगावर फक्त एक मुडक फडक कमरेला खोवलेले, केसात कडुनिबाचे ढाळे खोचलेले, अशा मुली घुमत होत्या वातावरण झपाटलेले होते कुशीची आडव्या फाद्या पसरवलेली,

काळ्या बुंध्याची झाडे चेटूक झाल्यासारखी भयचकित झाली होती

रेडा म्हणजे यमदूताचे वाहन आणि त्यात गुलाल फासलेला रेडा जास्त भीतिदायक, बीभत्स वाटतो, पण हे वेगळे लोक यांना रेडा म्हणजे सर्वस्व, रेडा म्हणजे सपत्ती, रेडा म्हणजे उबारा घरात रेडा असल्याशिवाय त्याना चैन नाही तो म्हणजे घरदाजपणा जन्माला रेडा, मरणाला रेडा, देवदेवस्कीला रेडा हवाच

नीती म्हणजे काय ? परपुरुषाचा नुसता स्पर्श झाला तर थोडीकडे स्त्रिया आगीत गेल्या आहेत, तर थोड्या जमातीत आपल्या बायकोला पाहुण्याच्या सेवेला दिले जाते, सेजेला दिले जाते आणि त्याने जर तिला नाकारले तर तो अपमान समजला जातो

स्वैराचार मग असा स्वेच्छाचार होतो एका सस्कृतीत व्यभिचार म्हणवलेली गोष्ट दुसऱ्या सस्कृतीत शिष्टाचार, सुआचार ठरते

या लोकात उरळी नावाची जमात पाश्चात्त्य सुधारकावर कडी करते याच्यात आपापसांत बायकाची अदलाबदल होते आणि कौतुकाची गोष्ट अशी, ती पाहिजे तेव्हा, तिच्या इच्छेने नवऱ्याच्या घरी परतते

परिस्थिती माणसाला घडवते की माणूस परिस्थितीला हा वाद अलाहिदा आहे. जीवनाचे वस्त्र निरनिराळ्या धाग्यानी विणलेले असते विचित्र धाग्याचा गुताडा झाला मनात वासना दडवलेला.. नैसर्गिक वासना कोंडून ठेवणारा माणूस मग माणूस राहत नाही तो पशू होतो, याकरिता असा निचरा व्हावा लागतो

या इथल्या रहिवाशाप्रमाणेच इथल्या मातीतच, निसर्गातच चमत्कार आहे आम्ही गेलो त्या वर्षी कोडायमध्ये ' कुरुजी ' नावाच्या झाडाना बहर यायचा होता बीज उमलले होते, अकुरले होते. एखाद्या देवकेळीच्या झाडासारखे रोपटे साधेसुधे, तशाच मुळाशी गाठी, कद, पण फुले अनुपम, अप्रतिम हा बहर सात-आठ महिने टिकणार होता

कुठलेही बीज एका वर्षाने उसवते थोडी तीन वर्षांनी मातीतून डोकी वर काढतात, पण या कुरुजीला कितीही पाणी घाला, ही भूमिकन्या एका तपाने वनवासातून घरी येणार

आता पुन्हा आमची गाडी सतापली आणि परत आम्ही कडेला जाऊन बसलो मुगळधाचा अनुभव होता आम्ही इथे–तिथे पाहू लागलो तो भित्यापाठी ब्रह्मराक्षस!

मागच्या एका झाडाला दोन हिरव्या सापाची कलेवरे खिळे टोचून अड-कवलेली होती असेल काहीतरी अघोरी करणी देवदेवस्की असे आम्हाला

वाटले खरे, पण नतर कळले, ही क्रूर करणी आदिवासीची नव्हती, तर ' मॉड ' शहरी जगाची होती या सगळ्या कारभारातून कातड्याची एक सुदर बॅग परदेशी महिलेच्या हातात येणार होती अथवा एखादा पुरुष त्याचा कमरपट्टा घालून मिरवणार होता

कोणता धदा कसा फोफावतो, तेजीला येतो आपल्याला माहीत आहे काय? परदेशात आज मानवी कवटयाना मागणी आहे आणि भारत, ब्रह्मदेश, नेपाळ ही आशियाई राष्ट्रे हे पुरवतात त्याकरिता स्मशाने उकरली जातात, नदीतून वाहणारी प्रेते अडवली जातात आणि हाताशी आहेच तर बाकीचे अवयवही सोलले जातात मागणी तसा पुरवठा होतो

शेवटी आम्ही सात हजार फुटावरच्या कोडाईकॅनलला पोहोचलो आणि तळयावर ऊन खात बसलो शाली, स्वेटर्स घातलेले पर्यटक आमच्यासारखेच पहुडले होते कुणी बोटिंग करीत होते, कुणी पत्त्यांनी खेळत होते, कुणी खात-पीत होते

तळयाच्या पाण्यात पडलेल्या छाया त्याला आणखी गडद बनवीत होत्या कमळे फुलली होती कुशीने केगदी उसवली होती मासळीने सुळकी मारली की उडणारे थेंब सूर्याच्या प्रकाशात पाचूसारखे चकाकत होते

वातावरणात सगळीकडे आनद, उत्साह होता एक भुगा उड्या मारीत म्हणत होता, ' जिंदगी एक सफर सुहाना यहाँ कल क्या हो किसने जाना ' एक प्रचड उच्च खडक कापून ठेवल्यासारखा एक कडा मात्र हे गूढपणे पाहत म्हणत होता

दुसऱ्या दिवशी आम्ही सात वाजता उठलो, तरी धुके अजून पृथ्वीला कवटाळून बसले होते कोडाईवरची झाडे-झुडपे, झोपड्या गुल होत्या रस्त्याने गट्टी फू केली होती फक्त डोंगरावरच्या फुलाचा धुद सुगध आणि पाखराची किलबिल रगत निर्माण करीत होती हिरव्यागार झाडाचे ओले लावण्य मनाला ताजगी देत होते निलगिरीची झाडे आणखी निळी झाली होती ' झाडे झाली निळी निळी ' बोरकराना ही कविता इथेच सुचली का ?

बाजूच्या गर्द झाडीत एक मधुचद्री युगुल निवात, नि:शब्द बसून धुद डोळ्यानी हे पिऊन घेत होते

हळूहळू सूर्याचा लाल गोळा राणीवशात येऊ लागला स्वप्नील धुके तर पृथ्वीला सोडायला तयार नव्हते एक लोककथा कानात येऊन गुणगुणू लागली

पृथ्वीचे खरे प्रेम आकाशावर पण तिचे लग्न झाले पृथ्वीचे सकाळ-सध्या-काळ सूर्याकडे होणारे मिलन पाहून आकाश रागाने लाल होते, चिडते, तळमळते आणि रडून घेते प्रियकराच्या दहिवराने भिजून पृथ्वी चिंब होते

आयुष्यात लक्षात उरण्यासारखा एक प्रसग इथे आम्हाला दिसला आणि

आम्ही गाडी थाबविली

एका प्रचड झाडाच्या आड दोन अस्वले एकमेकाशी बोचकारत होती खाकरत, शिकरत, आपला अवजड देह साभाळीत ती एकमेकाशी भिडत होती. कुशीला सात-आठ माणसे होती, ती त्यांना प्रोत्साहन देत होती, भाडण्यासाठी उत्तेजन देत होती

आता शेवटचा थाबा होता पेरियर अभयारण्य कुमळी, जे गाव अर्धे तमिळनाडू व अर्धे केरळमध्ये आहे, त्या गावावरून आम्ही सकाळी-सकाळी निघालो

रस्ता हिंदकळत होता नारळी-पोफळीच्या कुळागरातून, हिरव्या हिरव्या शेतातून आम्ही चाललो होतो मध्येच सारवलेल्या अगणात ओल्या पोफळीचा सडा दिसत असे आणि उन्हे अजून आली नव्हती तरीही पांढरे मुडू नेसलेले पुरुष व तसेच मुडू आणि ढगळ पोलके घातलेल्या स्त्रिया पायानी ते सारताना दिसत

कोट्टायम लागले रबर, केळी, काळ्या मिरीचे वेल, विड्याची पाने, वेलदोडे दिसू लागले काथ्याचे छोटे छोटे उद्योगही दिसायला लागले पायपुसणी, दोऱ्या, सुभ ही रस्ताच घर समजली असावीत आमचा टेंपोही तऱ्हेवाईक तो त्याना तुडवीत सरळ निघाला

छोटचा छोटचा तळ्यातून कमळे अजून पेगत होती आणि एक अधीर भृग त्याना 'किचमीत' कुस्करत होता, पण ती त्याला न दुखवता साभाळायला शिकली होती, पण हा चेकाळल्यासारखा केगदीच्या फुलांकडे धावला केगदीने काटचानी त्याला फटकारले असावे हा दुखावलेला परत कमळांच्या गळचात पडला

थेकडी गाव लागले एक सीरियन चर्च लागले तसेच वेगळचा धाटणीचे

सहा मैलावरची पम्मी व कुकडी ही धरणे दिसू लागली पर्वतमाथ्यावरचे छोटे छोटे धबधबे मध्येच कोलांटचा खात, मध्येच थबकत, मध्येच धावत सुटत आणि मध्येच चमचमू लागत

छोटचा छोटचा वळणांवर वनखात्याचे फलक दिसू लागले, 'सुदर माझा गोवा हिरवा राखून ठेवा '

उतरणीवर पसरलेले चहाचे मळे दिसू लागले मेढयाच्या केसासारखी कापलेली चहाची रोपटी आणि मध्ये गुराख्यासारखे उगवलेले झाड दिसू लागले

कॉफीच्या फुलाचा मोहोर घमघमत होता आणि इथे तिथे मिळेल तिथे उगवलेल्या चादणीसारख्या फुलाचा वास त्यात मिसळला होता

शेवटी आम्ही ' अरण्य निवास ' या सरकारी निवासामध्ये येऊन राहिलो.

तीन हजार फूट उचीच्या डोगरावर नैसर्गिक पाणी अडवून आठशे चौरस किलोमीटर जागेवर हा पाण्याचा साठा म्हणजेच हे अभयारण्य शेजारी टेकडी

आहे, जगल आहे, रानात साबर, हरणे, रानगवे, रानडुक्कर, हत्ती आणि तळचात असख्य पक्षी आहेत

सरत्या सध्याकाळी लाँचने आम्ही अभयारण्य पाहावयास गेलो तलावात वठलेली, वाळलेली झाडे होती त्यांवर बगळे, पाणकोबडे बसले होते झाडावर पक्ष्याचे थवेच्या थवे किलबिलत होते, इथून–तिथून नाचत होते मध्येच ते गिरक्या घेत, झाडाचा झुला करीत, पाण्यात डुबक्या घेत, कलकलाट करीत परत झाडावर येऊन बसत

पाणी अगदी स्तब्ध, निवळ हिरव्या झाडाचे प्रतिबिब पाण्यात पडत होते चकवा झाल्यासारखे वाटत होते, आत झोकून द्यावे असे वाटले

लाँच एका टीकच्या झाडाकडे थांबवण्यात आली कडेचे गवत कापून ठेवण्यात आले होते, म्हणजे जनावरे सुलभ रीतीने दिसू शकतात

एक सांबर आले पायानी ढुश्शा देत राहिले एका रानडुकराने फेरी मारली दुसरा एक आला जमीन खणीतच राहिला मऊ दिसले की खणायचेच असते

हत्तीचे एक जोडपे धाकटयाला मध्ये घालून 'हम दो हमारा एक' या थाटात आले एकुलते एक असल्याने माणसाच्या पोराप्रमाणे ते लाडुबाई झाले होते मध्येच धप्प करून पडले धडपडत उठले आईबाप –

'सोळा वरसाच्या म्हकलेन उखललो करो
आनि आवय म्हूटा म्हजो कुसावो बरो'

अशा 'तोखणायेन' त्याला कुरवाळू लागले सोंडेने त्याचा गालगुच्चा घेऊ लागले धाकटेही मग लाडात आले सोंडेने आईबापाच्या अगावर पाणी उडवू लागले. आम्ही गुग सूर्य डोगराआड केव्हा गेला कळलेच नाही

'उदीर गेलो कोचिक' त्याने काहीच आणले नाही, पण फक्त मी खाऊन–पिऊन नाही आले, आणल्या आठवणी – त्या या शब्दांत गुफल्या आहेत

¤

मराठी ग्रं...
प्रवेश
क्र. ६४४
शाखा

REFBK-0026749

## आम्ही प्रकाशित केलेली काही प्रवासवर्णने

| | |
|---|---|
| आम्ही लमाण | उषा धाणदीकर |
| आज इथे उद्या तिथे | वि. स वाळिंबे |
| पश्चिम भ्रमण | डॉ उमेशचद्र तावडे |
| माझं लडन | मीना प्रभू |
| सुखाचे दिवस | रमेश मत्री |

## आम्ही प्रकाशित केलेली काही विज्ञानविषयक पुस्तके

| | |
|---|---|
| विज्ञानाचे शिल्पकार भाग-१ (सूक्ष्म जतुशोधक) | सौ शाता पेंडसे |
| विज्ञानाचे शिल्पकार भाग-२ ( ज्योति·शास्त्रज्ञ) | सौ शाता पेंडसे |
| विज्ञानाचे शिल्पकार भाग-३ (विद्युत् प्रकाश) | सौ शाता पेंडसे |
| विज्ञानमाला भाग १,२,३ | सौ शाता पेंडसे |
| कथारूप वैज्ञानिक | किशोर कुलकर्णी |
| ज्ञानदीप | निरजन घाटे |
| वसुधरा | निरजन घाटे |
| अवकाश | निरजन घाटे |
| इलेक्ट्रॉनिक्स | निरजन घाटे |
| पर्यावरण प्रदूषण | निरजन घाटे |
| ज्ञानज्योति | निरजन घाटे |
| विज्ञान आणि आपण | निरजन घाटे |
| टपाल तिकीटातून विज्ञान | प्रभाकर सोवनी |
| आई मला साग | ग ब ग्रामोपाध्ये |
| जगल गाथा | डॉ अनिल महाबळ |
| विपुलाच सृष्टी | श्री अ दाभोळकर |
| गणकयत्राचे अतरग | चद्रसेन टिळेकर |
| प्रश्नोत्तर गणकयत्र | चद्रसेन टिळेकर |
| वैज्ञानिक खेळणी | डी एस्. इटोकर |